म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७१०८०

गडी

मिर्ज़ा ग़ालिब

आणि त्याच्या उर्दू ग़ज़ला

REFBK-0010566

Goray

तमसो मा ज्योतिर्गमय
LEAD KINDLY LIGHT
पॉप्युलर प्रकाशन

६०२४३
१६८०
काव्य
२०/६/६९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५६८
मुंबई शाखा (स्थान प्रत)

मिर्झा गालिब

आणि त्याच्या उर्दू गज़ला

REFBK-0010566
REFBK-0010566

सेतुमाधव श्रीनिवास पगडी

तमसो मा ज्योतिर्गमय
LEAD KINDLY LIGHT
पॉप्युलर प्रकाशन

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

© पॉप्युलर बुक डेपो, १९५८

प्रथमावृत्ति
जुलै १९५८

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
ग. रा. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

प्रिय पत्नी

उषा

हिला....

७०२९३ काव्य
१९६० ८९/६१/१९

प्रस्तावना

उर्दू काव्यासंबंधीं महाराष्ट्रांत कुतूहल आणि जिज्ञासा ही असली, तरी मराठींत या विषयावर पुस्तकें हाताच्या बोटांवर मोजण्याइतकींहि नाहींत. उर्दू काव्यांतील गज़लप्रकार हा मराठींत अठराव्या शतकांत प्रविष्ट झाला असला, तरी तो खऱ्या अर्थानें मराठींत रूढ झाला तो कै. माधवराव पटवर्धनांच्या प्रयत्नांमुळेंच होय. असें असलें तरी उर्दू काव्याचा विस्तार, त्याची घडण आणि त्याचें वातावरण ह्याबद्दल महाराष्ट्रांत सर्वसाधारणपणें अज्ञान दिसून येतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. गालिब, इक्बाल, जोश, जिगर इत्यादि कवींच्या नांवाचा परिचय मराठी रसिकांना थोडाबहुत झाला आहे इतकेंच फार तर म्हणतां येईल.

उर्दू काव्यांतील त्रिमूर्ति म्हणजे मीर, गालिब आणि इक्बाल हे होत. त्यांतहि निवड करायची म्हटलें तर गालिबला उर्दूचा सर्वश्रेष्ठ कवि समजावा लागेल. त्याची उर्दू काव्यरचना विपुल नाहीं. आणि जी आहे तिचा बव्हंश गज़ल या पद्यप्रकारानें व्यापला आहे. पण गालिबनें जें कांहीं रचलें आहे तें उर्दू काव्यप्रांतांत अमर होऊन बसलें आहे. अशा ह्या थोर कवीचा आणि काव्याचा परिचय मराठींतून करून द्यावा हाच हेतु हा ग्रंथ लिहिण्याच्या मागें आहे. भारतीय भाषाभगिनींनीं परस्परांची ओळख करून घेणें हें भारतीयांच्या भावनात्मक ऐक्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे. त्या दृष्टीनें सध्यां देशांत प्रयत्न चालू आहेत. ह्या प्रयत्नांना ह्या अनुवादानें हातभार लागेल अशी आशा आहे.

गालिबच्या उर्दू गज़ला मराठींत देतांना, सर्वसामान्य वाचकांना उर्दू शब्दांचे उच्चार, सध्यां होतात तसे करणें सुलभ जावें, हा प्रयत्न करण्यांत आला आहे. उर्दूंत बरेच शब्द निरनिराळ्या प्रकारें उच्चारले जातात. उदाहरणार्थ, यौं, यूं; यह, ये; वह, वो; गरां, गिरां; चरागां, चिरागां; महब्बत, मुहब्बत. त्यामुळें ह्या ग्रंथांत बरेच शब्द निरनिराळ्या प्रकारें लिहिलेले आढळतील. उर्दू कविता आज कशी म्हटली जाते, ह्याची कल्पना मराठी वाचकांना ह्यावरून येईल.

गालिबच्या गज़लांचें भाषांतर करणें हें किती अवघड आहे ह्याची कल्पना प्रत्यक्ष काम हातांत घेतल्यानंतर येऊं लागली. उर्दू काव्याची बैठक फारसी कल्पना, संकेत, शब्द-प्रयोग आणि वाक्संप्रदाय यांवर आधारली आहे. जाळें (दाम), पारधी (सय्याद), घरटें (आशियाना), वीज (बर्क़), धान्याची रास (खिर्मन), बुल्बुल, व फूल (गुल), कुमरी पक्षी आणि सुरूचें झाड, आरसा आणि पोपट यांचे परस्पर संबंध, प्रिया (यार, माशूक़, दोस्त, महबूब), तिची मैफिल (बज़्म, मजलिस), प्रतिस्पर्धी (ग़ैर, रक़ीब), असे एक ना दोन, कितीतरी संकेत फारशींतून उर्दूंत आले आहेत. मदिरा आणि मदिरापात्र यासंबंधीं, शराब, मय, दो आतिशा, बादा, जाम, सागर, मीना, खुम, इत्यादि अनेक शब्दांचा

वापर आपल्याला आढळतो. मध्यपूर्वेचा इतिहास आणि दंतकथा ह्यांतील, शीरीं फरहाद, लैला मजनूं, यूसफ जुलेखा ह्यांचाहि सर्रास उपयोग उर्दू कवि करतात. गालिबच्या उपमा गुंतागुंतीच्या आहेत. त्यांत फारसी शब्द सढळ हातानें वापरण्याकडे त्याचा कल दिसून येतो. त्याच्या काव्यांत आढळणाऱ्या फारसी शब्दांची यादी केली तर एक हजाराच्या वर भरेल. आतां रूढ असलेल्या उर्दू बोलभाषेंत यांपैकीं बरेच शब्द वापरीत नाहींत. ह्यामुळें भाषांतर शब्दशः केलें तर तें दुर्बोध होईल असें वाटलें म्हणून कांहीं ठिकाणीं, भावार्थ दिला आहे, कांहीं ठिकाणीं दंतकथांची माहिती अनुवादांतच दिली आहे. फार्सी उर्दू न येणारा, पण उर्दू काव्याची बैठक तरी कशाप्रकारची आहे ह्याबद्दल जिज्ञासा आणि कुतूहल बाळगणारा, सामान्य मराठी वाचकवर्ग आहे. त्याची जिज्ञासा पूर्ण करतां यावी हाच हेतु हा अनुवाद करतांना मी समोर ठेविला आहे. हा प्रयत्न कितपत यशस्वी झाला आहे हें ठरविण्याचें काम रसिकांचें आहे.

ज्यांनीं ह्या कामांत मला प्रोत्साहन दिलें आणि अनेक उपयुक्त सूचना केल्या त्यांत, उर्दू संशोधनसंस्थेचे चालक प्राध्यापक नदवी, नागपुरचे सुपरिंटेंडिंग इंजीनियर श्रीयुत अंधारे, लोकसत्तेचे सहसंपादक विद्याधर गोखले आणि गोविंद तळवलकर, माझे मित्र कै. के. बी. जोशी या सर्वांचा मी ऋणी आहें.

सेतुमाधव पगडी

" सुशील ", आर्थर बंदर रोड
कुलाबा, मुंबई
१ जुलै, १९५८

सेतुमाधव श्रीनिवास पगडी हे मराठवाड्यांतील, वाङ्मय, इतिहास व समाजशास्त्र ह्या विषयांचे गाढे अभ्यासक म्हणून विद्वज्जनांत ओळखले जातात. ते बहुभाषाकोविदही आहेत. मराठी व इंग्रजी ह्या भाषांव्यतिरिक्त कानडी, तेलगु, हिंदी, बंगाली, फार्सी, उर्दू, गोंडी, कोलामी ह्या भाषाही त्यांना चांगल्याच अवगत आहेत.

पगडी ह्यांचें घराणें मूळचें श्रीक्षेत्र वांई येथील. उत्तर–पेशवाईतील स्वाऱ्यांच्या निमित्तानें त्यांचे पूर्वज कर्नाटकांत स्थायिक झाले. श्री. सेतुमाधवराव ह्यांचा जन्म ता० २७ ऑगष्ट १९१० मराठवाड्यांत निलंगा ह्या गांवीं झाला. पुणें येथील न्यू इग्लिश स्कूलमधून ते मॅट्रिक झाले. त्यांचें उच्च शिक्षण काशी व अलाहाबाद येथें झालें. हिंदु युनिव्हर्सिटीचे ते बी. ए. असून अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे ते 'राज्यशास्त्र' ह्या विषयाचे एम्. ए. आहेत. ह्या दोन्ही परीक्षा ते पहिल्या वर्गात पहिल्या क्रमांकास उत्तीर्ण झाले.

महाविद्यालयीन अभ्यासक्रम आटोपल्यावर हैद्राबाद राज्यांत त्यांनीं नोकरी धरली. मामलेदाराच्या जागेवरून शिक्षणखात्याच्या सचिवाच्या जागेपर्यंत ते वाढत गेले. सध्यां ते मुंबई राज्यांत शिक्षणखात्याचे नायब सचिव म्हणून काम करीत असतात.

गेल्या वीस वर्षांत त्यांनीं विपुल ग्रंथरचना केली आहे. 'उषा,' 'अलकनंदा,' 'अशोकाचीं पानें' हे तीन लघुकथासंग्रह, 'त्रिलिंग देशांतील दैनंदिनी' हा निबंधसंग्रह, 'मराठवाड्यांतील आधुनिक कविता,' 'मराठवाड्यांतील गद्यवाङ्मय,' हे समीक्षणात्मक लेखसंग्रह, 'वरंगळचे काकतीय राजे,' 'सूफी संप्रदाय,' 'हैद्राबादच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास' हे ऐतिहासिक ग्रंथ, असे नऊ ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत. मराठीप्रमाणेंच इंग्रजींतही त्यांनीं लिहिलेले 'Among the Gonds of Adilabad' 'Tribal Welfare', 'A Grammar of the Gondi Language', 'A Grammar of the Kolami Language' हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. "The Freedom struggle in Hydrabad (1800 – 1920) ह्या ग्रंथाच्या तिन्ही खंडांचें त्यांनीं संपादन केलें आहे.

मराठवाड्यांत मराठी भाषा व वाङ्मय ह्यांसंबंधीं अलीकडे जी एक नव्या उत्साहाची लाट उसळली आहे, तिला प्रेरक अशा ज्या कांहीं प्रमुख व्यक्ति आहेत, त्यांपैकीं श्री. पगडी हे एक होत. मराठवाडा साहित्यपरिषदेचे ते कांहीं काळ अध्यक्षही होते.

मिर्झा असदुल्लाखान गालिब ह्याचें उर्दू काव्यवाङ्मयांतील स्थान हें अद्वितीय आहे. गालिबचा मृत्यु होऊन आज जवळ जवळ नव्वद वर्षें होत आलीं, परंतु त्याची लोकप्रियता आणि त्याच्या वाङ्मयाचा अभ्यास ह्या गोष्टी अद्यापही यत्किंचित् सुद्धा कमी झाल्या नाहींत हे विशेष होय. त्याच्या काव्याचे आणि गद्याचे ग्रंथ त्याच्या हयातींत प्रकाशित झाले, इतकेंच नव्हे तर त्याच्या मृत्यूपूर्वी त्याच्या ग्रंथांच्या एकाहून अधिक आवृत्त्या निघाल्या. इतर कवींच्या मानानें गालिबला विलक्षण प्रसिद्धि आणि लोकप्रियता लाभून त्याला 'उस्ताद' म्हणजे कविकुलगुरु म्हणून त्याच्या हयातींतच त्याला मान मिळूं लागला.

मिर्झा गालिबची उर्दू आणि फारसी रचना विपुल आहे. त्याच्या फारसी कविता संख्येनें त्याच्या उर्दू कवितांच्या चौपट भरतील. फारसींत त्याची गद्यरचनाही बरीच आहे. तैमूर घराण्याचा सुरवातीचा इतिहास, १८५७ सालांतील घटनांच्या विविध आठवणी, फारसी पत्रपद्धतीवर चर्चा, फारसी कोशावर टीकात्मक लिखाण असें गालिबचें फारसी गद्य-लिखाण आहे. उर्दूंतील त्याचें प्रकाशित वाङ्मय म्हणजे त्याचा 'दीवान' ऊर्फ ग़ज़ल-संग्रह किंवा कविता-संग्रह आणि त्यानें लिहिलेल्या पत्रांचा प्रचंड संग्रह होय. त्याच्या पत्रांनीं उर्दू गद्याला सोपें आणि सुटसुटीत वळण लावलें. उर्दू गद्याच्या घटनेंत गालिबचें स्थान म्हणजे केवळ असाधारण आहे.

मिर्झा गालिबची उर्दू कविता तसें पाहिलें तर संख्येनें फार मोठी नाहीं. सुमारें सवा-दोनशें ग़ज़ला आणि पंचवीस-तीस कसीदा म्हणजे स्तुतिपर कविता, रुबाया आणि कांहीं प्रासंगिक कविता मिळून तीनएक हजार ओळी भरतील. इतका गालिबचा काव्यसंसार आहे. पण भाषेवरील विलक्षण प्रभुत्व, कल्पनांचा तरलपणा, उपमांचा मार्मिकपणा, मानवी जीवनाचें सूक्ष्म निरीक्षण, प्रेमाच्या निरनिराळ्या अवस्थांचें सखोल वर्णन आणि तत्त्वज्ञानपर विचार ह्यांमुळें गालिबच्या कविता उर्दूंतील इतर कोणत्याही कवींच्या काव्यकृतीपेक्षां उठून दिसतात खास !

असा हा अग्रगण्य उर्दू कवि इ. स. १८६९ सालीं पैगंबरवासी झाला. त्याच्या मृत्यू-नंतर त्याच्या ग्रंथांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आणि त्याच्या काव्यावर अनेक टीकात्मक ग्रंथ लिहिले गेले. गालिबच्या चरित्रकारांत सुप्रसिद्ध कवि अल्ताफ हुसेन 'हाली' ह्यानें लिहिलेलें 'यादगारे गालिब' हें महत्त्वपूर्ण होय. हालीला गालिबच्या सहवासाचा लाभ झाल्यामुळें

त्यानें लिहिलेल्या चरित्रांत जिव्हाळा आणि आत्मीयता आहे. ह्यानंतर डॉ. बिजनोरी, डॉ. अब्दुल लतीफ, महमद अक्राम इत्यादींनीं गालिबचें चरित्र आणि वाङ्मय ह्यांवर संशोधन-पूर्वक ग्रंथ लिहिले आहेत. अलीगढ, लखनौ, दिल्ली, हैद्राबाद इत्यादि ठिकाणीं गालिबच्या काव्याची चर्चा करण्याकरितां मंडळें असून अंजुमन तरक्की उर्दूनें गालिबसंबंधीं अनेक विद्वानांचे लेख एकत्रित करून प्रकाशित केले आहेत.

मिर्झा गालिबला इतकी प्रसिद्धि व लोकप्रियता कां लाभली, त्याच्या वाङ्मयांत कोणतीं वैशिष्ट्यें आहेत हें समजावून घेण्याकरितां त्याचा जीवनवृत्तांत समजून घेणें अत्यावश्यक आहे.

'गालिब' आणि 'असद' हीं मिर्झा असदुल्लाखान गालिब ह्याचीं कवितेंतील नांवें होत. गालिबचें घराणें हें मूळचें मध्य आशियांतील समरकंदचें. तें वंशानें तुर्क होतें. गालिबचा आजा कौकानबेग हा इ. स. १७५० च्या सुमारास आपलें नशीब काढण्याकरितां समरकंदहून हिंदुस्थानांत आला. दिल्लीला आल्यानंतर कौकानबेगला मोंगल लष्करांत हुद्दा देण्यांत आला आणि सरंजाम म्हणून एक परगणा पण देण्यांत आला.

कौकानबेगला बरींच मुलें झालीं. त्यांपैकीं प्रमुख म्हणजे अब्दुल्लाबेग आणि नसरुल्लाबेग. अब्दुल्लाबेगचें लग्न आग्रा येथील एक अधिकारी ख्वाजा गुलाम हुसेन कमीनदानची मुलगी इज्जतुन्निसाबरोबर झालें. ह्या अब्दुल्लाबेगचा मुलगा म्हणजेच असदुल्लाखान 'गालिब' हा होय.

कौकानबेगच्या मृत्यूनंतर अब्दुल्लाबेग आणि नसरुल्लाबेग हे आग्र्यास आले आणि तिथें त्यांनीं शिंदे सरकारच्या फौजेंत नोकरी पत्करली. अब्दुल्लाबेग हा आग्र्यांत फार दिवस टिकून राहिला नाहीं. त्यानें लखनौ, हैद्राबाद इत्यादि ठिकाणीं लष्करी कामगिरी बजावली. शेवटीं अलवार सरकारतर्फे लढत असतां तो एका किल्ल्याच्या वेढ्यांत कामास आला. त्या वेळीं गालिबचें वय अवघें पांच वर्षांचें होतें.

अब्दुल्लाबेगला तीन मुलें झालीं. सर्वांत मोठा असदुल्लाखान गालिब हा होय. त्याचा जन्म २७ डिसेंबर १७९७ रोजीं आग्रा येथें झाला. ह्याचा भाऊ मिर्झा युसूफ आणि छोटी खानम हीं त्याच्या पाठीवर झालीं. अब्दुल्लाबेगच्या मृत्यूनंतर ह्या साऱ्या भावंडांचें संरक्षण गालिबचा चुलता नसरुल्लाबेग ह्यानें केलें. हा प्रथम शिंदे सरकारच्या पदरीं आग्र्याचा मुख्य अधिकारी म्हणून राहिला होता. पुढें इ. स. १८०३ मध्यें इंग्रजांनीं मराठ्यांच्या-कडून आग्रा जिंकून घेतलें त्या वेळीं नसरुल्लाबेगनें इंग्रजांची नोकरी पत्करली. अलवारच्या राजाचा वकील नबाब अहमदबख्श ह्याची बहीण नसरुल्लाबेगला दिलेली होती. ह्या अहमद-बख्शाचे इंग्रज सेनापति लॉर्ड लेक ह्याच्याशीं मैत्रीचे संबंध होते. ह्या संबंधांमुळेंच नसरुल्ला-बेगला गोऱ्या फौजेंत चारशें स्वारांचा अधिकारी म्हणून नेमणूक मिळून स्वारांच्या सरंजामा-करितां म्हणून त्याला दोन परगणेही बहाल करण्यांत आले.

वरील गोष्टीनतर एक दोन वर्षांतच नसरुल्लाबेग पैगंबरवासी झाला. ह्या सुमारास नवाब अहमदबख्शला इंग्रजांच्याकडून फीरोजपूर झरक्याची जहागीर मिळाली. जहागिरीकरितां अहमदबख्शनें पंचवीस हजार रुपये दरवर्षी इंग्रज सरकारांत भरावयाचे असें ठरलें होतें. नसरुल्लाबेगच्या मृत्यूनंतर त्याच्या स्वारांचें पथक तोडण्यांत आलें. वेळप्रसंगीं पन्नास स्वारांचें पथक हजर करण्याची जबाबदारी अहमदबख्शनें आपल्याकडे घेतली. शिवाय नसरुल्लाबेगच्या मागें राहिलेल्या त्यांच्या कुटुंबीयांची व्यवस्था पाहाण्याचेंही अहमदबख्शनें आपल्यावर घेतलें. ह्याच्या मोबदल्यांत पंचवीस हजार रुपयांचा वार्षिक वसूल इंग्रजांनीं त्याला माफ केला. नसरुल्लाबेगला मिळालेले परगणे अहमदबख्शाच्या जहागिरींत मिळविण्यांत आले. ही व्यवस्था इ. स. १८०६ मध्यें करण्यांत आली. ह्या व्यवस्थेप्रमाणें स्वारांच्या पथकावर पंधरा हजार आणि नसरुल्लाबेगच्या कुटुंबीयांवर दहा हजार खर्च करण्याची जबाबदारी अहमदबख्शनें पत्करली.

अहमदबख्शाच्या घराण्याला अलवारच्या महाराजाकडून लोहारूचा परगणा जहागीर म्हणून मिळाला होता. अशा रीतीनें फीरोजपूर झरका आणि लोहारूच्या जहागिरीमुळें अहमदबख्शाचें घराणें दिल्लींतील उमराव घराण्यांत मोडूं लागलें. लोहारूचे नवाब ह्या अहमदबख्शाच्या वंशांतील होत.

मिर्जा गालिबचा बाप आणि चुलता ह्यांचे मृत्यु गालिबच्या लहानपणीं झाल्यामुळें छोट्या गालिबचा संभाळ त्याच्या आजोळीं झाला. त्याचा आजा गुलाम हुसेन कमीनदान ह्याचें घराणें सुखवस्तू लोकांत मोडणारें असल्यामुळें गालिबचें बालपण ऐषआरामांत गेलें. गालिबचें शिक्षण नजीर अकबराबादी व महमद मोअज्जम ह्या विद्वानांच्या देखरेखीखालीं झालें. ह्याशिवाय अब्दुस्समद नांवाच्या एका इराणी विद्वानाकडून आपल्याला ज्ञानाचा लाभ झाला असल्याचें गालिबनें नमूद केलें आहे. परंतु अब्दुस्समद ही व्यक्ति काल्पनिक असावी असें कित्येकांचें मत आहे. हिंदुस्थानांतील विद्वानांच्या फारसी ज्ञानाविषयीं गालिबचें मत चांगलें नव्हतें. पण आपलें फारशीचें ज्ञान इराणी विद्वानांच्या बरोबरीचें आहे हें दाखविण्याकरितां गालिबनें अब्दुस्समद ह्या इराणी गुरूचें काल्पनिक चित्र उभें केलें असावें असें अनेक संशोधकांचें मत आहे.

वयाच्या तेराव्या वर्षी गालिबचें लग्न नवाब अहमदबख्शचा भाऊ इलाहीबख्श ह्याची कन्या उमराव बेगम हिच्याबरोबर झालें. वर सांगितल्याप्रमाणें अहमदबख्श हा लोहारू आणि फीरोजपूर झरका ह्या जहागिरींचा नवाब असल्यामुळें ह्या श्रीमंत व प्रतिष्ठित घराण्याशीं गालिबचा विवाहसंबंध म्हणजे गालिबच्या दृष्टीनें सुयोगच होता. विवाहानंतर गालिबनें आग्रा सोडून दिल्लीला कायमची वस्ती केली. ह्यानंतर वीस-बावीस वर्षांचा होईपर्यंत गालिब हा आग्र्याला आजोळीं जाऊन–येऊन असे. आग्र्यांतील आपल्या आयुष्यासंबंधीं बरेच उल्लेख

गालिबच्या पत्रांतून आढळतात. त्यावरून गालिबचे तारुण्याचे दिवस आग्र्याला बरेच रंगेल-पणांत गेले असावेत असें दिसतें.

मिर्जा गालिबला कविता रचण्याचा नाद नऊ-दहा वर्षांच्या वयापासून सुरू झालेला दिसतो. काव्यरचनेस त्यानें उर्दूतून सुरवात केली. नंतर बारा-तेरा वर्षांच्या वयापासून त्याच्या फारसी काव्यरचनेला प्रारंभ झाला.

दिल्लीस आल्यावर नवाब अहमदबख्श, त्यांचे भाऊ इलाहीबख्श (गालिबचा सासरा) ह्यांच्या मार्फतीनें गालिबला दिल्लींतील बऱ्याच मंडळींच्या सहवासाचा लाभ होऊं लागला. त्या वेळीं दिल्लीच्या तख्तावर शहाआलमचा मुलगा अकबरशहा हा होता. प्रत्यक्षांत त्याची सत्ता लालकिल्ला आणि शहराचा कांहीं भाग ह्याच्या बाहेर नव्हती. तरीपण अकबरशहाच्या आश्रया-मुळें दिल्ली शहरांत विद्वान, साहित्यिक आणि गुणी माणसें जमा झालीं होतीं.

कविवर्यांत जौक, मोमिन, शहानसीर इत्यादि कवि, विद्वज्जनांत शहा अब्दुल अजीज, शहा इस्माइल, फजलेहक खैराबादी, टीकाकारांत नवाब मुस्ताफा खां शेफता ही मंडळी त्या काळांत दिल्लींत बरीच प्रसिद्धीस आली होती. राजवाड्यांत आणि शहरांतही ठिकठिकाणीं मुशायरे म्हणजे कविसंमेलनें होत, त्यांतून गालिबही भाग घेत असे. दिल्लींत आल्यानतर गालिबच्या कर्तृत्त्वाला विस्तृत क्षेत्र उपलब्ध होऊन त्याच्या कवितांचा सर्वत्र बोलबाला होऊ लागला. गालिबचें उर्दू आणि फारसी ह्या दोन्हीं भाषांवर असामान्य प्रभुत्व होतें आणि त्यानें ह्या काळांत दोन्हीं भाषांतून विपुल गद्य आणि पद्यरचना केली. गालिबचा मेहुणा अलीबख्श ह्याच्या विनंतीवरून गालिबनें इ. स. १८२५ मध्यें फारसी पत्रव्यवहार कसा करावा ह्यावर फारसींत एक छोटेंसें पुस्तक लिहिलें. पूर्वी चालत आलेली अलंकारिक भाषा टाकून देऊन सुटसुटीत, सोपी आणि सुबोध भाषा वापरण्याची त्यानें आपल्या ह्या पुस्तकांत सूचना केलेली आहे. ह्याच पद्धतीचा त्यानें पुढें आपल्या उर्दू पत्रव्यवहारांत वापर केला आणि उर्दू गद्याला वेगळें वळण लावून दिलें.

ह्याच सुमारास म्हणजे इ. स. १८२७ मध्यें गालिबला आपल्या पेन्शनचा निकाल लावून घेण्यासाठीं कलकत्त्याला जावें लागलें. त्याच्या कलकत्त्याच्या प्रवासाची हकीकत अशी —

गालिबचा चुलता नसरुल्लाबेग ह्याच्या मृत्यूनंतर त्याची जहागीर नवाब अहमदबख्श ह्यानें आपल्याकडे घेऊन त्याऐवजीं नसरुल्लाबेगच्या कुटुंबाचे योगक्षेम पाहाण्याची जबाबदारी आपल्याकडे घेतली. गालिब, त्याचा भाऊ मिर्जा युसूफ, वहीण आणि गालिबची आई ह्या सर्वांना मिळून वर्षाला तीन हजार रुपये मिळत असत आणि त्यांत गालिबच्या वांट्याला फक्त साडेसातशें रुपये येत. गालिबचें म्हणणें असें होतें कीं दहा हजारांचा करार ठरला असतां फक्त तीन हजार रुपये मुक्रर करणें हें अन्यायाचें होय.

त्यांतच अहमदबख्शच्या जहागिरीची वांटणी झाली. अहमदबख्शला तीन मुलें होतीं. प्रथम पत्नीपासून झालेला शमसुद्दीन आणि द्वितीय पत्नीकडून झालेले अमीनुद्दीन आणि जियाउद्दीन. शमसुद्दीनच्या वांट्याला फीरोजपूर झरका आणि अमीनुद्दीन व जियाउद्दीन ह्यांच्या वांट्याला लोहारूचा परगणा अशी एकंदर इस्टेटीची वांटणी झाली.

गालिबनें आपली पेन्शन वाढून मिळावी असा नवाबापाशीं प्रयत्न केला. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. शेवटीं कलकत्त्याला जाऊन खटल्याचा निकाल आपल्या मनासारखा लावून घ्यावा म्हणून गालिबनें इ. स. १८२६ मध्यें दिल्ली सोडली.

दिल्लीहून निघून गालिब प्रथम लखनौला गेला. लखनौला तो जवळ जवळ एक वर्ष-भर होता. त्या वेळीं लखनौच्या गादीवर गाजीउद्दीन हैदर हा बादशहा राज्य करीत होता. त्याच्या दरबारांत आपली पोंच व्हावी ह्याचा गालिबनें प्रयत्न केला; परंतु दरबारी लोकांच्या कुटिलपणामुळें त्यांत त्याला यश आलें नाहीं. परंतु लखनौचा सुप्रसिद्ध कवि नासिख ह्याच्या-बरोबर गालिबची ओळख झाली. ह्या काळांत त्यानें बऱ्याच फारसी आणि कांहीं उर्दू कविता रचलेल्या दिसतात.

गालिबनें २७ जून १८२७ रोजीं लखनौ सोडलें. तेथून कानपूर, बांदा, अलाहाबाद ह्या मार्गें तो बनारसला पोहोंचला. बनारसचें वातावरण गालिबला आवडलेलें दिसतें. आपल्या फारसी ग़ज़लांतून त्यानें बनारसचें मोठें आकर्षक वर्णन केलें आहे. एका पत्रांतून त्यानें असें म्हटलें आहे कीं, ‘ मी जर तारुण्यांत बनारसला गेलों असतों तर तेथून माझा पाय निघाला नसता. ’

बनारसहून निघून गालिब पाटणा आणि मुर्शिदाबादच्या मार्गानें २० फेब्रुवारी १८२८ रोजीं कलकत्त्यास पोहोंचला. तिथें पोहोंचल्यावर नवाब अहमदबख्शच्या मृत्यूची त्याला बातमी मिळाली. गालिबनें अहमदबख्शाचा मुलगा नवाब शमसुद्दीन ह्याच्या विरुद्ध खटला चालविला होता. पण गालिबनें आपला अर्ज तत्कालीन गव्हर्नर जनरलपाशीं रुजूं झाल्यावर अर्जाची चौकशी दिल्लीच्या एजंटामार्फत व्हावयाला पाहिजे असें दिल्लींतील आपला वकील हीरालाल ह्यास लिहिलें.

गालिबला बरेच दिवस कलकत्त्याला अडकून पडावें लागलें. पण चौकशी निकालांत निघण्याचा रंग दिसेना. अशा रीतीनें गालिबला आपल्या कामांत अपयश मिळण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. सुदैवानें गालिबला कलकत्त्यांतील उर्दू-फारसी विद्वानांच्या मैफिलींतून भाग घेण्याची नामी संधि मिळाली. कलकत्त्यांतील मुशायऱ्यांतून गालिबनें अनेक उर्दू आणि फारसी कविता म्हटल्या आणि त्याच्या काव्यगुणांबद्दल त्याची सर्वत्र वाहवा झाली. कलकत्त्याला बऱ्याच विद्वानांशीं गालिबचा संबंध आला. त्यांत अब्दुल कादर रामपुरी, करम हुसेन बिलग्रामी, नेमतअली अजीमाबादी, अकबरअली मुतवल्ली इमामबादा, सिराज अहमद इत्यादि

५ . . . .

प्रमुख होते. विशेषतः सिराज अहमदशीं गालिबचा फारसींतून बराच पत्रव्यवहार झाला. सिराज अहमदच्या सांगण्यावरून गालिबनें आपल्या उर्दू आणि फारसी कवितांचा संग्रह एकत्रित केला आणि त्या संग्रहाचें नांव 'गुलेराना' म्हणजे 'विकसित फूल' असें ठेविलें.

कलकत्त्यांत खटल्याचा निकाल लागत नाहीं हें पाहून गालिब २९ नोव्हेंबर १८२९ रोजीं दिल्लीस परतला. कलकत्त्यांतील दिवसांची गालिबला बरीच आठवण राहिली असें दिसतें. कलकत्त्यासंबंधीं त्यानें वर्णन केलेल्या खालील ओळी तर पहा——

कलकत्तेका जो ज़िकर किया तूने हमनशीं
एक तीर मेरे सीनेमें मारा के हाये हाये
वो सब्जा जार हाये मुतराके है ग़ज़ब
वो नाज़नीं बुतान खुदआरा के हाये हाये
सब्र आजमा वो उनकी निगाहें के हफ़ नजर
ताकत रुबा वो उनका इशारा के हाये हाये
वो मेवा हाये ताजा वो शीरीं के वाहवा
वो बादा हाये नाब गवारा के हाये हाये

हे मित्रा, कलकत्त्याचा तूं उल्लेख काय केलास! एक बाण माझ्या उरांत मारल्यासारखें झालें आहे. तेथील हिरवळी आणि उद्यानें, तेथील शृंगारून, नटूनथटून फिरणाऱ्या युवती, त्यांचीं मनें अस्वस्थ करणारी दृष्टि आणि शक्ति हरण करणारे त्यांचे संकेत, त्या शहरांतील सुंदर आणि मधुर फळें अन् तेथील उंची दारू! हाय हाय! काय काय म्हणून वर्णन करावें.

दिल्लींत आपल्या पेन्शनीसंबंधानें गालिबनें खटपट आरंभली. दहा हजार रुपये वार्षिक ठरले असतांना ती कमी कां करण्यांत आली हा मुख्य प्रश्न होता. ही रक्कम पांच हजारांवर आणण्यांत आली होती. ह्या पांच हजारांपैकीं पंधराशें नसरुल्लाबेगच्या कुटुंबियांना आणि पंधराशें गालिब आणि त्याचा भाऊ मिर्झा युसूफ ह्यांना आणि उरलेले दोन हजार रुपये ख्वाजा हाजीखां ह्याच्या वांट्याला अशी विभागणी करण्यांत आलेली होती. नवाब शमसुद्दीनचें म्हणणें असें कीं दहा हजारांचे पांच हजार सरंजाम माल्कमनें केले. गालिबचें ह्यावर म्हणणें असें कीं:फारसींतील तो ह्यासंबंधीं तयार केलेला हुकूमनामा बनावटी होय. पण माल्कम अजून हयात होता. त्याला विचारणा केली असतां लॉर्ड लेकनें ठरविलेल्या दहा हजारांच्या वर्षासनांत कपात करून पांच हजारांवर रक्कम आणण्याचा हुकूमनामा अगदीं खरा असल्याचें त्यानें सांगितलें आणि त्यामुळें गालिबच्या विरुद्ध निकाल लागून त्याला आजन्म मासिक साडेबासष्ट रुपयांच्या पेन्शनीवर समाधान मानून घ्यावें लागलें.

इकडे शमसुद्दीननें रेसिडेंटचें मन वळवून आपल्या भावाला मिळालेली लोहारूची जाहागीर वर्षासनाच्या मोबदल्यांत परत आपल्या संस्थानांत मिळवून घेतली. ह्याविरुद्ध अमीनुद्दीननें कलकत्त्यांत अपील दाखल केलें. नवीन बदलून आलेला रेसिडेंट फ्रेजर हा अमीनुद्दीनला अनुकूल होता असें दिसतें. गालिबनें पण अमीनुद्दीनला पाठिंबा दिला.

गालिबला आपल्या पेन्शनीच्या कज्ज्यांत कर्ज बरेंच झालें होतें. आपली पेन्शन वाढेल अशी त्याला आशा वाटत होती पण ती आतां साफ खुंटली होती. सावकारांनीं कर्ज-फेडीबद्दल त्याच्यावर खटला भरला आणि त्याच्यावर डिक्री आणली. आपल्याला अटक होईल ह्या भीतीनें गालिबनें कित्येक महिनेपर्यंत घरांतून बाहेर जाणें सोडलें होतें.

ह्याच सुमारास नवीन रेसिडेंट फ्रेजर आणि नवाब शमसुद्दीन ह्यांच्यांतील पूर्वीचे मैत्रीचे संबंध जाऊन त्याऐवजीं बिघाड निर्माण झाला होता. त्यांतूनच २२ मार्च १८३५ रोजीं फ्रेजरचा खून झाल्यामुळें दिल्लींत एकच खळबळ माजली. ह्या खूनप्रकरणाची रीतसर चौकशी होऊन त्यांत शमसुद्दीनवर आरोप सिद्ध झाला आणि त्याला ३ ऑक्टोबर १८३५ रोजीं फांशी देण्यांत आलें. नवाब शमसुद्दीनबद्दल दिल्लींतील जनतेंत सहानुभूति असल्यामुळें आणि गालिबचे नि शमसुद्दीनचे संबंध बरे नसल्यामुळें ह्या प्रकरणांतील चौकशींत गालिबचें अंग असावें असा दिल्लीवासियांना संशय आला आणि प्रतिकूल जनमताची झळ अशा प्रकारें गालिबला सोसावी लागली.

वाढतें कर्ज, लोकांची प्रतिकूल टीका ह्यांमुळें गालिबला बराच त्रास सहन करावा लागला. गालिबचें वैवाहिक जीवन विशेष सुखाचें होतें असें दिसत नाहीं. त्याला बरींच मुलें झालीं खरीं पण तीं वर्ष-सहा महिन्यांवर जगलीं नाहींत.

तरुण वयांत गालिबचें प्रेम एका नर्तकीवर बसलें होतें. परंतु हा प्रीतिसंबंध फार दिवस टिकला नाहीं. कारण थोड्याच दिवसांत त्या नर्तकीचा मृत्यु झाला. ह्या प्रसंगाचा उल्लेख गालिबनें चाळीस-पंचेचाळीस वर्षांनंतर लिहिलेल्या एका पत्रांत केला आहे. आपल्या ह्या प्रेयसीच्या मृत्यूवर त्यानें लिहिलेलें शोकगीत खरोखरीच हृदयद्रावक आहे. उदाहरण म्हणून खालील दोनच ओळी पहा—

शरमें-रुसवाईसे जा छुपना नकाबे खाकमें
खत्म है उल्फतकी तुझपर पर्दादारी हाये हाये

आपलें प्रेमाचें रहस्य बाहेर पडेल ह्या कल्पनेनें तूं आतां मातीच्या बुरख्याआड (मृत्यु) जाऊन लपलीस. आम्हीं पडदापद्धति पाहिली आहे पण तुझा हा पडदा म्हणजे हद्द झाली!

गालिबला मदिरेचें व्यसन होतें. रोजच्या रोज दारू प्यायला मिळाल्याशिवाय त्याला स्वस्थता वाटत नसे. माझ्यासमोर मदिरापात्र ठेवा आणि मग बघा माझ्या तोंडांतून शब्दसुमनें

७ . . . .

कशीं बाहेर पडतात तीं ! माझ्या हातांत शक्ति नसेल पण डोळ्यांत तर आहे ना ! मदिरेची सुरई अन् पात्रें माझ्या डोळ्यांसमोर अद्याप राहूं द्या कसे ! मदिरासेवनाचा आनंद कुणाला हवा आहे ! स्वतःला अन् जगाला विसरून जाण्यासाठीं मदिरा हवीच – असे कितीतरी उद्गार गालिबच्या काव्यांत आढळून येतात.

गालिबनें ह्याच सुमारास दिल्लीच्या दरबारांत प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं अकबरशहा नांवाचा बादशहा गादीवर होता. 'ज़फ़र' हा त्याचा युवराज. हाच 'ज़फ़र' पुढें बहादूरशहा ह्या नांवानें दिल्लीच्या गादीवर बसला. परंतु इ. स. १८३५ च्या सुमारास त्याचें युवराजपद काढून घेऊन आपला दुसरा मुलगा सलीम ह्याला तें पद मिळावें अशी अकबर-शहानें खटपट चालविली होती. कवि ज़ौक हा 'ज़फ़र' चा गुरु होता. सलीम युवराज होईल ह्या आशेनें गालिबनें एक कसीदा रचून त्यांत त्याची स्तुति केली होती. परंतु अक-बरशहाचे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत आणि शेवटीं अकबरशहाच्या मृत्यूनंतर इ. स. १८३७ मध्यें बहादूरशहा गादीवर आला. आपण राजपुत्र सलीम गादीवर येईल अशी आशा बाळगीत होतों परंतु त्याच्या ऐवजीं बहादूरशहाला गादी मिळाली ह्याची जाणीव होऊन गालिबला बहादूरशहाकडून आतां मदत मागण्यास संकोच वाटूं लागला.

अशा रीतीनें पेन्शनच्या बाबतींत आणि दरबारी आश्रयाच्या बाबतींत गालिबची भयंकर निराशा झाली. वैवाहिक जीवन नि संततीबद्दल दैव त्याला अनुकूल राहिलें नाहीं. मदिरेची संवय, खर्चिकपणा, कर्जदारांचा सततचा तगादा ह्या सर्वांमुळें गालिबची मनःस्थिति ह्या काळांत मोठी अनुकंपनीय झाली होती.

परंतु असें जरी असलें तरी त्याचें फारसी आणि उर्दू गद्य आणि पद्यलेखन चालूच होतें. त्याचा फारसी गद्य आणि पद्यसंग्रह इ. स. १८३७ मध्यें तयार झाला. त्याला त्यानें "मैख़ानये आरज़ू" (आकांक्षांचें मद्यालय) असें नांव दिलें. पण त्याचा मेहुणा अलीबख्श ह्यानें ह्या ग्रंथांतील गद्यभाग वेगळा केला आणि त्यांत गालिबनें वेळोवेळीं लिहिलेल्या फारसी पत्रांचा समावेश करून 'पंज आहंग' ह्या नांवानें वेगळा संग्रह इ. स. १८४० मध्यें तयार केला. हा संग्रह इ. स. १८५३ मध्यें छापला गेला. गालिबचीं फारसी पत्रें तत्कालीन प्रमुख व्यक्तींच्या नांवें लिहिलीं गेलेलीं आहेत. त्यांत नासिख, मोमिन, शेफ़्ता, नय्यर दरख्शान हे प्रसिद्ध कवि, मौलाना फज़्लेहक़, मौलाना सद्रोद्दीन, मौलाना विलायत हुसेन हे विद्वान आणि म्हैसूरचा राजपुत्र बशीरुद्दीन, राजपुत्र सुलेमान शिकोह, नवाब हिसामुद्दीन हैदर, सर जेम्स थॉमस, अलवारचे महाराज, नवाब सादुद्दीनखान, हकीम अहसनुल्लाखान इत्यादि बडी मंडळी होती. गालिबच्या पूर्व आयुष्यासंबंधी माहितीचीं साधनें म्हणून हीं पत्रें महत्त्वाचीं आहेत. वाङ्मयप्रांतांत गालिबचें महत्त्व दिवसेंदिवस किती वाढत होतें ह्याचा हीं सारीं पत्रें म्हणजे अत्यंत महत्त्वाचा पुरावा होय.

इ. स. १८४१ च्या ऑक्टोवर महिन्यांत गालिबचा उर्दू कवितांचा संग्रह सर सैय्यद अहमद (त्या वेळीं ते सर झाले नव्हते) आणि त्यांचे वंधू सैय्यद महमदखान ह्यांनीं आपल्या सैयदुलमताबे ह्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला. ह्या संग्रहाच्या प्रकाशनानें गालिबचा लौकिक उभ्या हिंदुस्थानांत सर्वत्र पसरला.

इ. स. १८४२ मध्यें दिल्ली कॉलेजमध्यें कांहीं नव्या नेमणूका करण्याचा सरकारनें विचार केला. हिंदुस्थान सरकारचे चिटणीस मिस्टर टॉमस हे ह्या कामानिमित्त दिल्लीस आले. गालिबचा लौकिक त्यांच्या कानांवर ह्यापूर्वीच गेला होता. त्यामुळें दिल्ली कॉलेजांतील फारसीच्या प्राध्यापकाची जागा त्यांनीं गालिबला देऊं केली. गालिब हा टॉमस साहेबाकडे भेटण्यास गेला असतां टॉमस आपल्या स्वागताकरितां बाहेर आला नाहीं ह्याचा विषाद मानून गालिबनें टॉमसनें दिलेली प्राध्यापकाची जागा नाकारली.

ह्या काळांतील मुशायऱ्यांतून गालिबनें फारसींतून कितीतरी कविता म्हटल्या. इ. स. १८२७ ते १८४७ पर्यंतच्या काळांत गालिबची फारसी रचना उर्दूच्या मानानें अधिक भरते. परंतु उर्दूतून काव्यरचना अगदीं बंद होती असें मात्र नव्हे. पण गालिबचा ओढा उर्दूपेक्षां फारसीकडे अधिक होता ह्यांत संशय नाहीं. इ. स. १८४५ मध्यें त्याचें फारसी दीर्घ-काव्य "अबरे गोहरबार" (मौक्तिकयुक्त मेघ) रचून झालें होतें. शहानामाच्या धर्तीवर महाकाव्य लिहिण्याची त्यांची इच्छा होती पण प्रास्तविक वंदना, प्रार्थना व साकीला आवाहन ह्याच्या पलीकडे गालिबची रचना गेली नाहीं.

इ० स० १८४७ मध्यें गालिबवर एक दुर्धर प्रसंग ओढवला. जून १८४७ मध्यें जुगार खेळण्याच्या आरोपावरून गालिबवर खटला भरण्यांत येऊन त्याला सहा महिन्यांची कैद आणि दोनशे रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यांत आली. शहरचा कोतवाल फैजुल हसनखां हा गालिबचा शत्रु होता. त्यानेंच गालिबवर हें संकट आणलें होतें. गालिब तीन महिने तुरुंगांत होता. नंतर इंग्रज अधिकाऱ्यांच्या शिफारसीवरून त्याची सुटका करण्यांत आली.

ह्या घटनेमुळें गालिबला अत्यंत दुःख झालें. ह्या काळांत त्याचे आप्त आणि मित्र म्हणविणारे त्याच्याशीं संबंध ठेवीनासे झाले, हें गालिबला विशेष जाणवलें. तत्कालीन सुविख्यात टीकाकार आणि कवि मुस्ताफाखां शेफता ह्यानें मात्र गालिबची ह्या प्रकरणांत मनःपूर्वक विचारणा करून त्याला बहुमोल मदत केली.

इ० स० १८४७ त तुरुंगांतून सुटून आल्यावर कालेशहा नांवाच्या मौलवी आणि पीराच्या मदतीनें गालिबचा बहादूरशहा ऊर्फ 'ज़फ़र' च्या दरबारांत शिरकाव झाला. काले-शहाला बहादूरशहा फार मान देत असे. त्याच्या सांगण्यावरून बादशहानें त्याला आपल्या नोकरींत घेतलें. तारीख ४ जुलै १८५० रोजीं गालिबला मिर्जा नजमोद्दौला दबीरुल्मुल्क

निजामजंग ही पदवी देऊन तैमुर घराण्याचा इतिहास फारसीमधून लिहिण्याच्या कामावर त्याची नेमणूक करण्यांत आली. हें काम गालिबला बादशहाचा वजीर हकीम अहसानुल्लाखान ह्याच्या शिफारसीवरून देण्यांत आलें. ह्याबद्दल वार्षिक मुशाहिरा सहाशें रुपयांचा ठरला.

गालिब आतां बादशहा बहादूरशहा ह्याच्या दरबारांत येऊ–जाऊं लागला. दरबारी मुशायऱ्यांतून भाग घेणें, बादशहासमोर स्तुतिगीतें म्हणणें, आणि तैमुर घराण्याचा इतिहास लिहिणें हीं कामें त्याच्याकडे आलीं. परंतु हा इतिहास कांहीं त्यानें लिहून पूर्ण केला नाहीं. 'मेहेरे नीमरोज' (मध्यान्हीचा सूर्य) ह्या नांवानें त्यानें जो ग्रंथ ह्यासंबंधांत लिहिलेला आहे त्यांत तैमुर घराण्याची सुरवातीची थोडी हकीकत आलेली आहे. पुढें ह्या कामासंबंधानें बादशहाचें लक्ष साफ उडालें आणि हें काम हळूहळू बंद पडलें.

गालिबचा दरबारांत प्रवेश होण्यास जे अनेक अडथळे होते त्यांत राजकवि जौक ह्याचाही हात होता. जौक हा प्रतिभाशाली कवि होता. जौक, मोमिन आणि गालिब ही योग्यतेनें समान अशी मंडळी त्याकाळच्या काव्यप्रांतावर आधिपत्य गाजवीत होती असें म्हटल्यास मुळींच अतिशयोक्तीचें होणार नाहीं. परंतु जौकच्या कवितांतून दिल्लीकरांच्या वापरांतले आणि परिचयाचे शब्द, संकेत आणि वाक्यसंप्रदाय – ज्यांना 'रोजमऱ्रा' म्हणजे नेहमींच्या बोलचालींतले म्हणत असत ते – विपुलतेनें आढळतात. ह्या उलट गालिबची कविता बरीच फारसी मिश्रित असल्यामुळें बऱ्याच जणांना दुर्बोध वाटे. त्याच्या कवितेंतील उपमा, अलंकार, वर्णनें सहज ध्यानांत येत नसत. ह्या सर्व कारणांमुळें गालिबची शैली म्हणजे एक टीकेचा विषय बनला होता. इ. स. १८४०–४२ च्या सुमारास झालेल्या एका मुशायऱ्यांत एक हकीम आगाजान ऐश ह्या कवीनें गालिबवर खालील ओळींतून उघड हल्ला चढविला होता.

"अगर अपना कहा तुम आप समझेभी तो क्या समझे
मजा कहनेका जब है एक कहे और दूसरा समझे
कलामे मीर समझे और जबाने मीरजा समझे
मगर इनका कहा ये आप समझें या खुदा समझें"

जौकला कदाचित् असेंही वाटत असावें कीं गालिबचें महत्त्व जर वाढलें तर त्यामानानें आपलें महत्त्व कमीं होईल. ह्या कारणामुळेंच गालिबचा दरबारांत प्रवेश होण्यास बरेच दिवस लागले.

गालिबची दरबारांत नेमणूक झाल्यावर थोड्याच दिवसांत युवराज शहाजादा फतेहुल्मुक ह्यानें गालिबला आपला उस्ताद मानलें आणि चारशें रुपये वर्षासन नेमून दिलें.

आतांपर्यंत गालिबची फारसीकडे ओढ होती. "माझ्या काव्यांतील खराखुरा रस अनुभवायचा असेल तर माझें फारसी काव्य वाचा; नीरस उर्दू काव्य कशाला वाचतां" अशी गालिबनें पुढील ओळींतून सूचना केलेली आहे.

"फारसी बीन ताबबीनी नक्शहाये रंगारंग
बगुज़र अज़ मजमुए उर्दूके बेरंगे मन अस्त"

परंतु असें जरी असलें तरी दिल्लीच्या दरबारांत फारसीवरचें लक्ष कमी होऊन उर्दूचें महत्त्व वाढत होतें. फारसी जाणणारी मंडळी कमी होऊं लागली होती. खुद्द बहादूरशहा हा 'ज़फ़र' ह्या टोपण नांवानें उर्दूतून काव्यरचना करी आणि कवि जौककडून त्यांत सुधारणा करून घेई. आतां फारसी जाणणारे राहिले नाहींत अशी हाकाटी गालिबनें कित्येक ठिकाणीं केलेली आढळते. त्याला स्वतःच्या फारसी भाषेवरील अप्रतिम प्रभुत्वाचा भारी गर्व होता आणि त्याच प्रमाणांत तो हिंदुस्थानांतील फारसी लेखकांना तुच्छ समजत असे. ह्या त्याच्या वृत्तीमुळें त्याला पुढें अनेक लेखकांशीं कटु वादविवादाचे प्रसंग अनुभवावे लागले.

बहादूरशहाशीं संबंध आल्यामुळें गालिबनें आपलें लक्ष पुन्हां उर्दूकडे वळविलें. जुन्या कवितांवर त्यानें पुन्हां नजर फिरविली. दुर्बोध कविता शक्य तितक्या सुबोध करण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या नवीन कवितांना सुबोध आणि सुटसुटीत वळण लावलें.

दरबारांत कवी जौकशीं गालिबचे संबंध कांहीं खेळीमेळीचे राहिले नाहींत. एखादा प्रसंग उद्भवावा आणि दोघांचे आपसांत गैरसमज वाढावे असें अनेक वेळां घडलें. राजपुत्र जवानबख्तच्या लग्नाच्या वेळचा प्रसंग येथें नमूद करावासा वाटतो. तो असा —

राजपुत्र जवानबख्त ह्याच्या विवाहाच्या वेळीं सेहेरागीत रचण्याची वेळ आली. आपल्याकडील मंगलाष्टकांप्रमाणें मुसलमान समाजांत लग्नप्रसंगीं हें सेहेरागीत रचण्याची पद्धति आहे. सेहेरा म्हणजे मुंडावळ. त्याची स्तुतिगीतें रचण्यांत कवींची परीक्षा होत असे. गालिबनें राजपुत्र जवानबख्त ह्याच्या विवाहप्रसंगीं जो सेहेरा म्हटला त्यांत शेवटच्या ओळी खालीलप्रमाणें होत्या —

हम सुख़न फ़हम हैं गालिबके तरफ़दार नहीं
देखें इस सेहेरेसे कहदे कोई बेहेतर सेहेरा

आम्ही रसिक आहोंत. गालिबचे पक्षपाती नाहीं. आम्हीही पाहूं कीं ह्या सेहेऱ्यापेक्षां चांगला सेहेरा कुणी म्हणतो का तें.

गालिबनें सेहेऱ्यांतून मारलेला हा टोमणा जौकला उद्देशून होता असें सर्वांच्या तोंडीं झालें. बादशहानें गालिबचा सेहेरा जौकला दाखवून त्याचें-उत्तर देण्यास सांगितलें. जौकनें त्याचें उत्तरांत एक सेहेरा लिहून काढला. त्यांत कवीनें सेहेरा लिहावा तर असा लिहावा अशा प्रकारचा उलट टोमणा जौकनें गालिबला दिला. बहादूरशहाचा त्या प्रसंगामुळें आपल्या-

वर राग झाला आहे हें पाहून गालिबनें एका गोड कवितेंत बादशहाची समजूत घातली. आपला उद्देश कुणावर हल्ला करण्याचा नव्हता. आपण पिढीजाद शिपाईगडी आहोंत. काव्य-लेखनावरच कांहीं आपला मानसन्मान अवलंबून नाहीं. आपल्याला बादशहाचे सेवक होणें लाभलें हें भाग्य काय कमी आहे. जौकशीं मी कशाला वरें भांडूं ?

उस्तादे शहासे हो मुझे पुरखाशका खियाल
ये ताब, ये मजाल, ये ताक़द नहीं मुझे
किस्मत बुरी सहीं पे तबीयत् बुरी नहीं
है शुक्रकी जगहके शिकायत नहीं मुझे
सादिक़ हूं अपने कौलमें गालिब खुदा गवाह
कहता हूं सच के झूटकीं आदत नहीं मुझे

असें म्हणून गालिबनें बादशहाची समजूत घातली आणि हें प्रकरण मिटविलें.

इ. स. १८५२ मध्यें गालिबचा मित्र सुप्रसिद्ध कवि मोमिन ह्याचा मृत्यु झाला. त्याच वर्षीं गालिबचा प्राणाहून प्रिय असलेला आप्त त्याच्या मेहुणीचा मुलगा जैनुलाबिदीन आरिफ़ ह्या ऐन तारुण्यांत निवर्तला. गालिबचीं स्वतःचीं मुलें पांच-सहा महिन्यांवर अशीं जगलींच नाहींत त्यामुळें आरिफ़वर त्याचें विलक्षण प्रेम होतें. त्याच्या मृत्यूवर गालिबनें अतिशय हृदयस्पर्शी असें शोकगीत रचलें आहे.

लाज़िम् थाके देखो मेरा रस्ता कोई दिन और
तनहा गये क्यौं अब रहो तनहा कोई दिन और

हे आरिफ, तूं एकटा निघून गेलास. मी बरोबर येण्याची वाट तरी पाहायची होतीस. आतां परलोकांत तुला कांहीं दिवस एकट्यानेंच काढावे लागतील.

ह्या वरील ओळींनीं त्या शोकगीताला सुरवात झालेली आहे. आरिफच्या मृत्यूनंतर त्याचीं लहान मुलें हुसेन शहा अली आणि बाकर अली ह्यांना गालिबनें आपल्या घरीं आणून त्यांचा संभाळ केला.

इ. स. १८५४ मध्यें कवी जौक ह्याचा मृत्यु झाला. आतां दिल्लींतील कविश्रेष्ठांपैकीं गालिबच काय तो एकटा उरला होता. ह्याच सुमारास फजलेहक़च्या मार्फतीनें गालिबचा रामपूरचे नवाब युसूफ अली ह्यांच्याशीं निकटचा संबंध आला. जौकच्या मृत्यूनंतर बहादूर-शहानें जौकची राजकवीची जागा गालिबला दिली ; आणि स्वतःच्या कविता तो गालिबकडून तपासून घेऊं लागला. बहादूरशहाच्या धार्मिक वृत्तीचा थोडाफार परिणाम गालिबवर झाल्या-शिवाय राहिला नाहीं. गालिबच्या काव्यांतून सूफी तत्त्वज्ञानाची जी झांक दिसते त्याचें थोडें तरी श्रेय बहादूरशहाच्या सहवासाला द्यावें लागेल.

राजकवीची जागा लाभल्यानें गालिबला स्वास्थ्य लाभलें. पेन्शनची रक्कम कांहीं वाढली नाहीं तरी बहादूरशहाच्या ह्या नोकरींत त्याला थोडी फार मिळकत होई. रामपुरच्या नबाबाकडूनही त्याला थोडें फार उत्पन्न होत असे. राजकवि म्हणून ह्याशिवाय त्याची चोहोंकडे प्रसिद्धि झाली ती निराळीच. अल्पावधींतच त्याच्या उर्दू आणि फारसी कविता सर्वतोमुखीं होऊन तो कविश्रेष्ठ म्हणून ओळखला जाऊं लागला. आपले कवितासंग्रह प्रसिद्ध झालेले पाहाण्याचें भाग्य त्याला लाभलें.

परंतु अगदीं ह्याच सुमारास म्हणजे इ० स० १८५७ मध्यें हिंदुस्थानांत प्रचंड आणि प्रलयंकारी संग्राम उद्भवून दिल्लीच्या राजघराण्याची त्यांत आहुति पडली आणि गालिबच्या भोंवतीं वावरणारें आणि त्याला परिचित असणारें सारें जग हां हां म्हणतां उध्वस्त होऊन गेलें.

इ० स० १८५७च्या मे महिन्याच्या सुरवातीला मीरतहून आलेल्या शिपायांनीं दिल्ली घेतली आणि बहादूरशहाला तख्तावर बसविलें. तो सम्राट आहे म्हणून त्या शिपायांनीं सर्वत्र दवंडी पिटली. दिल्ली शहरांतील इंग्रजांची क्रूर कत्तल करण्यांत आली. चार महिनेपर्यंत दिल्ली शिपायांच्या ताब्यांत होती. सप्टेंबर महिन्यांत दिल्ली इंग्रजांनीं फिरून आपल्या ताब्यांत घेतली. ह्यानंतरच्या झालेल्या लूटमारीनें आणि कत्तलीनें दिल्लींत हाहाःकार उडाला. सम्राट बहादूरशहाची चौकशी करण्यांत येऊन त्याला रंगूनला पाठविण्यांत आलें. त्याच्या मुलांचा अमानुषपणें वध करण्यांत आला. राजघराण्यांतील कित्येकांना फांसावर लटकावण्यांत आलें. राजवाड्यांतील स्त्रियांची अन्नान्नदशा होऊन अनेक सुशील स्त्रिया देशोधडीला लागल्या, अनेकींनीं सामान्य माणसांबरोबर विवाह केले तर कांहींनीं अनैतिक आयुष्य स्वीकारलें. शहरांत हजारोंची कत्तल करण्यांत आली. कोट्यवधि रुपयांची संपत्ति लुटली गेली. शेकडों इमारती जमीनदोस्त करण्यांत आल्या. अशा रीतीनें दिल्ली गोऱ्यांनीं उध्वस्त करून टाकली.

स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळांत गालिब हा दिल्लींत होता. त्याचे अनेक आप्त, परिचित आणि मित्र ह्या समरांत ठार मारले गेले होते. त्याचा भाऊ युसूफ मिर्जा हा ह्याच काळांत आजारी पडला आणि मरण पावला. गालिबचा भाचा आशूरबेग व त्याचा मुलगा अहमद मिर्जा ह्यांचा वध करण्यांत आला. गालिबचा मित्र फज़्लेहक़ खैराबादी ह्याला काळ्या पाण्यावर पाठविण्यांत आलें. खुद्द गालिबचें घर सुरक्षित राहिलें. कारण हकीम महमूदखां ह्यांचे पतियाळाच्या महाराजांशीं घनिष्ठ संबंध होते आणि हकीमसाहेब ज्या भागांत राहात असत तिथेंच गालिबचें घर होतें. पतियाळाच्या सैनिकांची एक तुकडी ह्या भागाचें रक्षण करण्याकरितां नेमण्यांत आली होती. त्यामुळें तो भाग सुरक्षित राहिला. पण गालिबची चीजवस्त—सोनें नाणें हीं सर्व—शहराच्या दुसऱ्या भागांत ठेवण्यांत आली होती ती मात्र लुटण्यांत आली.

१८५७ च्या वरील घटनांसंबंधीं गालिबनें फारसींत एक छोटेखानी पुस्तक लिहिलेलें आहे त्याचें नांव आहे : ‘ दस्तंबो ’. ह्या पुस्तकांत गालिबवर गुदरलेल्या संकटांचें

नि प्रसंगांचें तपशीलवार वर्णन आहे. परंतु ह्या पुस्तकांत सवच गोष्टी लिहिण्यास गालिबला भीति वाटत असावी हें स्पष्ट दिसतें. आपला शिष्य हरगोपाल तफ़्ता ह्यास लिहिलेल्या एका पत्रांत गालिब म्हणतो, " माझ्या ह्या पुस्तकाची एक प्रत गव्हर्नर जनरलकडे पाठवीन आणि एक त्याच्या मार्फतीनें इंग्लंडच्या महाराणीकडे. ह्यावरून ओळख कीं पुस्तकांतील मजकूर कसा असेल तो. "

गालिबनें कितीही संकोचानें हें पुस्तक लिहिलेलें असलें तरी त्यांतून दिल्ली शहराची दुर्दशा केवढ्या प्रमाणावर झाली होती हें जाणवल्याशिवाय राहावत नाहीं.

दिल्लींत ११ मे १८५७ रोजीं जी भयंकर कत्तल होऊन त्यांत इंग्रज बायकापोरें मारलीं गेलीं ह्याचें गालिबला अत्यंत दुःख वाटलें. दिल्लींत शिपायांचें राज्य होतें त्या वेळचा मजकूर गालिबनें फार सारांशरूपानें म्हणजे अवघ्या पांच सहा पानांतच सांगितला आहे. पण इंग्रजांनीं पुन्हा दिल्ली घेतल्यानंतर घडलेल्या हकीकतींचें तपशीलवार वर्णन त्यांत आलेलें आहे. जिकडे तिकडे लूटमार सुरू झाली. शहरांतील निरनिराळ्या भागांतून लोकांचे हाहाःकार ऐकूं येत. गालिबच्या आळींत दहाबारा घरें होतीं. आळीबाहेर पडण्याची सोय नव्हती. जवळपास गोड पाण्याची विहीर नव्हती. दोन दिवस आळींतील लोकांनीं कठीण अवस्थेंत खाण्यापिण्यावांचून काढले. तिसऱ्या दिवशीं पतियाळाच्या महाराजांनीं हकीम महमूदखानच्या रक्षणाकरितां पाठविलेले शिपाई आले. जवळच्या विहिरीवरून पाणी आणण्याची आळींतील लोकांना परवानगी मिळाली पण ती विहीर खाऱ्या पाण्याची होती. त्यापलीकडे जाणें म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखें होतें. त्यामुळें खारट पाण्यावरच लोकांना समाधान मानून घ्यावें लागलें. सुदैवानें दोन-चार दिवसांतच सपाटून पाऊस पडला. लोकांनीं त्या पावसाच्या पाण्यानें भांडीं-कुंडीं भरून घेतलीं. ज्या फकीर कालेशहाच्या मार्फतीनें गालिबची बहादूरशहाच्या दरबारांत वर्णी लागली होती त्याच्याकडे गालिबनें आपली सारी चीजवस्त त्याच्या मठांतील तळघरांत ठेविली होती. परंतु दुर्दैवानें ती सर्वच्या सर्व लुटली गेली.

१५ ऑक्टोबर १८५७ ह्या दिवशीं कांहीं इंग्रज शिपाई गालिबच्या आळींत आले. त्यांनीं लुटालूट कांहीं केली नाहीं, पण आरिफचीं मुलें आणि इतर शेजाऱ्यांना त्यांनीं पकडून नेलें. तत्कालीन अधिकारी कर्नल ब्राऊन ह्यानें थोडीबहुत चौकशी करून गालिबला आणि मुलांना परत जाण्याची परवानगी दिली. एका आख्यायिकेप्रमाणें गालिबनें मोठ्या चतुरपणें आपली सुटका करून घेतली. कर्नलनें त्याला विचारलें कीं, 'तूं मुसलमान आहेस काय ?' गालिबनें म्हटलें, 'हो, मी अर्धा मुसलमान आहें. दारू पितों पण डुकराचें मांस खात नाहीं.' कर्नल हसला आणि त्यानें गालिबला परत जाण्याची परवानगी दिली.

ह्याच काळांत गालिबचा भाऊ मिर्जा युसूफ आजारी पडून वारला. पंचवीस-तीस वर्षांच्या वयापासून त्याचा मेंदू बिघडला होता. तो मरण पावल्यावर दोन चार माणसें गोळा करून त्याचा दफनविधि करण्यास गालिबला फार श्रम पडले.

दिल्ली इंग्रजांच्या हातीं आल्यावर हजारों लोक शहर सोडून पळून गेले होते. त्यांना परत येण्याची परवानगी नव्हती. जानेवारी १८५८ मध्यें हिंदूंना शहरांत येऊन राहण्याची परवानगी मिळाली. पण धरपकडीचें सत्र चालूंच राहिलें. तें कांहीं थांबलें नाहीं. गालिबच्या मित्रमंडळींचे जे हाल झाले त्याचेंही वर्णन दस्तंबोंत गालिबनें केलेलें आहे.

गालिबचे आप्त लोहारूचे नवाबजादे जियाउद्दीन आणि अमीनुद्दीन हे दिल्ली सोडून लोहारूच्या दिशेनें जात असतांना वाटेंत मेहेरौली येथें शिपायांनीं त्यांना अक्षरशः नागविलें आणि त्यांच्यापाशीं असलेली सर्व चीजवस्त लुटली. दिल्लींतील त्यांचा वाडा मोठा प्रेक्षणीय होता. तो पूर्णपणें उध्वस्त करण्यांत आला. जियाउद्दीन ह्याचा ग्रंथसंग्रह मोठा मूल्यवान होता त्याचाही पूर्ण निकाल लावण्यांत आला. त्यांत गालिबचा कवितासंग्रह पण होता. सुदैवानें १८५७ च्या सुरुवातीला गालिबनें ह्या संग्रहाची एक प्रत रामपुरला पाठविली होती. सध्यां प्रसिद्ध असलेल्या गालिबच्या कविता रामपुरच्या प्रतीवरून घेतलेल्या आहेत. ह्याशिवाय गालिब फारसी आणि उर्दू कविता रचून जियाउद्दीनकडे पाठवीत असे. परंतु त्यांचा मात्र कांहीं मागमूस राहिलेला नाहीं.

मुजफ्फ़रोद्दीन हैदर आणि हुसेन मिर्जा ह्यांच्या घरांना आगी लावण्यांत आल्या. त्यांच्यापाशीं गालिबचे बरेच कागदपत्र होते.; परंतु अर्थातच ते नष्ट झाले.

गालिबचा मित्र आणि सुप्रसिद्ध टीकाकार नवाब मुस्ताफाखान शेफ़ता ह्याला सात वर्षांची कैदेची शिक्षा झाली होती. अपील केल्यानंतर तो सुटला. उर्दू कवींच्यावर ह्याचे परीक्षणात्मक लेख फारसी भाषेंत असून "गुलशने बेखार" (कंटकविरहित उपवन) ह्या नांवानें शेफ़ताचा ग्रंथ विद्वज्जनांत मान्यता पावलेला आहे.

गालिबचा दुसरा मित्र मुफ़्ती सद्रुद्दीन आजुर्दा हा फारसी भाषेंतील नामांकित कवि आणि अरबी भाषेचा गाढा विद्वान होता. १८५७ त तो बरेच दिवस तुरुंगांत खितपत पडला होता. चौकशींत त्याला जीवदान मिळालें खरें परंतु त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्यांत आली. पुढें अपीलमध्यें निम्मी मालमत्ता परत मिळावी असा हुकूम झाला.

फजलेहक़ खैराबादी हा अरबी फारसीचा विद्वान आणि उत्तम टीकाकार होता. गालिबची सुरवातीची कविता बेदिल कवीच्या काव्याच्या धर्तीवर म्हणजे पेचदार, दुर्बोध आणि रुक्ष होती. ती बदलून सुबोध आणि आकर्षक रचनेकडे गालिबला प्रवृत्त करण्याचें सारें श्रेय फजलेहक़ खैराबादीला आहे. १८५७ च्या संघर्षांत खैराबादीला काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती.

गालिबला पहिले कांहीं दिवस हालअपेष्टांत काढावे लागले. आपल्याला घरांतील कपडे विकून पोट चालवावें लागलें असें त्यानें एक पत्रांत लिहिलेलें आढळतें. लोक अन्न खातात पण आम्ही कपडे खातों अशी त्यानें कोटी केली आहे. ह्या त्याच्या संकटकालांत गालिबच्या हिंदु शिष्यांनीं आणि मित्रांनीं त्याला फार मदत केली. मुन्शी हरगोपाल तफ़्ता

ह्यानें आग्र्याहून त्याला कपडे आणि कांहीं पैसे पाठविले होते. गालिब हा मदिरेचा अनन्य-भक्त होता. मद्य हें त्याचें रोजचें अन्न होऊन बसलें होतें. त्याचा पुरवठा गालिबचा मित्र महेशदास हा करी. त्याचे इतर मित्र हीरासिंग, शिवजीराम आणि बालमुकुंद हे गालिबची दिवसरात्र विचारपूस करीत. इ० स० १८६० मध्यें गालिब दिल्लीची काय परिस्थिति होती ह्यासंबंधीं एका पत्रांत लिहितो—

"परवां मी शहरांत विहिरींची काय स्थिति आहे हें पाहाण्याकरितां शहरांत गेलों होतों. जुम्मामशिदीपासून राजघाटपयत एक वाळवंट आहे. ह्यांत कांहीं अतिशयोक्ति नाहीं. ठिकठिकाणीं विटांचे ढिगारे पडलेले आहेत ते जर उचलण्यांत आले तर सारें ओसाड वाटेल. मिर्ज़ा गोहरच्या बागेजवळची जी खोल जागा आहे ती आतां बागेच्या पातळीबरोबर झाली आहे. राजघाटाचा दरवाजा बंद झाला आहे. तटाचे वरचे भाग तेवढे दिसताहेत नि खालचे भाग बुजले आहेत. कश्मीरी दरवाजाची स्थिति तर तूं पाहिलीच आहेस. आतां रेल्वेचे रूळ घालण्याकरितां म्हणून कलकत्ता दरवाजापासून काबुली दरवाजापर्यंत मोकळें मैदान करण्यांत आलें आहे. पंजाब, कटरा, धोबीवाडा, रामजी गंज, सादतखान, जर्नेलच्या बिबीची हवेली, रामजीदास गोदामवाल्याचीं घरें, साहेबरामची बाग व हवेली ह्यांपैकीं एकाचाही ठावठिकाणा राहिलेला नाहीं. सारांश, शहर साफ ओसाड झालें आहे. आतां जर विहिरी बुजविल्या गेल्या आणि गोड पाणी जर दुर्मिळ झालें तर हें मैदान करबल्याचें मैदान होईल. हे परमेश्वरा, दिल्लीचे लोक आपली उर्दू टकसाळी समजत. आतां उर्दू बाजाराची आळी राहिली नाहीं. आतां उर्दू कोठें, दिल्ली कोठें ? आतां नुसती छावणी शिल्लक राहिली आहे. आतां किल्ला नाहीं. शहर नाहीं कीं बाजार नाहीं कीं कालवा नाहीं."

आणखीन् एका पत्रांत तो लिहितो—

"अरे बाबा, काय लिहूं ? दिल्लीचें वैभव पांच गोष्टींवर अवलंबून होतें. लालकिल्ला, चांदणी चौक, जुम्मा मशिदीची सहल ही रोजची, दर आठवड्यास यमुनेच्या पुलावर फिरणें आणि वर्षांतून एकदां फुलवाल्यांचा मेळा ह्या पांची गोष्टी आतां राहिलेल्या नाहींत. आतां सांग, दिल्ली कुठें राहिली ती."

दिल्लींत सगळें स्थिरस्थावर झाल्यानंतर गालिबनें आपलें पेन्शन परत मिळावें म्हणून पुन्हां खटपट सुरू केली. पण दोनतीन वर्षेंपर्यंत त्याच्या प्रयत्नाला यश आलें नाहीं. सुदैवानें रामपूरचे नवाब युसूफअली ह्यांनीं गालिबला सर्वतोपरी साहाय्य केलें. गालिबनें इ० स० १८६० च्या सुमारास रामपूरला भेट दिली. एकीकडे रामपूरच्या नवाबांनीं गालिबला महिना शंभर रुपये चालू केले अन् दुसरीकडे त्याचें सरकारी पेन्शन पुन्हा मिळू लागलें. ह्यामुळें गालिबची खालावलेली आर्थिक स्थिति सुधारूं लागली.

गालिबच्या साहित्यसेवेचा लौकिक खूप दूरवर पसरलेला होता. गालिबच्या पत्रव्यवहारावरून त्याचा संबंध हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतील थोर आणि नामांकित व्यक्तींशीं आला होता असें दिसतें. अशा व्यक्तींत टीपू सुलतानचा वंशज शहाजादा बशीरुद्दीन, कलकत्त्याचे खान बहादूर अब्दुल गफूर, सुरतेचे नवाब गुलाम बाबाखान, लोहारूचे नवाब अलाउद्दीन आणि जियाउद्दीन, बडोद्याचे सरदार नवाब मीर इब्राहीम अलीखान, अलवारचे महाराज, अलाहाबादचे मुन्शी गुलाम गौस बेखबर वगैरे नामांकित लोक होते.

ह्याच सुमारास 'बुरहान काते' नांवाचा फारशी कोश प्रसिद्ध झाला. त्याच्यावर गालिबनें फार कडक शब्दांत टीका केली. हा टीकाग्रंथ 'काते बुरहान' ह्या नांवानें प्रसिद्ध झाला. त्याला उत्तरें आणि प्रत्युत्तरें देण्याकरितां देशांतील अनेक विद्वान सरसावले. गालिबनें कोशांतील अनेक चुका नजरेस दाखविल्या. त्या चुका योग्यच होत्या ही गोष्ट खरी असली तरी ग्रंथकारावर आणि त्याचें समर्थन करणाऱ्यांवर गालिबनें वाजवीपेक्षां कडक शब्दांत टीका केली. त्यामुळें प्रचंड वादळ उठलें. शिवाय हिंदुस्थानांतील फारसी विद्वानांची फारसींसंबंधींची विद्वत्ता मानण्यास गालिब तयार नव्हता. पण मौज अशी कीं गालिब स्वतः जातीनें तुर्क होता. तो वंशानें इराणी नव्हता. तेव्हां लोकांनीं तुम्हांला तरी असें बोलण्याचा काय अधिकार पोहोंचतो असा रोखठोक सवाल केला. गालिबवर प्रखर आणि वैयक्तिक स्वरूपाची टीका झाली. त्यामुळें गालिबनें एका टीकाकारावर कोर्टांत अब्रुनुकसानीची फिर्याद गुदरली. पुढें हा खटला आपसांत मिटविण्यांत आला.

ह्या वादामुळें गालिबला बराच मनस्ताप सहन करावा लागला. त्यांत आजाराची भर पडली. गालिबच्या मदिरासेवनाचा परिणाम त्याची प्रकृति बिघडण्यांत होऊन दोन वर्षेंपर्यंत त्याच्या अंगावर फोड आणि इतर व्याधींनीं त्याला नुसतें भंडावून सोडलें. १८६४ च्या सुमारास त्याची ह्या आजारांतून सुटका झाली.

इ. स. १८६५ मध्यें रामपूरचे नवाब युसूफअली ह्यांचा मृत्यु होऊन त्यांच्या जागीं कल्बेअली हा गादीवर आला. समारंभाला गालिब रामपुरला गेला होता. त्यानें समारंभाचें मोठें मजेदार वर्णन केलेलें आहे. नवाबाकडून त्या प्रसंगीं गालिबला बरीच आर्थिक मदत झाली.

रामपूरहून परत येतांना वाटेंत गालिबचें सगळें सामान गंगेच्या पुरांत वाहून गेलें. गालिबला पांच-सात दिवस आजाराच्या अवस्थेंत मुरादाबाद येथें काढावे लागले. दिल्लीस परत आल्यानंतर गालिब बरेच दिवस अशक्ततेमुळें बिछान्यावर पडून होता. ह्या वेळीं त्याचें वय अडसष्ट वर्षांचें होतें. इ. स. १८६५ सालीं लिहिलेल्या एका पत्रांत तो लिहितो —

" पूर्वी मी अशक्त होतों. आतां शरीरांत अर्धे प्राण शिल्लक राहिले आहेत. पूर्वी कानानें नीटसें ऐकूं येत नव्हतें; आतां त्यांतच भर म्हणून कीं काय डोळ्यांनीं पण दिसत नाहीं. चार ओळी लिहिल्या कीं बोटें वांकडीं होतात. "

उर्दूचा सुप्रसिद्ध कवि अल्ताफ हुसेन ' हाली ' ह्याचा गालिबशीं ह्याच काळांत संबंध आला. हालीनें पुढें गालिबचें चरित्र लिहिलें तें हाली आणि गालिबच्या निकट सहवासामुळें उत्कृष्ट आणि सरस उतरलें आहे.

ह्या काळांतील गालिबचें महत्त्वाचें पुस्तक म्हणजे इ. स. १८६८ च्या ऑक्टोबर महिन्यांत प्रसिद्ध झालेला त्याचा पत्रव्यवहार होय. ' उदे हिंदी ' ह्या नांवानें हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. पण ह्या ग्रंथांत अनेक चुका आढळून आल्या. त्याशिवाय पत्रांची मांडणी अतिशय अव्यवस्थित अशी होती. म्हणून गालिबनें पत्रांची व्यवस्थित मांडणी केली. त्यांत नवीन पत्रांची भर घातली. हा पत्रसंग्रह " उर्दूये मोअल्ला " ह्या नांवानें मार्च १८६९ मध्यें प्रसिद्ध झाला. ह्या संग्रहाला प्रस्तावना मीर मेहेदी मज्रूह आणि समाप्तीचा लेख कुरबान अली सालिक ह्यांनीं लिहिलेला आहे. हे दोघेही गालिबचे मित्र आणि चाहते होते. पण हा पत्र-संग्रह प्रसिद्ध होण्याच्या आधीं म्हणजे १५ फेब्रुवारीं १८६९ रोजीं गालिबचा मृत्यु झाला. त्या वेळीं गालिबचें वय बहात्तर वर्षांचें होतें. गालिबला मूलबाळ नव्हतें पण बाकरअली आणि हुसेनअली हीं आरिफचीं मुलें त्यानें आपलींच मुलें म्हणून सांभाळली होतीं. गालिबच्या मृत्यू-नंतर एक वर्षानें त्याची पत्नी उमराव बेगम हिचा मृत्यु झाला. गालिबची स्वतःची अशी औरस संतति शिल्लक राहिली नव्हती; परंतु असें जरी असलें तरी गालिबच्या वाङ्मया-पत्यामुळें त्याचें नांव उर्दू साहित्यांत अमर झालें आहे.

आपल्या वहात्तर वर्षांच्या दीर्घ आयुष्यांत मिर्झा गालिबनें विपुल ग्रंथरचना केली. उर्दू आणि फारसी ह्या दोन्ही भाषांवर त्याचें असामान्य प्रभुत्व होतें. उर्दूतील त्याचे प्रमुख ग्रंथ म्हणजे त्याचा उर्दू कवितांचा संग्रह आणि प्रचंड पत्रव्यवहार हे होत. फारसी साहित्यांत त्यानें एक कवितासंग्रह, तैमूर घराण्याच्या इतिहासाचा पूर्वभाग मेहेरे नीमरोज़, फारसी पत्रव्यवहार आणि अठराशें सत्तावनच्या प्रसंगींचा ग्रंथ दस्तंबो हे एवढे लिहून महत्त्वाची भर टाकली आहे. त्याची फारसी काव्यरचना संख्येनें उर्दू कवितांच्या चौपट भरेल इतकी आहे. फारसींत इतकी विपुलरचना गालिबनें केलेली असली तरी गालिबला जी कीर्ति लाभली ती त्याच्या उर्दू कवितांच्यामुळें होय असेंच म्हणावें लागेल. उर्दू काव्यांत ग़ज़ल, मसनवी, क़सीदा म्हणजे स्तुतिपर कविता, मर्सिया म्हणजे शोकगीतें, नात म्हणजे धार्मिक कविता, रुबाया इत्यादि विविध पद्यप्रकार आहेत. गालिबनें क़सीदा आणि रुबाया हे प्रकार हाताळले नाहींत असें नाहीं पण त्याच्या ग़ज़लांच्या संख्येनें पाहातां इतर वृत्तांतील कविता संख्येनें अत्यल्प आहेत आणि गुणांनीं त्या ग़ज़लांच्या बरोबरीला येत नाहींत. गालिबच्या काव्याचें खरें वैशिष्ट्य त्याच्या ग़ज़लांतून आहे आणि त्या ग़ज़ल काव्यामुळेंच गालिबला उर्दूतील कविश्रेष्ठ म्हणून ओळखलें जातें. ग़ज़ल ह्या पद्यप्रकाराचा वापर उर्दू साहित्यांत सुरवातीपासून आढळतो. उर्दूत हा प्रकार फारसीपासून आला. डॉ. माधवराव पटवर्धन – माधव ज्यूलियन ह्यांनीं आपल्या गज्जलांजलीच्या प्रस्तावनेंत ग़ज़लबद्दलची बरीच चर्चा केली आहे. ते म्हणतात––

" गज्जल हा एक गायनाचा प्रकार वाटतो. मूलतः हा एक पद्यप्रकार आहे. हा मूळचा अरबी आहे. परंतु मराठीशीं त्याचा परिचय उर्दू पदांच्या द्वारा झाला आहे ... गज्जल आणि क़सीदा हे एकयमकीच असावे लागतात म्हणजे पहिल्या, दुसऱ्या व पुढील समचरणांच्या अंतीं एकच यमक साधिलें पाहिजे. गज्जलांत द्विपद्यांची संख्या पांचाहून अधिक व सतराहून कमी अशी मर्यादित असते... धात्वर्थानें पाहातां गज्जल म्हणजे प्रेमालाप होत. अर्थात् शृंगार हाच गज्जलाचा मुख्य विषय होय. प्रेमगीतांत स्वाभाविकपणेंच विप्रलंभ शृंगाराचा आविष्कार अधिक आढळतो. कांहीं गज्जल सृष्टिवर्णनपर, बोधपर व ध्येयस्तुतिपरही असतात. पण गज्जल हा भावगीतांप्रमाणें एकपिंडी असतोच असें नाहीं. यमकसूत्रांत गोंवलेला गज्जल हा द्विपदी मुक्ताफळांचा जणूं काय सरच होय. "

वर म्हटल्याप्रमाणें गज़लांतून एका द्विपदीचा मागील व पुढील द्विपदींशीं संबंध असतोच असें नाहीं. प्रत्येक द्विपदींची रचना ही स्वतंत्र समजली पाहिजे. केवळ यमकामुळें गज़लांतील द्विपद्या एकत्र आलेल्या असतात. ह्यामुळें प्रत्येक द्विपदींतील कल्पना स्वतंत्र असून दोन ओळींतच ती कल्पना पूर्ण करणें आवश्यक आहे. ती कल्पना जितकी मनोरम आणि आकर्षक असेल आणि ती जितकी अर्थपूर्ण शब्दांत मांडली गेली असेल त्यावरच कवीच्या काव्यगुणांची पारख किंवा कसोटी होते. उर्दू काव्यांत गज़लचें काय स्थान आहे? ह्यासंबंधीं उर्दू साहित्यांतील नामांकित टीकाकार इबादत बरेलवी ह्यांनीं सांगोपांग चर्चा केली आहे. गज़ल और तग़ज़ल ह्या त्यांच्या लेखांतील सारांश असा —

गज़लचा प्रकार उर्दू काव्यांत प्रारंभापासून दिसून येतो. प्रत्येक काव्यांत उर्दू कवींनीं निरनिराळे विषय गज़लांच्या द्वारें हाताळले. मग तीं शोकगीतें म्हणजे मर्सिया असोत कीं स्तुतिगीतें म्हणजे कसीदे असोत कीं तत्त्वज्ञानपर विचार असोत. मर्सिये लिहिणारा शोककवि अनीस किंवा तत्त्वज्ञानी कवि एकबाल ह्यांनींही गज़लांच्या द्वारें आपली काव्यरचना करणें आवश्यक मानलें.

गज़लांच्या उत्क्रांतींत इराणी संस्कृति आणि रसिकतेचा फार मोठा वांटा आहे. सौंदर्याची अनुभूति आणि त्याची नाजूक आणि आकर्षक पद्धतीनें मांडणी हीं इराणी वाङ्मयाचीं वैशिष्ट्यें होत. त्यांत प्रणय आणि प्रणयाराधनाची भर पडल्यामुळें इराणी वाङ्मयांत रंग भरला. हींच वैशिष्टयें उर्दू गज़लनें आत्मसात केलीं. इराणी संस्कृति आणि रसिकतेची वाढ ज्या समाजांत आणि वातावरणांत झाली, इराणी समाजाला जीं दृश्यें आवडत, ज्या ऋतुचक्रांनीं त्याला मोहिनी घातली, ज्या पक्ष्यांच्या गायनानें त्याचें मनोरंजन केलें त्या साऱ्या साऱ्यांचा प्रभाव गज़लांवर झालेला दिसून येतो. हिंदुस्थानांत स्थापन झालेली तुर्क आणि मोंगल राज्यें इराणी संस्कृतीनें प्रभावित झालीं. त्या प्रभावानें जें वातावरण निर्माण झालें त्यामुळें गज़ल प्रकाराचें समृद्धिकरणच झालें आहे असें म्हणावयास हवें.

इराणमध्यें गज़लची वाढ कां झाली ह्याबद्दल बरेलवींचें मत आहे कीं इराणमध्यें अरबी संस्कृतीचा प्रभाव बराच पडला. अरबी समाजजीवन आणि संस्कृतींतील उत्साह व दमदारपणा आणि इराण्यांची सौंदर्योपासना ह्यांचा संगम झाला आणि त्यांतून वाङ्मयप्रांतांत गज़ल ह्या पद्यप्रकाराची वाढ झाली. ह्यापूर्वी इराणमध्यें कसीदा म्हणजे स्तुतिपर कविता ही भारी लोकप्रिय होती. अरबांच्या राजकीय वर्चस्वामुळें कसीदा ह्या काव्यप्रकाराला चालना मिळली. प्रेमगीतेंसुद्धां ह्या पद्यप्रकारांतून लिहिलीं जात. पण हळूंहळू कसीद्यापासून हा प्रकार वेगळा होऊन गज़लची स्वतंत्र अशी रचना अंमलांत येऊं लागली. ह्या प्रकाराला सुरवात इराणी कवि रुदकी ह्यानें केली.

सुरवातीस गज़लचे विषय म्हणजे प्रेम आणि शृंगार हे होते. गज़ल हा शब्द अरबी आहे. त्याचा अर्थ स्त्रियांबरोवर किंवा स्त्रियांसंबंधीं प्रणयक्रीडेच्या गोष्टी करणें असा आहे.

इराणमध्यें सुरवातीच्या गज़ला आणि कसीदा ह्यांमध्यें फारसा फरक नव्हता. फरक होता तो वर्ण्यविषयासंबंधीं. कसीद्यांत नवाब, अमीर, बादशहा ह्यांची स्तुति आढळे. पण गज़लांमधून प्रेयसीची भरपूर स्तुति आढळे. त्यांत प्रेयसीचें रूपसौंदर्य, तिचे विभ्रम, तिनें केलेला छळ, तिचा चंचलपणा इत्यादींचीं वर्णनें आढळत.

हा प्रकार बराच काळपर्यंत चालू होता. परंतु मानवाचें जग केवळ सौंदर्य आणि प्रेम ह्यांतच मर्यादित राहूं शकत नाहीं. निसर्ग, जीवन, जीवनाचे विविध प्रश्न, अध्यात्म असे कितीतरी विषय मनुष्याचें लक्ष आपल्याकडे ओढून घेतात. त्यामुळें अध्यात्माची, भक्तिमार्गाची आणि परमेश्वरप्राप्तीची चर्चा करणारा सूफी पंथ अस्तित्वांत आल्याबरोबर त्याचा परिणाम गज़लांवर होऊं लागला आणि अर्थातच त्यांच्या विषयांचा विस्तार पण होऊं लागला. गज़लांत पूर्वीपासून असलेले प्रणय आणि सौंदर्याचे संकेत सूफींनीं हाताळले. त्यामुळें एकीकडे धार्मिक आणि रुक्ष विषयांत आकर्षकपणा आला आणि दुसरीकडे गज़लांची बैठक केवळ प्रणय आणि सौंदर्याच्या उपासनेंत मर्यादित राहिली नाहीं. मदिरा म्हणजे प्रेम किंवा भक्ति, मदिरा वाटणारा साकी म्हणजे गुरु, मदिरालयांतील मंडळी म्हणजे भक्तगण, बुरख्याआड लपलेला प्रियकर म्हणजे अगम्य परमेश्वर असे गज़लांतून आढळणारे संकेत सूफींचे आणि गज़लांचे अन्योन्य संबंध दर्शवितात.

गज़लला सर्वोच्च स्थान मिळवून देणाऱ्या फारसी कवींत सिनाई, फरीदुद्दीन अत्तार, मौलाना रूम, ईराकी, सादी, खुसरौ, हसन, सलेमान, ख्वाजू, हाफिज़, फुगानी, शफाई, उर्फी, नजीरी, सायब, जहीरी, गालिब हे प्रमुख होत. त्याचप्रमाणें उर्दू गज़लकारांमध्यें वली, मीर, सौदा, दर्द, मजहर जानेजाना, मुसहफी, गालिब, मोमिन, शेफ़्ता, हाली, दाग हे श्रेष्ठ ठरतात. गज़लांच्या उत्क्रांतींत एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं तत्कालीन सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचें प्रतिबिंब त्या त्या काळच्या गज़लांतून आपल्याला दिसून येतें. प्रणय, प्रेम, तत्त्वज्ञान इत्यादींचीं वर्णनें आपल्याला निरनिराळ्या काळांत दिसून येतात. पण संकेतांत फारसा बदल झालेला नाहीं. फक्त त्यांचे अर्थ मात्र वेळोवेळीं बदलत गेले.

प्रणय हा गज़लाचा मुख्य विषय होय. प्रेम आणि प्रणयाच्या विविध अवस्था अनेक तऱ्हातऱ्हांनीं वर्णिलेले प्रसंग गज़लांतून आढळतात. प्रेयसीचें सौंदर्य, तिचा चंचलपणा, उत्कंठा, विरह, मीलन, मत्सर, हेवा इत्यादि सर्व प्रकार गज़लांतून आढळतात. गज़लांतील प्रेमिक प्रेयसीकरितां अनेक संकटें झेलतो, तिच्या घराची धूळ उडवीत फिरतो, तिच्या भिंतीच्या आसऱ्याला तो जाऊन बसतो, तिच्या रखवालदाराची मनधरणी करतो, तिच्याकडून झालेला आपला छळ आणि अवहेलना सहन करतो, इतर प्रतिस्पर्धी सुद्धां त्याचा छळ करतात. प्रेयसीच्या मैफिलींत त्याची टिंगल उडवितात. प्रेमाच्या पूर्तिकरितां तो आपला जीव देतो. पण इतकें झालें तरी प्रेयसी त्याचा छळ करण्याचें सोडीत नाहीं. ती त्याच्या कबरेवर येऊन त्याला शिव्यांची लाखोली वाहते. अशा ह्या प्रेमाच्या गोष्टी गज़लकार आपापल्या विशिष्ट

शैलींत वर्णन करतात. त्यांत वापरण्यांत येणारे संकेत म्हणजे गुल आणि बुलबुल म्हणजे बुलबुलांचें प्रेम आणि गुल म्हणजे फुलांचा निष्ठुरपणा. दुसरें पतंग आणि दीप म्हणजे परवाना आणि शमा. निर्बंध म्हणजे कफस, स्वतांचें घर म्हणजे आशियाना म्हणजे घरटें, छळणारा शत्रु म्हणजे सय्याद (शिकारी) हा अनेकदां काळ किंवा नियति ह्या अर्थानें उल्लेखिला जातो. असे कितीतरी संकेत आपल्याला उर्दू गजलांतून दृष्टोत्पत्तीस येतात. संकट ओढवणें ह्याचा उल्लेख करतांना घरट्यावर वीज पडणें असा करतात. शुद्ध प्रेमाला ते दीपशिखेवर झेप घेणाऱ्या पतंगाची उपमा देतात.

वर वर्णिलेले असे अनेक संकेत हे गजलाचा अविभाज्य भाग बनलेले आहेत. गजल हा भावगीताचा प्रकार आहे आणि मर्यादित शब्दांत कोणतीही गोष्ट वर्णिणें आवश्यक असल्यामुळें संकेतांचा वापर करणें आवश्यक ठरतें.

संकेतांबरोबर गतकालांत होऊन गेलेल्या कांहीं व्यक्तींचीं आणि घटनांचीं ठरीव उदाहरणें देण्याचा प्रघात गजलांतून आहे. लला मजनू, शीरीं फरहाद, युसूफ–जुलेखा, तारसच्या पर्वतावर मूसाला साक्षात्कार हीं उदाहरणें आपल्याला गजलांतून हटकून आढळतात. त्यांचा उद्देश आणि त्याबरोबरच जीवनाकडे पाहाण्याचा, धर्माकडे आणि अंधधार्मिक परंपरेकडे पाहाण्याचा एक निराळाच दृष्टिकोन आपल्याला दिसून येतो. ज्ञान आणि भक्ति, बुद्धि आणि श्रद्धा ह्यासंबंधीं लिहितांना गजलकारांनीं कर्मठांची, त्यांच्या कर्मठपणाची, स्वर्गनरकाच्या रूढ कल्पनांची ठिकठिकाणीं टर उडविली आहे. गजलांतून जीवनाच्या संघर्षाचें प्रतिबिंबही आपल्याला दिसतें. त्याबरोबर निराशा आणि अगतिकता ह्याचेंही चित्रण आपल्याला आढळतें. अलीकडे म्हणजे गेल्या पांचपन्नास वर्षांत राजकीय आणि सामाजिक विषयही गजलांतून आले आहेत. पण संकेताचा तोच वापर अर्थात् निराळ्या अर्थानें दिसून येतो, अशा रीतीनें गजलांची उत्क्रांति झाली आहे.

इबादत बरेलवींनीं केलेल्या वरील विवेचनावरून गजलची कल्पना पूर्णपणें येईल. अगदीं अलीकडे म्हणजे राष्ट्रीय चळवळीचा उदय झाल्याबरोबर गजलकारांनीं ह्या चळवळीचें चित्रण गजलांतून केलें असून भारतांतील राष्ट्रीय चळवळीच्या काळांत वेळोवेळीं अशा शेकडों गजला लिहिल्या गेल्या. त्याचीं तीनच उदाहरणें पाहा—

करम मेहबानका है या हुस्नेखल्के नातुवां मेरा
मेरे घरको घर अपना जानता है मेहमान मेरा

ही काय पाहुण्यांची कृपा म्हणावी का माझें आदरातिथ्याचें दुबळेपण म्हणावें. हा पाहुणा तर माझ्या घराला आपलें घर समजून बसला आहे.

ख़ियाल उनका सुख़न मेरा, ज़बान उनकी दहन मेरा
बहार उनकी, चमन मेरा, गुल उनके गुलिस्तां मेरा

त्यांचे विचार, माझी भाषा; त्यांची वाणी, माझें मुख; त्यांचे वसंतऋतु, माझी बाग; त्यांचीं फुलें अन् फुलबन माझें.

वरील ओळींतून इंग्रज राजकर्त्यांबद्दलचे संकेत स्पष्ट दिसून येतात.

सबाने जाते जाते जाने क्या सरगोशियांकी हैं
न भूला एक वर्गे गुलभी दर्से इंतिशार अबतक।

पहांटेच्या वाऱ्यानें बागेंतून जातां जातां फुलांना काय कानमंत्र दिला आहे कुणास ठाऊक. कारण कोणत्याही फुलझाडाला भांडखोरपणाचा अद्याप विसर पडलेला नाहीं.

इंग्रजांनीं जातां जातां देशांत जो कलह माजविला त्याचा संकेत ह्या वरील ओळींतून दिसून येतो.

आमचें कांहींही होवो पण इंग्रज ह्या देशांतून निघून जावोत ह्यासंबंधींच्या कांहीं ओळी पाहा —

सितम्‌भी होगा तो देख लेंगे करमका
भांडा तो फूट जायें
ये दोस्तीका तिलसम् टूटे मेहेरबानीका
झूट जाये

आमच्यावर जुलूम झाले तरी आम्ही पाहून घेऊ; पण त्यांचे (इंग्रजांचे) भ्रम तरी उघडे पडतील. ही मैत्री, मोहजाल आणि मेहेरबानीचें असत्य हीं तरी उघडीं पडतील.

बलासे क़ज़ाक आके लूटें, ये पासबानोंकी
लूट जाये
उचकले शाहीन तो गम नहीं है, कफ़स्‌तो
कम्बख्त टूट जाये

लुटारूंनीं आणि दरोडेखोरांनीं आम्हांला लुटलें, नागवलें तरी आम्हांला शोक नाहीं; ह्या रखवालदारांनीं चालू ठेवलेली (इंग्रजांनीं) लूट तरी थांबेल. गरुडांनीं आमच्यावर झेप घेऊन आमचें सर्वस्व नेलें तरी हरकत नाहीं; आमचें कारागृह तरी कोलमडून पडेल.

अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. ह्यावरून उर्दू गज़लांतून निरनिराळ्या काळीं निरनिराळे विषय कसे प्रभावी रीतीनें हाताळले गेले हें दिसेल.

मागें सांगितल्याप्रमाणें गालिबचा उर्दू काव्यरचनेचा बव्हंश म्हणजे गज़लाच होत. त्याच्या गज़लांची संख्या सुमारें सव्वा दोनशें भरेल. त्यांतील द्विपद्यांची संख्या चौदा साडेचौदाशें भरेल. म्हणजे सुमारें अडीच पावणेतीन हजार ओळींत गालिबचें उर्दू काव्य सामावलेलें आहे.

गालिबच्या काव्याचे विषय प्रेम, प्रेमिक, प्रेयसी, प्रतिस्पर्धी, उत्कंठा; विरह, वियोग, मीलन हे तर आहेतच. पण त्यापेक्षांही महत्त्वाची गोष्ट म्हणजे जीवन, जीवनांतील संघर्ष, आशा-निराशांचें द्वंद्व, सृष्टिविषयक तत्त्वज्ञान, धर्म आणि धार्मिक रूढीसंबंधीं विचार ह्या सर्वांत गालिबच्या गजलांचें वैशिष्ट्य दिसून येतें. अर्थात् कोणत्याही विषयाचें वर्णन करतांना गालिबची प्रतिभा प्रखरतेनें चमकलेली दिसते ह्याचें कारण म्हणजे त्याचें काव्य कृत्रिम नसून तें त्याच्या जीवनांतील अनुभवांतून आणि आंतरिक तळमळींतून निर्माण झालेलें आहे. असें जेव्हां असेल तरच तें काव्य जिवंत आणि सरस उतरतें ह्यासंबंधीं गालिबचे स्वतःचेच विचार पाहा—

हुस्ने फ़रोगे शमये सुख़न दूर है असद्
पहले दिले गुदाख़्ता पैदा करे कोयी

काव्याची ज्योत उज्ज्वल करणें असल्यास उत्कट तळमळ असलेलें हृदय प्रथम लाभलें पाहिजे.

आते हैं गैबसे ये मज़ामीन् खियालमे
गालिब् सरीरे खामा नवाये सरोश है

काव्याचे विषय माझ्या मनांत अंतराळांतून येतात. ते कागदावर उतरून घेतांना लेखणीचा ध्वनि होतो तो म्हणजे देवदूतांचा संदेश होय.

खुलता किसी पे क्यों मेरे दिलका मुआमिला
शेरोंके इंतिखाब्ने रुसवा किया मुझे

माझ्या हृदयांतील तळमळ कुणालाही समजली नसती पण माझ्या काव्यांनीं ती तळमळ उघडकीस आणली.

पाते नहीं जब राहतो चढ जाते हैं नाले
रुकती है मेरी तबा तो होती है रवां और

नद्यांना वाट सापडली नाहीं तर त्यांचें पाणी वर चढूं लागतें. त्याचप्रमाणें अंतरींची तळमळ आंत कोंडून राहिली कीं तिला काव्याच्या रूपानें वाट फुटते.

लिखता हूं असद सोजिशे दिल से सुखने गरम.
ता रख न सके कोयी मेरे हरफ़पर अंगुश्त

अंतरींच्या जिव्हाळ्यांतून माझें तेजस्वी काव्य बाहेर पडतें म्हणून माझ्या काव्यावर तें कृत्रिम आहे म्हणून बोट ठेवण्यास नको.

गालिबला आपल्या काव्यशक्तीचा मोठा अभिमान होता ह्यासंबंधीं त्यानें जागोजागीं आपले विचार प्रकट केले आहेत. ह्याचें एक उदाहरण तर पाहा —

हैं और भि दुनियामें सुखन्वर बहोत् अच्छे
कहते हैं के गालिबका है अंदाज़े बयां और

जगांत चांगले चांगले कवि आहेत परंतु गालिबची काव्यशैली कांहीं औरच आहे असें लोक म्हणतात.

गज़लास अनुसरून गालिबनें प्रेम हा विषय प्रामुख्यानें हाताळलेला आहे. प्रेमाशिवाय जीवनांत रस नाहीं. जीवनाला गोडी आणि लज्जत येते ती ह्या प्रेमामुळें. ह्यासंबंधीचे गालिबचे उद्गार असे –

इश्कसे तबीयतने जीस्तका मजा पाया
दर्दकी दवा पायी दर्देलादवा पाया

प्रेमामुळें प्रकृतीला जीवन आकर्षक वाटूं लागलें. व्यथेला औषध मिळालें आणि ज्याला औषध नाहीं अशा व्यथेचा लाभ झाला.

इश्कपर ज़ोर नहीं ये है वो आतिश गालिब
के लगाये न लगे और बुझाये न बने

प्रेमावर कुणाचीच मात्रा चालूं शकत नाहीं. ती एक आग आहे. ती लावूं म्हटल्यानें लागत नाहीं आणि विझवूं म्हटल्यानें विझत नाहीं. प्रेमिक, प्रेयसी, प्रतिस्पर्धी, छळ, वियोग, विरह, उत्कंठा, निराशा हीं सारीं सारीं प्रेमांत अनुभवाला येतात, ह्यावर गालिबच्या बहुतेक साऱ्या कविता मोठ्या बहारीच्या आहेत. त्या मुळांतूनच वाचल्या पाहिजेत तेव्हां त्यांची खरीखुरी लज्जत समजून येईल. राहावत नाहीं म्हणून कांहीं उदाहरणें खालीं देत आहें.

नींद उसकी है दिमाग उसका है रातें उसकी हैं
जिसके बाज़ूपर तेरी जुल्फें परेशां होगयीं

तुझे केशकलाप ज्याच्या स्कंधावर रुळतात त्याचें वैभव काय विचारावें. त्याची सुखनिद्रा, त्याचे विलास, त्याची आनंदकारी रात्र हीं अवर्णनीय होत.

जब वो जमाले दिलफरोज़ सूरते मेहेरे नीमरोज
आपहि हो नज्ज़ारा सोज़ पर्देमें मूँह छुपाये क्यौं

तिचें सौंदर्य आकर्षक अन् चेहरा मध्यान्हीच्या सूर्यासारखा तेजस्वी आहे. तिच्याकडे पाहणाऱ्याला ती नजरेनें जाळूं शकते. मग तिनें बुरख्याआड मुख कां लपवावें ?

शब् को किसीके ख्वाब में आया नहो कहीं
दुखते हैं आज उस् बुते नाज़ुक बदनके पांव

त्या कोमलांगीचे पाय आज कां बरं दुखत आहेत. काल रात्रीं ती कुणाच्या स्वप्नांत तर चालत आली नसेल ना !

जबतक्के न देखा था कदे यार का आलम्
मैं मोतकदये फित्नये महशर न हुवा था

कल्पांताच्या दिवशीं प्रलय होतो त्यावर माझा विश्वास नव्हता. पण तुझें शरीरसौष्ठव आणि चालणें ह्यानें घडून आलेला प्रलय पाहिल्यावर माझा कल्पांताच्या कल्पनेवर विश्वास बसला.

साये की तरह साथ फिरे सर्व व सनूबर
तू इसकदे दिल्कश् से जो गुल्जारमें आवे

तूं आपला आकर्षक बांधा घेऊन बागेंत आलीस कीं पाहा आपल्या बांध्याचा गर्व करणारी सुरू आणि सनुबरचीं झाडें तुझ्या मागें मागें सावलीसारखीं फिरूं लागतील.

लैला-मजनू, शिरीं-फरहाद आदि प्रेमिकांच्या प्रेमवेडाचा उल्लेख गालिबनें जागोजागीं केलेला आहे. प्रेमापायीं घरदार सुटलें आणि विशाल वाळवंट आपल्या नशिबीं आलें. पण--

सौगज़ जमींके बदले बियांबा गिरां नहीं

म्हणजे माझ्या घराच्या शंभर गज जमिनींच्या मोबदल्यांत हजारों चौरस मैलांचें वाळवंट मिळतें तर हा सौदा महाग कां पडला असें कवि ह्या काव्यपक्तींतून विचारतो.

प्रियेशी भेट घेण्यांत वाटत असलेला संकोच तर पाहा--

वां वो गुरुरें इज्जो नाज़ यां ये हिजावे पासे वज्—
राहमें हम मिलें कहां बज्ममें वो बुलाये क्यौं

ती गर्विष्ठ आणि नखरेल अन् आम्ही संकोची आणि स्वाभिमानी. आमची गांठ पडावी तरी कशी आणि तिनें तरी आम्हांला बैठकींत बोलवावयाचें कां ?

ये न थी हमारी किस्मत् के विसाले यार होता
अगर और जीते रहते यही इंतेजार होता

मीलन आमच्या नशिबांत नव्हतें हेंच खरें. आम्हांला अधिक आयुष्य मिळालें असतें तर आम्हांला तेंही प्रियेच्या प्रतीक्षेंत घालवावें लागलें असतें.

गालिब हा रसिक, दिलदार मनाचा आणि अनेक आकांक्षा मनांत बाळगणारा होता. त्यामुळें आकांक्षांची पूर्ति झाली नाहीं कीं त्याची रुखरुख त्याला लागे.

हजारो ख्वाहिशें ऐसी के हर ख्वाहिशपे दम निकले
बहोत निकले मेरे अरमान लेकिन् फिर भी कम निकले

हजारों आकांक्षा मनांत येतात अन् प्रत्येक आकांक्षा तावडतोब पुरी व्हावी ह्याची तळमळ लागते. बऱ्याच आकांक्षा पुऱ्या झाल्या पण अतृप्त आकांक्षांच्या मानानें त्या

प्रिया पुन्हा एकदा आपल्याकडे येणार ह्या उत्कंठेंतून निघालेल्या कांहीं ओळी तर पाहा. त्या मनःस्थितीचें बहारदार वर्णन आहे.

मुद्दत हुयी हैं यार को मेहमां किये हुये
जोशे कदहसे बज्मे चिरागां किये हुये

प्रियेला पाहुणी करून आणि त्यानिमित्त लाल वारुणीच्या मैफिलीची आरास करून अनेक दिवस झाले.

करतां हूं जमा फिर जिगरे लख्त् लख्त को
अरसा हुवा है दावते मिज़गां किये हुये

हृदयाचे उडालेले तुकडे मी पुन्हा एकत्र करीत आहें. प्रियेच्या पापण्यांना आमंत्रण देऊन बरेच दिवस झाले.

फिर वजे एहतियात्से रुकने लगा है दम्
वरसों हुये हैं चाके गरेबां किये हुये

आतां पुन्हा मनःस्थिति वेडाकडे ओढ घेऊं लागली आहे. मागें प्रेमवेडांत अंगावरचे कपडे फाडून टाकल्याला बरेच दिवस झाले.

फिर्शौक कर रहा है खरीदार की तलब्
अर्जे मताए अक्ल, दिलो वजां किये हुये

रसिकतेला आपली बुद्धि, हृदय आणि जीव ह्यांचा निकाल लावून टाकण्याची ओढ लागली आहे.

मांगे है फिर् किसी को लबे बामपर हवस
जुल्फे सियाह रुखपे परेशां किये हुये

आपले केशकलाप मोकळे सोडलेले असे कुणीतरी पुन्हा समोरच्या गच्चीवर येऊन उभें राहावें असें वाटूं लागलें आहे.

चाहे है फिर किसी को मुकाबिल में आरज़ू
सुर्मे से तेज़ दुश्नये मिज़गां किये हुये

जिच्या पापण्यांचा खजीर सुरम्याच्या धारेनें अधिक तीक्ष्ण बनला आहे अशी प्रेयसी पुन्हा एकदा आपल्या सन्मुख बसावी अशी ओढ लागली आहे.

जी ढूंढता है फिर वही फुर्सत के रातदिन्
बैठे रहे तसव्वुरे जानां किये हुये

रात्रंदिवस प्रियेच्या चिंतनांत मग्न राहावें असें मनाला पुन्हा वाटूं लागलें आहे.

२७. . . .

प्रेमीजनांचा वियोग हा महत् दुःखाचा प्रसंग. मिर्जा गालिबच्या आयुष्यांत प्रेमप्रसंग आला होता. ऐन तारुण्यांत त्याचें एका नर्तकीवर प्रेम बसलें होतें. ती पण त्याच्यावर अनुरक्त होती. पण दुर्दैवानें तिचा लवकरच मृत्यु झाला. गालिबला ह्या प्रसंगीं अपरंपार दुःख झालें. चाळीस वर्षांनंतर एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत गालिबनें त्या नर्तकीची आठवण केलेली आहे. तिच्या मृत्यूनंतर त्यानें जें शोकगीत लिहिलें त्यांतील कांहीं ओळी अवश्य वाचण्यासारख्या आहेत.

उमर भरका तूने पैमाने वफ़ा बांधा तो क्या
उमर को भी तो नहीं है पायदारी हाये हाये

जन्मभर आपण एकनिष्ठ राहू असें आपलें ठरलें होतें. पण आयुष्य तरी कुठें थड आहे.

शर्म रुसवायीसे जा छुपना नकाबे ख़ाकमे
खत्म है उल्फत कि तुझपर पर्दादारी हाये हाये

आपलें प्रेमाचें गुपित उघडें पडेल ह्या विचारानें कां तूं मातीच्या बुरख्याआड आपलें तोंड लपविलेंस ? पडदापद्धतीची तर तूं कमालच केली आहेस.

खाकमें नामोंसे पैमाने मोहब्बत मिट्ट गयी
मिट्ट गयी दुनियासे राहो रस्मे यारी हाये हाये

प्रेमाचीं वचनें मातींत मिळून गेलीं. जगांतून प्रेमाची रीतच नाहींशी झाली. गालिबचें प्रेम हें कांहीं अगम्य, गूढ, दैवी अशा प्रकारचें नाहीं. तें जीवंत आणि सहृदय माणसाचें प्रेम आहे.

उत्कंठा, हेवा, मत्सर, विरह, वियोग, मीलन, आशा – निराशांचें द्वंद्व ह्यांचें सुंदर चित्रण गालिबनें केलेलें आहे. ह्यामुळें वाचकाला गालिबच्या काव्याचा आस्वाद घेतांना आपण वर्णिलेल्या मनःस्थितीचा अनुभव घेत आहोंत असें वाटतें.

गुल, बुलबुल, सुरूचें झाड आणि कुमरी पक्षी, शमा परवाना, पारधी, जाळें, घरटें, कारागार इत्यादि संकेतांचा वापर गालिबनें आपल्या काव्यांतून केलेला आहे.

कोण म्हणतें बुलबुलच्या आक्रंदनांत प्रभाव नाहीं म्हणून. तिकडे फुलाची स्थिति पाहा. त्याच्या पाकळ्यांचे (काळजाचे) तुकडे उडून गेले आहेत.

आमच्या घरट्याला लागून पारध्यानें जाळें लपवून ठेविलें आहे. उडण्याचा अवकाश कीं आम्हीं जाळ्यांत अडकलोंच.

हे माझ्या सोबत्या, मी तुरुंगांत आहें. बागेची काय हालहवाल आहे सांग. अरे गप्प कां ? काल बागेंत वीज पडली आहे हें सांगण्यास कांकूं कशाला करीत आहेस. अरे सांग, ती वीज माझ्याच घरट्यावर पडली असेल कशावरून.

मदिरेचे उल्लेख इतर कवि करतात. भक्ताला मदिरा, गुरुला मदिरा पाजणारा साकी अशा उपमा उर्दू काव्यांत सर्रास आढळतात. पण गालिब हा मदिरेचा भक्त होता. त्याच्या काव्यांतून मदिरेचे, मद्यपात्राचे, साकीचे आणि मैफलींचे उल्लेख कमालीचे खुमासदार वाटतात. ते एकत्र करून पुढें देण्यांत आलेले आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि: ...

२९. . . .

उर्दू आणि फारसी काव्यांत मद्य, मद्यशाला आणि मद्यपानाचे पुष्कळ उल्लेख आढळतात. तत्त्वज्ञानपर कवितांतूनही भक्तीच्या आविष्काराकरितां भक्ति म्हणजे मदिरा, भक्तमंडळी म्हणजे मैफिल, गुरु म्हणजे साकी असे संकेत वापरण्याची परंपरा उर्दू आणि फार्सी काव्यांतून दिसून येते. कर्मठ आणि कट्टर रूढिनिष्ठ माणसें म्हणून शेख, जाहिद (जपजाप्य करणारे), मोहतसिब (लोकांच्या नीतिमत्तेवर देखरेख ठेवणारे अधिकारी) ह्यांची टिंगल उडविण्यांत येऊन, त्यांना मदिरालयाला भेट देण्याचें, मदिराप्राशनाचें (अर्थात् कर्मठपणा सोडून देऊन परमेश्वराची खरी भक्ति करण्याचें) आमंत्रण देण्यांत येतें. कधीं कधीं कर्मठपणाची संवय सोडून आम्हीं आतां परमेश्वरभक्तीकडे वळलों आहोंत हें सांगण्याकरितां मीरसारखा कवि म्हणतो,

तसबीह को मुद्दतों संभाला हमने
खिर्का गले में बांधा हमने
आखिर उमरमें मैकी खातिर मीर
सज्जादा गिरवी रखने निकाला हमने

आम्ही जन्मभर जपमाळ ओढिली आणि गळ्यांत कफनी अडकविली. आतां आयुष्याच्या शेवटच्या काळांत मद्याचा लाभ व्हावा म्हणून नमाज पढण्याचें आसन गहाण टाकण्यास निघालों.

येथें सांगण्याचा उद्देश हा कीं जन्मभर कर्मठपणानें वागलों पण त्यांत समाधान लाभलें नाहीं. शेवटीं परमेश्वराची निस्सीम आराधना करावयाची असेल तर कर्मठपणाची बाह्य अवडंबरें टाकून दिलीं पाहिजेत. हें पटलें. गालिबनेंही म्हटलें आहे कीं,

रात पी जमजम् पे मये और सुबहदम्
धोये धब्बे जामये एहरामके
जमजम ही पे छोडो मुझे क्या तौफे हरमसे
आलूदा बमये जामये एहराम बहोत है

जमजमच्या पवित्र विहिरीवर बसून आम्हीं रात्रीं मद्याचें सेवन केलें आणि सकाळीं एहरामवर (हाजच्या यात्रेकरूनीं चढवावयाचे विशिष्ट झगे) मद्याचे डाग पडलेले आम्हीं

धुवून काढले. मला जमजमच्या विहिरीवरच बसून राहूं द्या. मला काब्याच्या प्रदक्षिणेशीं काय करावयाचें आहे. माझ्या झग्यावर मद्याचे डाग पुष्कळ पडले आहेत.

कर्मठ माणसाची टिंगल खालील पद्यपंक्तींतून उडविलेली आढळते.

रिंदाने दरे मैकदा गुस्ताख हैं जाहिद
जिनहार न होना तरफ इन बे अदबोंसे

हे कर्मठा, मद्यालयाच्या तोंडाशीं किंवा दाराशीं जमलेले हे मद्यपी उद्धट आहेत. त्यांच्या तोंडाशीं न लागलेलें बरें.

क्यों रद्दाकदा करें है जाहिद
मये है यह मगस् की कै नहीं है

हा कर्मठ (जाहिद) मागें पुढें कां करीत आहे. त्याला सांगा कीं ही मदिरा आहे. मधमाशीचें वमन म्हणजे मद्य नव्हे.

कहां मैरवाने का दरवाजा गालिब और कहाँ वाएज
पर इतना जानते हैं कल वह जाता था के हम निकले

कुठें मद्यालयाचें दार आणि कुठें प्रवचनकार, दोघांचा काय संबंध. पण आम्हांला इतकें माहीत आहे कीं, काल आम्ही मद्यालयाच्या दारांतून बाहेर पडत होतों, त्या वेळीं तो आंत प्रवेश करीत होता.

मस्जिद के ज़ेर साया खराबात चाहिये
भौं पास आंख किब्लये हाजात चाहिये

हे प्रवचनकारा, मशिदीच्या शेजारीं मद्यालय हवें. अरे, परमेश्वरानें नाहीं का भुवयापाशीं (:मशिदीच्या कमानीसारख्या) डोळे (मद्यालयें) निर्माण केलीं आहेत.

रखता फिरू हूं खिर्का व सज्जादा रहने मये
मुद्दत हुयी हैं दावते आबो हवा किये

दारू पिऊन पुष्कळ दिवस झाले आतां पुन्हां नमाजाचें आसन आणि आपली फकिरीची गोधडी गहाण ठेवावी झालें.

दिल वदीन नकद्ला साकीसे गर सौदा किया चाहे
के इस बाजारमें सागर मनाये दस्तगरदां हैं

अरे, ह्या साकीपाशीं उधारखातें नाहीं. सारा कांहीं रोकड मामला आहे. तुला जर येथें मदिरा हवी असेल तर आपला धर्म अन् हृदय हीं साकीच्या हवालीं करून तूं मदिरा संपादन कर.

वाएज न तुम पियो न किसीको पिला सको
क्या बात है तुम्हारी शराबे तहूर की

अरे प्रवचनकारा, ही असली कसली रे तुझी स्वर्गातील सुरेची बढाई. धड तुलाही ती पिण्यास मिळत नाहीं अन् दुसऱ्यांनाही तूं पाजूं शकत नाहींस म्हणजे काय ?

जाहिर हैके घबराके न भागेंगे नकीरीन
हां, मुहसे मगर बादाये दोशीना की बू आये

मनुष्य मेल्यानंतर कबरींत त्याच्या पापपुण्याचा झाडा घेण्याकरितां नकीरीन नांवाचा देवदूत येतात अशी श्रद्धा आहे. कवि म्हणतो, मरणाच्या आधीं प्यालेल्या मदिरेचा माझ्या तोंडाला येणारा वास पाहून हे देवदूत कांहीं एक हिशेब न मागतां पळून जातील.

मद्याची उपमा कां उपयोगांत आणावयाची ह्यासंबंधीं गालिब म्हणतो कीं, पूर्वीपासूनच तशी परंपरा चालत आलेली आहे.

हरचंद हो मुशाहिदे हक़की गुफ्तगू
बनती नहीं है बादा वो सागर कहे बग़ैर

कोणतीही तत्त्वाची आणि अंतिम सत्याची गोष्ट असो, मद्य आणि मद्याचा पेला हे संकेत वापरल्याशिवाय जमतच नाहीं.

पण असा कांहीं आडपडदा न ठेवतां मद्यपानाचीं केलेलीं वर्णनं कांहीं थोडींथोडकीं नाहींत. गालिब हा कवी तर मदिरेचा अनन्यभक्त होता. त्यामुळें त्यानं वरील काव्यपंक्तींतून जाहिद आणि वाएज ह्यांची टिंगल उडवीत मदिरेची म्हणजे भक्तीची महति गाइली आहे. तिथेंच त्यानं आपल्या स्वतःच्या मदिरासक्तीची उघडउघड कबुली पण दिलेली आहे. त्यामुळें त्याचीं हीं मद्यासंबंधींचीं वर्णनं मोठीं चटकदार झालेलीं आहेत.

फिर देखिये अंदाजे गुलफ़्शानीये गुफ़्तार
रखदे कोयी पैमाना व सहबा मेरे आगे

माझ्यासमोर मद्याची सुरई अन् चषक ठेवा आणि मग पाहा माझ्या मुखांतून शब्दरूपी पुष्पांची वृष्टी कशी काय होते ती !

गो हाथ को जुंबीश नहीं आंखोंमें तो दम है
रहने दो अभी सागर व मीना मेरे आगे

हातांत शक्ति नसली म्हणून काय झालें. डोळ्यांत तर आहे ना ! माझ्यासमोर अजून मद्यसुरई आणि चषक राहूं द्यारे.

गालिब छुटी शराब पर अब भी कभी कभी
पीता हूं रोजे अब्र व शबे माहताबमें

गालिब म्हणतो, माझी मदिरा सुटली पण अजूनही चांदण्या रात्रींत आणि आभाळ आलेल्या दिवशीं मी पितोंच.

उर्दू काव्यांत नदीच्या कांठांना नेहमीं तहानलेलें असें कल्पितात. आतां ह्यासंबंधी गालिबच्या खालील ओळी पाहा —

बक़द्रे ज़र्फ है साक़ी खुमारे तिश्नाकामीभी
जो तू दरियाये मये है तो मैं खिमियाजा हूं साहिलका

हे साकी, प्रत्येकाला आपापल्या मगदुराप्रमाणें मदिरा पिण्याची तळमळ असते. माझेंच पाहा ना, माझी तहान कितीही मदिरा पिऊन शांत व्हायची नाहीं. अरे, तूं जर मदिरेचा दर्या असलास तर मी त्या दर्याचा सदा तृषार्त असा कांठच आहे असें समज.

यह मसायले तसव्वुफ, यह तेरा बयान गालिब
तुझे हमवली समझते जो न बादारवार होता

त्या तत्त्वज्ञानाच्या गोष्टी आणि त्यांचें वर्णन करण्याची तुझी शैली अरे तूं जर दारुड्या नसतास तर आम्ही तुला निश्चित संत समजलों असतों.

मैं और बज्मे मैसे यौं तिश्ना काम आवूं
गर मैंने कीभि तोबा तो साकीको क्या हुवा था

मी अन् मद्यालयांतून न पितां यावें ? मी दारूची शपथ घेतली होती तरी साकीला काय झालें होतें ? त्यानें जबरीनें नको होतें का पाजायला मला ?

असदुल्लाखां तमाम हुआ
अये दरेगा वह रिंदे शाहिदबाज

अरेरे तो सौंदर्योपासक आणि मदिरेचा भक्त असदुल्लाखां गालिब मेला.

कर्जकी पीते थे मये लेकिन समझते थे केहां
रंगलायेगी हमारी फाका मस्ती एक दिन

कर्ज काढून पिणें चालू होतें पण आमची ही फाकेमस्ती कधींना कधीं फळाला आल्याशिवाय राहाणार नाहीं, ह्याची आम्हांला बालंबाल खात्री आहे.

कलके लिये आज न कर खस्त शराबमें
यह सूयेज़न है साक़ी ये कौसरके बाबमें

सज्जनांना स्वर्गातील अमृत (कौसर) प्यायला मिळतें अशी समजूत आहे. गालिब म्हणतो, अरे साकी तर मग आम्हांला भरपूर पाज बरें. त्यांत कसूर मात्र करूं नकोस. तुला वाटतें आम्हांला स्वर्गांत कौसर (अमृत) मिळेल कीं नाहीं. अरे काळजी करूं नकोस. आमचा स्वर्गांतील साकीवर पूर्ण विश्वास आहे. त्याच्याबद्दल तूं संशय घेऊं नकोस.

कोई कहे के शबे माहमें क्या बुराई है
बलासे आज अगर दिन को अब्रोबाद नहीं

आज आभाळ आलेलें नाहीं. मदिरापानाची काय मजा येणार म्हणतात. पण चांदण्या रात्री तर आहेत ना. चांदण्यांतही मदिरापानाची खूप लज्जत राहील.

आपल्या मदिरापानाचें समर्थन गालिबनें खालील ओळींत केलेलें आहे.

मये से गरज़ निशात है किस रूसियाह को
इक गूना बेखुदी मुझे दिन रात चाहिये

मदिरापानानें आनंद भोगायला कुणा कमनशिबाला हवें आहे. मला तर दिवसरात्र स्वतःला विसरून जाण्यास हवें आहे.

मद्य आणि मद्यालयाच्या वर्णनांत गालिबची प्रतिभा कशी भराऱ्या मारते तें पाहा.

परे परवाना शायद बादबाने किश्तीये मये था
हुई मजलिस की गर्मीसे रवानी दौरे सागर की

मैफिल सुरू झाली. दिवे पेटले आणि दिव्याच्या मागोमाग पतंग आले. त्यांच्या मागोमग दारूच्या पेल्यानें भरलेली किश्ती (ट्रे, तबक) मैफिलींतून फिरूं लागली. म्हणजे ह्या किश्तीला (नावेला) पतंगाचे पंख बादबान (शीड ह्याकारणारे) बनून पुढें नेत आहेत असें वाटतें.

मये परस्तान खुमे मये मुह से लगायेहि बने
एक दिन् गर न हुवा बज्ममें साकी न सही

अरे मद्यप्यांनो, मैफिलींत एक दिवस साकी नसला म्हणून काय झालें. पेले भरून मिळत नसले तर सुरईच लावा तोंडाला कशी ती !

गालिबची काव्यसृष्टींतील प्रिया ही पट्टीची पिणारी दिसते. त्यासंबंधींचे उल्लेख तर पाहा.

मये वह क्यों बहोत पीते बज्मे ग़ैर में यारब
आजही हुवा मंजूर उनको इम्तिहान अपना

मी मदिरा किती पिऊं शकतों हें पाहाण्याकरितां ती परक्यांच्या मैफिलींतून उपस्थित राहून मदिरेचें मनसोक्त प्राशन करीत आहे. अरेरे, आजच तिला हा प्रयोग करून पाहाण्याची कां इच्छा झाली ? अन् ती पण परक्यांच्या मैफिलींत कां ? माझ्यापाशीं कां नाहीं ?

चश्मे मा रोशनके उस बेदर्दका दिल शाद है
दीदये पुरखूं हमारा सागरे सरशारे दोस्त

रक्तानें लाल झालेले आमचे डोळे पाहून प्रियेला काय आनंद होत आहे. तिला वाटतें कीं हे डोळे म्हणजे कांठोकांठ भरलेले वारुणीचे पेलेच होत.

तेरी तरफ है ब हसरत् नज्जारये नरगिस्
बकोरिये दिले चश्मे रकीब सागर खींच

सुंदर डोळ्यांना नरगिसच्या फुलाची उपमा देतात. हे प्रिये, नर्गिसचें फूल तुझ्याकडे हेव्यानें पाहात आहे म्हणून तूं संकोचानें कां मदिरा पीत नाहींस. अग, त्या फुलाला डोळे ते कुठले अन् त्याला पाहाण्याची शक्ति तरी कुठें आहे ? तूं कांहीं एक संकोच न करतां हवी तितकी मदिरा पी बरं !

साबित हुवा है गरदने मीनापे खूने खल्क
लरजे है मौजे मये तेरी रफतार देखकर

मदिरा पिऊन बेहोशींत तूं पावलें टाकीत तरुणांचीं हृदयें चिरडीत चाललीस. त्यांच्या खुनाचा डाग तुझ्या नव्हे, त्या मदिरेच्या पात्राला लागला आहे. हें सगळें आपल्यामुळें घडलें म्हणून पात्रांतील मदिरा बघ तर कशी घाबरून सारखी कांपत आहे.

हमसे खुल जावो बवक्ते मय परस्ती एक दिन्
वर्ना हम छेडेंगे रखकर उजरे मस्ती एक दिन

मद्याची आराधना चालू असतांना रंगांत येऊन आमच्याशीं निःसंकोचपणें वाग बरें. नाहींतर लक्षांत ठेव, आम्हींच मदिरा पिऊन बेहोष झाल्याचें निमित्त करून तुला छेडल्याशिवाय राहाणार नाहीं.

रातके ववत मये पिये साथ रकीब को लिये
आये वह यां खुदा करे पर न करे के यौं

काल रात्रीं माझ्या प्रतिस्पर्ध्याला सोबतीला घेऊन प्रियेनें मदिरेचें सेवन केलें. तिनें माझ्याकडे यावें. पण कसें ? माझ्या प्रतिस्पर्ध्याला बरोबर न आणतां बरं.

मये लेगया है हुस्ने खुद आरा को बेहिजाब
अये शौक यां इजाज़ते तस्लीमें होश है

मदिरेच्या धुंदींत तिनें आपला बुरखा बाजूला सारला आहे. आतां तूं पण आपली शुद्ध तिला अर्पण करून तिच्याशीं बेभानपणें वागण्यास कांहीं हरकत नाहीं.

मैं उन्हें छेडूं और कुछ न कहें
चल निकलते जो मये पिये होते

मीं तिला छेडावें आणि तिनें कांहीं बोलूं नये. तेंच ती प्यालेली असली तर तिनें गहजब उडवून दिला असता. कुठें कवीनें प्रियेला साकी म्हणून संबोधलें आहे. ती मैफिलींत परक्यांना पेले भरभरून देते पण आम्हांला मात्र विचारीत सुद्धां नाहीं अशी कागाळी केली आहे.

गैर लें महफ़िलमें बूसे जामके
हम रहे यौं तिश्ना लब्र पैग़ामके

परक्यांना तिच्या मैफिलींत मधुचषक ओष्ठांना लावण्यास मिळावे अन् आम्हीं मात्र तिच्या दोन शब्दांसाठीं तहानलेले असावे. हा काय प्रकार आहे.

आतां मद्य, मधुशाला ह्यांचे उल्लेख इतर विषयांच्या अनुषंगानें गालिबनें कसे तयार केलेले आहेत तें तर पाहा.

क़तरये मये बसके हैरतसे नफ़स परवर हुवा
खते जामे मये सरासर रिश्तये गौहर हुवा

प्रियेचें सौंदर्य पाहून मधुचषकांतील दारूचे थेंब पात्राच्या बाहेर जागच्या जागीं थवकून त्यांची एक माळच बनलेली आहे.

होती है किस् कदर अरज़ानीये मये जल्वा
के मस्त है तेरे कूचे में हर दर व दीवार

तुझ्या सौंदर्याच्या आविष्कारापायीं दारू स्वस्त झाली आहे म्हणूनच कीं काय तुझ्या परिसरांतील घरेंदारेंसुद्धा ह्या मदिरेंत केवळ तुझ्या दर्शनानें धुंद आणि बेहोश होऊन गेलीं आहेत.

न पूछ वसअते मयेखानये जुनून गालिब
जहां यह कासये गरदूं है यक खाक अंदाज़

वेडाची मद्यशाळा किती विस्तीर्ण आहे म्हणून विचारूं नकोस. अरे, हें आकाशाचें भांडें आहे ना, तें आमच्या ह्या मद्यशाळेंतील कचरा टाकण्याची पेटी आहे असें समज.

क्यौं गरदिशे मदामसे घबरा न जाये दिल
इन्सान हूं प्याला व साग़र नहीं हूं मैं

ह्या चिरकालच्या भ्रमंतीनें कां बरें मन घाबरून जाणार नाहीं. मी तरी शेवटीं मनुष्यच आहें ना ! सारखा फिरत राहाणारा, मद्यालयांतील पेला तर नव्हे ना !

दीदार बादा हौसला साकी निगाह मस्त
बज़्मे खियाल मैकदये बेखरोश है

मन म्हणजे गोंगाट नसलेली मद्यशाळाच. प्रियेकडे सतत पाहायला मिळणें हेंच मद्य. हें कधींच कमी पडत नाहीं आणि प्रत्येकाला त्याच्या योग्यतेप्रमाणें हें मद्य प्राशन करावयाला मिळतें.

रहा आबाद आलम् अहले हिंम्मतके न होनेसे
भरे है जिसक़दर जामो सुबू मैखाना खाली हैं

जगांत सर्वत्र महात्मे असते आणि त्यांनीं जगाचा त्याग केला असता तर हें जग निर्जन बनलें असतें. पण जग आबाद आहे ह्यावरून तसे महात्मे फार थोडे असले पाहिजेत हेंच सिद्ध होतें. पाहा मद्यालयांत सुरया आणि पेले कांठोकांठ भरले आहेत. ते भरून तशाच अवस्थेंत राहाणें म्हणजेच मद्यालयांत कुणीं मद्यपी नाहीं हें सिद्ध होतें.

गरदिशे सागरे सद् जलवये रंगीन तुझसे
आयीनादारी यक दींदये हैरान मुझसे

तुझें बहुरंगी सौंदर्य मैफिलींतील पेल्यासारखें सारखें फिरत आहे–पसरत आहे. अन तें पाहून माझे नेत्र आरशासारखे अचंब्यांत पडले आहेत. (उर्दू काव्यांत अचंबा किंवा आश्चर्य व्यक्त करण्याकरितां नेहमीं आरशाची उपमा देतात.)

अशा प्रकारें गालिबनें आपल्या काव्यांतून मदिरा, मधुचषक, मधुशाला इत्यादींचा उपयोग केलेला आहे. परमेश्वरप्राप्ती, गुरूची कृपा, समाधि इत्यादि तत्त्वज्ञानपर व्यवहारांत मद्याची उपमा देण्याचा प्रघात उर्दू फार्सी काव्यांत आहे. पण मद्यासंबधीं आलेली प्रत्येक ओळ ही भक्तिपर, प्रत्येक साकी हा गुरु आणि प्रत्येक मधुचषक म्हणजे उपासना असें समजण्याचें कारण नाहीं, कांहीं ठिकाणीं प्रियेला साकी कल्पिलेलें आहे. तर कांहीं ठिकाणीं प्रियेच्या मैफिलींतील साकी हा प्रियकराचा प्रतिस्पर्धी असतो आणि एरवीं मैफिलींत प्रेमिकाला दारू कधीं न देणारा हा साकी जेव्हां पेला प्रेमिकाच्यापुढें करतो त्या वेळीं त्या साकीनें दारूंत कांहीं मिसळलें तर नाहींना अशी शंका प्रेमिकाला येते.

मदिरेचें वर्णन करतांना गालिबच्या प्रतिभेला जी भरारी आलेली आहे त्यांत काव्य-कल्पनेइतकाच मदिरेच्या प्रत्यक्ष अनुभवाचाही वांटा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण ही गोष्ट इतकी महत्त्वाची नाहीं. त्यानें केलेलीं वर्णनें हीं हृद्य आणि चटका लावणारीं आहेत हें विशेष महत्त्वाचें आहे. एरवीं ग़ज़ल म्हणजे निरनिराळे विषय ज्यांत आलेले आहेत अशा द्विपदांची पण फक्त यमकाच्या दोरीनें एकत्र आलेली माळच. परंतु गालिबनें एक संपूर्ण ग़ज़ल ‘ मौज शराब ’ म्हणजे मधुलहरी ह्या नांवाखालीं रचलेली आहे. त्या ग़ज़लाची बहार खालील ओळींत पाहा —

मधुलहरींना पंख फुटण्याचा (हालचाल करण्याचा) काळ (वसंतऋतु) पुन्हा पातला आहे. ह्या मधुलहरी बदकांना (म्हणजे बदकाच्या आकाराच्या मदिरेच्या पात्रांना) मैफिलींतून तरंगत जाण्याची शक्ति देवोत. (वसंतऋतूंत मदिरेच्या मैफिली झडतात आणि मधुपात्रें मैफिलींतून सारखीं फिरत असतात त्याला उद्देशून वरील कल्पना आहे.)

बागेंतील वृक्षलता आज इतकी बेहोष कां बरें झाली आहे? ह्याचें कारण उघड आहे. द्राक्षांच्या वेलींकडून मादक द्राक्षासवांचा गंध घेऊन वायू ह्या वृक्षलतांवरून जात आहे ना हेंच तें कारण बरं!

मदिरेंत जो बुडून गेला तो नशिबवान खरा अन् ज्याच्या डोक्यावरून मधुलहरी वाहूं लागल्या, त्या मधुलहरी नव्हेत तर ते भाग्योदयसूचक हुमा नांवाचे पक्षीच त्याच्या डोक्यावरून चालले आहेत असें समजावें.

हा वर्षाऋतु आहे. ह्या ऋतूमुळें जीवनलहरींचेंच मधुलहरींत रूपांतर होईल ह्यांत काय आश्चर्य!

तुफान उत्साहामुळें चोहोंकडे चार प्रकारच्या लहरी उत्पन्न झालेल्या आहेत. पुष्पलहरी (फुलांचा सडा), आकाशांत सूर्यास्तसमयीं पसरलेल्या रंगलहरी, मंदमंद पवनाच्या लहरी अन् मधुलहरी ह्या त्या चार लहरी होत.

रसिकतेला जितकी तळमळ तितक्याच प्रमाणांत मधुलहरी अमृत बनून रसिकतेला भरपूर जीवन देतात.

ह्या मधुलहरी द्राक्षवेलींच्या नसानसांतून जीवनरस बनून वाहात आहेत. पानांचा लालसर रंग म्हणजे ह्या मधुलहरींचे पंखच होत.

माझ्या कल्पनेच्या पथावर लाल लाल दिव्यांची आरासच झाल्यासारखी वाटते आहे. लाल मधूचे विचार डोक्यांत घोळताहेत. ह्या मधुलहरी म्हणजे लाल फुलांचा सडाच अन् ह्या लाल रंगाचा इतका खच म्हणजे दिव्यांची ती आरासच नव्हे का?

मधुलहरी मेंदूपर्यंत जाऊन भिडल्या आहेत. नशा खूपच चढली आहे. ह्या नशेच्या आड्न जणूं काय ह्या मधुलहरी माझी बुद्धि अजून किती शाबूत आहे ह्याचें निरीक्षण करण्यांत गुंतल्या आहेत.

जगांत सर्वच वस्तूंना बहर आलेला आहे. अगदीं हरित् तृणापासून तों थेट मधुलहरीपर्यंत.

क्षणिक वसंतऋतूच्या अनुभवानें आपण क्षणभंगुर जीवनाचा अंदाज घेऊं शकतों. म्हणजे वसंतऋतु हा जीवनावरील थर होय. तसेंच मधुलहरींमुळें विस्मृतिसागराचाही अनुभव लाभतो.

फुलांचा बहर पाहून हे असद, माझें देहभान हरपत आहे. आतां मधुलहरींना पंख फुटण्याची पुन्हा वेळ आली आहे.

गालिबच्या वरील मधुलहरींमुळें त्याच्या एकंदर काव्याला लज्जतदार खुमारी आलेली आहे, हें निःसंशय होय.

गालिबच्या काव्यांत जीवन, सृष्टि, परमेश्वर वगैरेसंबधीं जे विचार आढळून येतात ते आणि त्यांची काव्यमय मांडणी हें गालिबचें वैशिष्ट्य इतर कवींच्या काव्यांतून इतक्या प्रकर्षानें आढळून येत नाहीं. जीवन म्हणजे संघर्ष होय. परिस्थितीशीं सतत झगडणें टळत नाहीं. जीवनांत शोकाचा फार मोठा वांटा आहे, फार काय जीवनाचे बंध आणि शोकाचे बंध हे एक भासण्याइतके निकटचे आहेत. एक मरणाशिवाय त्यांतून सुटका होत नाहीं. सहन करणें, परिस्थितीशीं झगडत राहणें हें आवश्यक आहे. कारण त्याशिवाय गत्यंतर नाहीं असें गालिबचें मत आहे. कधीं कधीं जीवनांतील दुःखानें गालिब अगदीं कळवळून उठतो आणि मग त्याच्या तोंडून निराशेचे आणि दुःखाचे उद्गार निघतात. गालिबचें एकंदर आयुष्य दगदगींत आणि त्रासांत गेलें. त्याची आर्थिक स्थिति कधींच चांगली नव्हती. त्यांतच खर्चिकपणा व मदिरेचें व्यसन. कौटुंबिक जीवनांत त्याला संततीवियोगाचें दुःख अपार होतें. गालिबला एकंदर सात मुलें झालीं पण तीं सारीं कांहीं महिन्यांच्यावर मात्र जगलीं नाहींत. आपल्या मेहुणीच्या मुलावर म्हणजे आरिफवर त्यानें जीवापाड प्रेम केलें; परंतु दुर्दैवानें तोपण तरुण वयांत मृत्यु पावला. १८५७ चा प्रचंड वणवा पेटलेला त्यानें डोळ्यानें पाहिला होता. त्यांत त्याच्या भावाची, भाच्याची, प्रियजनांची आणि मित्रांची पडलेली आहुति त्यानें प्रत्यक्ष पाहिली होती. दिल्लीचें राजघराणें नष्ट आणि देशोधडीला लागलेलें त्यानें प्रत्यक्ष पाहिलें. आपल्या बहात्तर वर्षांच्या आयुष्यांत गालिबला जीवनाचा आणि त्यांतील सुखदुःखाचा जो अनुभव आला तो फारच थोड्यांच्या वांट्यास आला असेल. ह्यासंबंधींचे गालिबच्या ग़ज़ला तर पाहा—

मेरी किस्मत में ग़म गर इतना था
दिलभी यारब कयी दिये होते

हे परमेश्वरा, माझ्या नशिबांत तूं इतकीं दुःखें लिहिलीं होतींस तर तीं सारीं सहन करण्यास हृदयें तरी अनेक द्यायचीं होतींस. एका हृदयानें काय काय म्हणून सहन करावें.

दिल ही तो है न संग व ख़िश्त दर्दसे भर न आये क्यौं
रोवेंगे हम हजार बार कोयी हमें सताये क्यौं

हें हृदय हें शेवटीं हृदयच आहे. तें कांहीं दगड नव्हे कीं धोंडा नव्हे. तें व्यथेनें कां बरें भरून येणार नाहीं. आम्ही अनंत वेळां रडूं पण रडूं देण्यांत आम्हांला कुणी कां बरें त्रास द्यावा.

देर नहीं हरम नहीं, दर नहीं आस्तान नहीं
बैठे है रहगुजरपे हम ग़ैर हमें उठाये क्यौं

हे कांहीं देऊळ नव्हे कीं मशीद नव्हे, हें कांहीं कुणाचें दार नाहीं कीं कुणाचा उंबरठा नाहीं. आम्ही वाटेवर बसलों आहोंत. आम्हांला काय म्हणून लोकांनीं तेथून उठवावें ?

क्यौं गर्दिशे मदामूसे घबरा न जाये दिल
इन्सान हूं प्याला व सागर नहीं हूं मैं

ह्या चिरकालच्या भ्रमंतीनें मन कां बरें घाबरून जाणार नाहीं ? मी तर शेवटीं मनुष्यच आहें ना ! सारखा फिरतींत असलेला मद्यालयांतील पेला तर नव्हे ना !

यारब जमाना मुझको मिटाता है किसूलिये
लौहे जहांपे हर्फे मुकर्रर नहीं हूं मैं

हा काळ मला पुसून टाकण्यास कां बरें बघत आहे ? जगाच्या फलकावर मी पुन्हा लिहिलेला आणि म्हणून पुसण्यालायक असलेला शब्द आहें कीं काय ?

जीवन हा एक संघर्ष आहे त्यांतून सुटून जावें म्हटलें तरी तें शक्य नाहीं.

कशाकश हाये हस्तीसे करे क्या सओये आज़ादी
हुओ जंजीर मौजे आबको फ़ुरसत रवानी की

ह्या जीवनाच्या संघर्षांतून सुटून जाण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं. समुद्राच्या लाटा तर पाहा. किनाऱ्याकडे येत असतांना प्रत्येक लाटेला तर वाटतें कीं आपण समुद्रांतून सुटलों आहोंत. परंतु किनाऱ्यापर्यंत पोहोंचतां पोहोंचतांच पायांत सांखळी घालून ओढल्यासारखें होऊन त्या लाटेला समुद्राकडे परत फिरावें लागतें. तसेंच जीवनाचें पण आहे.

सहन करणें आणि परिस्थितीशीं सतत झगडत राहाणें हेंच गालिबच्या मतें ह्याच्यावर उपाय आहेत.

ताब लायेही बनेगी गालिब्
वाकिया सख्त हैं और जान अजीज्

गालिब म्हणतो, संकटें सहन करणें हाच एकमेव उपाय आहे. कारण एकीकडे प्रसंग बांका आहे तर दुसरीकडे प्राण प्रत्येकाला प्रिय आहेत.

मरणाशिवाय ह्या जीवनशोकाला सुटका नाहीं. तेव्हां मृत्यूनें सुटका करीपर्यंत धैर्यानें सारें सारें सहन करीत राहाणें आवश्यक आहे.

गमे हस्तीका असद् किस्से हो जुज़ मर्ग इलाज
शमा हररंग में जलती है सहेर होने तक

एका मृत्यूशिवाय ह्या जीवनशोकांतून सुटका कशी बरें होणार ? तो दिवा पाहा. पहांट होऊन विझून जाईपर्यंत त्याला जळणें प्राप्तच आहे ना.

मरणानें कितीतरी गोष्टींवर पडदा पडतो.

ढांपा कफ़न्ने दागे उयूबे बरहनगी
मैं वरना हर लिबासमें नंगे वजूद था

कफ़नानें (प्रेतावरील वस्त्रानें) माझ्या नग्नतेवर पांघरूण घातलें; नाहींतर मी जीवंतपणीं कोणताही पोषाख घातला तरी वस्तुतः नग्नच होतों.

हें जीवन क्षणभंगुर आहे. ह्या जीवनाचा वारू तुफान नि अनावर असा आहे. जीवनाचा बहर क्षणिक आहे. जगत् नाशवंत आहे. असे विचार गालिबनें व्यक्त केलेले आहेत.

पढता हूं मक्तबे गमे दिल् में सबक़ हनोज़
लेकिन यहीके रफ़्त गया और बूद था

हृदयशोकाच्या शाळेंत मी पाठ घेत आहें. पण दोन शब्दांच्या पुढें प्रगति कांहीं झाली नाहीं. एक शब्द रफ़्त म्हणजे गेला आणि दुसरा शब्द बूद म्हणजे होता हा होय.

ह्या भूतलावर होऊन गेलेल्या नररत्नांची आठवण होऊन गालिब विचारतो —

मक्दूर हो तो खाकसे पूछूं के अये लयीम
तूने वो गंज हाये गिरांमाया क्या किये

मला शक्य असतें तर मी वसुंधरेला विचारलें असतें कीं, हे कृपण स्त्रिये, बोल, इतकीं नररत्नें आपल्यापाशीं सांठवून ठेवून तूं त्यांचें काय करीत आहेस.

पण जीवन दुःखपूर्ण आहे हें म्हणणाऱ्यांना गालिबचें सांगणें आहे सुखदुःखाच्या घटना अपरिहार्य आहेत आणि त्यांच्यामुळेंच जीवनाला जिवंतपणा आला आहे.

नगमा हाये गमको भी
अये दिल् गनीमत् जानिये
बे सदा हो जायेगा ये साजे हस्ती एक दिन्

हे हृदया, ह्या शोकगीतांनाच बरें समज. अरे, एक दिवस हें जीवनाचें वाद्य बंद पडून जाईल हें ध्यानांत आहे ना !

हवसको है निशाते कार क्या क्या
न हो मरना तो जीनेका मजा क्या

गालिबच्या जीवनाकडे पाहाण्याचा असा दृष्टिकोन आहे. जीवन हें सुखदु:खाचें मिश्रण आहे. पण असें जरी असलें तरी तें जगलेंच पाहिजे. त्या संघर्षांतून सुटका नाहीं. दु:खें अमाप आहेत. पण म्हणून जीवनाचा त्याग करणें शक्य नाहीं आणि इष्ट नाहीं असें गालिबचें म्हणणें आहे. कांहीं टीकाकारांच्या मतें गालिबच्या गीतांतून निराशेचे सूर निघतात असें म्हणणें आहे. परंतु गालिबनें गमे हस्ती (जीवनशोक), गमे इश्क (प्रेमशोक), गमे दिल (हृदयशोक), ह्यासंबंधीं लिहिलेलें असलें तरी त्याचें तत्त्वज्ञान निराशेचें नाहीं. परिस्थितीला तोंड देऊन झगडणें आणि दु:खें सहन करणें हेंच आवश्यक असतें असें त्याचें म्हणणें आहे. धर्माच्या बाबतींत तर गालिब हा अद्वैती होता.

हस्ती के मत् फरेब में आजाइयो असद्
आलम् तमाम् हल्कये दामे खियाल् है

हे असद (कवीचें नांव) का अस्तित्वाचा भ्रम बाळगूं नकोस. अरे, ही सृष्टि म्हणजे कल्पनांचें जाळें आहे.

एक परमेश्वर सत्य ; बाकी सर्व मिथ्या असा गालिबचा सिद्धांत दिसतो.

न था कुछ तो खुदा था
कुछ न होता तो खुदा होता
डुबोया मुझको होने ने,
न होता मैं तो क्या होता
किंवा – जबके तुझबिन् नहीं कोयी मौजूद
फिर ये हंगामा अये खुदा क्या है

हे परमेश्वरा, ह्या जगांत तुझ्याशिवाय दुसरें कोणीं नाहीं तर हा सारा गोंधळ कशामुळें झालेला आहे ?

परमात्म्याचें स्वरूप कणाकणांतून दिसून येतें. हें सर्व परमात्म स्वरूपांत विलीन होणार तसें होणें हेंच त्याचें ध्येय आहे.

इश्रते कतरा है दरियामें फना हो जाना

समुद्रांत विलीन होऊन जाणें ह्यांतच जलबिंदूचें वैभव आहे.

निष्काम उपासनेची आणि आत्यंतिक भक्तीची गालिबनें जागोजागीं आवश्यकता प्रतिपादन केलेली आहे. स्वर्गांतील सुखें लाभावींत म्हणून केलेली उपासना ही सत्काम उपासना होय. त्यांत आमीष ठेवण्यांत आलेलें आहे. असा स्वर्ग आम्हांला नको.

तो उचलून नरकांत झोकून द्या कसें असा सवाल गालिबनें टाकलेला आहे. तुमचा स्वर्ग कसा काय आहे हें आम्हांला माहीत आहे. मनाच्या करमणुकीला तो चाळा म्हणून बरा आहे.

हम को मालूम है जन्नत्‌कि हक़ीक़त लेकिन्
दिलके खुश रखनेको ग़ालिब ये खियाल अच्छा हैं

गालिव हा शियापंथी होता. पण त्याची वृत्ति संकुचित नव्हती. त्याचे जिवलग मित्र निरनिराळ्या पंथाचे वा धर्माचे होते. शिवाय त्याचे हिंदु शिष्य आणि चाहाते अनेक असून याच्याशीं त्याचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते.

एका पत्रांत तो लिहितो,

" बंदा परवर, मैं तो बनी आदमको (मनुष्यमात्र) मुसलमान हो या हिंदु या नुसरानी (ख्रिस्ती) अजीज रखता हूं आर अपना भाई गिनता हूं. दूसरा माने या न माने. "

धर्माचा कट्टरपणा गालिबला कधींच मान्य नव्हता. त्याची मदिरेची आसक्ति ही एकच गोष्ट त्याची धर्माचरणांतील शिथिलता दाखविण्यास पुरेशी आहे. रूढिप्रिय आणि कट्टर नुर्मनिष्ठांची त्यानें जागोजागीं टर उडविली आहे. साधासुधा भक्तिमार्ग सोडून रूढ धर्माचरण करणें, वृत्तीनें कट्टर, लोकांना स्वर्गाचीं आमिषें आणि नरकाचें भय दाखविणारे संकुचित वृत्तीचे मुल्ला, मौलवी, जाहिद, वाएज (प्रवचनकार), मोहतसीव (लोकांच्या नीतिमत्तेवर देखरेख ठेवणारे) ह्यांची त्यानें ठिकठिकाणीं हजेरी घेतली आहे.

गालिबचें व्यक्तिमत्व अष्टपैलू होतें. त्याच्या उर्दू ग़ज़लांतून जीवनाचे विविध विषय हाताळण्यांत आले असून गालिबनें ते सारे मोठ्या आकर्षक पद्धतीनें हाताळलेले आहेत, मांडलेले आहेत हें विशेष होय. गालिबच्या स्वतःच्या अनुभवांतून त्याच्या कविता निर्माण झाल्या असल्यामुळें त्यांत खरा रस उतरलेला दिसून येतो. योग्य आणि चित्ताकर्षक उपमा, मोहक रचना, शब्दांची मनोहर घडण ह्यामुळें गालिबच्या कविता गेलीं शंभर वर्षें रसिकांच्या जिभेवर सारख्या खेळत आहेत.

" दिले नादान तुझे हुवा क्या है ?
आखिर अिस दर्दकी दवा क्या है ? "
" इश्क मुझको नहीं वहशतही सही
मेरी वहशत तेरी शोहरत ही सही "
" मुद्दत हुयी है यारको मेहमां किये हुये "
" हजारो ख्वाहिशें ऐसी के हर ख्वाहिशूपे दम निकले,
बहोत निकले मेरे अरमान फिरभी कम निकले "

"आहको एक उम्र चाहिये असर होने तक
कौन जीता है तेरे ज़ुल्फ़के सर होने तक"

"कोयी उम्मीद बर नहीं आती,
कोयी सूरत नजर नहीं आती"

"दिळसे तेरी निगाह जिगरतक उतर गयी
दोनोंको एक अदामें रजामंद कर गयी"

"दर्दसे मेरे है तुझको बेकरारी हाये हाये
क्या हुयी जालिम् तेरी गफलत शुआरी हाये हाये"

"ये न थी हमारी किस्मतके विसाले यार होता
अगर और जीते रहते यही इंतेजार होता"

गालिबच्या अशा कितीतरी कविता लोकांच्या तोंडीं आहेत. गालिबचा मृत्यु इ. स. १८६९ मध्यें झाला. त्याला आज जवळ जवळ नव्वद वर्षें होत आलीं. ह्या काळांत उर्दू काव्यसृष्टींत हाली, एक्बाल, हसरत मोहानी, जोश, जिगर इत्यादींनीं बहुमोलाची उत्कृष्ट भर घातली. परंतु असें जरी असलें तरी गालिबचें श्रेष्ठपद अद्यापही अढळ राहिलें आहे व तें त्यांच्या काव्यगुणामुळें.

गालिबच्या उर्दू गज़लांचा केलेला हा मराठी अनुवाद रसिकांना आवडेल अशी आशा आहे.

१ . . . नक़्श फ़रयादी है किसकी शोख़िये तहरीरका
काग़ज़ी है पैरहन् हर पैकरे तस्वीरका ॥ १ ॥

कावे कावे सख़्तजानीहाये तनहाई न पूछ
सुब्ह करना शाम का लाना है जूये शीरका ॥ २ ॥

जज़्बए बेइख़्तियारे शौक़ देखा चाहिये
सीनए शमशीरसे बाहर है दम शमशीरका ॥ ३ ॥

आगही दामे शुनीदन जिस क़दर चाहे बिछाये
मुद्दआ अनक़ा है अपने आलमे तक़रीरका ॥ ४ ॥

बस्के हूं गालिब असीरीमेंभी आतिश् ज़ेरपा
मूये आतिश दीदा है हल्क़ा मेरी जंजीरका ॥ ५ ॥

(१) इराणमध्यें आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्याकरितां लोक आपलीं इष्ट तीं गाऱ्हाणीं कागदावर लिहून त्याचा अंगरखा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जात. गालिब म्हणतो, ' माझें अस्तित्व हेंच गाऱ्हाणें आहे कीं, परमेश्वरानें ह्या दुःखमय जीवनांत मला कां आणलें आहे. त्या दृष्टीनें प्रत्येक वस्तूनें जणूं परमेश्वरापाशीं दाद मागण्याकरितां कागदाचा अंगरखा धारण केला आहे.

(२) मित्रा, एकटेपणाच्या रात्रीची मनःस्थिति विचारूं नकोस. तशी रात्र कंठणें म्हणजे प्रेमिक फरहादनें कालवा खणून प्रेमवचनाची पूर्ति करूं पाहाण्याइतकें अवघड आहे.

(३) आपली भावभक्ति शिगेला पोचली कीं ध्येयपूर्ति ही झालीच पाहिजे. बलिदानाची इच्छा उत्कट झाली कीं खड्गाची तीक्ष्णता खड्गाच्या बाहेर येऊन आघात केल्याशिवाय राहाणार नाहीं. इच्छेची उत्कटता मात्र हवी.

(४) माझें लेखन गूढ स्वरूपाचें आहे. तुम्ही निरीक्षणाचें जाळें कसेंही पसरा. माझ्या वाणींतील अर्थ तुम्हांला समजणें अशक्य आहे.

(५) माझ्या पायांत शृंखला असल्यामुळें मी बंधनांत आहें. पण अंतरींच्या दाहकतेमुळें त्या शृंखला आगीसमोर केंस धरला असतां तो जसा वर्तुळाकार आणि निर्जीव बनतो तद्वत् निर्जीव बनल्या आहेत.

२ . . . जुज़् कैस् और कोई न आया बरूये कार
सहरा मगर बतंगीए चश्मे हुसूद् था ॥ १ ॥
आशुफ़्तगीने नक़्शे सवेदा किया दुरुस्त
ज़ाहिर हुवा कि दाग़का सरमाया दूद था ॥ २ ॥
था ख्वाबमें खियालको तुझसे मुआमिला
जब आँख खुलगयी जियां था न सूद था ॥ ३ ॥
लेता हूं मक़्तबे ग़मे दिलमें सबक़् हनोज़
लेकिन यही के रफ़्त गया और बूद् था ॥ ४ ॥
ढांपा कफ़नने दाग़े उयूबे बरहनगी
मैं वरना हर लिबासमें नंगे वजूद् था ॥ ५ ॥
तेशे बगैर मर न सका कोहकन् असद्
सरगश्तये खुमारे रुसूमो क़ुयूद था ॥ ६ ॥

(१) प्रेमाच्या उत्कटतेंत एक, म्हणजे मजनू सोडून कुणी पुढें आला नाहीं. एवढें मोठें वाळवंट पण त्यानें सुद्धां प्रेम व्यक्त केलें नाहीं. जणूं काय आत्यंतिक मत्सरामुळें त्या वाळवंटाचे डोळेही संकुचित झाले होते. कवीचा आशय असा कीं इतकें मोठें जग पण प्रेम व्यक्त करण्यास असमर्थ ठरलें. तें व्यक्त करण्यास अधिकार केवळ एकट्या मजनूचा ठरला.

(२) तीव्र अस्वास्थ्यामुळें हृदयावर डाग पडला आहे. जसे धुरामुळें काळे डाग पडतात नि ते तसेच राहातात त्याप्रमाणें. कवीनें तळमळीला धूर, आणि हृदयावर पडलेल्या व्रणाला काळ्या डागाची उपमा दिलेली आहे, आणि म्हटलें आहे कीं डाग पडण्यास जसा धूर कारणीभूत होतो तसेंच हृदयावर व्रण पडण्यास मनाची आत्यंतिक तळमळ कारणीभूत होते.

(३) माझी कल्पनाशक्ति स्वप्नांच्या अवस्थेंत तुजपाशीं हितगुज करीत होती म्हणजे तुझें स्वरूप जाणून घेण्याच्या प्रयत्नांत होती. परंतु जागृत अवस्थेंत पाहतों तो ह्या हितगुजीचा लाभही झालेला नाहीं अन् तोटाही नाहीं.

(४) हृदयाच्या शोकशाळेंत मी अजून धडेच शिकत आहें. ते धडे कोणते म्हणाल तर दोन शब्दांचे अर्थ. एक म्हणजे " गत " अन् दुसरा म्हणजे " होता ". कवीचें म्हणणें असें कीं जग म्हणजे शोककथा आहे. प्रत्येक वस्तूचा नाश ठेवलेला आहे. कोणत्याही वस्तूसंबंधीं ती एकेकाळीं होती आणि आतां गेली हेच ना शब्द वापरावयाचे. जगाच्या शोकशाळेंतील हेच ते धडे होत.

(५) एका कफनानेंच (प्रेतावर घालवयाचें कापड) माझ्या दोषावर पांघरूण घातलें नाहीं तर जीवनांत कितीही कपडे वापरून मी नग्नच होतों नाहीं का ?

(६) सुप्रसिद्ध प्रेमिक फरहादनें कुऱ्हाडीनें आपली आत्महत्या करून घेतली. खरें म्हणजे हें त्यानें करावयास नको होतें. प्रेम अत्युत्कट असलें तर मरण आपोआप यावयास हवें होतें. त्यास कुऱ्हाड कशाला ? प्रेमांत कृत्रिमता नको. ह्या कुऱ्हाडीमुळेंच फरहादच्या प्रेमव्यथेला मर्यादा पडल्यासारखें झालें.

३ . . . कहते हो न देंगे हम दिल् अगर पडा पाया
दिल् कहां के गुम कीजिये हमने मुद्दुआ पाया ॥ १ ॥
इष्कसे तबीयतने जीस्तका मज़ा पाया
दर्दकी दवा पायीं दर्दे बेदवा पाया ॥ २ ॥
दोस्तदारे दुश्मन् है एतेमादे दिल् मालूम्
आह बेअसर देखी नाला नारसा पाया ॥ ३ ॥
सादगी व पुरकारी बेखुदी व हुशियारी
हुस्नको तगाफुलमे जुर्रत् आज़मा पाया ॥ ४ ॥
गुंचा फिर लगा खिलने आज हमने अपना दिल
खून् किया हुवा देखा गुमकिया हुवा पाया ॥ ५ ॥
हाले दिल् नहीं मालूम् लेकिन् इस् कदर यानी
हमने बारहा ढूंडा तुमने बारहा पाया ॥ ६ ॥
शोरे पंदे नासेहने जख़्मपर नमक छिडका
आपसे कोई पूछे तुमने क्या मज़ा पाया ॥ ७ ॥

(१) तूं म्हणतेस कीं तुझें हृदय मला कुठें आढळलें तर मी तें तुला परत देणार नाहीं. अग ! मजपाशीं माझें हृदय कुठें शिल्लक राहिलें. आहे कीं आढळल्यावर देत नाहीं म्हणून तूं म्हणतेस. तुझा अर्थ मी समजलों. माझें हृदय तुझ्या हातीं आल्यानंतर मला चिडविण्याकरितां तूं हें म्हणत आहेस.

(२) जीवनांत प्रेम नसेल तर मजा नाहीं. प्रेमाचा लाभ झाल्यामुळें जीवनाचा खरा-खुरा आनंद अनुभवास आला. रोगाला औषध मिळालें आणि त्याबरोबर ज्या रोगाला औषध नाहीं अशी व्यथा पदरीं पडली.

(३) माझें हृदय – माझ्या प्रियेकडे झुकल्यामुळें, माझेंच असून मला वैरी बनलें आहे, अन् म्हणून तर माझ्या निश्वासाला फळ नाहीं. आणि ह्यामुळेंच कीं काय माझें रुदन अरण्य-रुदन ठरत आहे.

(४) सुंदर स्त्रियांच्या वागणुकीच्या सहजपणामागें खोल अर्थ असतो. त्यांचा हेतु असा कीं प्रियकराची कठिण परीक्षा घ्यावी, म्हणून, त्यांचा सहजपणा हा धूर्तपणा असतो आणि त्यांची बेपर्वाई म्हणजेच त्यांचें चातुर्य होय.

(५) उर्दू काव्यांत हृदयाला नेहमीं फुलांच्या गुच्छाची उपमा देतात. कवि म्हणतो कीं माझें हृदय रक्ताच्या रूपानें नेत्रद्वारें वाहत गेलें होतें त्याचा मागमूसही नव्हता. त्याचा आज शोध लागला. वसंतऋतूंत उमललेल्या फुलांचा गुच्छ म्हणजेच माझें हृदय होय.

(६) मला माझ्या हृदयाची कल्पना नाहीं. इतकें माहित आहे कीं मी पुष्कळ वेळां हृदयाचा शोध केला पण मला त्याचा ठावठिकाणा लागला नाहीं. त्याउलट तुला माझें हृदय कित्येक वेळां हातीं आलें होतें पण तूं त्याची पर्वा केली नाहींस.

(७) उपदेशकांच्या बोधानें माझ्या जखमेवर मीठ चोळण्याचें काम केलें. कुणीं त्यांना विचारावें कीं अशा रीतीनें मला त्रास देण्यांत तुम्हांला काय आनंद वाटला.

दिल मेरा सोज़े निहांसे बे महाबा जलगया
४ . . . आतिशे खामोशके मानिंद गोया जलगया ।। १ ।।
दिलमें जौके वस्ल व यादे यार् तक् बाक़ी नहीं
आग इस घरमें लगी ऐसी के जो था जलगया ।। २ ।।
मैं अदमसे भी परेहूं वरना गाफिल बारहा
मेरी आहे आतिशींसे बाले अन्का जलगया ।। ३ ।।
अर्ज़ कीजे जौहरे अंदेशेकी गरमी कहां
कुछ् खियाल् आया था वहशत्का के सहरा जल्गया ।। ४ ।।
दिल नहीं तुझको दिखाता वरना दाग़ोंकी बहार
इस चरागांका करुं क्या कारफ़रमा जल्गया ।। ५ ।।
मैं हूं और अफ़्सुर्दगीकी आरज़ू गालिब् के दिल
देखकर तर्जे तपाके अहले दुनिया जल्गया ।। ६ ।।

(१) माझें हृदय आंत लपलेल्या प्रेमाच्या आगीनें बेधडक जळून गेलें आणि त्याचा पत्ताही कुणाला नाहीं. जणूं काय ही आग आंतल्या आंतच पेटत होती.

(२) आतां हृदयांत मीलनाची हौस किंवा प्रियेची आठवण सुद्धा शिल्लक राहिलेली नाहीं. कारण ह्या घरांत आग इतकी भडकली होती कीं होतें नव्हतें तें सारें सारें कांहीं जळून खाक झालें आहे.

(३) मी आतां अस्ति आणि नास्तीच्याही पलीकडे पोचलों आहें. ह्यापूर्वी माझ्या निःश्वासांच्या ज्वाळांनीं सर्व कांहीं होरपळून निघत होतें.

(४) माझी तळमळ, उत्कटता अन् आवेश मी किती वर्णन करूं ? इतकेंच म्हणूं शकेन कीं सर्व कांहीं सोडून वणवण भटकण्याची मी इच्छा केली मात्र कीं त्या इच्छेच्या दाहकतेनें अरण्याला आग लागली.

(५) हृदयावर ज्या जखमा झाल्या आहेत त्या इतक्या आहेत कीं आतिषबाजीच्या दिव्याचीच उपमा त्यांना शोभेल. त्या जखमांची बहार मीं तुला दाखविली असती परंतु काय करूं, ज्याच्यावर जखमा आहेत तें हृदय जळून गेलें आहे.

(६) जगाची रीत पाहून मन प्रफुल्ल होण्याऐवजीं उदास झालें आहे. कारण जगाची रीतच अशी कीं आपलें हृदयही जळून जावें.

शौक़ हर रंग रक़ीबे सरोसामां निक़ला
५ . . . कैस् तस्वीरके परदेमे उरियां निक़ला ॥ १ ॥
जख़्म्ने दाद न दी तंगीये दिलकी यारब्
तीर भी सीनये बिसमिल्से पुरअफशां निकला ॥ २ ॥
बूये गुल् नालए दिल् दूदे चिराग़े महफिल्
जो तेरी बज़्मसे निकला सो परेशां निक़ला ॥ ३ ॥
दिल् हसरतजदा था मायदये लज्जते दर्द्
काम यारोंका बक़द्रे लबो दंदां निक़ला ॥ ४ ॥
अये नौ आमोज़े फ़ना हिम्मते दुश्वार पसंद
सख्त् मुश्किल् है के ये कामभी आसान् निकला ॥ ५ ॥
दिल्में फिर गिरियाने एक शोर उठाया ग़ालिब्
आह जो क़त्रा न निकला था सो तूफ़ान् निक़ला ॥ ६ ॥

(१) निर्भेळ प्रेमाला अवडंबराचें हरप्रकारें वांकडें आहे म्हणूनच मजनूंचीं चित्रें पाहा, तीं नग्नच काढतात ना !

(२) शरामुळें हृदय विद्ध झालें पण जखमेनें हृदयाची कांहीं कदर केली का ? हृदयामधून बाणाला घाबरून आरपार निघून जावें लागलें, पण जखम राहिलीच.

(३) हे प्रिये, तुझ्या मैफिलींतून जो निघाला तो त्रस्त होऊनच निघाला. मग तो फुलांचा सुगंध असो, हृदयाचें गाऱ्हाणें असो कीं समईचा धूर असो.

(४) माझ्या हृदयव्यथेच्या मेजवानीनें माझ्या मित्रांचे योग्यतेनुरूप समाधान होतें म्हणजे माझ्या काव्यरचनेमुळें प्रत्येक रसिकाला आपापल्या योग्यतेप्रमाणें काव्यानंदाचा लाभ होतो.

(५) माझी धीरवृत्ति पाहा. नष्ट होण्याचें काम वास्तविक किती अवघड ? पण माझ्या वृत्तीनें हें अवघड काम सुद्धा सोपें करून दाखविलें.

(६) अश्रु ढाळतांना मीं संयम दाखविला. त्या उलट न गळलेला अश्रुबिंदु हृदयाची कालवाकालव करीत आहे. जणूं काय हा एकच बिंदु म्हणजे तुफानच.

धमकीमे मर्गया जो न बाबे नबर्द था
६... इष्के नबर्द पेशा तलबगारे मर्द था ॥ १ ॥
थाजिंदगीमे मर्ग्का खट्का लगा हुवा
उडनेसे पेश्तरभी मेरा रंग जर्द था ॥ २ ॥
तालीफ़े नुस्खहाये वफ़ा कर रहा था मै
मज्मूए ख़ियाल् अभी फ़र्द फ़र्द था ॥ ३ ॥
दिल ता जिगर के साहिल दरियाए ख़ून है अब
इस् रहगुजर्मे जल्वये गुल् आगे गर्द था ॥ ४ ॥
जाती है कोई कश्मकश् अंदोहे इष्क की
दिलभी अगर गया तो वही दिल का दर्द था ॥ ५ ॥
अहबाब चारासाज़ीए वहशत् न कर् सके
जिंदां मे भी ख़ियाले बियांबा नवर्द था ॥ ६ ॥
ये लाशे बेकफ़न् असदे ख़स्ताजांकी है
हक् मग्फ़िरत् करे अजब आज़ाद मर्द था ॥ ७ ॥

(१) आपल्या क्षेत्रांत अनभिज्ञ असलेला प्रेमिक पहिल्याच धक्क्याला गडगडला. प्रेमाचें क्षेत्र इतकें कठिण आहे कीं त्यांत उतरणारा अचल चिकाटीचाच हवा.

(२) जीवनांतच मला मृत्यूची नेहमीं धाकधूक लागली होती. मरणाच्या अगोदरच माझ्या चेहेऱ्याचा रंग फिक्कट झाला होता म्हणजे मरण येण्याच्या आधींच जणूं कांहीं मी मरून गेलों होतों.

(३) माझ्या विचारांत अजून पोक्तपणा येण्याच्या पूर्वींच म्हणजे सुरवातीपासूनच मी प्रेम आणि निष्ठा (इश्क आणि वफा) ह्यांचा गुलाम झालों.

(४) हृदयापासून काळजापर्यंत आज रक्ताची नदी वाहात आहे. म्हणजे तळमळीचा दर्या उफाळून आला आहे. पण एक काळ असा होता कीं ह्या वाटेंत असा वसंतऋतु फुलला होता कीं ज्याच्या पुढें बागांचा बहर कांहींच नाहीं. कवीचा सांगण्याचा हेतु हा कीं पूर्वीं मन स्वस्थ आणि आनंदांत होतें. आतां प्रेमाचा छंद लागल्यामुळें तें अत्यंत व्यथित झालें आहे.

(५) प्रेमाच्या शोकांतून मुक्तता अशक्य आहे. हृदय आपल्यापाशीं शिल्लक नाहीं पण हृदयाची व्यथा मात्र शिल्लक आहे. आणि हृदय हातचें गेलें ह्याचा शोक आहे. अर्थात् कोणत्याही परिस्थितींत शांति म्हणून नाहीं.

१०५७८

(६) माझ्या प्रेमोन्मादाचा इलाज माझे मित्र करूं शकले नाहींत. मला त्यांनीं बंधनांत ठेवलें तरी माझे विचार आणि भावना स्वैर फिरत होत्या.

(७) कफन नसलेलें हें प्रेत विपन्न स्थितींत असलेल्या 'असद'चे म्हणजे 'गालिब' चें आहे. अरेरे ! काय सांगावें ? हा गालिब किती स्वातंत्र्यप्रिय होता. त्याला आपल्या प्रेतावर कफनाचेंही बंधन आवडलेलें नाहीं. परमेश्वर त्याचेवर दया करो. प्रेताला कफनसुद्धां न मिळणें हें अत्यंत दारिद्र्यावस्थेचें चिन्ह समजतात. गालिबनें ह्याच स्थितीला स्वातंत्र्यप्रियता संबोधून खऱ्या परिस्थितीला निराळें रूप देण्याचा प्रयत्न केला आहे.

७ . . . शुमारे सुबहा मर्गू़बे बुते मुश्किल पसंद् आया
तमाशाये बयक् कफ् बुर्दने सद्दिल् पसंद आया ।। १ ।।
बफैजे बेदिली नौमीदीये जावीद् आसां है
कुशाइशको हमारा उक़दये मुश्किल पसंद आया ।। २ ।।
हवाये सैरे गुल, आयीनए बेमेहरीये क़ातिल
के अंदाज़ बख़ून् गल्तीदने बिसमिल् पसंद् आया ।। ३ ।।
जराहते तोहफ़ये अल्मास अर्मुग़ाने दाग़े जिगर हद्या
मुबारक् बाद् असद् गम् ख्वारे जाने दरद मंद् आया ।। ४ ।।

(१) माझ्या निर्दय प्रियेला आतां स्मरणी आवडूं लागली आहे. कारण स्मरणी एकदम हातांत घेतली कीं स्मरणींतले शंभर मणी मुठींत येतात. म्हणजे एका झेपेंत शंभर हृदयें ताब्यांत घेण्याची इच्छा तिला झाली आहे. हेंच तिच्या आवडीवरून दिसून येतें आहे.

(२) जगाकडून निराशा पदरीं पडल्यामुळें कायमची निराशा सहन करणें सोपें झालें आहे. आतां जगांतील आशा आणि निराशा ह्या दोन्हीं आम्हांला सारख्याच झाल्या आहेत.

(३) बागेंत फुलें वाऱ्यानें डोलत आहेत तीं प्रियेला कां आवडतात म्हणाल तर तीं सुंदर आहेत म्हणून नव्हें, तर वाऱ्यामध्यें डोलणाऱ्या त्या फुलांकडे पाहून तिला रक्ताच्या थारोळ्यांत तडफडणाऱ्या हृदयाची आठवण होते.

(४) हे गालिब ! हे असद, माझा मित्र माझ्या प्रियेची समजूत घालण्याकरितां गेला. येतांना तो हिरे, माणकें बरोबर घेऊन आला. तीं कोणतीं तर त्याच्या स्वतःच्या हृदयावर माझ्या प्रियेनें केलेले आघात होत. आशय असा कीं माझ्या तर्फे माझ्या प्रियेकडे गेलेला मित्र स्वतः प्रेमिक बनून आला.

८ . . . दहरमें नक़्शे वाफ़ा वजहे तसल्ली न हुवा
है ये वो लफ़्ज़के शरमिंदये मानी न हुवा ।। १ ।।
सब्ज़ये ख़त्से तेरा काकुले सरकश् न दबा
ये जमर्रुदभी हरीफे दमे अफई न हुवा ।। २ ।।

मैंने चाहाथा के अंदोहे जफ़ासे छूटूं
वो सितमगर् मेरे मरनेपेभी राज़ी न हुआ ॥ ३ ॥

दिल् गुज़रगाहे खियाले मये व सागर ही सही
गर नफ़स् जादये सरे मंजिले तक़्वा न हुवा ॥ ४ ॥

हूं तेरे वादा न करने मे भी राज़ी के कभी
गोश मिन्नतक़शे गुलबांगे तसल्ली न हुआ ॥ ५ ॥

किससे महरूमिये किस्मतकी शिकायत कीजे
हमने चाहा था के मरजायें सो वो भी न हुवा ॥ ६ ॥

मर गया सदमये यक् जुंबिशे लबसे ग़ालिब्
नातुवानीसे हरीफ़े दमे ईसा न हुवा ॥ ७ ॥

(१) निष्ठेची छाप काळावर पडली पण त्यानें मनाचें समाधान काय होणार ? जर ह्या निष्ठेचा कांहीं लाभ नाहीं तर ह्या शब्दांत अर्थच राहात नाहीं.

(२) लोक म्हणतात कीं पाचू (जमरूद) सापासमोर धरली तर सर्पाचे डोळे जातात पण तुझे काळेभोर दिसणारे केस इतके नखरेल आहेत कीं तुला पाचूसारखी हिरवी लव येऊन सुद्धा तुझ्या कुरळ्या आणि वक्र कुंतलाला मऊपणा आला नाहीं.

(३) मी मनांत इच्छा केली कीं आतां मरण बरें. म्हणजे तिच्याविषयींची निष्ठा आणि त्यामुळें मला होणारें दुःख ह्यांतून माझी मुक्तता होईल. पण ती कठोरहृदया माझ्या मरणालाही संमती देईना. न जाणों माझ्या मरणानें जगांत तिचा दुर्लौकिक व्हावयाचा.

(४) माझे श्वासोच्छ्वास धर्माच्या (कर्मठपणाच्या) वातावरणांत चालले नाहींत तर हरकत नाहीं. माझें हृदय तर मदिरा आणि मदिरेच्या पेल्याचें निवासस्थान आहे ना !

(५) तूं मीलनाचें वचन दिलें नाहींस तरी आनंद आहे. नाहींतर हीं वचनें कानांवर आणि हृदयावर पडून त्यांना तुझें ऋणी व्हावें लागलें असतें.

(६) आमच्या दरिद्री नशिवाचें गाऱ्हाणें कुणापाशीं घेऊन जावें. मरणाची इच्छा खूप केली पण तें तरीं कुठें येतंय.

(७) येशूच्या फुंकर मारण्यानें रोगी बरे होतात आणि मेलेले जीवंत होतात असें म्हणतात. पण मी इतका अशक्त झालों होतों कीं फुंकर मारण्याची वेळच आली नाहीं. हजरत ईसाचे (येशूचे) ओठ हलले तोच माझा (गालिबचा) अंत झाला.

सताइशगर् है जाहिद् इस् कदर जिस् बागे़ रिज़्वां का
२.... वो यक् गुलदस्ता है हम् बेखुदोंके ताके निसियांका ॥ १ ॥

बयां क्या कीजिये बेदादे काविशहाये मिज़गां का
के हरयक कत्रयेखून् दाना है तस्बीहे मर्जांका ॥ २ ॥
न आयी सत्वते कातिल्र भी माने मेरे नालोंको
लिया दांतोंमें जो तिन्का हुवा रेशा नीस्तांका ॥ ३ ॥
दिखावूंगा तमाशा दी अगर फ़ुर्सत् ज़मानेने
मेरा हर दागे दिल्र यक् तुख़्म् है सर्वे चरागांका ॥ ४ ॥
किया आईना ख़ानेका वो नक़्शा तेरे जल्वेने
करे जो परतवे ख़ुर्शीद् आलमे शबिस्तां का ॥ ५ ॥
मेरी तामीरमे मुज़्मिर् है यक् सूरत् ख़राबीकी
हयूला बर्के ख़िरमन्का है ख़ूने गर्म् देहेक़ांका ॥ ६ ॥
उगा है घर्में हरसू सबज़ा वीरानी तमाशा कर्
मदार अब खोदने पर् घास के है मेरे दर्बांका ॥ ७ ॥
ख़मूशीमें निहां ख़ूंगश्ता लाखों आर्जूयें हैं
चिरागे मुर्दा हूं मैं बेज़बां गोरे ग़रीबांका ॥ ८ ॥
हनूज यक् परतवे नक़्शे ख़ियाले यार बाक़ी है
दिल्र अफ़सुर्दा गोया हुजरा है यूसुफ़्के ज़िंदांका ॥ ९ ॥
बग़ल्में ग़ैरकी आज आप सोये हैं कहीं वर्ना
सबब क्या ख़्वाबमें आकर् तबस्सुम् हाये पिनहांका ॥ १० ॥
नहीं मालूम किसकिस्का लहू पानी हुवा होगा
कियामत् है सरश्क् आलूदा होना तेरे मिज़गांका ॥ ११ ॥
नजरमें है हमारी जादये राहे फ़ना ग़ालिब
के ये शीराज़ा है आलम् के अजज़ाये परेशांका ॥ १२ ॥

(१) ज्या स्वर्गाची हा कर्मठ इतकी स्तुति करतो तो स्वर्ग म्हणजे आमच्या नजरेंत कांहींच नाहीं. त्याला आम्ही विस्मृतीच्या कोनाड्यांत पडून राहिलेला गुच्छ समजतों.

(२) प्रियेच्या पापण्यांची हालचाल काय सांगावी. त्यामुळें आमच्या डोळ्यांतून अश्रूंच्या, नव्हे रक्तांच्या धारा वाहूं लागतात. त्यांचा प्रत्येक बिंदु म्हणजे माळेचा दाणा भासतो.

(३) प्रियेचा दर्प माझीं गाऱ्हाणीं थांबविण्यास असमर्थ ठरला. मी दांतीं तृण धरलें पण त्या तृणामधूनही गाऱ्हाण्यांचे सूर निघत होते.

(४) मला काळ अनुकूल झाला तर सध्यां माझ्या हृदयावरचे डाग (व्रण) जे सुरूच्या झाडाच्या बियांसारखे दिसतात त्यांचा बहर आलेला मी दाखवीन. सांगण्याचा आशय असा कीं, प्रेमाच्या मार्गांत कांहीं आडकाठी न आली तर हेच व्रण वाढून फोंफावलेल्या सुरूच्या झाडासारखे दिसतील.

(५) माझ्या हृदयाचा शीशमहाल तुझ्या दृष्टीमुळें हां हां म्हणतां नष्ट झाला. पहांटेचे दंवबिंदू सूर्याच्या किरणांनीं नष्ट होतात. अगदीं तसेंच झालें आहे.

(६) माझ्या अस्तित्वामध्येंच माझ्या नाशाचें रहस्य लपलेलं आहे. म्हणजे प्रत्येक जीवनाच्या आंत मृत्यू लपलेला आहे. शेतकऱ्यांनीं कष्ट करून धान्याचे ढीग लावावे आणि तेंच कारण आकाशांतून ढिगाऱ्यावर वीज पडण्याचें ठरावें म्हणजे कष्टाच्या फळांत विजेची भीति लपलेली असावी तसेंच जीवनांत मृत्यु लपलेला असतो.

(७) घरांत प्रत्येक ठिकाणीं हिरवळ उगवलेली आहे. म्हणजे उध्वस्त घर जणूं काय ह्या हिरवळीचा तमाशा पाहात आहे. आतां घरचा रखवालदार ही हिरवळ काढून टाकील हीच आशा राहिली आहे.

(८) माझ्या स्तब्धतेंत हजारों रक्तरंजित इच्छा लपलेल्या आहेत. गरीबाच्या थडग्यावर जळणारा आणि कधीं विझेल ह्याचा नेम नसणारा असा मी एक निस्तेज दिवा आहें.

(९) हृदयांत अजून प्रियेच्या आठवणीचा एक किरण शिल्लक आहे. माझें उदास हृदय म्हणजे युसूफच्या तुरुंगाचा एक भाग आहे.

(१०) आज तूं खात्रीनें परपुरुषाच्या कुशींत झोपली असली पाहिजेस. नाहींतर माझ्या स्वप्नांत ओठावर मिस्किल हसूं घेऊन आलीच नसतीस.

(११) आतां तुझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा चालल्या आहेत. आतां तुला पश्चात्ताप झालेला दिसतो, पण तुझ्या डोळ्यांतून जाणारें हें पाणी नव्हे तर अनेक प्रियकरांच्या हृदयांचें रक्तच आतां तुझ्या डोळ्यांतून पाणी बनून वाहात आहे.

(१२) माझ्या डोळ्यांसमोर मृत्यूचा रस्ता दिसत आहे. जग आणि त्याच्या विखुरलेल्या निरनिराळ्या घटकांना एकत्र आणणारा हा एकच मार्ग आहे.

१० . . . न होगा यक् बियांबा मांदगीसे जौक़ कम मेरा
हबाबे मौजये रफ़्तार् है नक़्शे क़दम् मेरा ॥ १ ॥
मोहब्बत थी चमनसे लेकिन अब ये बेदिमाग़ी है
कै मौजे बूये गुल्से नाकूमें आता है दम मेरा ॥ २ ॥

(१) माझ्या समोरची वाट मला थकविणारी असली तरी मी ती मोठ्या आनंदानें आक्रमीन. थकणार नाहीं अन् उद्दिष्टाचें माझें प्रेम कमी होणार नाहीं. दिवा हातांत धरला तर

दिव्याबरोबर कांचेचा फुगाही जसा जातो तसा मी प्रेमाच्या वाटचालींत न थकतां चाललेला आहें.

(२) काळ बदलला कीं सगळेंच बदलतें. माझेंच पाहा कीं ह्या बागेवर माझें प्रेम किती होतें पण आतां ह्यांतील फुलांचा सुगंध मला अत्यंत तापदायक होत आहे.

११ . . . सरापा रहने इश्क़ व नागुज़ीर् उल्फते हस्ती
इबादत् बर्क़की करता हूं और अफ़सोस् हासिल का ॥ १ ॥
बक़द्रे जर्फ है साक़ी खुमारे तिश्ना कामी भी
जो तू दरियाये मैं है तो मैं खमयाज़ा हूं साहिल का ॥ २ ॥

(१) एकीकडे मी अंतर्बाह्य प्रेममय झालों आहें आणि दुसरीकडे मला स्वतःच्या जीवनाची लालसा आहे. प्रेमाच्या विजेनें हें सारें जीवन दग्ध होण्याचा संभव आहे तरीपण मी एकीकडे विजेची आराधना करीत आहें अन् दूसरीकडे जीवनाचा नाश होणार म्हणून हळहळ करीत आहें.

(२) हे साकी, दारूची तृष्णा प्रत्येकाला त्याच्या योग्यतेप्रमाणें लाभते. पण माझी तृष्णा साधीसुधी नाहीं. मदिरा ही वाहाणारी नदी असेल तर मी सदा तृषित असलेला तिचा कांठ आहें.

१२ . . . महरम नहीं है तू ही नवाहाए राज़ का
यां वरना जो हिजाब है–पर्दा है साज़ का ॥ १ ॥
रंगे शिकस्ता सुबहे बहारे नजारा है
यह वक़्त है शगुफ़तने गुलहाए नाज का ॥ २ ॥
तू और सूए ग़ैर नज़र हाए तेज़ तेज़
मैं और दुख तेरे मिज़ाहाए दराज़ का ॥ ३ ॥
सर्फा है जब्ते आह में मेरा वगरना मैं
तामा हूं एक ही नफ़से जां गुदाज का ॥ ४ ॥
हैं बस्के जोशे बादा से शीशे उछल रहे
हर गोशए बिसात है, सर शीशाबाज़ का ॥ ५ ॥
काविश का दिल करे है तक़ाज़ा कि है हनूज़
नाखुन पै क़र्ज़ उस गिरहे नीम बाज़ का ॥ ६ ॥
ताराजे काविशे गमे हिजरां हुआ ‘असद’
सीना, कि था दफीना गुहर हाए राज का ॥ ७ ॥

(१) हे मनुष्या, तुलाच सृष्टीमागचें गूढ संगीत आकलत नाहीं पण दिव्य दृष्टि असणाऱ्यांना प्रत्येक आवरणामागें सत्य स्थितीचा आविष्कार होतो. जणूं काय हीं आवरणें अशा महाभागांना प्रत्येक वस्तूचें गूढसंगीत ऐकविणारे बाजाचे भातेच भासतात.

(२) प्रभातकाळीं प्रथम प्रकाश फिक्कट असतो आणि फुलें झोपेमुळें आळसावलेलीं दिसतात. पण नंतर टवटवीत होतात. तसेंच झोपेच्या खुमारीनंतर तरुणी आळोखेपिळोखे देतात. त्या वेळीं त्यांचा चेहरा फिक्कट असतो. नंतर सकाळच्या ताज्या हवेनें त्यांचे चेहरे टवटवीत होतात. फूल उमलावें तसे.

(३) तूं आपल्या लांबलांब पापण्यांनीं (उर्दू वाङ्मयांत हें सौंदर्याचें लक्षण समजलें जातें.) जेव्हां दुसऱ्यांच्याकडे पाहतेस तेव्हां दुसऱ्यांना सुख देणाऱ्या तुझ्या पापण्या माझ्या हृदयावर खंजीर बनून आघात करतात.

(४) माझ्यांत संयम आहे म्हणून. नाहीं तर माझा एकच निःश्वास माझ्या शरीराला दिव्यासारखा जाळून टाकायला समर्थ आहे.

(५) वसंत ऋतूमुळें बाटलींतील दारू उफाळून येत आहे. मैफिलींत बिछायतीवर ठेवलेल्या ह्या बाटल्या दारूच्या उफाळण्यामुळें इकडून तिकडे उड्या मारीत आहेत. जणूं काय ही बिछायत म्हणजे जादूगाराचें शरीरच होय. आणि तो जादूगार बाटल्या इकडून तिकडे नाचवीत आहे.

(६) प्रेमाचा छंद घेतलेला प्रियकर प्रेमाच्या वेडांत कपडे फाडतो असा उर्दू काव्यांत संकेत आहे. ह्या ओळींत नखामुळें कापड अर्धेंच फाटलें असून विनफाटलेलें कापड अजून तसेंच राहिलें आहे. म्हणजे छंद किंवा वेड ह्याची पूर्ती होण्याची जणूं तें कापड वाट पाहत आहे. कवीचा आशय असा कीं कोणताही छंद घेतलेलीं माणसें छंद पूर्ण होईपर्यंत संतुष्ट होत नाहींत, किंवा काम अर्धवट ठेवीत नाहींत.

(७) हे असद (कवीचें नांव) माझें हृदय म्हणजे रहस्यांच्या मौक्तिकांचें भांडार होतें पण विरहाच्या संघर्षांत तें उध्वस्त झालें.

१३ . . . बज़्मे शाहन्शाह में अशआर का दफ़्तर् खुला
रखियो यारब ! यह दरे गंजीनए गौहर खुला ।। १ ।।

शब हुई फिर अंजुमे रख़्शिंदा का मन्ज़र् खुला
इस तकल्लुफ़ से कि गोया बुतकदे का दर खुला ।। २ ।।

गरचे हूं दीवाना पर, क्यों दोस्त का खाऊं फरेब
आस्तीं में दश्ना पिन्हां हाथ में नश्तर खुला ।। ३ ।।

गो न समझूं उसकी बातें, गो न पाऊं उसका भेद
पर यह क्या कम है कि मुझसे वो परी पैकर खुला ॥ ४ ॥
है ख़याले हुस्न में हुस्ने अमल का सा खयाल
खुल्द का इक दर है, मेरी गोर के अन्दर खुला ॥ ५ ॥
मुंह न खुलने पर है वो आलम कि देखा ही नहीं
जुल्फ़ से बढ़कर नक़ाब उस शोख़ के मुंह पर खुला ॥ ६ ॥
दर पे रहने को कहा और कहके कैसा फिर गया
जितने अर्से में मिरा लिपटा हुआ बिस्तर खुला ॥ ७ ॥
क्यों अंधेरी है शबे ग़म ? है बलाओं का नुज़ूल
आज उधर ही को रहेगा दीदए अख़्तर खुला ॥ ८ ॥
क्या रहूं गुरबत में खुश ? जब हो हवादिस का यह हाल
नामा लाता है वतन से नामाबर् अकसर खुला ॥ ९ ॥
उसकी उम्मत में हूं मैं, मेरे रहें क्यौं काम बन्द्
वास्ते जिस शाह के 'गालिब' गुम्बदे बे दर खुला ॥ १० ॥

(१) मोंगल सम्राट बहादुरशाहाच्या काळीं दर आठवड्यास मुशायरे होत असत. बादशहाच्या ह्या मैफिलींना गालिबनें मौक्तिक भांडार (गंजीने गोहर) असें नांव दिलें आहे. कवि म्हणतो कीं, बादशहाच्या मैफिलींत पुन्हा मुशायरे सुरू झाले आहेत. जणूं काय काव्याचें दफ्तरच उघडलें गेलें आहे, हे परमेश्वरा, ह्या मौक्तिक भांडाराचें दार नेहमींच उघडें राहूं दे.

(२) रात्र झाली आणि तारका (काव्याच्या) चमकूं लागल्या. जणूं काय संध्याकाळीं देवळाचीं दारें उघडल्यावर देवमूर्तीच्या आरतीकरितां तयार करण्यांत आलेले ते तुपाचे दिवेच होत.

(३) मी वेडा असलों तरी मित्र म्हणून वावरणाऱ्या शत्रूच्या बोलण्यांत कां येईन. माझें वेड दूर करण्याकरितां आपण जमलों आहों असें हे दाखवितात पण वास्तविक ह्यांनीं मला मारण्याकरितां, अस्तनींत शस्त्रें बाळगलीं आहेत.

(४) प्रियेचें रहस्य मला न उमगो, तिचें बोलणें मला न समजो, पण ती आतां मोकळेपणानें बोलूं लागली हेंच काय कमी आहे ?

(५) माझी सौंदर्याबद्दलची आसक्ति म्हणजे नितांत सुंदर अशा परमेश्वराच्या आराधनेचीच कल्पना नव्हे काय ? धार्मिक वृत्तीच्या मुसलमानांच्या बाबतींत समजलें जातें कीं ते मेल्यानतर कबरींतच त्यांच्याकरितां स्वर्गाचें दार उघडलें जातें तसें माझ्या बाबतींतही होईल.

(६) तिनें अजून तोंडावरचा बुरखा काढला नाहीं तर ही स्थिति प्रियेच्या चेहऱ्यावरचें हें अवगुंठन तिच्या कपोलावर खेळणाऱ्या केंसांच्या बटांपेक्षांही जास्त खुलून दिसतें.

(७) मी तिच्याकडे गेलों. तिनें दारावर पडून राहाण्याची परवानगी दिली. अजून मी आपली वळकटी उघडत होतों. तोंच तिनें मला विरुद्ध होऊन मनाई केली. ह्या चंचलपणाला काय म्हणावें ?

(८) विरहाची रात्र इतकी काळीकुट्ट कां ? आलें लक्षांत. वरून संकटें कोसळत आहेत. आकाशांतील चंद्रिका ह्या संकटांची मौज पाहाण्यांत गुंतल्या आहेत. त्या पृथ्वीकडे पाहात्या तर त्यांचा प्रकाश पडला असता.

(९) परदेशांत तरी मला कुठें सुख आहे ? कारण घरून जीं पत्रें येतात तीं सुद्धां अर्धी फाडलेलीं व उघडीं म्हणजे कुणाच्या तरी मृत्यूची सूचना देणारीं येतात. कुणाच्या मृत्यूची हकीकत कळविणें असल्यास पाकिटाच्या कोपऱ्यांत काळा डाग करून पाकिटें एका बाजूला फाटलेलीं अशीं पत्रें पाठविण्याचा शिरस्ता आहे. कवि म्हणतो कीं, परदेशांत सुद्धां स्वस्थतेनें राहण्याची सोय नाहीं. कारण, स्वदेशांतून दुर्घटनांच्या बातम्या येऊन मन अस्वस्थ करतात.

(१०) मी पैगंबराचा भक्त आहें. ज्यांच्याकरतां दार नसलेले घुमट (आकाश) उघडून ज्यांना परमेश्वरी साक्षात्कार झाला अशांचा मी अनुचर आहें. मला निराश होण्याचें काय कारण आहे ?

१४ . . . शब् के बर्क़े सोजे दिलसे ज़ोहरये अब्र् आब् था
शोलये जवाला हरएक़ हल्क़ये गरदाब् था ॥ १ ॥
वां करम् को उज्रे बारिश था इनान्गीरे ख़िराम्
गिरियासे यां पंबये बालिश् कफे सैलाब था ॥ २ ॥
वां खुदआराईको था मोती परोनेका ख़ियाल
यां हुजूमे अश्क़्मे तारे निगाह् नायाब् था ॥ ३ ॥
जल्वये गुल्ने किया था वां चिरागां आब्जू
यां र वां मिज़गाने चश्मे तरसे खूंनेनाब था ॥ ४ ॥
या सर पर शोरे बेख़्वाबीसे था दीवार जो
वां वह फ़र्क़ेनाज़् महवे बालिशे कम्ख़्वाब था ॥ ५ ॥
यां नफ़स् करता था रोशन शमए बज़्मे बेख़ुदी
जल्वये गुल वां बिसाते सोहबते अहबाब् था ॥ ६ ॥

फ़र्श से ता अर्श वां तूफ़ान था मौजे रंगका
यां जमींसे आसमांतक सोख्तन् का बाब था ॥ ७ ॥
नागहां इस रंगसे खूनाबा टपकाने लगा
दिल् के जौक़े काविशे नाखुनसे लज़्जतयाब् था ॥ ८ ॥

(१) रात्रीं मी इतका बेचैन झालों होतों कीं, माझी हृदयांतील व्यथेच्या विजेनें मेघाच्या पानाचें विरघळून पाणी पाणी होत होतें. तरी हृदयांतील आग इतकी दाहक होती कीं पाणी पडून त्यांतून जे भोंवरे निर्माण होत ते आपल्या भोंवतीं फिरणाऱ्या अग्निचक्रासारखे भासत.

(२) पावसाचें निमित्त करून प्रियेनें माझ्याकडे येण्याचें टाळलें आणि इकडे विरहामुळें मला अश्रूंच्या धारा लागून उशींतला कापूस भिजून चिंब झाला होता.

(३) तिकडे प्रिया स्वतःच्या शृंगाराकरितां मोत्यांची गुंफण करीत होती. इकडे विरहावस्थेमुळें डोळ्यांत अश्रूंची इतकी दाटी झाली होती कीं कांहींच दिसेनासें झालें.

(४) तिकडे बहरलेल्या तांबड्या फुलांचें प्रतिबिंब कालव्यांत पडून पाण्यांत दिवे लागल्याचा भास होत होता आणि इकडे माझ्या डोळ्यांतून निखालस रक्त वाहात होतें.

(५) रात्रीं मी विरहानें पीडित होऊन डोकें फोडून घेण्याकरितां भिंत कोठें आढळते का म्हणून शोधण्यांत रात्र घालविली तर तिकडे माझी प्रिया किनखाबाच्या उशीवर आपलें डोकें ठेवून मजेंत निद्रासुखाचा अनुभव घेत होती.

(६) इकडे माझ्या विरहव्याकुळतेच्या मैफिलींत माझ्या दीर्घ निश्वासाचीच तेवढी समई जळत होती आणि तिकडे प्रियेच्या मैफिलींत आपल्या सोबत्यांच्याकरितां प्रियेनें फुलांची बिछायतच रचली होती. म्हणजे त्यांच्याशीं प्रिया गप्पागोष्टी करीत होती.

(७) प्रियेच्या मैफिलींत मौजमजेचा रंग जमिनीपासून आकाशापर्यंत पसरला होता आणि इकडे माझ्या हृदयांतील ज्वाळा आकाशापर्यंत भिडल्या होत्या.

(८) नखांनीं हृदयाच्या चिंधड्या उडविण्यास सुरवात केली ह्या गोड अनुभवामुळें हृदयांतून रक्त बाहेर पडूं लागलें.

१५... नालये दिल्में शब् अंदाजे असर नायाब था
था सिपंदे बज्मे वस्ले ग़ैर गो बेताब था ॥ ९ ॥
मुक़दमे सैलाबसे दिल् क्या निशाते आहंग है
खानये आशिक् मगर् साज़े सदाये आब था ॥ १० ॥
नाजिशे अय्यामे खाकिस्तरनशीनी क्या कहूँ
पहलूये अंदेशा वक्फे बिस्तरे संजाब था ॥ ११ ॥

कुछ न की अपने जुनूने नारसाने वर्ना यां
ज़र्रा ज़र्रा रूकशे खुर्शीदे आलमताब था ॥ १२ ॥
आज क्यौं परवा नहीं अपने असीरोंकी तुझे
कल्ह तलक् तेराभि दिल् मेहरोवफ़ाका बाब था ॥ १३ ॥
याद कर् वो दिन् के हरयक् हल्का तेरे दामका
इंतिजारे सैद मे यक् दीदये बेख्वाब था ॥ १४ ॥
मैने रोका रात् गालिब्को वगर्ना देख्ते
उस्के सैले गिरियामे गरदूं कफ़े सैलाब् था ॥ १५ ॥

(१) रात्रीं विरहानें पीडित होऊन मी आक्रंदन करीत होतों पण माझ्या ह्या निश्वासांत कांहीं लाभ नव्हता. उलट प्रियेची मैफिल भरली होती. माझे हे निश्वास म्हणजे प्रियेच्या मैफिलीला नजर लागूं नये म्हणून आगींत टाकलेले आणि धुराच्या रूपानें निघालेले सिंपद म्हणजे काळे दाणे होत.

(२) अहाहा! माझें नशीव काय वर्णावें? प्रियेनें मला टाकल्यामुळें दुर्दैवाचा जो पूर लोटला आहे, त्याचा ध्वनि मला जलतरंगाच्या वाद्यासारखें सुख देत आहे.

(३) विरहावस्थेमुळें मी जमिनीवर लोळत होतों ती वैभवाची अवस्था काय वर्णावी? ती जमीन वाटतच नव्हती; तर संजाब जनावराच्या चामड्यापासून तयार केलेली ती भरजरी शय्याच भासत होती.

(४) माझ्या प्रेमवेडाचें कांहींच फळ लाभलें नाहीं. तें अपूर्णच असलें पाहिजे. जर माझें वेड आत्यंतिक असतें तर त्याचा एकेक कण सूर्याची बरोबरी करूं शकला असता.

(५) हे प्रिये, आज कां बरें तुला आपल्या प्रेमांत सांपडलेल्या असीरांची म्हणजे कैद्यांची पर्वा नाहीं. कालपर्यंत तर तुझें हृदय म्हणजे प्रेम आणि निष्ठेचें आगर होतें.

(६) हे प्रिये, तुला तो दिवस आठवत नाहीं का? जेव्हां शिकार गांठण्याकरितां तूं आपलें जाळें पसरलें होतेंस आणि त्या जाळ्याचा प्रत्येक तंतु शिकार हेरण्याकरितां म्हणून अनिमिष असा डोळाच बनला होता.

(७) मी काल रात्रीं गालिबचें रडें थांबविलें म्हणून बरें. नाहींतर त्याच्या अश्रूंच्या पुरानें आकाशसुद्धां जलमग्न झालें असतें.

१६ . . . एक् एक् क़तरेका मुझे देना पड़ा हिसाब
खूने जिगर वौदियते मिज़गाने यार था ॥ १ ॥
अब मैं हूं और मातमें एक् शहर आरसू
तोडा जो तूने आईनये तिमसालदार था ॥ २ ॥

गलियों में मेरी नाश को खींचे फिरो कि मैं
जां दादए हवाए सरे रह गुजार था ॥ ३ ॥
मौजे सरावे दश्ते वफ़ा का न पूछ हाल
हर ज़र्रा मिस्ले जौहरे तेगे आबदार था ॥ ४ ॥
कम जानते थे हम भी ग़मे इश्क़ को पर अब
देखा तो कम हुए पे ग़मे रोज़गार था ॥ ५ ॥

(१) माझ्या काळजांतील रक्त प्रियेच्या पापण्यांना गहाण पडलें होतें. म्हणून मला रक्ताच्या एकेक थेंबाचा हिशेब द्यावा लागला.

(२) माझें हृदय म्हणजे माझ्या हजारों आकांक्षांचीं चित्रें असलेला आयनेमहालच होय. माझें हृदय भग्न केल्यामुळें मला माझ्या आकांक्षांची नगरीच नष्ट झाल्याचा शोक करावा लागत आहे.

(३) प्रियेच्या घरच्या वाटेच्या तळमळींत मला मरण आलें. आतां इतकें तरी करा कीं माझें प्रेत ओढीत गल्यागल्यांतून फिरवा म्हणजे एखादे वेळीं तें नेमकें प्रियेच्या घरच्या गल्लींत पोहोंचेल आणि माझी इच्छा पूर्ण होईल.

(४) प्रेमवेडाच्या मृगजळाची भयंकर स्थिति विचारूं नकोस. अरे ह्याचा कणनकण म्हणजे तीक्ष्ण शस्त्रच. ज्याच्यावर हें शस्त्र पडलें त्याचा चुराडाच झाला म्हणून समजावें.

(५) मी प्रेमाच्या दुःखाला (गमे इश्क) साधारण समजत होतों पण त्यांत फसल्यावर समजलें कीं ही व्यथा कमी असली तरी साऱ्या जगाच्या दुःखापेक्षांही तीव्र आहे.

१७ . . . बस के दुश्वार है हर काम का आसां होना
आदमी को भी मयस्सर नहीं इन्सां होना ॥ १ ॥
गिरिया चाहे है ख़राबी मेरे काशाने की
दरो दीवार से टपके है बियाबां होना ॥ २ ॥
वाए दीवानगिए शौक के हरदम मुझको
आप जाना उधर और आप ही हैरां होना ॥ ३ ॥
जल्वा अज बस्के तक़ाज़ाए निगह करता है
जौहरे आईना भी चाहे है मिज़गां होना ॥ ४ ॥
इशरते क़त्ल गहे अहले तमन्ना मत पूछ
ईद नज्ज़ारा है शमशीर का उरियां होना ॥ ५ ॥

ले गये ख़ाक़ में हम दाग़े तमन्नाए निशात
तू हो और आप बसद रंग गुलिस्तां होना ॥ ६ ॥
इशरते पारए दिल, ज़ख़मे तमन्ना खाना
लज्जते रीशे जिगर गर्क़े नमकदां होना ॥ ७ ॥
की मिरे क़त्ल के बाद उसने जफ़ा से तौबा
हाय उस ज़द पशेमां का पशेमां होना ॥ ८ ॥
हैफ़ उस चार गिरह कपडे की क़िस्मत 'गालिब'
जिसकी किस्मत में हो आशिक़ का गरेबां होना ॥ ९ ॥

(१) प्रत्येक काम सोपें होणें फार कठिण आहे. हेंच पाहा साधारण माणसें तर सर्वत्रच दिसतात पण सगळ्याच माणसांना माणूस (माणुसकीनें युक्त) बनणें शक्य नाहीं.

(२) माझ्या रोदनाचा हेतु घर उध्वस्त करणें हाच आहे. परिणाम पहा कीं घराच्या भिंतींतून व दरवाजांतून नाशाचीं चिन्हें गळतांना दिसत आहेत.

(३) अरेरे ! काय हें प्रेमाचें वेड ! त्या वेडाच्या भरांत मी प्रियेच्या घराकडे जातों आणि इथें कसा आलों म्हणून अचंब्यांत पडतों.

(४) प्रियेचें सौंदर्य इतकें प्रभावी आहे कीं, तिला पाहाण्याकरितां आरशाचे डोळे व त्या भोंवतीच्या पट्टयाच्या पापण्या झाल्या आहेत.

(५) वधस्थानावर जमलेल्या प्रेमिकांचा आनंद काय वर्णावा ? त्यांना वधण्याकरितां बाहेर पडलेली तलवार पाहून त्यांना ईदचा चंद्र पाहिल्याचा भास होत आहे.

(६) सुखें भोगण्याची इच्छा हृदयांत बाळगूनच आम्ही मृत्युमुखीं पडलों. आतां तूं तरी सुखानें राहा आणि उपवनासारखी विकसित हो.

(७) अतृप्त आकांक्षांची जखम गोड वाटते, आणि व्यथित हृदय मिठानें चोळलें गेलें असलें तर त्याची लज्जत काय वर्णावी ? प्रेमिकांना ह्या गोष्टी आवडतात.

(८) माझा वध केल्यानंतर प्रियेनें आतां ह्यापुढें आपण कुणाला छळणार नाहीं अशी शपथ घेतली. वाहवा ! फार लवकरच तिला पश्चात्ताप झाला म्हणावयाचा.

(९) अरेरे ! ज्याच्या नशिबीं प्रेमवेड्या लोकांच्या अंगावर अंगरखा म्हणून बसणें आलें आहे त्या चार वार कपड्याची काय स्थिति वर्णावी ? वेडाच्या भरांत अंगावरील कपड्यांच्या चिंध्या प्रेमिक करून टाकतात. त्याच्याकडे निर्देश आहे.

१८. . . शब ख़ुमारे शौक़े साक़ी रुस्तख़ेज़ अंदाजा था
ता मुहीते बादा सूरतखानए ख़मूयाज़ा था ॥ १ ॥

यक क़द वहशत से दर्से दफ़्तरे इम्कां खुला
जादा, अजज़ाए दो आलम दश्त का शीराज़ा था ॥ २ ॥

मानेए वहशतख़िरामीहाये लैला कौन है
खानए मजनून सहरा गर्द बे दरवाज़ा था ॥ ३ ॥

पूछ मत रुस्वाइए अन्दाजे इस्तग़नाए हुस्न
दस्त मरहूने हिना, रुख्सार रहने गाज़ा था ॥ ४ ॥

नालए दिल ने दिये अवराक़े लख्ते दिल ब बाद
यादगारे नाला, इक दीवाने बेशीराज़ा था ॥ ५ ॥

(१) काल रात्रीं साकीच्या प्रतीक्षेंत मनाची स्थिति कल्पांतासारखी क्षुब्ध झाली होती. फार काय, ह्या प्रतीक्षेमुळें बाटलींतील दारू सारखी चळवळ करीत असल्यामुळें तें दृश्य प्रेक्षणीय झालें होतें.

(२) प्रेमवेडाला सुरवात झाली मात्र. सृष्टीच्या रहस्याचें दार मला उघडल्यासारखें दिसूं लागलें. जणूं काय वेड घेणें (छंद घेणें) हें सृष्टीचीं रहस्यें उलगडण्याला पहिलें साधनच ठरलें. हेतु हा कीं आत्यंतिक छंद असल्याशिवाय सृष्टीचीं रहस्यें समजत नाहींत.

(३) मजनूच्या घराला दार नव्हतें कीं दरवाजा नव्हता. तो तर वनांत वाळवंटांत भटकत होता. मग लैलाला मजनूला भेटण्यास आडकाठी कशाची होती ?

(४) सौंदर्याला कोणत्याही बाह्य शृंगाराची आवश्यकता असूं नये. पण प्रियेनें हाताला मेंदी लावली आहे व गालावर गाजा चोळला आहे. सुंदर स्त्रिया स्वभावतः सर्वांकडे दुर्लक्ष (प्रेमिकांना न वगळतां) करतात असा जो भ्रम आहे तो तिनें आपल्या सौंदर्याला मेंदी आणि गाजाचे ऋणी करून ठेविल्यामुळें उघडकीस आला.

(५) माझें हृदय म्हणजे कवितासंग्रह होय. पण प्रेमशोकामुळें ह्या कवितासंग्रहाचीं पानें – हृदयाचे तुकडे – उलटसुलट होऊन गेलीं आहेत. आणि माझा कवितासंग्रह सुसंबद्ध राहिला नाहीं.

१९... दोस्त ग़मख़ारी में मेरी सई फरमायेंगे क्या ?
जख़्म के भरने तलक नाखुन न बढ आयेंगे क्या ? ॥ १ ॥

बे नियाज़ी हद से गुज़री बन्दा परवर कब तलक
हम कहेंगे हाले दिल, और आप फरमायेंगे, क्या ? ॥ २ ॥

हजरते नासेह गर आयें, दीदा वो दिल फर्शे राह
कोई मुझको यह तो समझादो कि समझायेंगे क्या ? ॥ ३ ॥
आज वां तेग़ो कफ़न बांधे हुए जाता हूं मैं
उज्र मेरे क़त्ल करनेमें वो अब लायेंगे क्या ? ॥ ४ ॥
गर किया नासेह ने हमको क़ैद, अच्छा ! यों सही
यह जुनूने इश्क़ के अन्दाज छुट जायेंगे क्या ? ॥ ५ ॥
ख़ानाज़ादे जुल्फ़ हैं ज़ंजीर से भागेंगे क्यों ?
हैं गिरफ़्तारें वफ़ा जिन्दां से घबरायेंगे क्या ? ॥ ६ ॥
है अब इस मामूरे में क़हते ग़मे उल्फ़त् 'असद'
हमने यह माना कि दिल्ली में रहें खायेंगें क्या ॥ ७ ॥

(१) माझ्या प्रेमाच्या आजारावर माझे मित्र यशस्वी उपचार करूं शकतील हें शक्य नाहीं. कारण हृदयाच्या जखमा एकीकडे भरतात न भरतात तोंच हाताचीं नखें वाढतील आणि भरत आलेल्या जखमांना पुन्हा नखांनीं ओरबाडावेंसें वाटूं लागेल हा प्रकार असाच चालावयाचा आणि माझ्या जखमा कधींच बऱ्या व्हावयाच्या नाहींत.

(२) मी तुला आपल्या हृदयाची परिस्थिति वर्णन करावी आणि तूं प्रत्येक वेळेला विचारावेंस कीं, काय म्हटलें ? काय बोललास ? तुझ्या दुर्लक्षाची आतां मात्र कमाल झाली.

(३) उपदेश करणारे मित्र आले तर येवोत. त्यांच्याकरितां हृदयाची आणि डोळ्यांची बिछायत करीन पण ते येऊन मला उपदेश तरी कशाचा करणार ? हें तरी कोणी सांगेल कीं नाहीं ?

(४) आज मी प्रियेकडे बळी जाण्याच्याच इच्छेनें डोक्याला कफन बांधून आणि हातांत तलवार घेऊन जाईन. आतां बघूं ती मला मारण्याचें टाळण्याकरितां काय निमित्त करते तें. हेतु हा कीं प्रेमाच्या पायीं जीव देण्याची आम्ही पूर्ण तयारी केली आहे.

(५) मला उपदेश करणारांनीं मला बंधनांत ठेवलें असें जरी मानलें तरी माझें प्रेमवेड सुटणें कसें शक्य आहे ?

(६) प्रियेच्या कुरळ्या केशकलापाचे आम्ही बंदे गुलाम. आम्हांला बेड्यांची काय डर ? तिच्या निष्ठेंत आम्ही गिरफदार आहोंत. आम्हांला कारागृहाची काय भीति ?

(७) प्रेमामुळें होणाऱ्या शोकाचा आतां दिल्लींत दुष्काळ पडला आहे. हा शोक हेंच आमचें अन्न होय. हेंच जर मिळत नाहीं तर दिल्लींत राहून आम्ही खाणार काय ?

२० . . . यह न थी हमारी क़िस्मत् के विसालेयार होता
अगर और जीते रहते यही इन्तिज़ार् होता ॥ १ ॥
तेरे वादे पर जिये हम् तो यह जान् झूठ जाना
के खुशी से मर न जाते अगर एतिबार् होता ॥ २ ॥
तेरी नाज़ुकी से जाना कि बंधा था अहद बोदा
कभी तू न तोड सकता, अगर उस्तवार् होता ॥ ३ ॥
कोई मेरे दिल से पूछे तेरे तीरे नीम्कश् को
यह खलिश कहां से होती जो जिगर के पार् होता ॥ ४ ॥
यह कहां की दोस्ती है के बने हैं दोस्त नासेह
कोई चारासाज होता, कोई ग़मगुसार् होता ॥ ५ ॥
रगे संग से टपक्ता वो लहू के फिर् न थम्ता
जिसे ग़म समझ रहे हो यह अगर शरार् होता ॥ ६ ॥
ग़म अगरचे जां गुसिल है पे कहां बचें के दिल है
ग़मे इश्क़ गर न होता ग़मे रोज़गार् होता ॥ ७ ॥
कहू किससे मैं के क्या है, शबे ग़म बुरी बला है
मुझे क्या बुरा था मरना अगर एक बार् होता ॥ ८ ॥
हुए मरके हम जो रुस्वा, हुए क्यौं न ग़र्क़ दरिया ?
न कभी जनाज़ा उठता, न कहीं मज़ार् होता ॥ ९ ॥
उसे कौन देख सकता, के यगाना है वह यक्ता ?
जो दुई की बू भी होती, तो कहीं दोचार् होता ॥ १० ॥
ये मसाइले तसव्वुफ ! ये तेरा बयान् ‘ ग़ालिब ’ !
तुझे हम वली समझते जो न बादाख्वार् होता ॥ ११ ॥

(१) आमच्या दैवांतच प्रियेचें मीलन नव्हतें. आम्ही अजून कांहीं दिवस जगलों असतों तरी प्रतिक्षेंतच दिवस घालवावे लागले असते. मीलन नशिबीं नव्हतेंच.

(२) तुझ्या वचनांवर आम्ही जगलों असें तुला वाटत असेल तर तें खोटें समज. अगे, तुझ्या वचनांवर विश्वास असता तर आम्ही हर्षोन्मादानें मेलों नसतों का ?

(३) हे प्रिये, तूं नाज़ूक आहेस म्हणून तर तूं दिलेल्या वचनांचें बंधनही नाज़ूकच आणि म्हणून तुटणारें असलें पाहिजे. हें वचनांचें बंधन दृढ असतें तर तुझ्या नाजुकपणाला

झेपलें नसतें. प्रियेला वचनभंगाच्या आरोपांतून प्रेमिकानें फार कुशलतेनें वांचवण्याचा प्रयत्न केला आहे.

(४) तूं आपले नयनशर जे माझ्यावर फेंकलेस त्या तुझ्या धनुष्याची कमान आकर्ण ताणली नव्हतीस हें बरें झालें. कारण बाण हृदयांत रुतला असून त्याच्या गोड व्यथेचा मी अनुभव घेत आहें. जर तो बाण आरपार निघून गेला असता तर त्या गोड अनुभवाचा लाभ मला मिळाला नसता.

(५) ही कसली मैत्री आहे कीं मित्रांनीं दुःखाचे वांटेकरी होण्याचें व सहानुभूति दाखविण्याचें सोडून उपदेशकाची भूमिका घेतली आहे.

(६) ज्याला आपण शोक समजतों ती आग असती तर दगडांच्या रेषांमधूनही (दगडांत अग्नि सुप्त असतो) न थांबणारी रक्ताची धार लागली असती. म्हणजे दगडासारख्या कठीण पदार्थालाही हा शोक सहन झाला नसता.

(७) शोक हा जीवनाला विरघळून टाकणारा आहे. त्यांतून वांचणें अशक्य आहे. कारण हृदय म्हणजे शोक आणि व्यथा ह्यांचें केंद्रच होय. शोक करणें आणि व्यथा अनुभविणें हा तर त्याचा स्वभाव. मग प्रेमाचा शोक नसता तर जगांतील इतर सगळीं दुःखें हृदयानें लावून घेतलीं असतीं.

(८) मी कुणासमोर वदावें ? ही शोकरात्र म्हणजे फार मोठें संकट आहे. त्यांत पुनः पुन्हां मरणाचें दुःख अनुभवास येतें. त्यापेक्षां एकदाच येणारें खरें मरण पत्करलें.

(९) जिवंतपणीं प्रेमापायीं तर माझा दुर्लौकिक झालाच होता. मेल्यावरही आमची फजीति कांहीं कमी झाली नाहीं. प्रेतयात्रेचे धिंडवडे, कबर बांधण्याचा गोंधळ त्यापेक्षां पाण्यांत बुडून मरण आलें असतें तर जनाजा (प्रेतयात्रा) आणि मजार (थडगें) ह्या भानगडीच नसत्या. मरणोत्तर आमची फजीति तरी झाली नसती.

(१०) परमेश्वर एक आहे. तो निर्गुण, निराकार आणि त्रिकालाबाधित आहे. त्यांत जर द्वैत असतें तर कोठेंना कोठें तो आपल्याला दिसला नसता का ?

(११) सूफी तत्त्वज्ञानाच्या गोष्टी आणि तुझी वर्णन करण्याची शैली ! काय सांगावें गालिब, तूं जर मदिरेचा भक्त नसतास तर आम्ही तुला संतच समजलों असतों.

२१ . . . हवस को है निशाते कार क्या क्या
न हो मरना तो जीने का मजा क्या ? ॥ १ ॥
तजाहुले पेशगी से मुद्दआ क्या
कहां तक ऐ सरापा नाज़ क्या क्या ॥ २ ॥

नवाज़िश हाए बेजा देखता हूं
शिकायत हाए रंगीं का, गिला क्या ॥ ३ ॥
निगाहे बेमहाबा चाहता हूं
तग़ाफ़ुलहाए तमकीन् आज़मा क्या ? ॥ ४ ॥
फ़रोग़े शोलए खस् यक् नफ़स है
हवस को पासे नामूसे वफ़ा क्या ! ॥ ५ ॥
नफ़स् मौजे मुहीते बेखुदी है
तग़ाफ़ुलहाए साक़ी का गिला क्या ॥ ६ ॥
दिमाग़े इत्रे पैराहन् नहीं है
ग़मे आवारगीहाए सबा क्या ॥ ७ ॥
दिले हर कतरा है साजे अनाअल्बहर्
हम उसके हैं हमारा पूछना क्या ॥ ८ ॥
महाबा क्या है मैं ज़ामिन इधर देख
शहीदाने निगह का खूंबहा क्या ? ॥ ९ ॥
सुन ! ऐ ग़ारतगरे जिन्से वफ़ा सुन !
शिकस्ते शीशए दिल की सदा क्या ? ॥ १० ॥
किया किसने जिगर दारी का दावा
शकेबे खातिरे आशिक़ भला क्या ॥ ११ ॥
ये क़ातिल, वादए सब्रआज़मा क्यों ?
ये काफ़िर फ़ितनए ताक़तरुबा क्या ॥ १२ ॥
बलाए जां है 'ग़ालिब' उसकी हर बात
इबारत क्या, इशारत क्या, अदा क्या ! ॥ १३ ॥

(१) जगाचे व्यवहार हे इतक्या हौसेनें चालले आहेत त्याला कारण जीवन हें अल्पायु आहे म्हणूनच होय. मरण नसतें तर जगण्यांत गोडी राहिली नसती. मरणामुळेंच जगण्यांत मौज निर्माण झाली आहे.

(२) हे प्रिये, माझ्या प्रत्येक गोष्टीला काय, काय, असें म्हणत जातेस. ह्याचा अर्थ काय ? असें जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यांत तुझा काय हेतु आहे ?

(३) तुझी माझ्या प्रतिस्पर्ध्यांवर अनाठायीं कृपा मला दिसते आहे. मग मी त्यांचीं गोड गाऱ्हाणीं तुला सांगितलीं तर त्याचें तुला वाईट कां वाटावें ?

(४) माझ्याकडे मोकळ्या नजरेनें पाहा. असे डोळे झांकण्याचे आणि माझ्या सहनशीलतेची परीक्षा पाहाण्याचें कारण काय ? माझ्या दृष्टीला दृष्टि भिडव आणि बघ मी कसा तळमळतों तें.

(५) हे प्रिये, माझ्या गुलहाशीप्रतिस्पर्ध्यांचें प्रेम म्हणजे तृणांत आग लागून क्षणांत विझून जाण्यासारखें क्षणभंगूर आहे. त्यांना एकनिष्ठतेची पर्वा कसली ?

(६) प्रेमामुळें माझा श्वास म्हणजे विस्मृतीच्या दर्यावरची एक लाटच आहे प्रत्येक श्वासाबरोबर मी विस्मृतींत बुडून जातों आणि मग साकी (मधु पाजणारा) आमच्याकडे दुर्लक्ष करतो. त्याचें गाऱ्हाणें करण्याची मला शुद्ध कुठली राहायला ? दारू ही विस्मृतीची अवस्था लाभण्याकरितां घ्यायची, आम्ही तर पहिल्यापासूनच त्या अवस्थेंत आहोंत.

(७) प्रतिस्पर्ध्यांनीं प्रियेच्या कपड्यांवर अत्तर लावलें आहे. त्याचा सुगंध घेऊन वायु इकडून तिकडे फिरत आहे. आम्हाला त्याचें काय ? कारण, तो सुगंध सेवण्याच्या परिस्थितींत (विस्मृतीमुळें) आम्ही राहिलों नाहीं.

(८) समुद्रांतील प्रत्येक बिंदूचें हृदय हाच सूर काढीत आहे कीं, मी समुद्रांत समाविष्ट होऊन समुद्र बनलों आहें. तसेच आम्हीही ‘ अहं ब्रह्मास्मि ’ आहोंत. आमचें वैभव काय विचारावें ?

(९) तुला कशाची भीति आहे ? हे प्रिये, माझ्याकडे निःसंकोचपणें पाहा. मी तुझ्या नयनशराला बळी पडलों तरी तुला कांहीं वाटायला नको. कुणाचा वध केला तर शिक्षा म्हणून आपला वध करतील. ही भीति तुला आहे ना (खुनाला खून म्हणून) पण आम्ही जेव्हां शहीद होऊं म्हणजे आपण होऊन बळी जाऊं तेव्हां खूनबहा (खुनाला खून) ची शिक्षा येथें लागू होत नाहीं. तर तुला भीति वाटायला नको. मी जबाबदार आहें ना ?

(१०) एकनिष्ठ प्रेमिकांच्या प्रेमाचा विध्वंस करणाऱ्या हे प्रिये, आमच्या हृदयाचा भंग करूं नकोस. कारण हृदयभंगाचा ध्वनि होऊन तुझ्या लौकिकाच्या दुंदुभि कांहीं वाजणार नाहींत.

(११) तुझ्यावांचून मला चैन पडेल आणि मी शांत राहीन असा अट्टाहास आम्हीं कुठें केला आहे ? असें कोणी प्रेमिक म्हणेल तर तें खरें नाहीं.

(१२) हे माझा वध करू पाहणाऱ्या प्रिये, माझ्या सहनशीलतेची पराकाष्ठा पाहाण्याचें हें (माझा वध करण्याचें वचन) तूं काय म्हणून देतेस ? तुझ्या नजरेंत ही गोष्ट साधी आहे. पण माझी शक्ति हरण करणारी आहे.

(१३) हे गालिब, प्रियेचें बोलणें, तिचा नाज, नखरा, तिचे संकेत हे काय सांगावे ? तिची प्रत्येक हालचाल म्हणजे बलायेजान (जीवावर गुदरणारा कहर) आहे.

दर्ख़ुरे क़हरो ग़ज़ब जब कोई हमसा न हुआ
२२ . . . फिर ग़लत क्या है कि हमसा कोई पैदा न हुआ ॥ १ ॥
बन्दगी में भी वो आज़ाद्व ख़ुदबीं हैं, कि हम
उल्टे फिर आये दरे काबा अगर वा न हुआ ॥ २ ॥
सबको मक़बूल है दावा तेरी यक्तायी का
रूबरू कोई बुते आईना सीमा न हुआ ॥ ३ ॥
कम नहीं, नाज़िशे हम नामीए चश्मे ख़ूबा
तेरा बीमार, बुरा क्या है गर अच्छा न हुआ ॥ ४ ॥
सीने का दाग़ है वो नाला, के लब् तक् न गया
ख़ाक का रिज़्क़ है वो क़तरा, जो दरिया न हुआ ॥ ५ ॥
नाम का मेरे है वो दुख, के किसी को न मिला
काम में मेरे है वो फितना, के बरपा न हुआ ॥ ६ ॥
हर बुने मू से दमे ज़िक्र न टपूके ख़ूंनाब
हमज़े का क़िस्सा हुआ, इश्क़ का चचा न हुआ ॥ ७ ॥
क़तरे में दजला दिखाई न दे और जुज़्व में कुल
खेल लड़कों का हुआ, दीदए बीना न हुआ ॥ ८ ॥
थी खबर गर्म कि ‘ गालिब ’ के उड़ेंगे पुरज़े
देखने हम भी गये थे, पै तमाशा न हुआ ॥ ९ ॥
‘ असद ’ ! हम वो जूनूं जौलां गदाए बेसरोपा हैं
के है सर पंजए मिज़गाने आहू पुश्तख़ार् अपना ॥ १० ॥

(१) प्रिया माझ्यावर जुलूम करीत आहे. ती मला छळीत आहे. ती आम्हालाच छळण्यायोग्य समजते तर मग आम्ही तरी कां म्हणूं नये कीं छळ सहन करण्यांत आम्ही अद्वितीय आहोंत. आमच्यासारखा दुसरा कोणी उत्पन्नच झाला नाहीं.

(२) आम्ही दास असलों तरी स्वाभिमान व स्वत्व आम्हीं सोडलेलं नाहीं. फार काय आम्ही काब्याला गेलों आणि त्या मंदिराचें दार बंद असलें तर आम्ही उलट्या पावलीं परत येऊं, दार उघडा म्हणून कुणाची अजीजी करणार नाहीं.

(३) तुझें अद्वितीय सौंदर्य सर्वमान्य आहे. आणि म्हणून कोणीही सुंदर स्त्री तुझ्यासमोर येण्यास धजत नाहीं.

(४) सुंदर स्त्रियांच्या डोळ्यांना उर्दू कवितेंत चष्मेबीमार म्हणतात. कवि म्हणतो, हे प्रिये, तुझा प्रियकरही बीमार (प्रेमामुळें) आहे. तुझे डोळे तर चष्मेबीमार आहेत. मी बीमार (आजारी) असलों तर काय हरकत आहे ? तुझे डोळे आणि मी दोघेही बीमार आहोंत. हें सादृश्य हेंच माझें भाग्य होय.

(५) हृदयांतील व्यथा ओठांवर येत नाहीं ती व्यर्थ होय. पाण्याचा बिंदु दर्यांत न जातां जमिनीवर पडला तर जमिनींत जिरून जातो. समुद्रांत पडला असता तर समुद्र झाला असता.

(६) माझ्या वांट्याला आलेलीं दुःखें दुसऱ्या कुणाच्याच नशीबीं आलीं नसतील. आणि माझ्या कामांत इतक्या अडचणी आल्या तितक्या कुणाच्याच कामांत आल्या नसतील.

(७) प्रेमाच्या कथा तर अशा पाहिजेत कीं, त्या ऐकून रोमरोमांतून रक्त गळलें पाहिजे. नाहींतर अशा कथा अमीरहमजाच्या कथांसारख्या अवास्तव आणि केवळ करमणुकीच्या होत.

(८) योग्याला बिंदूंत सिंधु आणि अणूंत विश्व दिसलें पाहिजे. नाहींतर तो पोरखेळ होय. योग्याची दृष्टि नव्हे.

(९) आमची फजीति म्हणजे लोकांना तमाशा वाटतो. आज गालिबची फजीति होणार म्हणून खबर गरम होती. आम्हीही पाहायला गेलों पण असें कांहीं घडलें नाहीं.

(१०) प्रेमवेडांत आम्ही फकीरांपेक्षांही कफल्लक बनलों आहोंत. फकीरांपाशीं पाठ खाजविण्याकरितां हरिणाचें शिंग असतें तेंही आमच्यापाशीं नाहीं. पण प्रेमवेडांत आमची गति इतकी तीव्र आहे कीं आम्हीं हरिणासारख्या चपळ जनावरांना मागें टाकलें आहे. हरिणांच्या लांब पापण्या आमच्या पाठींना खाजविण्याचें काम करतात. म्हणजे ते आमच्या मागें राहिले आहेत.

२३ . . . पए नज्रे करम तोहफा है शर्मे ना रसाई का
बखूं ग़लतीदए सद रंग दावये पारसाई का ॥ १ ॥
न हो हुस्ने तमाशा दोस्त रुस्वा बेवफ़ाई का
बमुहरे सदनज़र साबित है दावा पारसाई का ॥ २ ॥
जकाते हुस्न दे ऐ जल्वए बीनश के मेहर आसा
चिराग़े खानए' दरवेश हो, कासा गदाई का ॥ ३ ॥
न मारा जान कर बेजुर्म, क़ातिल तेरी गर्दन पर
रहा मानिन्दे खूने बेगुनह हक़ आशनाई का ॥ ४ ॥

तमन्नाए ज़बां महवे सिपासे बे ज़बानी है
मिटा जिससे तक़ाज़ा शिकवए बे दस्तो पाई का ॥ ५ ॥
वही इक बात है जो यां नफ़स, वां नकूहते गुल है
चमन का जल्वा बाइस है मेरी रंगीं नवाई का ॥ ६ ॥
दहाने हर बुते पैग़ारा जू, ज़ंजीरे रुस्वाई
अदम तक बेवफा ! चर्चा है तेरी बेवफ़ाई का ॥ ७ ॥
न दे नामे को इतना तूल ' ग़ालिब ' मुख़्तसर लिख दे
के हसरत संज हूं, अर्ज़े सितमहाए जुदाई का ॥ ८ ॥

(१) हे परमेश्वरा, मी शंभर वेळां अपराध केले आणि तितक्याच वेळां मला पश्चात्ताप झाला आहे. हा अनेक वेळां अपराधांच्या हातून उध्वस्त झालेला माझा सात्विकपणा मी तुझ्या चरणीं अर्पण करतों.

(२) प्रियेला आपल्या सौंदर्याचें प्रदर्शन करण्याची हौस आहे पण हें तिच्या थिल्लरपणाचें आणि बेइमानीचें द्योतक समजूं नये. उलट तिच्यावर अनेक लोकांची नजर पडली तर तितक्या नजरा म्हणजे प्रियेच्या सद्भावनांचे शिक्केच होत असें समजावें.

(३) मुसलमानांत आपल्या संपत्तीचा चाळिसावा भाग जकवा म्हणजे खैरात करण्याची चाल आहे. कवि म्हणतो, हे सुंदरी, तुझ्या सौंदर्याच्या संपत्तीचा चाळिसावा भाग जरी मला दिलास तरी ह्या फकीराचें भिक्षापात्र उज्ज्वल करशील आणि मग हें भिक्षापात्र म्हणजे ज्योत बनून सूर्यासारखें माझें घर प्रकाशित करील.

(४) तूं मला (तुझ्या प्रियकराला) वधिलें नाहींस. तुला वाटलें असेल कीं मला वधिल्यानें एका निरपराध माणसाच्या खुनाचा डाग तुझ्यावर राहील. पण हें पाहा, असें केल्यानें तूं माझ्यावर अन्यायच नाहीं का केलास ? कारण, माझा वध करणें, माझ्या इच्छेप्रमाणें हेंच न्याय्य झालें असतें. तुझ्या ह्या वागणुकीनें खुनाच्या डागाच्या ऐवजीं अन्यायाचा डाग तुला लागलाच ना ?

(५) मी किती निराधार आहें (बेदस्तव पा हातपाय नसलेला) असें मला सांगायचें होतें पण माझी वाचाच बंद झाली. म्हणून मला आपल्या वाचेच्या असमर्थतेचे आभार मानले पाहिजेत. कारण त्यामुळेंच मी तुला आपली लाचारी सांगितली नाहीं.

(६) माझे श्वासोच्छ्वास आणि वसंतऋतूच्या सुगंधी वायूंत कांहीं फरक नाहीं. कारण इकडे माझ्या प्रतिभेला बहर आला आणि तिकडे वसंतऋतूमुळें बागेला बहर आला. माझा श्वास फुलांच्या सुगंधापेक्षां कांहीं कमी नाहीं.

(७) अनेक तरुणी तुझ्या बेमानीपणाची चर्चा करीत आहेत. त्या चर्चेची सांखळी (बोलतांना तोंडाचे चंबू करणें ह्याला गोल सांखळीची उपमा दिली आहे.) बनून ती सर्वत्र पसरली आहे.

(८) हे गालिब, आपली कथा दीर्घ करूं नकोस. फक्त इतकेंच सांग कीं मनांत आपली विरहावस्था वर्णन करण्याची इच्छा आहे. पण ती इतकी तीव्र आहे कीं लेखणीला ती विशद करून सांगणें शक्य नाहीं.

२४ . . . गर न अन्दोहे शबे फुर्क़त बयां हो जायगा
बे तकल्लुफ़ दागे माह मुहरे दहां हो जायगा ॥ १ ॥
ज़हरा गर ऐसा ही शामे हिज्र में होता है आब
परतवे महताब सैले खानमां हो जायगा ॥ २ ॥
ले तो लूं सोते में उसके पांव का बोसा, मगर
ऐसी बातों से वो काफ़िर बदगुमां हो जायगा ॥ ३ ॥
दिल को हम सर्फ़े वफ़ा समझे थे क्या मालूम था
यानी यह पहले ही नज्रे इम्तिहां हो जायगा ॥ ४ ॥
सबके दिल में है जगह तेरी, जो तू राज़ी हुआ
मुझपे गोया इक ज़माना मेहरबां हो जायगा ॥ ५ ॥
गर निगाहे गर्म फ़रमाती रही—तालीमे ज़ब्त्
शोला खस में जैसे, खूं रगमें निहां हो जायगा ॥ ६ ॥
बाग में मुझको न लेजा वरना मेरे हाल पर
हर गुले तर एक चश्मे खूं फ़िशां हो जायगा ॥ ७ ॥
वाए गर मेरा तिरा इन्साफ़् महशर में न हो
अब तलक तो यह तवक्क़ो है कि वां हो जायगा ॥ ८ ॥
फ़ायदा क्या ? सोच, आख़िर तू भी दाना है 'असद'
दोस्ती नादां की है, जी का ज़ियां हो जायगा ॥ ९ ॥

(१) मीं विरहाच्या रात्रींच्या दुःखाचें वर्णन केलें नाहीं आणि गप्प बसून राहिलों तर माझ्या ओंठावरचा मूकतेचा शिक्का चंद्रावरच्या डागासारखा उठून दिसेल आणि मी कांहीं न बोलतांच लोकांना माझी विरहव्यथा उमगून येईल.

(२) विरहव्यथा इतकी तीव्र असेल तर (पानें विरघळून पाणी होत असेल तर) चंद्राचें किरणही विरघळून त्याचा पूर वाहूं लागेल.

(३) प्रिया झोंपली आहे. तिच्या पायाचें चुंबन घ्यावेंसें वाटतें. पण न जाणो तिला शंका यायची कीं माझें प्रेम शुद्ध नाहीं. त्यांत आसक्ति भरली आहे.

(४) आम्हांला वाटलें होतें कीं, आमच्या प्रेमाच्या मोहिमेंत हृदयावर पूर्ण भिस्त टाकतां येईल. पण काय सांगावें, पहिल्याच तडाख्याला त्याचा बळी पडला.

(५) प्रिये, तुला सगळेच प्रिय जाणतात. तूं माझ्यावर प्रेम करशील तर मी समजेन कीं, तुझ्यामुळें सगळें जग माझ्यावर प्रेम करतें. तूं मेहेरबान तर सगळें जग मेहेरबान.

(६) तुझी करडी नजर मला संयमाचे पाठ देत असेल तर असेंच म्हटलें पाहिजे कीं, तुझ्या अवकृपेच्या भीतीनें माझ्या नसांतील रक्त लपून बसेल. तृणांत अग्नि सुप्तावस्थेंत सुप्त असतो तसें होईल.

(७) अरे, मला बागेंत घेऊन जाऊं नका. नाहींतर माझी दुःखपूर्ण कहाणी ऐकतांना प्रत्येक फुलाच्या डोळ्यांतून रक्ताचे अश्रू वाहूं लागतील.

(८) आज मी तुझा छळ सहन करीत आहें. आशा हीच कीं, शेवटच्या न्याय-दानाच्या दिवशीं परमेश्वराच्या दरबारांत मला न्याय मिळेल. आणि तेथेंही न्याय मिळाला नाहीं तर मात्र माझ्या हालाला पारावार राहाणार नाहीं.

(९) अरे असद, तूं दाना (सुज्ञ) आहेस. जरा विचार करून पाहा. नादान लोकांशीं दोस्ती म्हणजे प्राणावरचें संकटच नाहीं का ?

२५ . . . दर्द मिन्नत कशे दवा न हुआ
मैं न अच्छा हुआ, बुरा न हुवा ॥ १ ॥
जमा करते हो क्यौं रक़ीबों को ?
इक तमाशा हुआ गिला न हुवा ॥ २ ॥
हम कहां क़िस्मत आज़माने जायें ?
तू ही जब खंजरआज़मा न हुवा ॥ ३ ॥
कितने शीरीं है तेरे लब् ! के रक़ीब
गालियां खाके बेमज़ा न हुवा ॥ ४ ॥
है खबर् गर्म उनके आने की
आजही घर में बोरिया न हुवा ॥ ५ ॥
क्या वो नमरूद् की खुदाई थी
बन्दगी में मेरा भला न हुवा ॥ ६ ॥

जान दी, दी हुई उसी की थी
हक़ तो यह है के हक अदा न हुआ ॥ ७ ॥
जख़्म गर दब् गया, लहू न थमा
काम गर रुक गया रवा न हुवा ॥ ८ ॥
रहज़नी है कि दिलसितानी है ?
ले के दिल दिलसितां रवाना हुवा ॥ ९ ॥
कुछ तो पढ़िये के लोग कहते हैं
" आज 'गालिब' ग़जल सरा न हुवा " ॥ १० ॥

(१) माझ्या प्रेमाच्या रोगावर कोणतेंच औषध लागू पडलें नाहीं. हें बरें झालें. माझ्या रोगाला औषधाचे तेवढे तरी उपकार कशाला ?

(२) प्रिये, तूं गाऱ्हाणें करण्याकरितां चारचौघांना कां गोळा करतेस ? हें काय गाऱ्हाणें मांडणें झालें ? हा तर तमाशाच झाला.

(३) तूंच जर आमच्यावर खंजीर चालवणार नाहीं असें ठरविलेंस तर आम्ही तरी आमचें नशीब काढायला कुठें जायचें ?

(४) तुझे ओंठ इतके मधुर आहेत कीं त्यांतून निघणारे अपशब्दसुद्धा मधुर बनतात. आणि माझ्या प्रतिस्पर्ध्यांच्या कानांला गोड लागतात.

(५) आज प्रिया माझ्या घरीं येणार अशी गरम अफवा आहे. पण हाय आमचं दारिद्य काय वर्णावें ? घरांत फाटकी सत्रंजीही नाहीं, कीं आम्ही तिचें स्वागत करूं शकूं.

(६) निम्रोदनें आपण परमेश्वर असल्याचा दावा मांडला होता. आणि त्यांतच त्याचा नाश झाला. माझें दास्यत्व म्हणजे काय निम्रोदचें आगंतुक परमेश्वरपण होतें काय ? मग माझें नुकसान कां व्हावें ?

(७) हें जीवन म्हणजे ईश्वराचें देणें होय. मग तेंच त्याला अर्पण केलें, तरी त्याच्या उपकाराची काय फेड झाली. म्हणजे प्राण अर्पण करूनही आम्ही परमेश्वराच्या उपकाराची फेड करण्यास असमर्थ ठरलों.

(८) आमच्या जखमेवर पट्टी बांधूनही रक्त वाहायचें थांबलें नाहीं. मग ह्या न्यायानें माझीं कामें बंद केल्यानें ती थांबायला नको होती. चालू राहायला हवी होती. कवीचा आशय असा कीं, मला नको तेंच नेमकें कां घडावें ?

(९) प्रियेनें माझें हृदय नेलें त्याला तरी रीत हवी होती. सरळ वाटमारी करून तिनें हृदय पळविलें ह्याचा अर्थ काय ?

(१०) लोक म्हणतात तर गालिब, एखादी कविता म्हण ना मग ती यमकांनीं युक्त असलेली गझल नसली तरी चालेल.

गिला है शौक को दिल में भी तंगीए जा का
२६ . . . गुहरमें महव हुआ इज़्तिराब् दरिया का ॥ १ ॥
यह जानता हूं, कि तू और पासुखे मक्तूब
मगर, सितमज़दा हूं, जौक़े ख़ामा फ़र्सा का ॥ २ ॥
हिनाई पाए ख़िज़ां है बहार अगर है भी
दवाम कुलफ़ते ख़ातिर है ऐश दुनिया का ॥ ३ ॥
ग़मे फ़िराक़ में तकलीफ़े सैरे गुल मत दो
मुझे दिमाग़ नहीं ख़न्दाहाए बेजा का ॥ ४ ॥
हनूज़ महरमिए हुस्न को तरसता हूं
करे है हर बुनेमू काम चश्मे बीना का ॥ ५ ॥
दिल उस को पहले ही, नाज़ोअदा से दे बैठे
हमें दिमाग़ कहां हुस्न के तक़ाज़ा का ॥ ६ ॥
न कह कि गिरीया बमिक़दारे हसरते दिल है
मिरी निगाह में है जम्ओख़र्च दरिया का ॥ ७ ॥
फ़लक को देखके करता हूं उसको याद् ‘असद्’
जफ़ा में उसकी है अन्दाज़ कारफ़रमा का ॥ ८ ॥

(१) माझी तळमळ इतकी उत्कट आहे कीं, तिला वास करण्यास हृदय सुद्धां अपुरें वाटूं लागलें आहे. पण नाइलाज आहे. समुद्राची तळमळ नाहीं का मोतींत सामावून शांत झाली ती.

(२) मला पूर्णपणें माहीत आहे कीं, तूं माझ्या पत्राचें कधींच उत्तर देणार नाहींस. पण काय करूं ? हृदयांतील तळमळ मला लिहिण्यास सारखें प्रवृत्त करीत आहे. त्यामुळें माझा नाइलाज झाला आहे.

(३) वसंतऋतूचा रंग म्हणजे हेमंताच्या पायाची मेहेंदीच होय. तसेंच जगांतील सुखें म्हणजे दीर्घकालीन दुःखावरील क्षणभंगुर आणि भडक दिसणारे रंगच होत.

(४) ह्या विरहावस्थेंत मला बागेंत घेऊन जाऊं नका. तेथें फुलें विनाकारण हसतील आणि तें मला आवडायचें नाहीं.

(५) माझा रोमरोम उत्कंठित असला तरी मला सौंदर्याची रहस्यप्राप्ति झाली नाहीं. मी अद्यापि त्या रहस्यापासून वंचित झाल्याचा शोक करीत आहें.

(६) ती तगादा करण्याच्या आधींच आम्ही आपलें हृदय तिला अर्पण करून टाकलें. तगाद्याची वेळच आणली नाहीं.

(७) माझ्या डोळ्यांतून वाहाणारे अश्रू महासमुद्राएवढे आहेत. पण हें समजू नकोस कीं, ते माझ्या हृदयांतील तळमळीच्या प्रमाणांत बाहेर पडले आहेत. त्या अश्रूंपेक्षां कितीतरी जास्त पटीनें माझी तळमळ आहे.

(८) हे कवे, काळानें माझा जो अनन्वित छळ चालविला आहे त्यावरून मला प्रियेची आठवण येते. ह्या छळांत निश्चितपणें तिचाच संकेत असला पाहिजे.

क़तरए मै, बस्के हैरत से नफ़स परवर् हुआ
२७ . . . खते जामे मै सरासर रिश्तए गौहर हुआ ॥ १ ॥
एतिबारे इश्क़ की खाना खराबी देखना
ग़ैर ने की आह, लेकिन वो खफ़ा मुझ पर हुआ ॥ २ ॥

(१) मधुचषक प्रियेच्या ओंठाला जाऊन भिडण्याचाच अवकाश. चषकावरील मधुबिंदू तिचें सौंदय पाहून आश्चर्यानें थबकले. एकामागून एक असे थबकलेले बिंदू मोतीच्या सरासारखे वाटतात.

(२) प्रियेची नक्की खात्री कीं, माझ्याशिवाय तिच्याकरितां असे दीर्घ निश्वास सोडणारा कोणी नाहीं. आणि मग माझा प्रतिस्पर्धी अशी आह भरूं लागला (निश्वास सोडूं लागला) तरी मीच तसें केलें असें समजून ती माझ्यावरच रागावत आहे. माझ्या प्रेमाची तिला खात्री आहे पण त्याचा परिणाम मीच रागें भरून घेण्यांत झाला आहे.

जब ब तक़रीबे सफ़र यार ने महमिल बांधा
२८ . . . तपिशे शौक़ ने हर् ज़र्रे पे इक दिल बांधा ॥ १ ॥
अहले बीनश ने ब हैरत कदए शोखिए नाज़
जौहरे आईना को तूतिए बिस्मिल् बांधा ॥ २ ॥
यासो उम्मीद ने, यक अर्बदये मैदां मांगा
अजज़े हिम्मत ने तिलिस्मे दिले साइल बांधा ॥ ३ ॥
न बंधे तश्नगीये जौक़ के मज़मूं 'ग़ालिब'
गरचे दिल खोल के दरिया को भी साहिल बांधा ॥ ४ ॥

(१) प्रवासाच्या तयारीनें प्रियेनें तिकडे उंटावर आसन बांधलें आणि आम्ही इकडे आसक्तीच्या तळमळीनें तिच्या रस्त्यावरच्या प्रत्येक कणाकणाला आमच्या हृदयाचे तुकडे बांधले. हेतु हा कीं, तिनें हे तुकडे चिरडीत जावें.

(२) प्रियेचें प्रतिबिंब पडल्यामुळें आरसा आश्चर्यमग्न होऊन बसला आहे. आणि त्या आरशांतील रेषानरेषा तिच्याकडे पाहून आरशासमोर ठेवलेला पोपट जसा विचलित बनतो तशा झाल्या आहेत.

(३) माझ्या खचलेल्या धीरामुळें माझें हृदय म्हणजे आशा-निराशेच्या द्वंद्वाचें रण-क्षेत्रच बनलें आहे.

(४) उर्दू काव्यांत नदीच्या कांठांना जवळून पाणी वाहात असतां कांठ हे तृषार्तच असतात असें म्हटलें जातें. कवि म्हणतो, माझ्या रसिकतेनें इतकी प्रासादिक रचना केली कीं, त्याच्यासमोर नदी ही कांठासारखी तृषार्त दिसूं लागावी पण इतकें करूनही माझ्या रसिकतेची तहान बुजली नाहीं.

मैं और बज़्मे मै से यौं तश्ना काम आऊं !
२९ . . . गर मैं ने की थी तौबा, साक़ी को क्या हुआ था ॥ १ ॥

है एक तीर जिसमें दोनों छिदे पड़े हैं
वो दिन गये कि अपना दिल से जिगर जुदा था ॥ २ ॥

दरमान्दगी में 'गालिब कुछ बन पड़े तो जानूं
जब रिश्ता बेगिरह था नाखुन गिरहकुशा था ॥ ३ ॥

(१) मी आणि तुझ्या मैफिलींतून न पितां जावें ? मी पश्चात्ताप करून सोडली असेल, मला पाजायला साकीला काय झालें होतें ?

(२) हृदय आणि काळीज (दिल व जिगर) आरामांत होते ते दिवस गेले. आतां तर नयनाच्या एकच शरानें दोघेही विद्ध होऊन पडले आहेत.

(३) संकटांचें जाळें आमच्याभोंवतीं पडलें नव्हतें तेव्हां अशा जाळ्यांना तोडण्याची युक्ति आणि शक्ति दोन्ही आमच्यापाशीं होत्या. पण आतां आम्ही संकटांत फसलों आहोंत तर त्यांतून सोडवणूक करून घेण्याची शक्ति नष्ट झाली आहे. ह्यांतून कांहीं वाट निघाली तर बरें आहे.

३० . . . घर हमारा जो न रोते भि तो वीरां होता
बहर गर बहर न होता, तो बियाबां होता ॥ १ ॥
तंगीये दिल का गिला क्या यह वो काफिर दिल है
के अगर तंग न होता तो परीशां होता ॥ २ ॥
बाद यक उम्रे दरा, बार तो देता बारे
काश, रिज्वां ही दरे यार का दरबां होता ॥ ३ ॥

(१) आमच्या डोळ्यांतून अश्रूंची झड लागून घर बुडालें. अश्रू नसते तरी घर बसलेंच असतें. फरक इतकाच कीं, अश्रूंनीं घर बुडालें. नाहींतर घराचें वाळवंट झालें असतें. सारांश, घराचा नाश हा कांहीं चुकणारा नव्हता.

(२) हें हृदयच असें विचित्र आहे कीं, ह्यांत शोकानें घर केलें नसतें तर शोक कां नाहीं म्हणून ह्याला तळमळ लागली असती.

(३) जन्मभर आम्ही प्रियेच्या घरचे उंबरठे झिजविले पण त्या घरचा रखवालदार इतका कठोर आहे कीं, आम्हांला आंत जाऊंच देत नाहीं. त्याच्या ऐवजीं रिजवान (स्वर्गाचा द्वारपाल) असता तर आमच्या प्रिया पूजनाचें पुण्य लक्षांत घेऊन त्यानें आम्हांला चटकन् आंत सोडलें असतें.

३१ . . . न था कुछ तो खुदा था, कुछ न होता तो खुदा होता
डुबोया मुझको होने ने, न होता मैं तो क्या होता ? ॥ १ ॥
हुवा जब ग़म से यौं बेहिस, तो ग़म क्या सर के कटने का !
न होता गर जुदा तन से, तो ज़ानू पर धरा होता ॥ २ ॥
हुई मुद्दत के 'गालिब' मर गया पर याद आता है
वो हर इक बात पर कहना, कि यौं होता तो क्या होता ? ॥ ३ ॥

(१) जेव्हां कांहींच नव्हतें तेव्हां परमेश्वर होता. आणि कांहींही नसतें तरी परमेश्वर असता. ह्या माझ्या अस्तित्वानेंच माझा नाश केला. मी नसतोंच तर काय झालें असतें ?

(२) शोकाचा हा प्रलय झाला आहे. आतां डोकें धडापासून वेगळें झालें तरी त्याचा काय शोक ? कारण हें शिर धडापासून वेगळें झालें नसतें तर शोकाच्या आत्यंतिकतेनें मांडीवर टेकून राहिलें असतें.

(३) गालिबला मरून पुष्कळ दिवस झाले, पण अद्याप त्याची आठवण येते. विशेषतः त्याचें प्रत्येक गोष्टीला असें झालें असतें तर काय झालें असतें हें म्हणणें आठवतें.

मुद्रा. ७०२५३ काव्य
७६९० २८६१

३२ . . . यक ज़रेए ज़मीं नहीं बेकार बाग का
यां जादा भी फतीला है लाले के दाग़ का ॥ १ ॥
बे मै किसे है ताक़ते आशोबे आगही
खींचा है अज्ज़े हौसला ने खत अयाग़ का ॥ २ ॥
बुलबुल के कारोबार पे हैं खन्दहाए गुल
कहते हैं जिसको इश्क़ ख़लल है दिमाग़ का ॥ ३ ॥
ताज़ा नहीं है नशये फ़िक्रे सुख़न मुझे
तिरयाकीए क़दीम हूं दूदे चिराग़ का ॥ ४ ॥
सौ बार बन्दे इश्क़ से आज़ाद हम हुए
पर क्या करें, कि दिल ही अदू है फ़राग़ का ॥ ५ ॥
बेखूने दिल है चश्म में मौजे निगह ग़ुबार
यह मैकदा ख़राब है मै के सुराग़ का ॥ ६ ॥
बागे शिगुफ़्ता तेरा बिसाते निशाते दिल
अब्रे बहार खुमकदा किसके दिमाग का ॥ ७ ॥

(१) वसंतऋतूंत बाग फुलांफळांनीं भरून गेली आहे. मोकळी अशी कोणतीच जागा ह्या बागेंत राहिली नाहीं. फार काय बागेंतील लहान लहान वाटाही हिरवळींनीं भरल्या आहेत. जणूं काय त्या वसंतऋतूच्या ज्योतीच्या वातीच होत.

(२) जीवनांतील संकटें सहन करण्याची आम्हांला शक्ति राहिली नाहीं. त्यामुळें आम्ही मदिरेचें सेवन (मनाच्या विस्मृतीकरितां) करतों. जणूं काय मदिरेच्या पेल्यावर आम्ही संवेदनेच्या आणि जाणिवेच्या रेषा काढून ज्या प्रमाणांत मदिरा त्या प्रमाणांत जाणीव आणि संवेदना नाहींशी करण्याची सोय केली आहे. दुःखें आणि त्यांची जाणीव विसरणें ह्याकरितां आम्ही मदिरेचें सेवन करीत आहोंत.

(३) बुलबुल एकीकडे प्रणयरुदन करीत आहे, तर त्याचें प्रेमपात्र असलेलीं फुलें हसून त्याचा उपहास करीत आहेत. त्या म्हणतात कीं, प्रेम प्रेम ज्याला म्हणतात तें म्हणजे मेंदूचा एक विकारच होय. संस्कृत वाङ्मयांतील चकोरासारखें उर्दू वाङ्मयांतील बुलबुलचें प्रेम प्रसिद्ध आहे.

(४) अफूबाज, दिव्यांच्या (चिराग) धुराचा उपयोग करून नळींतून अफूचा हुक्का ओढतात. कवि म्हणतो, माझी प्रतिभेची आराधना ही आजची नाहीं. बऱ्याच दिवसांपासून

चालत आली आहे. दिव्याच्या समोर बसून मी काव्यरचना करतों त्यामुळें अफूबाजाप्रमाणेंच दिव्याच्या धुरांतून मी माझ्या अफूसेवनाच्या (काव्यरचनेच्या) गुंगीचा अनुभव घेतों.

(५) प्रेमाच्या बंधनांतून आम्ही अनेकदां मुक्त झालों. पण काय करावें ! हें हृदयच आमच्या स्वस्थतेच्या शत्रुस्थानीं आहे. तें आम्हांला कधीं स्वस्थ बसूं देईल तर ना ?

(६) मधु मैफिलींत नेहमीं दारू वाहात असली पाहिजे नाहींतर तेथें नुसती धूळ उडते. कवि म्हणतो, माझ्या डोळ्याच्या मधुगृहांत मधूचा (हृदयाच्या रक्ताचा) सांठा व्हायला हवा. नाहींतर कोरड्या डोळ्यांत धुळीशिवाय काय राहाणार

(७) आकाशांत मेघांची दाटी होते तेव्हां दारूबाजांच्या दारू पिण्याला ऊत येतो. म्हणून मेघांना मधुचषक म्हटलें आहे. कवि म्हणतो, माझें हृदय आनंदाचें निवासस्थान आहे. तें प्रियेच्या सौंदर्यामुळें होय. आकाशांतील मेघरूपी मधुचषक हें त्याचें कारण नव्हे. तें इतरांच्या आनंदाचें कारण असेल, माझ्या नव्हे.

३३ . . .

वो मेरी चीने जबीं से ग़मे पिन्हां समझा
राज़े मक्तूब ब बेरब्तिए उनवां समझा ॥ १ ॥
यक अलिफ बेश नहीं सैक़ले आईना हनूज़
चाक करता हूं मैं, जबसे के गरेबां समझा ॥ २ ॥
शरहे असबाबे गिरफ़्तारिए ख़ातिर मत पूछ
इस क़दर तंग हुआ दिल, कि मैं ज़िन्दां समझा ॥ ३ ॥
बद गुमानी ने न चाहा उसे सरगर्मे ख़िराम
रुख़ पे हर क़तरए अश्क़ दीदए हैरां समझा ॥ ४ ॥
अज्ज़ से अपने यह जाना कि वह बदख़ू होगा
नब्ज़े ख़स से तपिशे शोलए सोज़ां समझा ॥ ५ ॥
सफ़रे इश्क में की ज़ोफ़ ने राहत तलबी
हर क़दम साये को मैं अपने शबिस्तां समझा ॥ ६ ॥
था गुरेज़ां मिज़ए यार से दिल तादमे मर्ग
दफ़ए पैकाने क़ज़ा, इस क़दर आसां समझा ॥ ७ ॥
दिल दिया जान के क्यों उसको वफ़ादार 'असद'
ग़लती की कि जो काफ़िर को मुसलमां समझा ॥ ८ ॥

(१) माझ्या कपाळावरील आंठ्यावरून माझा काय हेतु आहे हें प्रियेनें ओळखलें. जणूं काय पत्रांतील विजोड आणि असंबद्ध मथळ्यावरून तिला पत्रांतील मजकूर समजला.

(२) मला समजूं उमजूं लागल्यापासून मी प्रेमवेडाचे पाठ घेत आहें. (वेडांत कपडे फाडण्याचा अभ्यास करीत आहें.) पण अद्याप त्या कलेंत तरबेज झालों नाहीं. जणूं काय पोलादाचा आरसा करायला जावें आणि पुष्कळ मेहनत करूनही त्याच्यावर फक्त एक रेषा उमटावी असें झालें आहे.

(३) मी बंधनांत कसा सांपडलों हें मला विचारूं नका. दुःखामुळें माझें हृदय इतकें संकुचित झालें आहे कीं, मी त्याला अरुंद असा तुरुंगच समजूं लागलों आणि त्यांत फसलों.

(४) प्रियेनें फिरायला जावें हेंही मला आवडेना. कारण, तिच्या फिरण्यानें तिच्या कपाळावर घर्मबिंदु उभे राहातील आणि तिच्या सौंदर्यामुळें ते आश्चर्यचकित होऊन जागच्याजागीं थबकून राहातील. माझ्या प्रियेच्या कपाळावर असे स्थिर राहाणाऱ्या बिंदूंचा मला हेवा वाटतो.

(५) माझी लाचार अवस्था पाहून माझी प्रिया खात्रीनें रोष करील. तिच्या रोषाला मी बळी पडेन ह्याची खात्री झाली. माझ्या ह्या अवस्थारूपी तृणाला तिचा रोषाग्नि निश्चित जाळून टाकील, असेंच मला वाटतें.

(६) प्रेमपथांत माझ्या अशक्ततेमुळें पुनः पुन्हा विश्रांति घ्यावीशी वाटे तेव्हां आम्ही आमच्या सावलीलाच रात्रीचें विश्रान्तिस्थान समजूं लागलों.

(७) प्रियेच्या नयनशरापासून वांचण्याची मीं शर्थ केली. पण तें शक्य झालें नाहीं. कारण तो नयनशर म्हणजे मृत्यूचाच बाण होता. त्यांतून वांचणें कसें शक्य होतें !

(८) हे असद्, तिला एकनिष्ठ समजून कशाला आपलें हृदय अर्पण केलेंस. काफरला मुसलमान समजलास ही केवढी चूक केलीस ?

३४ . . . फिर मुझे दीदए तर याद आया
दिल जिगर तशनए फरयाद आया ॥ १ ॥

दम लिया था न क़ियामत ने हनूज
फिर तेरा वक़्ते सफ़र याद आया ॥ २ ॥

सादगी हाए तमन्ना यानी
फिर वो नैरंगे नज़र याद आया ॥ ३ ॥

उज्रे वामान्दगी ऐ हसरते दिल
नाला करता था जिगर याद आया ॥ ४ ॥
ज़िन्दगी यों भी गुज़र ही जाती
क्यों तेरा राह गुज़र याद आया ॥ ५ ॥
क्या ही रिज़्वां से लड़ाई होगी
घर तेरा खुल्द में गर याद आया ॥ ६ ॥
आह वो जुरअते फरयाद कहां
दिलसे तंग आके जिगर याद आया ॥ ७ ॥
फिर तेरे कूचे को जाता है खयाल
दिल गुम् गश्ता मगर याद आया ॥ ८ ॥
कोई वीरानी सी वीरानी है
दश्त को देखके घर याद आया ॥ ९ ॥
मैंने मजनूं पे लड़कपन में 'असद'
संग उठाया था के सर याद आया ॥ १० ॥

(१) मला पुन्हा माझे पाणावलेले डोळे आठवले. माझ्या हृदयाला पुन्हा शोकमय अवस्था संपादण्याची हुरहुर लागली.

(२) तूं निघून गेलीस. मन बेचैन झालें. थोडा वेळ मन स्वस्थ झालें न झालें तोंच तुझें पुन्हा निघून जाणें आठवलें आणि मग पुन्हा अस्वस्थतेला सुरवात झाली.

(३) माझी मीलनाची वृथा आशा तरी पाहा. ती चंचल नजरेची प्रिया पुन्हा माझ्या आठवणींत आली. माझी आशा तरी किती भोळी. त्या चंचलेशीं मीलन अशक्य हें माहीत असूनही तिची आठवण मात्र सारखी येते.

(४) माझ्या हृदया, माझी निराशावस्था पाहा. मला शोक करण्याची इच्छा नव्हती का ? पण काय करूं. काळीज आधींच फाटून चाललें होतें. त्यामुळें दीर्घ निश्वास सोडण्याचा धीर मला होईना.

(५) जीवन कसें तरी संपून गेलें असतें. त्यांत तुझ्या येण्याजाण्याच्या वाटेची कां आठवण यावी ? ती आठवण झाली मात्र, दुःखानें मरणच ओढवलें.

(६) स्वर्गांत गेल्यावर हे प्रिये, मला तुझ्या घराची आठवण येईल आणि मी स्वर्गाच्या द्वारपालाला सांगेन कीं ह्या स्वर्गापेक्षां माझ्या प्रियेचें घर चांगलें आहे. ह्यामुळें त्या द्वारपालाशीं खासें भांडण जुंपेल.

(७) धीर धरण्याची आणि निश्वास सोडण्याची शक्ति कुठें आहे ? हृदयांत आतां शक्ति नसल्यामुळें मला आतां माझें काळीज आठवतें. कदाचित् काळजांत ही शक्ति शिल्लक राहिली असेल तर असो.

(८) मन कां बरें पुन्हा तुझ्या निवासस्थानाकडे धांव घेत आहे ? कदाचित् आपलें हरवलेलें हृदय तिकडे सांपडेल म्हणून असेल.

(९) प्रेमवेडांत घर उध्वस्त होऊन वाळवंट नशीबीं आलें. आम्ही घरालाच वाळवंट समजत होतों. पण हें वाळवंट इतकें भयंकर निघालें कीं, त्यामुळें आमचें घर आम्हांला आठवूं लागलें.

(१०) लहानपणीं, हे असद, इतर मुलांप्रमाणें मी एका प्रेमवेड्याला मारण्याकरितां दगड हातांत घेतला. पण एकाएकीं हा विचार आला कीं, पुढें मीही असाच वेडा झालों तर ! मुलें मलाही असेच दगड मारतील. हा विचार येतांच मीं दगडफेंक करणें सोडून दिलें.

३५ . . . हुई ताख़ीर, तो कुछ बाइसे ताख़ीर भी था
आप आते थे, मगर कोई इनान्‌गीर भी था ॥ १ ॥
तुमसे बेजा है मुझे अपनी तबाही का गिला
इसमें कुछ शायबए ख़ूबिए तक़दीर भी था ॥ २ ॥
तू मुझे भूल गया हो तो पता बतला दूं
कभी फ़ितराक में तेरे कोई नख़चीर भी था ॥ ३ ॥
क़ैद में थी तेरे वहशी को वही ज़ुल्फ की याद
हां कुछ इक रंजे गिरांबारिए जंजीर भी था ॥ ४ ॥
विजली इक कौन्द गई आंख़ों के आगे तो क्या
बात करते के मैं लब् तशनए तक़रीर भी था ॥ ५ ॥
यूसुफ़ उसको कहूं, और कुछ न कहे ख़र हुई
गर बिगड़ बैठे तो मैं लायक़े ताज़ीर भी था ॥ ६ ॥
देखकर ग़ैर को हो क्यौं न कलेजा ठण्डा
नाला करता था वले, तालिबे तासीर भी था ॥ ७ ॥
पेशे मे ऐब नहीं रखिये न फरहाद को नाम
हम ही आशुफ़्ता सरो में वो जवां ' मीर ' भी था ॥ ८ ॥

हम थे मरने को खड़े, पास न आया न सही
आख़िर उस शोख़ के तरकश में कोई तीर भी था ॥ ९ ॥
पकड़े जाते हैं फ़िरिश्तों के लिखे पर नाहक़
आदमी कोई हमारा दमे तहरीर भी था ॥ १० ॥
रेख़ती के तुम्हीं उस्ताद नहीं हो 'ग़ालिब'
कहते हैं अगले जमाने में कोई 'मीर' भी था ॥ ११ ॥

(१) प्रिये, तुला येण्यास उशीर झाला. ह्या उशीराला तसेंच कारणही असलें पाहिजे. कदाचित् माझ्या प्रतिस्पर्ध्यानें (रकीब) मधें थांबवून घेतलें असेल. नाहींतर उशीर करण्याला कारण काय ?

(२) माझ्या नाशाचें कारण माझें नशीबच होय. तूं नव्हे. पण माझ्या नाशाचें गाऱ्हाणें मी तुझ्याजवळ विनाकारण करीत असतों.

(३) तूं मला विसरली असशील तर हा बघ मी मागच्या गोष्टीची आठवण (पत्ता) देतों. तूं एकदां शिकार करून सावज आपल्या शिकारखान्यांत धरून ठेविलें होतेंस ना ? झालें, ती ओळख पटली ना ?

(४) तुझा प्रेमवेडा (मी) कैदेंत आहे. तेथें तुझा कुरळ्या केशकलापांची आठवण त्याला होते. अर्थात् पायांत बेड्या होत्या त्याचीही थोडी जाणीव होत होती. पण तुझ्या केशकलापाच्या आठवणीसमोर बेड्यांची जाणीव म्हणजे कांहींच नव्हे.

(५) तूं एकाएकीं माझ्या समोर आलीस. जणूं काय वीज चमकून डोळे दिपून गेले. पण स्वस्थपणें समोर येऊन दोन शब्द बोलली असतीस तर ? माझे कान तुझे शब्द ऐकण्यास तहानलेले होते.

(६) यूसुफचें सौंदर्य पूर्ण सौंदर्याच्या अर्थानें वाङ्मयांत निर्देशिलें जातें. मी तिला यूसुफ म्हटलें. बरें झालें. ती कांहीं बोलली नाहीं. यूसुफ गुलाम म्हणून ईजिप्तमध्यें विकला गेला होता. आपल्याला हा गुलाम म्हणतो कीं काय असें समजून तिनें शिक्षा केली असती, तर तेंही योग्य झालें असतें. पण तिच्या लक्षांत तें आलें नाहीं ही खैर झाली.

(७) माझा प्रतिस्पर्धी दीर्घ निश्वास सोडीत होता. आणि आपल्या प्रयत्नांना फळ यावें असें इच्छीत होता. त्याला कांहीं यश आलें नाहीं. त्याचे निष्फळ निश्वास पाहून मला फार बरें वाटलें.

(८) फरहादला तो धंद्यानें पाथरवट होता म्हणून नांवें ठेवूं नका. शीरीनच्या प्रेमाकरितां त्यानें कालवा खणण्याचें प्रचंड काम केलें. आम्हां प्रेमवेड्यांच्या रांगेंतलाच तो एक वीर होता.

(९) आम्ही मरणाला तयार होतों. ती कांहीं जवळ आली नाहीं. बरें, तें असो. पण दुरून आमचा वध करायला तिच्या भात्यांत शर नव्हते कीं काय ?

(१०) हा काय परमेश्वराच्या न्यायालयाचा प्रकार ! आम्हांला शिक्षा कशावरून तर चित्रगुप्तांनीं आमच्यासंबंधीं जें कांहीं लिहून ठेविलें असेल, त्यावरूनच. आरोपीला आपल्या बचावाकरितां मुभा तरी द्यावी कीं नाहीं ?

(११) अरे गालिब, उर्दूमध्यें तूंच कांहीं उस्ताद (परिपूर्ण) नाहींस. मागल्या काळांत मीर पण होऊन गेला होता, असे ऐकतों म्हटलें. आपण उर्दूत उस्ताद (गुरु) आहोंत आणि तेही मीरच्या बरोबरीचे हें ह्या ओळींत गालिबनें मोठ्या खुबीनें सूचित केलें आहे.

३६ . . . लबे खुश्क, दर तश्नगी मुर्दगां का
जियारत् कदा हूं दिल आज़ुर्दगां का ॥ १ ॥
हमा ना उमीदी हमा बदगुमानी
मैं दिल हूं फरेबे वफ़ाखुर्दगां का ॥ २ ॥

(१) आकांक्षा अतृप्त राहून जे मेले, त्या सर्वांत मी श्रेष्ठ आहें. ज्यांचीं हृदयें भग्न झालीं आहेत, अशा प्रेमवेड्यांना तर मी पूजास्थान बनलों आहें.

(२) प्रेमांत विश्वासघात झाल्यामुळें मी म्हणजे मूर्तिमंत निराशा आणि दुःख बनलों आहें.

३७ . . . तू दोस्त किसी का भी सितमगर न हुआ था
औरों पे है वो ज़ुल्म के मुझपर न हुआ था ॥ १ ॥
छोड़ा महे नख़शब की तरह दस्ते क़ज़ा ने
ख़ुर्शीद हनूज़ उसके बराबर न हुआ था ॥ २ ॥
तौफ़ीक़ बअन्दाज़ए हिम्मत है अज़ल से
आखों में है वो कतरा कि गौहर न हुआ था ॥ ३ ॥
जब तक के न देखा था क़दे यार का आलम
मै मोतक़िदे फितनए महशर न हुआ था ॥ ४ ॥
मैं सादादिल, आज़ुर्दगीये यार से खुश हूं
यानी सबक़े शौक मुकर्रर न हुआ था ॥ ५ ॥

दरियाए मआसी तुनुक आबी से हुआ खुश्क
मेरा सरे दामन भी अभी तर न हुआ था॥ ६ ॥

जारी थी 'असद्' दागे जिगर से मेरे तहसील
आतिशकदा, जागीरे समन्दर न हुआ था॥ ७ ॥

(१) हे जुलुमी प्रिये, तूं आजपर्यंत कोणालाही प्रिय म्हटलें नाहींस. माझ्या प्रतिस्पर्ध्यांनाही तूं तऱ्हेतऱ्हेनें छळलें आहेस, तितकें मला छळलें नाहींस हा भेद कां बरें? मला ह्या गोष्टीचा हेवा वाटतो.

(२) मागें इब्ने अता नांवाच्या शास्त्रज्ञानें कृत्रिम चंद्र तयार केला होता म्हणतात. त्याचा प्रकाश चार कोसपर्यंत पडत असे. दोन महिने चालू राहून हा कृत्रिम चंद्र तडकून नष्ट झाला. कवि म्हणतो, हे प्रिये, तुझ्या स्वरूपाची बरोबरी करण्याकरितां निसर्गानें सूर्याची घडण केली, पण कृत्रिम चंद्राप्रमाणेंच सूर्याची निर्मिति निष्प्रभ ठरली. सूर्य हा तुझी बरोबरी करूं शकत नाहीं.

(३) आपला निर्धार ज्या प्रमाणांत दृढ त्याच प्रमाणांत योग्यता प्राप्त होते. हें पूर्वीपासूनच चालत आलें आहे. नाहींतर पाण्याच्या एका थेंबाचा निर्धार होता म्हणूनच त्याला डोळ्यांतील अश्रुबिंदु होण्याचें भाग्य लाभलें. तो बिंदु जर अल्पसंतुष्ट असता तर जास्तींत जास्त मोतीं बनून कोणाच्या तरी गळ्यांत जाऊन बसला असता. डोळ्यांतील अश्रूंचें स्थान त्याला लाभलें नसतें.

(४) प्रियेचा उंच बांधा मी जोंपर्यंत पाहिला नव्हता तोंपर्यंत कल्पांताच्या प्रलयावर माझा विश्वास नव्हता. आतां मात्र तो प्रलय कसा असतो ह्याची मला कल्पना आली.

(५) प्रिया मलूल असली तरी मला आनंद वाटतो. कारण मला पुन्हा आपलें प्रेम व्यक्त करून तिला रंजविण्याची संधि मिळते.

(६) मी इतके अपराध केले आहेत कीं अपराधांचा समुद्र आतां कोरडा पडला आहे. तरी अजून अपराध करण्याची माझी इच्छा गेली नाहीं. समुद्र कोरडा पडला पण माझ्या इच्छांचा पदर कांहीं अजून भिजला नाहीं.

(७) हे असद, माझी हृदयांतील जखम म्हणजे धगधगतें अग्निकुंडच. मी त्या अग्नीची आराधना अनेक दिवसांपासून करीत आहें. त्या वेळीं अजून त्यांतून अग्निकीटक (समंदर) उत्पन्न झाला नव्हता. समंदर नांवाचा किडा अग्नि बराच काळ धगधगत राहिला तर निर्माण होतो असा कविसंकेत आहे.

३८ . . . शब कि वो मजलिस फ़रोज़े खलवते नामूस था
रिश्तए हर शमा, ख़ारे किस्वते फ़ानूस था ॥ १ ॥
मशहदे आशिक़ से कोसों तक जो उगती है हिना
किस क़दर यारब ! हलाके हसरते पाबोस था ॥ २ ॥
हासिले उल्फ़त न देखा जुज़ शिकस्ते आरज़ू
दिल बदिल पैवस्ता गोया यक लबे अफ़सोस था ॥ ३ ॥
क्या कहूं बीमारिए ग़म की फ़राग़त का बयान् !
जो के खाया खूनेदिल बेमिन्नते कैमूस था ॥ ४ ॥

(१) काल रात्रीं प्रियेची जेव्हां गुप्त मैफिल चालली होती, त्या वेळीं त्या मैफिलींतील दिवेसुद्धां संकोचानें अस्वस्थ झाले होते. जणूं काय त्यांच्या वातीच त्यांच्या पायांत कांटे बनून त्यांना अस्वस्थ करीत होत्या.

(२) प्रियेच्या मेंदी लावलेल्या पायाचें चुंबन घेण्याची इच्छा तशीच अतृप्त ठेवून प्रेमिक मरून गेला. त्याची फेड म्हणूनच कीं काय प्रेमिकाच्या मृत्युस्थानाजवळ लांबलांबपर्यंत मेहंदीचे मळे फुलले आहेत. कदाचित् आतांतरी तेथील मेहंदी प्रिया आपल्या पायांना लावील आणि प्रेमिकाची अतृप्त आकांक्षा पुरी होण्याचा योग होईल.

(३) प्रेमाचें फळ म्हणजे आकांक्षाभंगच होय हें आम्हांला दिसून आलें. प्रेमिकांचीं हृदयें मिळालीं. त्यांचें रूपांतर हळहळणाऱ्या ओठांत झालें.

(४) प्रेमाच्या दुःखाची मजा काय वर्णावी ? मी गम (दुःख) खातों त्याचें रूपांतर तावडतोब रक्तांत होतें. त्याला पचनाची जरूर नाहीं.

३९ . . . आईना देख अपना सा मुंह लेके रह गए
साहब को दिल न देने पे कितना ग़ुरूर था ॥ १ ॥
क़ासिद की अपने हाथ से गर्दन न मारिए
उसकी खता नहीं है यह मेरा कुसूर था ॥ २ ॥

(१) प्रिया नेहमीं गर्वानें म्हणे कीं, मी कोणावरही प्रेम करणार नाहीं. पण आरशांतील स्वतःचें प्रतिबिंब पाहून त्यावर ती भाळली. अशा प्रकारें तिचें गर्वहरण झालें.

(२) हे प्रिये, माझा निरोप तुझ्याकडे घेऊन येणाऱ्याचा वध करूं नकोस. तुझ्याकडे त्याला पाठविण्यांत माझी चूक होती. ह्यांत त्याचा काय दोष ? तुझ्या हातून वधिलें जाण्याचा मान मला मिळूं दे.

अज़े नियाज़े इश्क़ के क़ाबिल नहीं रहा
४० . . . जिस दिल पे नाज़ था मुझे वो दिल नहीं रहा ॥ १ ॥

जाता हूं दाग़े हसरते हस्ती लिये हुए
हूं शम्ए कुश्ता दरखुरे महफ़िल नहीं रहा ॥ २ ॥

मरने की ऐ दिल और ही तदबीर कर के मैं
शायाने दस्तो बाज़ुए क़ातिल नहीं रहा ॥ ३ ॥

बर्‌रूये शश जहत दरे आईनाबाज़ है
यां इम्तियाजे नाक़िसो कामिल नहीं रहा ॥ ४ ॥

वा कर दिये हैं शौक़ ने बन्दे नकाबे हुस्न
गैर अज़ निगाह अब कोई हायिल नहीं रहा ॥ ५ ॥

गो मैं रहा रहीने सितम हाए रोज़गार
लेकिन तेरे ख़याल से ग़ाफ़िल नहीं रहा ॥ ६ ॥

दिल से हवाए किश्ते वफ़ा मिट गई के वां
हासिल सिवाए हसरते हासिल नहीं रहा ॥ ७ ॥

बेदादे इश्क़ से नहीं डरता मगर ‘ असद ’
जिस दिल पे नाज था मुझे वो दिल नहीं रहा ॥ ८ ॥

(१) प्रेमाचे भार वाहण्यास आतां शक्ति राहिली नाहीं. ज्या हृदयाबद्दल मला अभिमान वाटत असे तें हृदय आतां माझ्यापाशीं राहिलें नाहीं.

(२) जीवनाची हुरहुर घेऊन मी ह्या लोकांतून जात आहें किंवा असें म्हणाना कीं हा विझलेला दिवा ह्या मैफिलीच्या योग्य राहिला नाहीं.

(३) हे हृदया, आतां मरणाची वेगळीच सोय पाहा. प्रियेच्या हातून वधिलें जाण्याची माझी आकांक्षा होती पण आतां तिच्या हातून वध व्हावा ह्या योग्यतेचा मी राहिलों नाहीं.

(४) काळ म्हणजे आयनेमहालच. ह्यांत शहाणे, मूर्ख सगळ्यांची मति गुंग झालेली दिसते. आरशांच्या नजरेंत चांगलें वाईट हा भेद नाहींच. सर्वांचेंच प्रतिबिंब त्यांत पडतें. तसें ह्या काळाच्या आयनेमहालांत सर्व सारखेच दिसतात. कुणालाच निसर्गाचें गूढ उकललेलें दिसत नाहीं.

(५) माझ्या रसिकतेनें सौंदर्यावरचे सर्व बुरखे काढून टाकले आहेत. फक्त आमच्या दृष्टीचाच पडदा शिल्लक राहिला आहे. प्रियेचें सौंदर्य पाहाण्यास आमच्या दृष्टींत शक्ति राहिली नाहीं. हें हृदय जागृत झालें तर हें सौंदर्य पाहाण्याची शक्ति डोळ्यांना लाभेल. एरव्हीं नाहीं.

(६) जीवनांत अनेक संकटें अंगावर येऊन पडलीं पण तुझ्यावरील माझ्या प्रेमाकडे मी कधींच दुर्लक्ष केलें नाहीं.

(७) एकनिष्ठ राहाण्याची इच्छा हृदयांतून नष्ट झाली आहे. कारण त्यांतून निष्फळ हुरहुरीशिवाय कशाचाच लाभ होत नाहीं.

(८) प्रेमांत जीं संकटें ओढवतात त्याची मला भीति नाहीं; पण हीं संकटें सहन करण्याची शक्ति आतां माझ्या हृदयांत राहिली नाहीं. ज्याबद्दल मला अभिमान होता तें हृदय आतां राहिलें नाहीं.

४१ . . . रश्क कहता है कि "उसका ग़ैर से इखलास हैफ़ !"
अक्ल कहती है, कि वो बेमेहर किसका आश्ना ? ॥ १ ॥

ज़र्रा ज़र्रा साग़रे मैख़ानए नैरंग है
गर्दिशे मजनूं, बचश्मकहाए लैला आश्ना ॥ २ ॥

शौक़ है सामां तराज़े नाज़िशे अरबाबे अज्ज़
ज़र्रा सहरा दस्तगाहो क़तरा दरिया आश्ना ॥ ३ ॥

शिकवा संजे रश्के हम दीगर न रहना चाहिये
मेरा ज़ानू मूनिस और आईना तेरा आश्ना ॥ ४ ॥

मैं और इक आफ़त का टुकडा वह दिले वहशी कि है
आफ़ियत का दुश्मन और आवारगी का आश्ना ॥ ५ ॥

रब्त यक शीराजए वहशत हैं अजज़ाये बहार
सब्जा बेगाना, सबा आवारा, गुल ना आश्ना ॥ ६ ॥

कोहकन नक़्क़ाशे यक तिमसाले शीरीं था 'असद'
संग से सर मारकर होवे न पैदा आश्ना ॥ ७ ॥

(१) मी प्रियेला दुसऱ्यावर प्रेम करतांना पाहातों. तेव्हां मला हळहळ वाटते. पण पुन्हां असें वाटतें कीं, ही हळहळ व्यर्थच नाहीं का? कारण ती प्रिया कुणाशींही मैत्री करील हें संभवनीय नाहीं. प्रेम करण्याचा तिचा स्वभावच दिसत नाहीं.

(२) मजनूचें वेड हें लैलाच्या इशाऱ्याच्या आधीन होतें तद्वतच ह्या सृष्टींतील कणनकण काळाच्या मद्यशाळेंतील पेला आणि म्हणून मद्यशाळेच्या आधीन होय.

(३) प्रेमिकांचें वैभव प्रेमच वाढवितें. ह्या प्रेमामुळेंच लहानशा अणूला विशाल भूप्रदेशाची आणि लहानग्या बिंदूला सागराची योग्यता प्राप्त होते.

(४) एक मी आहें आणि एक माझें हृदय. हें हृदय असें विचित्र आहे कीं, ह्याला कधीं स्वस्थता नको आहे. नेहमीं वेड घेण्याकडे ह्याचा कल. ह्यामुळें माझ्यावर जीं संकटें येतील तीं थोडींच.

(५) आपल्याला एक दुसऱ्याबद्दल गाऱ्हाणें करण्यास नको. कारण निराशेनें मी डोकें आपल्या मांडीवर टेकून बसलों आहें. आणि तूं आपल्या मांडीवर आरसा ठेवून त्यांत आपलें रूप न्याहळीत आहेस. (उर्दू काव्यांत आरशाला मांडीची उपमा देतात.)

(६) वसंतऋतूचे वटक म्हणजे प्रेमवेडानें बहकलेले होत. तोच त्यांच्यामधला दुवा होय. हिरवळ एकाकी, तर प्रभातकाळचा वायु मनसोक्त वागणारा आणि फुलें अनभिज्ञ, असा हा गोंधळ आहे.

(७) हे असद, फरहाद काय खरा प्रेमिक होता? तो शीरीनचें चित्र काढणारा एक पाथरवट होता. त्याचें प्रेम खरें असतें तर शीरीन त्याला मिळाली नसती का? नुसतें डोकें फोडून घेतल्यामुळें कां कुठें प्रियेचा लाभ होतो?

४२ . . .

ज़िक्र उस परीवश का और फिर बयान् अपना
बन गया रक़ीब आख़िर था जो राज़ दां अपना ॥ १ ॥
मै वो क्यों बहोत पीते बज़्मे ग़ैर में यारब
आज ही हुआ मंजूर उनको इम्तिहां अपना ॥ २ ॥
मंज़र इक बलन्दी पर और हम बना सकते
अर्श से उधर होता काश के मकां अपना ॥ ३ ॥
दे वो जिस कदर ज़िल्लत हम हंसी में टालेंगे
बारे आश्ना निकला उनका पास्बां अपना ॥ ४ ॥
दर्दे दिल लिखूं कब तक? जाऊं उनको दिखलाऊं
उंगलियां फ़िगार अपनी, ख़ामा ख़ूंचकां अपना ॥ ५ ॥

घिसते घिसते मिटही जाता आपने अबस बदला
नंगे सजदे से मेरे, संगे आस्तां अपना ॥ ६ ॥

ता करे न ग़म्माजी कर लिया है दुश्मन को
दोस्त की शिकायत में हमने हमज़बां अपना ॥ ७ ॥

हम कहां के दाना थे, किस हुनर में यक्ता थे
बे सबब हुआ 'गालिब' दुष्मन आस्मां अपना ॥ ८ ॥

(१) आधींच ती [प्रिया] अप्सरा आणि त्यांतून तिचें वर्णन करणारा मी. पण दुर्दैव माझें. ज्या मित्राला मी विश्वासांत घेऊन त्याच्यासमोर तिचें वर्णन केलें, तोच माझा प्रतिस्पर्धी बनला.

(२) परक्यांच्या मैफिलींत आज प्रिया मनसोक्त दारू पीत आहे. आपण किती पिऊं शकतों हें पाहायचें तिनें ठरविलें आहे. पण तिनें हें आजच करण्याचें कां ठरवावें ? आणि तेंही परक्यांच्या मैफिलींत ? माझ्या कां नको ?

(३) आमचें घर ह्या वेळीं आकाशावर आहे. त्याच्यापलीकडे कांहीं नाहींच. आकाशाच्या पलीकडे आमचें घर असतें तर आम्ही तेथून आकाशाची फेरी मारली असती. कवीचा आशय असा कीं, आम्हांला आपल्या स्वत्वाची जाणीव नाहीं. आमच्यावर विस्मृतीचा पडदा पडला आहे.

(४) प्रियेच्या घराचा पहारेकरी तऱ्हेतऱ्हेनें आम्हांला छळतो. पण तो ओळखीचा असल्यामुळें त्याचा छळ ही थट्टामस्करी आहे असें मानून हसण्यावारी टाळणें आम्हांला सुलभ झालें आहे.

(५) माझ्या हृदयाची व्यथा काय आहे, हें लिहितां लिहितां माझ्या बोटांना जखम झाल्या आहेत आणि लेखणींतून रक्त गळूं लागलें आहे. आतां प्रियेपाशीं जाऊन तिला आपली हृदयव्यथा सांगावी हेंच योग्य आहे.

(६) तुझ्या उंबरठ्याच्या दगडावर मी माझें कपाळ टेकीत असें तो दगड तूं कां बदलून टाकलास ? माझ्यासारख्या उपऱ्यानें तुझ्या घरच्या उंबरठ्याच्या दगडावर डोकें टेकावें ह्याची तुला लाज वाटली होय ? पण हें तूं व्यर्थ केलेंस. अगे, झिजून झिजून तो दगडच कालांतरानें नाहींसा झाला असता.

(७) माझ्या प्रतिस्पर्ध्यानें प्रियेपाशीं माझी चुगली करूं नये म्हणून मीं त्याला आपला मित्र बनविलें आहे. आम्ही दोघेही प्रियेचीं गाऱ्हाणीं करीत असतों. आतां तो माझी चहाडी कशी करणार ?

(८) योग्य आणि बुद्धिमान माणसालाच जग छळतें. गालिब म्हणतो, आम्ही कुठले योग्य आणि बुद्धिमान् ? काल विनाकारण मला छळीत आहे. काल आपल्याला छळीत आहे, हें सांगून गालिबनें आपण योग्य व बुद्धिमान् असल्याचें खुबीनें सुचविलें आहे.

४३ . . . सुर्मए मुफ़्ते नज़र हूं मेरी क़ीमत यह है
के रहे चष्मे ख़रीदार पे एहसान् मेरा ॥ १ ॥
रुख्सते नाला मुझे दे के मबादा ज़ालिम
तेरे चेहरे से हो ज़ाहिर ग़मे पिन्हां मेरा ॥ २ ॥

(१) मी डोळ्याला लावायचा सुर्मा आहें. त्याची फक्त हीच किंमत कीं, विकत घेणाऱ्यांच्या डोळ्यांनीं माझें ऋण मानावें. दुसरा आशय हा कीं माझें काव्य अमूल्य आहे आणि अमूल्य असूनही सारेजण त्याचा आस्वाद घेऊं शकतात.

(२) हे प्रिये, मला माझें दुःख अश्रूवाटें बाहेर काढण्याची परवानगी दे. असें न होवो कीं दुःख आंतल्याआंत राहिलं आणि त्याचा पश्चात्ताप तुला होऊन तुझ्या चेहेऱ्यावरून लोकांना माझें दुःख समजून येईल. (माझ्या प्रेमाचें रहस्य बाहेर पडेल.).

४४ . . . ग़ाफ़िल, बवहमे नाज़ ख़ुद आरा है वर्ना यां
बे शानए सबा नहीं तुर्रा गयाह का ॥ १ ॥
बज़्मे क़दह से ऐशे तमन्ना न रख के रंग
सैदे ज़दाम जस्ता है इस दामगाह का ॥ २ ॥
रहमत अगर क़बूल करे क्या बईद है
शर्मिन्दगी से उज़्र न करना गुनाह का ॥ ३ ॥
मक़तल को किस निशात से जातां हूं मै, के है
पुर गुल ख़याले ज़ख़्म से दामन निगाह का ॥ ४ ॥
जांदर हवाए एक निगहे गर्म है असद
परवाना है वकील, तेरे दाद ख्वाह का ॥ ५ ॥

(१) मूर्ख मानव समजत असतो कीं, त्याच्या हातून घडणारें प्रत्येक चांगलें कृत्य त्याच्या अक्कलहुशारीचें आणि बुद्धिमत्तेचें फळ आहे. पण वास्तविक पाहातां एक पान जरी हलायचें असलें तरी त्याला निसर्गाचें (परमेश्वराचें) साहाय्य लागतें.

(२) मैफिलींतून (जीवनांतून) आपल्याला सुखें भोगायला मिळतील असें समजूं नकोस. अरे, तें सावज कधींचेंच जाळ्यांतून निसटून गेलें आहे.

(३) मी माझ्या अपराधामुळें अगदीं शरमिंधा झालों आहें. गुन्हे केले म्हणून सांगण्याचीही लाज वाटते. माझी ही स्थिति पाहून परमेश्वर मला क्षमा करील तर आपला गुन्हा कबूल करणें मला कठीण नाहीं.

(४) बळी जाण्याकरितां मी वधस्थानाकडे किती आनंदानें चाललों पाहा. माझ्या दृष्टीच्या पदरांत माझ्या जखमांच्या विचाराचीं फुलें खच्चून भरलीं आहेत.

(५) हे प्रिये, हा असद (गालिब) तुझ्या प्रेममय दृष्टीची इच्छा करीत आहे. त्याची वकिली बघ. दिव्याच्या एका पेटल्या नजरेंत भस्म होऊं इच्छिणारा पतंगच करीत नाहीं का ?

४५ . . . जोरे से बाज़ आये पर, बाज आयें क्या
कहते हैं ' हम तुमको मुंह दिखलायें क्या ॥ १ ॥
रात दिन गर्दिश में हैं सात आस्मां
हो रहेगा कुछ न कुछ, घबरायें क्या ॥ २ ॥
लाग हो तो उसको हम समझें लगाव
जब न हो कुछ भी तो धोका खायें क्या ॥ ३ ॥
हो लिये क्यौं नामाबर के साथ साथ
यारब ! अपने ख़त को हम पहुंचायें क्या ॥ ४ ॥
मौजे ख़ून् सर से गुजर ही क्यौं न जाय
आस्ताने यार से उठ जायें क्या ॥ ५ ॥
उम्र भर देखा किये मरने की राह
मर गये पर, देखिए दिखालायें क्या ॥ ६ ॥
पूछते हैं वह के ' ग़ालिब ' कौन है
कोई बतलाओ के हम बतलायें क्या ॥ ७ ॥

(१) प्रियेला वाटतें कीं, तिनें मला फार छळलें आणि म्हणून तुला काय तोंड दाखवू असें ती म्हणत आहे. आतां हा सुद्धा छळच नाहीं का. मग मी तुला आतां छळणार नाहीं हें म्हणण्यांत काय अर्थ आहे ?

(२) अरे, काळाचें चक्र सारखें फिरत असतें मग आज वाईट दिवस आले म्हणून घाबरायचें काय ? पुन्हा हें चक्र पालटेलच कीं !

(३) बाहेरून चीड असेल तर आम्ही त्याला अंतरीचें प्रेम समजूं. नाहींतर व्यर्थ भ्रमांत राहाण्यांत काय अर्थ आहे ?

(४) प्रियेला हें पत्र नेऊन दे म्हणून आम्हीं तें निरोप्याच्या हवालीं केलें पण आमची घाई इतकी कीं, आम्ही त्याच्या (निरोप्याच्या) बरोबरच चालूं लागलों. मग तें पत्र आम्हींच नेऊन दिलें तर काय बिघडलें ?

(५) आमचा वध झाला तरी चालेल पण आम्ही प्रियेच्या घरच्या उंबरठ्यापासून हलणार नाहीं.

(६) जीवनभर आम्हीं मरणाची वाट पाहिली. आतां मरून गेलों आहोंत. बघावें आतां परमेश्वर आम्हांला शांति देतो कीं आणखी दुःखांत लोटून देतो ?

(७) सगळें आयुष्य तिच्यावर प्रेम करण्यांत घालविलें. आतां ती विचारते कीं, हा गालिब कोण आहे ? तुम्हीच सांगा कीं आतां ह्यावर काय बोलावें ?

४६ . . . लताफ़त बे कसाफ़त जल्वा पैदा कर नहीं सकती
चमन ज़ंगार है आईनए बादे बहारी का ॥ १ ॥
हरीफ़े जोशिशे दरिया नहीं ख़ुद्दारिए साहिल
जहां साक़ी हो तो बातिल है दावा होशयारी का ॥ २ ॥

(१) कोणतीही तरल कल्पना व्यक्त व्हायला भौतिक हें हवेंच. वसंतऋतूचा वाराच घ्या. फुललेली बाग म्हणजे त्या वसंतवाताच्या आरशाची धातूमिश्र चौकट नव्हे काय ?

(२) नदीचा कांठ स्वतःला वांचविण्याचा कितीही प्रयत्न करो पण नदीला पूर आला तर कांठाला वांचणें कसें शक्य आहे ? तद्वतच जेथें तूं साकी [मदिरा पाजणारा] आहेस तेथें आमची बुद्धि शाबूत राहील हें म्हणणें खोटें आहे.

४७ . . . इशरते क़तरा है दरिया में फ़ना हो जाना
दर्द का हद से गुज़रना है दवा हो जाना ॥ १ ॥
तुझसे, क़िस्मत में मेरी, सूरते क़फ़्ले अब्जद
था लिखा बात के बनते ही जुदा हो जाना ॥ २ ॥
दिल हुआ कशमकशे चारए ज़हमत में तमाम
मिट गया घिसने में इस उक़्दे का वा हो जाना ॥ ३ ॥
अब जफ़ा से भी हैं महरूम हम अल्ला अल्ला !
इस क़दर दुश्मने अरबाबे वफ़ा हो जाना ॥ ४ ॥

ज़ोफ़ से गिरिया मुबद्दिल ब दमे सर्द हुआ
बावर आया हमें पानी का हवा हो जाना ॥ ५ ॥

दिल से मिटना तेरी अंगुश्ते हिनाई का खयाल
हो गया, गोश्त से नाख़ुन का जुदा हो जाना ॥ ६ ॥

है मुझे अब्रे बहारी का बरस कर खुलना
रोते रोते गमे फुर्क़त में फ़ना हो जाना ॥ ७ ॥

गर नहीं नकहते गुल को तेरे कूचे की हवस
क्यों है, गर्दे रहे जौलाने सबा हो जाना ॥ ८ ॥

ताके, तुझपर खुले एजाज़े हवाए सैक़ल
देख बरसात में सब्ज़ आईने का हो जाना ॥ ९ ॥

बख़्शे है जल्वए गुल ज़ौक़े तमाशा 'ग़ालिब'
चश्म को चाहिये हर रंग में वा हो जाना ॥ १० ॥

(१) जलबिंदूचें सर्वोच्च वैभव म्हणजे समुद्रांत मिसळून नाहींसें होणें हेंच आहे. तद्वतच माझीं दुःखें इतकीं वाढलीं आहेत कीं, त्यामुळें मरण येऊन मी परमेश्वरांत विलीन झालों म्हणजे आजार हद्दीच्या बाहेर जाऊन स्वतःच औषध बनल्यासारखें नाहीं का झालें ?

(२) हे प्रिये, माझें नशीब म्हणजे अक्षरें जुळलीं कीं उघडणारें कुलूप होय. तुझें माझें मीलन जुळत आलें होतें पण जुळण्याचा रंग दिसूं लागतांच अक्षरें जुळून कुलूप जसें मोकळें (वेगळें) होतें तसेंच आपल्यालाही वेगळें व्हावें लागलें.

(३) माझें हृदय प्रेमाच्या धडपडींतच नष्ट झालें. ही निरगांठ सोडविण्यांतच दोरी झिजून नाहींशी झाली.

(४) आतां ती आमचा छळसुद्धां करीत नाहीं. म्हणजे आमच्याकडे छळून का होईना लक्ष देणें तिनें सोडून दिलें आहे. अरेरे, प्रेमनिष्ठ लोकांची काय ही दुरवस्था !

(५) पाण्याचें वायूंत रूपांतर होऊं शकतें. हें आम्हांला पटत नव्हतें. पण आतां खात्री पटली. कारण पूर्वी आम्ही अश्रू ढाळीत होतों. आतां अशक्ततेमुळें फक्त निश्वासच सोडूं शकतों. म्हणजे आमच्यांतील अश्रूंचें रूपांतर वायूंत नाहीं का झालें ?

(६) माझ्या हृदयांतून तुझ्या मेहंदी लावलेल्या बोटांची आठवण निघणें दुष्कर आहे. नख आणि त्याला चिकटलेलें मांस हें वेगळें करण्याइतकेंच तें दुष्कर आहे. (गोश्तसे नाखुन का जुदा होना) हा उर्दूंत वाक्संप्रदाय आहे.

(७) विरहांत रडतरडत नष्ट होणें आभाळ फुटून पाऊस पडण्याइतकेंच मला सुकर आहे.

(८) फुलांच्या सुगंधाला जर हे प्रिये, तुझ्या परिसरांत येण्याची इच्छा नाहीं तर तो प्रभातकालीन वायूंत समाविष्ट होण्याची इच्छा कां बाळगीत आहे ?

(९) तुझ्या आरशाची लोखंडी चौकट [फ्रेम] पावसाळ्यांत गंजून हिरवी झाली आहे. हरितरंग म्हणजे वहर येण्याचा संकेत आहे. तुझ्याकडे पाहून त्या चौखटीच्या आकांक्षा तर बहरून आल्या नसतील ना ?

(१०) हे गालिब, मनुष्यानें निसर्गाचें निरीक्षण करीत राहावें म्हणजे त्याची रसिकता प्रगल्भ होते. दुसरा अर्थ असा कीं, जीवनाच्या प्रत्येक पैलूचा अनुभव घेतला पाहिजे म्हणजे जीवनाच्या मागील सत्याकडे पाहाण्याची दृष्टि येईल.

४८ . . . फिर हुआ वक़्त कि हो बाल कुशा मौजे शराब
दे बते मै को दिले दोस्त शना मौजे शराब ॥ १ ॥

पूछ मत वजहे सियह मस्तिए अरबाबे चमन
सायए ताक में होती है हवा मौजे शराब ॥ २ ॥

जो हुआ ग़र्क़ए मै बख़्ते रसा रखता है
सर से गुज़रे पे भी है बाले हुमा मौजे शराब ॥ ३ ॥

है यह बरसात वो मौसम के अजब क्या है अगर
मौजे हस्ती को करे फ़ैज़े हवा मौजे शराब ॥ ४ ॥

चार मौज उठती है तूफ़ाने तरब से हरसू
मौजे गुल, मौजे शफ़क़, मौजे सबा, मौजे शराब ॥ ५ ॥

जिस क़दर रूह बनाती है जिगर तशनए नाज़
दे हैं तसकीन ब दमे आबे बक़ा मौजे शराब ॥ ६ ॥

बस्के दौडे है रगे ताक में खूं हो हो कर
शहपरे रंग से है बाल कुशा मौजे शराब ॥ ७ ॥

मौजए गुल से चिराग़ां है गुज़र गाहे ख़याल
है तसव्वुर में जबस जल्वानुमा मौजे शराब ॥ ८ ॥

नशे के पर्दे में है महवे तमाशाए दिमाग़
बस्के रखती है सरे नशो नुमा मौजे शराब ॥ ९ ॥

एक आलम पे हैं तूफ़ानिए कैफ़ीयते फ़स्ल
मौजए सब्जए नौख़ेज़ से ता मौजे शराब ॥ १० ॥

शरहे हंगामए हस्ती है ज़हे मौसमे गुल
रहबरे क़तरा बदरिया है ख़ुशा मौजे शराब ॥ ११ ॥

होश उडते हैं मेरे जल्वए गुल देख 'असद'
फिर हुआ वक्त के हो बालकुशा मौजे शराब ॥ १२ ॥

(१) पुन्हा योग्य वेळ आली आहे. मधुलहरींना जणूं पंख फुटले आहेत. आतां वदकांना (बदकाच्या आकाराची मदिरेची सुरई) ह्या मधुलहरींनीं पोहण्याची शक्ति द्यावी. अर्थात् मैफिलींतून आतां हीं मधुपात्रें सारखीं फिरत राहावीं.

(२) अरे, बागेंतील फुलवेली इतक्या बेहोश कां झाल्या आहेत ? ह्यांत आश्चर्य तें काय ? तो पाहा वारा. द्राक्षाच्या वेलीकडून बागेंत आला त्यामुळें द्राक्षासवाचा (मधु-लहरींचा) गंध त्यांत मिसळला. त्या वायूच्या सेवनानें ह्या फुलवेली बेहोश झाल्या आहेत.

(३) जो मदिरेंत बुडून गेला तो खरोखरच भाग्यवान् होय. फार काय, त्याच्या डोक्यावरून मधुलहरी जाऊं लागल्या तर त्या शुभसूचक आणि भाग्यनिदर्शक असा हुमा पक्षी समजावा.

(४) हा वर्षाऋतु (वर्षर्तु) आहे. ह्या ऋतूंत जीवन हें अक्षरशः मधुलहरींमध्यें रूपांतरित होईल ह्यांत काय आश्चर्य ?

(५) तुफान रसिकतेमुळें चार प्रकारच्या लहरी निर्माण झाल्याचा प्रत्यय येतो. फुलांच्या लहरी (फुलांचा खच); संध्याराग (आकाशांत सूर्यास्तसमयीं पसरणाऱ्या रंगलहरी), सुखद वायूच्या लहरी आणि मधुलहरी. म्हणजे जिकडे तिकडे आनंदीआनंद आहे. बागेंत फुलांचा सडा पडला आहे. आकाशांत संध्यारागाची शोभा अवर्णनीय आहे. मंद आणि सुगंधी वायूनें चित्ताला हर्ष होत आहे. आणि मदिरेचे पेल्यावर पेले रिकामे होत आहेत.

(६) रसिकतेला उसळून बाहेर यावेसें वाटतें. त्याच प्रमाणांत मदिरेचे घोंट रसिक-तेला अमृताचा साक्षात्कार करून देतात.

(७) मधुलहरी द्राक्षाच्या नसांनसांतून जीवनरस बनून [उडत] वाहात आहेत आणि द्राक्षांच्या पानांतून नवीन रंग धारण करून दृग्गोचर होताहेत.

(८) माझ्या हृदयांत मधुलहरी दौडत आहेत. ही लाल मधु लाल गुलाबासारखी असल्यामुळें अनेक मधुलहरी म्हणजे लाल गुलाबांचा खचच. ह्या तांबड्या रंगामुळें माझ्या हृदयांत लाल दिव्यांची आरासच झाल्यासारखी भासते.

९७ . . . .

(९) ह्या मधुलहरी माझ्या मेंदूपर्यंत जाऊन भिडल्या आहेत. त्यांनीं मला बेहोष केलें आहे. जणूं नशेच्या पडद्यामागून त्या माझ्या बुद्धीचें निरीक्षण करीत आहेत.

(१०) जगांत प्रत्येक गोष्टीला बहर आला आहे. अगदीं हिरव्या तृणापासून मधुलहरीपर्यंत.

(११) हा अल्पकाळ टिकणारा वसंतऋतु म्हणजे आपल्या क्षणभंगुर जीवनावरचें भाष्यच होय. मधुलहरी तरी काय अजब आहेत पाहा. क्षणिक वसंतऋतूनें जशी आपल्याला जीवनाची ओळख होते तशीच मदिरेच्या एका थेंबांत मनुष्याला समाधीच्या अवस्थेंत नेऊन पोंहोंचविण्याची शक्ति आहे.

(१२) हे असद, फळाफुलांना बहर आलेला पाहून माझें देहभान हरपत आहे. आतां मधुलहरींना पंख फुटून फिरण्याची पुन्हा वेळ आली आहे.

४९ . . . अफ़सोस के दीदां का किया रिज़्क़ फ़लक ने
जिन लोगों के थे दरखुरे अक़्दे गुहर अंगुश्त ॥ १ ॥
काफ़ी है निशानी तेरे छल्ले का न देना
ख़ाली मुझे दिखलाके बवक्ते सफ़र अंगुश्त ॥ २ ॥
लिखता हूं ' असद ' सोज़िशे दिल से सुख़नेगर्म
ता रख न सके कोई मेरे हर्फ़ पे अंगुश्त ॥ ३ ॥

(१) अरेरे ! काळाचा तडाखा पाहा. ज्यांचीं नाजुक बोटें म्हणजे मोत्यांच्या अंगठ्यांना योग्य होत, तीं आज किड्यांचें भक्ष्यस्थान बनलीं आहेत.

(२) प्रवासाला निघतांना तूं आठवणीची आंगठी द्यायला हवी होतीस ती दिली नाहींस. करंगुळी दाखवून आंगठी नाहीं म्हणालीस. हरकत नाहीं. नखऱ्यानें तूं नुसती करंगुळी जी मला दाखविलीस तीच आठवण मला पुरेशी आहे.

(३) अंतरींच्या तळमळीनेंच मी माझें जिवंत काव्य लिहीत आहें. म्हणजे कोणी माझ्या शब्दांवर बोट ठेवायला नको. [नीरस म्हणून टीका करायला नको.]

५० . . . रहा गर कोई ता क़ियामत सलामत
फिर इक रोज़ मरना है हज़रत सलामत ॥ १ ॥
जिगर को मेरे इश्क़े ख़ूंनाबा मशरब
लिखे है ख़ुदावन्दे नेमत सलामत ॥ २ ॥
अलज़्ज़ोम दुश्मन शहीदे वफ़ा हूं
मुबारक मुबारक सलामत सलामत ॥ ३ ॥

नहीं गर सर्व बर्गे इद्राके मानी
तमाशाए नैरंगे सूरत सलामत ॥ ४ ॥
मुन्द गईं खोलते ही खोलते आंखें " गालिब "
यार लाये मेरे बालीन् पे उसे, पर, किस वक्त ! ॥ ५ ॥

(१) कल्पांतापर्यंतचें आयुष्य कुणाला मिळालें तरी त्यालासुद्धां मरण येणें प्राप्त आहे.

(२) प्रेमाचें अन्न म्हणजे माझ्या हृदयाचें रक्तच. मग प्रेमाला हृदयाबद्दल प्रेम आणि आदर कां वाटणार नाहीं ?

(३) वाहवा ! मी किती धन्य आहें ? निष्ठेला आणि प्रेमाला माझे प्रतिस्पर्धी बळी गेले नाहींत. तो मान मला मिळाला.

(४) निसर्गाचें रहस्य जाणण्याची शक्ति नसेल, तर नसो. निसर्गाचें प्रत्यक्ष स्वरूप निरीक्षण करण्यास मिळालें तरी पुरे.

(५) प्रियेची वाट मीं शेवटच्या घटकेपयत पाहिली. माझ्या मित्रांनीं शेवटीं तिला माझ्या उशाशीं आणिली. तिला पाहण्याकरितां मी कसेबसे डोळे उघडले न उघडले तोंच ते कायमचेच मिटले. अरेरे ! मित्रांनीं कोणत्या अवेळीं तिला माझ्याकडे आणिली !

आमदे ख़त से हुआ है सर्द जो बाज़ारे दोस्त
५१ . . . दूदे शम्ए कुश्ता था शायद खते रुख़सारे दोस्त ॥ १ ॥
ऐ दिले ना आक़िबतअन्देश ज़ब्ते शौक़ कर
कौन ला सकता है ताबे जल्वए दीदारे दोस्त ॥ २ ॥
ख़ाना वीरां साज़िए हैरत तमाशा कीजिये
सूरते नक़्शे क़दम हूं रुफ़्तए रफ़्तारे दोस्त ॥ ३ ॥
इश्क़ में बेदाद रश्के ग़ैर ने मारा मुझे
कुश्तए दुश्मन हूं आख़िर गरचे था बीमारे दोस्त ॥ ४ ॥
चष्मे मा रौशन के उस बेदर्द का दिल शाद है
दीदए पुरख़ूं हमारा साग़रे सरशारे दोस्त ॥ ५ ॥
ग़ैर यौं करता है मेरी पुरसिश उसके हिज्र में
बेतकल्लुफ़ दोस्त हो जैसे कोई ग़मख़्वारे दोस्त ॥ ६ ॥
ताके मैं जानूं के है उसकी रसाई वां तलक
मुझको देता है पयामे वादए दीदारे दोस्त ॥ ७ ॥

जबके मै करता हूं अपना शिकवए ज़ोफ़ दिमाग़
सर करे है वो हदीसे ज़ुल्फे अम्बरे यार दोस्त ॥ ८ ॥
चुपके चुपके मुझको रोते देख पाता है अगर
हंस के करता है बयाने शोख़िए गुफ़्तारे दोस्त ॥ ९ ॥
मेहरबानी हाये दुश्मन की शिकायत कीजिये
या बयां कीजे सिपासे लज़्ज़ते आज़ारे दोस्त ॥ १० ॥
यह गज़ल अपनी मुझे जी से पसन्द आती है आप
है रदीफे शेर में 'गालिब', ज़बस् तकरारे दोस्त ॥ ११ ॥

(१) प्रियेच्या ओंठावर लव दिसूं लागली आहे. त्यामुळें प्रेमिकांची पांगापांग झाली आहे. म्हणजे ही लव म्हणजे तिच्या आंत विझलेल्या दिव्याचा काळा धूर तर नव्हे.

(२) अरे मूर्ख हृदया, आपल्या आसक्तीला आवर बरें. अरे, प्रियेचें सौंदर्यतेज झेलण्यास कोण समर्थ आहे ?

(३) पाहा, पाहा. प्रेमवेडानें माझें घर कसें उध्वस्त करून टाकलें तें. प्रियेच्या हंसगतीकडे पाहून मी मोहित झालों. पथिकाचीं पदचिन्हें जशीं उमटतात आणि पुन्हा पुसलीं जातात तसा मी प्रभावितही झालों आणि पुसलाही गेलों. (उध्वस्त झालों.)

(४) मी प्रेमपीडित होतों. त्या पीडेनें मरण यावें कीं नाहीं ? पण हाय ! माझें दुर्दैव ! मी प्रतिस्पर्ध्याच्या मत्सरांत आणि हेव्यांत हत झालों.

(५) आज त्या कठोर प्रियेला काय आनंद होत आहे ? हें पाहून आम्ही धन्य झालों. कारण आमचे रक्तानें भरलेले डोळे पाहून तिला वाटतें कीं हे डोळे नव्हेत. कांठोकांठ भरलेले लाल वारुणीचे पेलेच होत.

(६) मी प्रियेच्या विरहानें पीडित आणि माझा प्रतिस्पर्धी माझी चौकशी करण्यास निघाला आहे. जणूं काय एक जीवश्चकंठश्च मित्रच दुसऱ्याशीं सहानुभूति दाखवीत आहे.

(७) ह्यांत हेतु काय तर कीं आपली पोंहोच प्रियेपर्यंत आहे हें दाखविणें. वर मला म्हणतो काय कीं चल, मी तुला प्रियेचें दर्शन घडवितों.

(८) तो माझा पाठलाग सोडीत नाहीं. तुझें बोलणें ऐकण्याची मला शक्ति नाहीं. बोलणें आटोपतें घे म्हटलें कीं तो खट्याळपणानें प्रियेच्या सुगंधी केशकलापांचें वर्णन करूं लागतो. अशक्तावस्थेंत मेंदूला सुगंध कुठला आवडायला. पण प्रियेच्या केशकलापाचा सुगंध ना ? मला गप्प बसावें लागतें. कारण, तो सुगंध कुणाला आवडणार नाहीं ?

(९) मला रडतांना पाहून माझा प्रतिस्पर्धी मुद्दाम प्रियेच्या नखरेल बोलण्याचा विषय काढतो. पण त्यानें आनंद होण्याच्या ऐवजीं मी आंतल्याआंत कुढतों मात्र.

१०५६६

(१०) अशा स्थितींत मी काय करावें ? मित्राचे गुन्हाणें गावें का त्याला [illegible] प्रियेचं प्रेम लाभलें म्हणून धन्य समजावें ?

(११) गालिब, आपल्याला ही गजल फार आवडली. कारण त्यांतील प्रत्येक ओळीच्या शेवटीं दोस्त (प्रिया) हा शब्द आला आहे. आणि हा दोस्त (प्रिया) तर मला फार प्रिय आहे.

५२ . . . गुलशन में वंदोबस्त बरंगे दिगर है आज
कुमरी का तौक़ हल्क़ए बेरूने दर है आज ॥ १ ॥
आता है एक पारए दिल हर फ़ुगां के साथ
तारे नफ़स कमन्दे शिकारे असर है आज ॥ २ ॥
ऐ आफियत किनारा कर ऐ इन्तिज़ाम चल
सैलाबे गिरिया दरपए दीवारो दर है आज ॥ ३ ॥

(१) आज बागेमध्यें औरच रंग दिसतो. प्रिया बागेंत येणार म्हणून कुणालाच आंत जाण्याची परवानगी नाहीं. कुमरी (बुलबुल) पक्षालाही बाहेर ठेवण्यांत आलें आहे.

(२) माझ्या प्रत्येक निश्वासाबरोबर हृदयाचा एक तुकडा आज बाहेर निघत आहे. कदाचित् आज माझ्या निश्वासांना प्रभाव लाभला आहे.

(३) हे स्वस्थते, हे सुव्यवस्थे, तुम्ही आतां घर सोडून चालायला लागा पाहूं. कारण माझ्या अश्रुपुरांनीं आज माझें घरदार वाहून जाणार आहे.

५३ . . . नफ़स न अंजुमने आरज़ू से बाहर खेंच
अगर शराब नहीं इन्तिज़ारे साग़र खेंच ॥ १ ॥
कमाले गर्मिए सईए तलाशे दीद न पूछ
बरंगे ख़ार मिरे आईने से जौहर खेंच ॥ २ ॥
तुझे बहानए राहत है, इन्तिज़ार ऐ दिल
किया है किसने इशारा के तारे बिस्तर खेंच ॥ ३ ॥
तेरी तरफ़ है बहसरत, नज़ारए नर्गिस
बकोरिए दिलो चश्मे रक़ीब साग़र खेंच ॥ ४ ॥
बनीम ग़मज़ा अदा कर हक़े वदीअते नाज
नयामे पर्दए ज़ख्मे जिगर से खंज़र खेंच ॥ ५ ॥
मेरे कदह में है सहबाए आतिशे पिन्हां
बरूए सफ़रा, कबाबे दिले समन्दर खेंच ॥ ६ ॥

(१) कोणत्याही परिस्थितींत इच्छा करणें सोडूं नकोस. इच्छेच्या मैफिलींतून निघूं नकोस. मदिरा मिळत नसेल तर साकीची तरी प्रतीक्षा कर. सारांश, इच्छेचा त्याग करणें बरें नव्हे.

(२) प्रियेच्या दर्शनाकरितां मीं इतकी धडपड केली कीं, विचारतां सोय नाहीं. माझ्या दृष्टिरूपी आरशांत तुम्हांला कांचेचे तुकडे दिसणार नाहींत. कांटे दिसतील.

(३) हे हृदया, शय्येवर प्रियेची प्रतिक्षा करीत पडून राहाणें निरर्थक आहे. तुला आराम आणि चैन हवीं आहेत. म्हणून तूं शय्येची आराधना करीत आहेस. तुला प्रियेचा लाभ हवा असेल तर हीं सुखें सोडून दे.

(४) हे प्रिये, नरगिसचें फूल (डोळ्यांना नरगिसच्या फुलाची उपमा देतात) तुझ्याकडे हेव्यानें पाहात आहे, म्हणून का तूं संकोचानें मदिरेचें सेवन करीत नाहींस. पण तसें करण्याचें कारण नाहीं. नर्गिसला काय डोळे आहेत तिनें पाहायला? तूं निःसंकोचपणें पी.

(५) हे प्रिये, मी तुझा नाज (विभ्रम, नखरा) रूपी खंजीर हृदयांत जखमेंत बाळगला आहे. ती वस्तु तुला परत हवी असेल तर मोबदला म्हणून माझ्याकडे पुन्हा अर्धोन्मीलित कटाक्ष फेंक बरें!

(६) माझ्या पेल्यांत प्रेमाग्नीची मदिरा आहे. जर प्यायला अग्नि आहे तर त्याबरोबर खाण्याकरितां मला समंदरच हवा.

समंदर (अग्निकीट) नांवाचा किडा धगधगत्या अग्नींत निर्माण होतो अशी समजूत आहे.

५४ . . . हुस्न ग़म्जे की कशाकश से छुटा मेरे बाद
बारे आराम से हैं अहले जफ़ा मेरे बाद ॥ १ ॥
मन्सबे शेफ़्तगी के कोई क़ाबिल न रहा
हुई माज़ूलिए अन्दाज़ो अदा मेरे बाद ॥ २ ॥
शम्अ बुझती है तो उसमें से धुंवां उठता है
शोलए इश्क़ सियह पोश हुआ मेरे बाद ॥ ३ ॥
खूं है दिल ख़ाक में अहवाले बुतां पर यानी
उनके नाख़ुन हुए मोहताजे हिना मेरे बाद ॥ ४ ॥
दरख़ुरे अर्ज़ नहीं, जौहरे बेदाद को, जा
निगहे नाज़ है सुरमे से ख़फ़ा मेरे बाद ॥ ५ ॥
है जुनूं, अहले जुनूं के लिये आग़ोशे विदा
चाक होता है गरेबां से जुदा मेरे बाद ॥ ६ ॥

कौन होता है हरीफ़े मए मर्द अफ़गने इश्क़
है मुकर्रर लबे साक़ी पे सला मेरे बाद ॥ ७ ॥
ग़म से मरता हूं के इतना नहीं दुनिया में कोई
के करे ताज़ियते मेहरो वफ़ा मेरे बाद ॥ ८ ॥
आये है बेकसीए इश्क़ पे रोना 'ग़ालिब'
किसके घर जायगा सैलाबे बला मेरे बाद ॥ ९ ॥

(१) माझ्या मृत्यूमुळें सौंदर्याच्या मागची कटकट नाहींशी झाली. माझा छळ करणारी प्रिया आतां आपल्या मागची पीडा गेली म्हणून आरामांत आहे.

(२) माझ्यानंतर खरा प्रेमिक राहिला नाहीं. आणि त्यामुळें प्रेयसींचे विभ्रम, नाच, नखरे इत्यादींनाही खंड पडला.

(३) दिवा विझतांना त्यांतून धूर निघतो त्याप्रमाणें माझ्या मृत्यूनंतर प्रीतीच्या दिव्याला [विझल्यामुळें] धुरामुळें कृष्णवस्त्रें नशिबीं आलीं.

(४) अरेरे मी मेल्यानंतर माझ्या प्रियेची केविलवाणी स्थिति पाहून हृदयाचें पाणी पाणी झालें आहे. मी जीवंत होतों तोंपर्यंत माझी प्रिया माझ्या हृद्रक्तामध्यें आपलीं नखें रंगवून घेत असे. आतां तो नखराग तिला कोठून लाभावा ? तिला आतां मेहंदी लावायची वेळ आली आहे.

(५) मी जीवंत होतों तोंपयत प्रियेचें लक्ष, दुर्लक्ष ह्या दोन्हींची ना जबरदारी सांभाळीत होतों. माझ्यानंतर हें अशक्य झालें म्हणून कीं काय प्रियेनें डोळ्यांत काजळ घालणें सोडून दिलें आहे.

(६) मीच एक प्रेमवेडा होतों आणि वेडाच्या भरांत आपले कपडे फाडून टाकीत असें. माझ्यानंतर ही वेडाची रीत राहिली नाहीं. वेडानें प्रेमिकांचा शेवटचा निरोप घेतला आहे आणि कपडे चिरफाडीपासून अलिप्त झाले आहेत.

(७) प्रेममदिरा पिणारा कोणी प्रेमवीर आतां राहिला आहे का ? असें [प्रिया] साकी [माझ्या मृत्यूनंतर] पुन्हा पुन्हा विचारीत आहे.

(८) माझ्यानंतर प्रेमनिष्ठा इत्यादींबद्दल हळहळ करणारा कोणी राहाणार नाहीं. ह्या दुःखानेंच मी मरून चाललों आहें.

(९) प्रेमभावाला आतां वाईट दिवस आले (माझ्या मृत्यूमुळें) ह्याची हळहळ वाटते. बघावें आतां माझ्यानतर ह्या प्रेमभावनेचा पूर कुठें वाहूं लागतो तें.

५५. . . बला से हैं, जो ये पेशे नज़र दरोदीवार
निगाहे शौक़ को हैं, बालो पर दरो दीवार ॥ १ ॥
वफ़रे अश्क ने काशाने का किया यह रंग
के हो गये मेरे दीवारो दर, दरो दीवार ॥ २ ॥
नहीं है साया कि सुनकर नवीदे मक़दमे यार
गये हैं चन्द क़दम पेश्तर दरो दीवार ॥ ३ ॥
हुई है किस कदर अरज़ानीये मये जल्वा
के मस्त हैं तेरे कूचे में हर दरो दीवार ॥ ४ ॥
जो है तुझे सरे सौदाए इन्तिज़ार तो, आ
के हैं दुकाने मताए नज़र दरो दीवार ॥ ५ ॥
हुजूमे गिरिया का सामान कब किया मैने ?
के गिर पड़े न मेरे पांव पर दरो दीवार ॥ ६ ॥
वह आरहा मेरे हमसाए में तो साये से
हुए फिदा दरो दीवार पर दरो दीवार ॥ ७ ॥
नज़र में खटके है बिन तेरे घर की आबादी
हमेशा रोते हैं हम देखकर दरो दीवार ॥ ८ ॥
न पूछ बेख़ुदीए ऐशे मक़दमे सैलाब
के नाचते हैं पडे सरबसर दरो दीवार ॥ ९ ॥
न कह किसी से के 'ग़ालिब' नहीं ज़माने में
हरीफ़े राज़े मुहब्बत मगर दरो दीवार ॥ १० ॥

(१) तुला पाहावें म्हटलें तर तुझ्या घराच्या भिंती आणि दरवाजे आड येतात. पण खरेंच कां ते आड येतात ? मला तर वाटतें ह्या भिंती आणि कवाडें माझ्या कल्पनाशक्तीला पंख बनून तुझ्यापर्यंत पोहोंचण्यास मदतच करीत आहेत.

(२) माझ्या नेत्रांतून वाहाणाऱ्या अश्रूंच्या पुरामुळें घरची काय स्थिति झाली आहे ही ! पुरामुळें दार पडून त्याचीच भिंत झाली आहे आणि भिंतीला भगदाडें पडून तेथें दरवाजे बनले आहेत.

(३) माझ्या घरादाराच्या सावल्या ज्या दिसताहेत त्या सावल्या नाहींत. प्रियेच्या आगमनाप्रीत्यर्थ तिच्या स्वागताकरितां माझें घरच सावलीच्या रूपानें पुढें सरकत आहे असें वाटतें.

(४) तुझ्या घरच्या परिसरांत तुझ्या स्वरूपाची मदिरा किती तरी स्वस्त झाली आहे. म्हणूनच तुझ्या आळींतील घरेंदारें सुद्धां नशेमध्यें चूर दिसताहेत.

(५) प्रतीक्षा कशी असते हें तुला पहायचें आहे ना? तर ये आणि पाहा. प्रेमिक प्रियेच्या प्रतीक्षेंत घरादाराकडे सारखे डोळे लावून बसला आहे. आणि त्यामुळें तें (घरदार) जणूं काय स्वतःच प्रतीक्षेचें दुकान बनून राहिलें आहे असें वाटतें.

(६) प्रेमशोकांत मुक्तकंठानें अश्रू ढाळण्याचा मीं विचार केला मात्र, त्या विचारानेंच घरच्या भिंती आणि दरवाजे कोसळून माझ्या पायाशीं खालीं पडलीं. मग अश्रूंचा पूर वाहिला असता तर सगळें घर वाहूनच गेलें असतें.

(७) प्रिया माझ्या शेजारीं आली जणूं काय माझ्या घरादाराच्या सावल्या तिच्या घरादाराच्या सावल्यांच्याजवळ येऊन एकमेकांना भेटल्या.

(८) हे प्रिये, तूं घरांत नाहींस त्यामुळें ह्या घरांतील प्रत्येक वस्तु डोळ्यांत खटकते आहे. माझ्या घराकडे मी जेव्हां पाहातों तेव्हां अशी वृत्ति होऊन डोळ्यांतून पाणी वाहूं लागतें.

(९) आतां अश्रूंचा पूर वाहूं लागणार म्हणून प्रेमाच्या बेहोषींत माझीं घरेंदारें सुद्धां नाचूं लागलीं आहेत. प्रेमाच्या ह्या बेहोषाचें वैभव काय वर्णावें?

(१०) गालिब, तूं आपलें प्रेमरहस्य कुणालाच सांगूं नकोस. अगदीं राहावत नसेल तर घरच्या भिंतींना सांग. कारण ह्या भिंती तुझ्या कथा ऐकून घेऊं शकतील पण वाच्यता करण्याची शक्ति त्यांच्यांत नाहीं.

५६ . . . घर जब बना लिया तेरे दर पर, कहे बग़ैर
जानेगा अब भी तू न मेरा घर, कहे बग़ैर ॥ १ ॥
कहते हैं, जब रही न मुझे ताक़ते सुख़न
" जानूं किसी के दिल की मैं क्योंकर कहे बग़ैर " ॥ २ ॥
क़ाम उससे आ पड़ा है कि जिसका जहान में
लेवे न कोई नाम " सितमगर " कहे बग़ैर ॥ ३ ॥
जी ही में कुछ नहीं है हमारे वगरना हम
सर जाये या रहे न रहें पर कहे बग़ैर ॥ ४ ॥
छोडूंगा मैं न उस बुते काफ़िर का पूजना
छोडें न ख़ल्क़ गो मुझे काफ़िर कहे बग़ैर ॥ ५ ॥
मक़सद है नाज़ो ग़म्ज़ा वले गुफ़्तगू में काम
चलता नहीं है दश्नओ ख़ंजर कहे बग़ैर ॥ ६ ॥

हर चन्द हो मुशाहिदए हक़ की गुफ़्तगू
बनती नहीं है बादा ओ साग़र कहे बग़ैर ।। ७ ।।
बहरा हूं मैं तो चाहिये दूना हो इल्तिफ़ात
सुनता नहीं हूं बात मुकर्रर कहे बग़ैर ।। ८ ।।
'ग़ालिब' न कर हुज़ूर में तू बार बार अर्ज़
ज़ाहिर है तेरा हाल सब उन पर कहे बग़ैर ।। ९ ।।

(१) माझ्याकडे ये म्हणून हे प्रिये, मीं तुला सांगितलें. त्या वेळीं तुझें घर मला माहीत नाहीं असें तू म्हणालीस. आतां पाहा तुझ्या घरच्या उंबरठ्यावरच मी आपली पथारी पसरली आहे. आतां मी न सांगतांही तुला माझा ठावठिकाणा कळण्यासारखा आहे.

(२) विनवण्या करून करून माझ्या दांताच्या कण्या झाल्या. आतां बोलण्याची शक्ति पार नाहींशी झाली. आतां प्रिया म्हणते कीं, कोणी तोंड उघडून बोलल्याशिवाय मनुष्याचें मन तरी कसें समजावें ? माझ्या ह्या स्थितीला आतां काय करावें ?

(३) जिच्या नांवामागें छळणारी म्हणून शब्द जोडल्याशिवाय कोणी जिचें नांव घेत नाहींत त्या प्रियेशींच आमचा संबंध आला आहे. आमची ही अशी विचित्र परिस्थिति झाली आहे.

(४) आमच्या मनांतच कांहीं बोलण्यासारखें नाहीं म्हणून. नाहींतर प्राण जावोत अगर राहोत, आम्ही बोलल्याशिवाय राहाणारीं माणसें नाहींत.

(५) मी त्या तरुणीची आराधना केल्याशिवाय राहाणार नाहीं. मग हा परमेश्वराची आराधना सोडून भलत्याच्याच मागें लागला सबब हा काफर आहे असें जग म्हणो. त्याची मला पर्वा नाहीं.

(६) आम्हाला प्रियेचा चंचलपणा, तिचे विभ्रम आणि नखरे वर्णन करणें आहे. पण वर्णनांत खंजीर, कट्यार इत्यादींचे संकेत वापरल्याशिवाय चालतच नाहीं.

(७) तत्त्वज्ञानाच्या लाख गोष्टी असोत. त्यांच्या वर्णनांत मधु आणि मधुचषक यांचे संकेत वापरणें अपरिहाय आहे.

(८) मला ऐकूं येत नाहीं म्हणतेस ना ? मग बरें झालें. तुला काय सांगायचें आहे तें तुला पुन्हा पुन्हा सांगावें लागतें. म्हणजे आमच्यावर तुझी कृपा दुप्पट झाली म्हणण्यास हरकत नाहीं.

(९) गालिब, तूं बादशाहापाशीं (बहादूरशहा) पुन्हा पुन्हा कां विनवणी करतोस ? अरे, तूं न सांगतांच त्यांना सर्व कांहीं माहीत आहे.

५७... क्यों जल गया न ताब रुख़ यार देखकर
जलता हूं अपनी ताक़ते दीदार देखकर ॥ १ ॥
आतिश परस्त कहते हैं अहले जहां मुझे
सरगर्मे नालाहाए शरर बार देखकर ॥ २ ॥
क्या आबरूए इश्क़ जहां आम हो जफ़ा
रुकता हूं तुमको बे सबब आज़ार देखकर ॥ ३ ॥
आता है मेरे क़त्ल को पुरजोश रश्क से
मरता हूं उसके हाथ में तलवार देखकर ॥ ४ ॥
साबित हुआ है गर्दने मीना पे ख़ूने ख़ल्क़
लरज़े है मौजे मै तेरी रफ़तार देखकर ॥ ५ ॥
वा हसरता के यार ने खेंचा सितम से हाथ
हमको हरीसे लज्ज़ते आज़ार देखकर ॥ ६ ॥
बिक जाते हैं हम आप मताए सुखन के साथ
लेकिन अयारे तब्ए ख़रीदार देखकर ॥ ७ ॥
ज़ुन्नार बांध सुब्हे सद् दाना तोड़ डाल
रहरौ चले है राह को हमवार देखकर ॥ ८ ॥
इन आबलों से पांव के घबरा गया था मैं
जी खुश हुआ है राह को पुरख़ार देखकर ॥ ९ ॥
क्या बदगुमां है मुझसे के आईने में मेरे
तूती का अक्स समझे है ज़िंगार देखकर ॥ १० ॥
गिरनी थी हम पे बर्क़े तजल्ली, न तूर पर
देते हैं बादा जर्फ़े क़दह ख्वार देखकर ॥ ११ ॥
सर फोड़ना वो 'ग़ालिबे' शोरीदा हाल का
याद आ गया मुझे तेरी दीवार देखकर ॥ १२ ॥

(१) प्रियेचा तेजस्वी चेहरा पाहून माझे डोळे कां गेले नाहींत? ते धड राहिले ह्याचा मला राग येतो. असली कसली शक्ति माझ्या डोळ्यांत आली आहे ही?

(२) माझ्या हृदयांत आगीच्या ठिणग्या उडताहेत. आणि मी सारखे उष्ण निश्वास सोडीत आहें. त्यामुळें लोक मला अग्निपूजक समजूं लागले आहेत.

(३) छळ सोसणें हा आम्हां प्रेमिकांचा धर्म आहे. पण तूं आंबटषोकी आणि गुलहौशी लोकांनाही छळूं लागलीस हें पाहून वाईट वाटतें. खरा छळ हा प्रेमिकांचाच मान व अधिकार आहे. इतरांचा नव्हे. प्रेम इतकें स्वस्त झालें, तर त्याची अब्रू काय राहिली ?

(४) ती माझा वध करण्याकरितां येत आहे. तिच्या हातून मला मृत्यु येणार म्हणून मला आनंद मानावयास पाहिजे पण तिच्या हातांत तलवार पाहून मला हेवा वाटतो कीं, ह्या तलवारीला प्रियेच्या सहवासाचें भाग्य लाभलें. ह्या हेव्यानेंच मला मरण येईल असें वाटतें.

(५) हे प्रिये, मदिरेच्या धुंदींत पावलें टाकीत कित्येकांचीं हृदयें चिरडून टाकलींस. त्यांच्या खुनाचा डाग तुझ्यावर नाहीं. ह्या मधुचषकावर आहे आणि आपल्यामुळें हें सगळें घडलें हें पाहून चषकांतील मदिरा पहा कशी भीतीनें थरथर कांपते आहे.

(६) अरेरे ! काय माझें दुर्दैव ! प्रियेनें केलेला छळ आम्हांला आवडतो हें लक्षांत येतांच तिनें आमचा छळ करणेंही सोडून दिलें. म्हणजे आम्ही आतां तिच्या छळालाही मुकलों.

(७) रसिकावरून मी स्वतःला आणि माझ्या काव्याला ओवाळून टाकण्यास तयार आहें पण अट ही कीं, तो खराखुरा रसिक हवा.

(८) धर्माची स्मरणी टाकून दे आणि निधर्मीपणाचें जानवें गळ्यांत घाल. स्मरणींतले मणि लहानमोठे आहेत ती हाताळण्यास अवघड. त्या उलट जानव्याचें आहे. हेतु हा कीं, धर्माचरणाची वाट अवघड आहे त्या उलट निधर्मीपणाची वाट सपाट आणि सुकर आहे.

(९) प्रवासांत पायाला फोड आले म्हणून घाबरून गेलों होतों पण रस्त्यांत कांटे पाहिल्यावर आनंद झाला म्हणजे हे कांटे लागून फोड फुटतील म्हणजे आणखी त्रास होईल. प्रेमांत जितका त्रास अधिक तितकेंच समाधान अधिक लाभेल.

(१०) माझ्या हृदयाच्या आरशांत दुःखामुळें गंज चढून हिरवा रंग आला आहे. प्रियेला वाटतें कीं, हा गंज नव्हे तर हा हिरवा पोपट असावा आणि त्याला मीं हृदयांत बाळगलें आहे. म्हणजे मीं हृदयांत प्रियेच्या ऐवजीं दुसऱ्या कुणाला तरी स्थान दिलें आहे. म्हणून माझ्यावर प्रिया शंका घेत आहे. (उर्दू वाङ्मयांत बुलबुल पक्षाला फुलांचा प्रेमिक समजतात. तसेंच पोपटाला आरशाचा प्रेमिक समजतात.)

(११) तारस पर्वतावर मुसा असतांना त्याच्यावर परमेश्वरी कृपेची वीज पडली. जड पदार्थावर (पर्वतावर) ही वीज पडण्यापेक्षां आमच्याकडे तिची दृष्टि कां वळूं नये ? साकी तरी प्रत्येकाची योग्यता पाहूनच ना त्या त्या प्रमाणांत त्याला मदिरा पाजतो. मग आमची योग्यता पर्वतासारख्या निर्जीव पदार्थापेक्षां अधिक नव्हती कां ?

(१२) प्रिये, तुझ्या घरच्या भिंती पाहिल्यावर मला त्या भिंतीशीं प्रेमवेडा ‘ गालिब डोकें कसें फोडून घेत होता ह्याची आठवण झाली.

५८ . . . लरज़ता है मेरा दिल, ज़हमते मेहरे दरखशां पर
मैं हूं वो क़तरए शबनम, जो हो खार वियाबां पर ॥ १ ॥
न छोड़ी हज़रते यूसुफ़ने यां भी ख़ाना आराई
सफ़ैदी दीदए याक़ूब की फिरती हैं जिन्दां पर ॥ २ ॥
फ़ना तालीमे दर्से बेख़ुदी हूं उस ज़माने से
के मजनूं लाम अलिफ़ लिखता था दीवारे दबिस्तां पर ॥ ३ ॥
फराग़त किस कदर रहती मुझे तशवीशे मरहम से
बहम गर सुलह करते पारहाए दिल नमकदां पर ॥ ४ ॥
नहीं इक़लीमें उल्फत में कोई तूमारे नाज़ ऐसा
के पुश्ते चश्म से जिसके न होवे मुहर उनूवां पर ॥ ५ ॥
मुझे अब देखकर अब्रे शफक़ आलूदा याद आया
के फुर्क़त में तेरी, आतिश बरसती थी गुलिस्तां पर ॥ ६ ॥
बजुज़ परवाज़ शौके नाज़ क्या बाक़ी रहा होगा
क़ियामत इक हवाए तुन्द है ख़ाके शहीदां पर ॥ ७ ॥
न लड़ नासेह से ' गालिब ' क्या हुआ गर उसने शिद्दत की
हमारा भी तो आख़िर ज़ोर चलता है गरेबां पर ॥ ८ ॥

(१) मी म्हणजे अरण्यांतील कांटेरी झुडुपावर असलेला एक दंवबिंदु होय. त्यांत वर सूर्याचें तळपतें उन्ह पाहून मला धडकी भरली आहे. आधींच कांट्याच्या झुडुपावर माझें स्थान म्हणजे मी केव्हां नष्ट होईन ह्याचा नेम नाहीं. त्यांतून सूर्याची मला नष्ट करण्याची धडपड. मला इतक्या त्वरेनें नष्ट करण्याचा त्याचा अट्टाहास कां असावा ?

(२) यूसुफ मिश्र देशांत तुरुंगांत असतांना त्याच्या तुरुंगाच्या भिंतीसुद्धां लखलख करीत आहेत. कारण यूसुफच्या बापाची (याकूबची) तेजस्वी दृष्टि पुत्राच्या आठवणीमुळें तुरुंगाच्या भिंतीवर सारखी फिरत राहून त्यांना उजाळा देत आहे. यूसुफला उर्दू वाङ्मयांत सौंदर्याचा पुतळा समजतात. तुरुंगांतसुद्धां यूसुफला आपलें निवासस्थान सुंदर व आकर्षक करावेंसें वाटलें आणि त्यामुळें तेथील भिंती उजळून निघाल्या असें कवीनें म्हटलें आहे.

(३) प्रेमवेडा मजनूसुद्धां माझ्यासमोरचें पोर आहे. जेव्हां तो अजून विस्मृती (बेखुदी) चे पहिले पाठ घेत होता तेव्हां मी बेखुदीच्या (विस्मृतीच्या) समुद्रांत बुडून गेलों होतों. खुदी म्हणजे अहंता आणि बेखुदी म्हणजे अहंभावनेचा नाश.

(४) माझें हृदय आपल्या जखमांवर प्रियेकडून मीठ चोळून घेण्यास कबूल झालें असतें तर मला जखमेकरितां औषध शोधण्याची जरूर पडली नसती. कारण प्रियेनें छळ करावा हेंच माझ्या जखमेला औषध होय.

(५) प्रेमाच्या कचेरींत कोणताही कागद असा सांपडणार नाहीं कीं, ज्याच्यावर प्रियेच्या विभ्रमाचा, चंचलपणाचा व दुर्लक्षाचा शिक्का पडलेला नाहीं ?

(६) संध्यारागांनीं युक्त असे ढग पाहिल्यावर मला आठवतें कीं, तुझ्या विरहांत असें वाटे कीं, तांबडे ढग म्हणजे खालीं उपवनावर जणूं काय अग्निवर्षाव करीत आहेत.

(७) कल्पांताच्या दिवशीं आणखी काय होणार आहे ? मेलेलीं माणसें जीवंत होतील म्हणतात. तुझ्या कारणीं मेलेल्या लोकांत शिल्लक काय राहिलें आहे ? फक्त इकडे तिकडे भटकण्याची हौस शिल्लक आहे. कल्पांताच्या दिवशीं वारे जोरानें वाहूं लागतील आणि ह्या शहीदांची धूळ प्रथमपासूनच उडते आहे ती आणखी जास्त उडूं लागेल.

(८) हे गालिब, उपदेशकांनीं तुला प्रेमवेड सोडून देण्याचा उपदेश केला तर त्यांच्याशीं भांडूं नकोस. कारण आपलाही प्रभाव आहेच कीं, त्यांनीं फारच आग्रह धरला तर वेडांत फाडायला आपले कपडे तरी आपल्यापाशीं शिल्लक आहेत ना ?

५९ . . . है वस्ले हर इक उनके इशारे में निशां और
करते हैं मुहब्बत, तो गुज़रता है गुमां और ॥ १ ॥
यारब, वो न समझे हैं न समझेंगे मेरी बात
दे और दिल उनको जो न दे मुझको ज़बां और ॥ २ ॥
अबरू से है क्या उस निगहे नाज़ को पैवन्द
है तीर मुक़र्रर, मगर उसकी है कमां और ॥ ३ ॥
तुम शहर में हो तो हमें क्या ग़म जब उठेंगे
ले आयेंगे बाजार से जाकर दिलो जां और ॥ ४ ॥
हर चंद सबुक दस्त हुए बुत शिकनी में
हम हैं तो अभी राह में है संगे गिरां और ॥ ५ ॥
है ख़ूने जिगर जोश में दिल खोल के रोता
होते जो कई दीदए ख़ूनाबा फ़िशां और ॥ ६ ॥
मरता हूं इस आवाज़ पे हर चन्द सर उडजाय
जल्लाद को लेकिन वो कहे जाय के “ हां और ” ॥ ७ ॥

लोगों को है खुर्शीदे जहां ताब का धोका
हर रोज़ दिखाता हूं मैं इक़ दाग़े निहां और ॥ ८ ॥
लेता न अगर दिल तुम्हे देता कोई दम चैन
करता, जो न मरता, कोई दिन, आहों फ़ुगां और ॥ ९ ॥
पाते नहीं जब राह तो, चढ़ जाते हैं नाले
रुकती है मेरी तबा तो होती है रवां और ॥ १० ॥
हैं और भी दुनियां में सुख़नवर बहुत अच्छे
कहते हैं के 'गालिब' का है अन्दाज़े बयां और ॥ ११ ॥

(१) प्रियेच्या प्रत्येक संकेतांतून अनेक अर्थ निघतात म्हणून ती प्रेम करूं लागते, तेव्हां मला वेगळाच संशय येतो.

(२) प्रियेला कितीही समजवा तिला अर्थबोध होत नाहीं आणि होणारही नाहीं. हे परमेश्वरा, मला दुसरी वाणी दे आणि तें शक्य नसेल तर तिला वेगळें तरी हृदय दे.

(३) तिच्या चंचल डोळ्यांचा कमानदार भुवयांशीं काय संबंध ? तिच्या नयनाचेच शर होत. पण त्यांचे धनुष्य भुवयांत नाहीं तर हृदयांत आहे.

(४) तूं या नगरांत आली आहेस आणि माझं हृदय हरण केलेंस त्याची काळजी नाहीं. कारण तूं आल्यापासून ह्या नगरांत कित्येक हृदयाची देवघेव चालली आहे. त्यापैकींच एक आम्ही जरूर लागेल तेव्हां बाजारांत जाऊन घेऊन येऊं.

(५) मूर्तिभंजनांत आम्ही तज्ज्ञ झालों असलों तरी सर्वांत कठीण मूर्ति म्हणजे अहंतेचा भंग आमच्या हातून अद्याप होणें आहे.

(६) ह्या वेळीं माझ्या काळजांतील रक्त उसळत आहे. तरी दोनच डोळे लाभले आहेत. त्यापेक्षां जास्त डोळे असते तर मनसोक्त रडून अनेक नेत्रांवाटें काळजांतील रक्ताला वाट करून दिली असती.

(७) माझा शिरच्छेद झाला तरी त्याची मला पर्वा नाहीं. हं ! अजून आघात कर, अजून एक वार कर, असें प्रियेनें माझ्या वधकर्त्याला उद्देशून म्हटलेले शब्द ऐकण्यासाठीं मी प्राण द्यायला तयार आहें.

(८) माझ्या हृदयांतील सुप्त जखमांचा एकेक व्रण मी लोकांना दाखवितों. तर त्यांना तप्त सूर्य पाहिल्याचा भास होतो.

(९) तुला मीं माझें हृदय दिलें नसतें तर स्वस्थता मिळाली नसती आणि माझा मृत्यु झाला नसता तर अजून कांहीं दिवस मी उष्ण निश्वास सोडण्यांत घालविले असते.

(१०) नद्यांना वाहाण्यास वाट मिळाली नाहीं तर त्यांचें पाणी चढूं लागतें. तसेंच हृदयशोकाला दाबण्याचा प्रयत्न केला कीं, तो वर चढत मुखावाटे निश्वासाच्या, काव्यांच्या रूपानें बाहेर पडूं लागतो.

(११) जगांत पुष्कळ चांगले कवि आहेत. पण गालिबची काव्यशैली कांहीं वेगळीच आहे असें लोक म्हणतात.

६० . . . सफ़ायीये हैरते आईना है सामाने ज़ंग आख़िर
तग़य्युर आबे बरजा मान्दा का, पाता है रंग आखिर ॥ १ ॥
न की सामाने ऐशोजाह ने तदबीर वहशत की
हुआ जामे ज़मुर्रूद भी मुझे दाग़े पलंग आख़िर ॥ २ ॥

(१) सांठलेल्या पाण्यावर घाण सांचते आणि पुष्कळ दिवस बिनवापरतां ठेवलेल्या आरशावर गंज चढतो. तसेच निष्क्रिय लोक नाश पावतात.

(२) वैभव लाभलें तरी माझ्या वेडावर उतारा मिळाला नाहीं. जमरुदचे (रत्नांचे) पेले म्हणजे वैभवाचीं चिन्हें असावींत पण माझ्या बाबतींत ते जणूं वाघाच्या पाठीवरचे पिवळे पट्टेच माझें वेड वाढविण्यास कारण ठरले.

६१ . . . जुनूं की दस्तगीरी किससे हो गर हो न उर्यानी
गरेबां चाक का हक़ हो गया है मेरी गर्दन पर ॥ १ ॥
बरंगे काग़जे आतिशज़दा नैरंगे बेताबी
हज़ार आईना दिल बांधे है बाले यक तपीदन पर ॥ २ ॥
फ़लक से हमको ऐशे रफ़्ता का क्या क्या तक़ाज़ा है
मताए बुर्दा को समझे हुए हैं क़र्ज़ रहज़न पर ॥ ३ ॥
हम और वो बेसबब रंजआश्ना दुष्मन के रखता है
शुआए मेहरसे तोहमत निगह की चष्मे रौज़न पर ॥ ४ ॥
फ़ना को सौंप गर, मुश्ताक़ है अपनी हक़ीक़त का
फ़रोग़े तालेए ख़ाशाक है मौक़ूफ़ गलख़न पर ॥ ५ ॥
'असद' बिस्मिल है किस अंदाज़ का क़ातिलसे कहता है
के मश्क़े नाज़ कर ख़ूने दोआलम मेरी गर्दन पर ॥ ६ ॥

(१) प्रेमवेडाच्या भरांत मी अंगावरचे कपडे फाडून दिगंबर अवस्था धारण केली आहे. म्हणजे माझ्या चिंध्या झालेल्या कपड्यांनीं माझें वेड उघडें केलें ह्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

(२) मजकूर लिहिलेला कागद जळूं लागला म्हणजे त्या कागदावरील शब्द चमकदार दिसतात. तद्वतच माझ्या स्वस्थतेच्या आगीमुळें माझ्या हृदयासमोर आरसे धरल्यासारखें होऊन माझ्या हृदयांतील कालवाकालव स्पष्टपणें दिसत आहे.

(३) गतवैभवाबद्दल काळापाशीं गाऱ्हाणें करणें म्हणजे लुटीच्या मालाचें ऋण लुटारूवर आहे म्हटल्यासारखें आहे. गाऱ्हाणें केल्यानें चोर लुटीचा माल परत कां देणार आहे? तसेंच काळापाशीं गाऱ्हाणें केल्यानें गतवैभव परत का मिळणार आहे?

(४) माझ्या प्रियेला काय म्हणावें? विनाकारण माझ्यावर चिडते. साध्या साध्या गोष्टीवर संशय घेते. अहो भिंतीच्या फटींतून सूर्याचा किरण तिच्या खोलींत आला तर तिला वाटते कीं, मीच फटींतून तिला पहात आहें आणि म्हणून ती माझ्यावर संशय घेते.

(५) तुला सत्यज्ञान हवें असेल तर अहंतेला नष्ट करून टाक. गवताला तरी तेज आगींत पडल्यामुळेंच लाभतें ना? (जळण्यामुळें)

(६) कवि असद तरी विचित्रच आहे. तो पाहा, प्रियेला म्हणत आहे कीं, प्रिये, तुला वध करण्याचे प्रयोग करावयाचे आहेत ना? माझ्यावर प्रयोग कर. मी राजी आहें मग माझ्या वधाचा आरोप तुझ्यावर येणार नाहीं.

लाज़िम था के देखो मेरा रस्ता कोई दिन और
६२ . . . तन्हा गये क्यों? अब रहो तन्हा कोई दिन और ॥ १ ॥
मिट जायगा सर, गर तेरा पत्थर न घिसेगा
हूं दर पे तेरे नासिया फ़र्सा कोई दिन और ॥ २ ॥
आये हो कल और आज ही कहते हो कि जाऊं
माना के हमेशा नहीं अच्छा, कोई दिन और ॥ ३ ॥
जाते हुए कहते हो क़ियामत को मिलेंगे
क्या खूब! क़ियामत का है गोया कोई दिन और ॥ ४ ॥
हां ऐ फ़लके पीर जवां था अभी 'आरिफ़'
क्या तेरा बिगड़ता जो न मरता कोई दिन और ॥ ५ ॥
तुम माहे शबे चार दहम थे मेरे घर के
फिर क्यों न रहा घर का वो नक़्शा कोई दिन और ॥ ६ ॥
तुम कौन से ऐसे थे खरे दादो सितद के
करता मलकुल मौत तक़ाज़ा कोई दिन और ॥ ७ ॥

११३ . . . .

मुझसे तुम्हें नफ़रत सही, नैयर से लड़ाई
बच्चों का भी देखा न तमाशा कोई दिन और ॥ ८ ॥
गुज़री न बहर हाल यह मुद्दत खुशो नाखुश
करना था जवां मर्ग गुज़ारा कोई दिन और ॥ ९ ॥
नादां हो जो कहते हो के क्यों जीते हैं 'ग़ालिब'
क़िस्मत में है मरने की तमन्ना कोई दिन और ॥ १० ॥

आरिफ़ हा गालिबचा मेव्हणीचा म्हणजे बायकोच्या बहिणीचा मुलगा, आणि गालिबला आपल्या मुलासारखा प्रिय होता. त्याच्या अकाली मृत्यूवर ही कविता लिहिली आहे.

(१) हे आरिफ़, ह्या लोकांतून निघून जाण्यापूर्वी तूं माझी वाट पाहायची असती. आतां एकटाच निघून गेलास ना ? मग कांहीं दिवस तुला परलोकांत एकटेंच राहावें लागेल.

(२) अजून कांहीं दिवस तुझ्या कबरीच्या दगडावर डोकें आपटून घेणें नशिबीं आहे. एक तर डोकें आपटून आपटून दगड तरी झिजून जाईल किंवा माझें डोकें तरी फुटून मला मृत्यु येईल.

(३) कालच तूं ह्या जगांत आलास आणि आजच जातों म्हणतोस हें काय ? कां ? आजचा मुहूर्त चांगला होता ? मला माहीत आहे कीं प्रत्येक दिवशीं कांहीं मुहूर्त चांगला नसतो पण आजच निघून जाण्याची काय घाई होती ?

(४) निघून जाण्याच्या दिवशीं तूं म्हणतोस कीं आपण कल्पांताच्या दिवशीं (त्या दिवशीं परमेश्वर सर्वांचा न्यायनिवाडा करतो अशी समजूत आहे) भेटूं. जणूं काय कल्पांत म्हणतात तो कांहीं वेगळाच प्रकार आहे. तूं आम्हांला सोडून चाललास हाच कल्पांत आहे.

(५) अरे काळा, आरिफ़ अजून तरुण होता. तूं अजून कांहीं दिवस वाट पाहिली असती तर काय बरें तुझें बिघडलें असतें ?

(६) अरे आरिफ़, तूं तर माझ्या घरचा चतुर्दशीचा चंद्र होतास. माझ्या घरचें हें स्वरूप कांहीं दिवस असेंच राहिलें असतें तर काय बिघडलें असतें ?

(७) अरे असा काय तूं सचोटीचा होतास म्हणून मृत्यूनें आपल्या कराराचा तगादा केल्यावर तूं त्याच्या हांकेला ओ दिलीस ? त्याला अजून कांहीं दिवस तरी टाळायचें असतेंस.

(८) बरें, मी आणि नय्यर (गालिबचा नातेवाईक आणि कवि) तुला आवडत नसूं. पण घरांतील पोरांबाळांचें अजून कांहीं दिवस कातुक पाहायला तुला काय झालें होतें ?

(९) इतके दिवस सुखदुःखांत तूं काळ घालविलास. असेच अजून कांहीं दिवस चालवायचे असतेस.

(१०) लोक विचारतात कीं, आरिफ़ मेला आणि गालिब तूं कसा जिवंत राहिलास ? अरे मंदबुद्धींना काय सांगावें ? माझ्या नशीबांत मृत्यूचें आमंत्रण अजून कांहीं दिवस लिहिलेलें दिसत नाहीं हेच म्हणावें, दुसरें काय ?

६३ . . . फ़ारिग़ मुझे न जान कि मानिन्दे सुबहो मेहर
है दाग़े इश्क़ ज़ीनते जेबे कफ़न हनूज़ ॥ १ ॥
है नाज़े मुफलिसां ज़रे दस्त रफ़्ता पर
हूं गुलफ़रोशे शोखिए दाग़े कुहन हनूज़ ॥ २ ॥
मैख़ानए जिगर में यहां ख़ाक भी नहीं
ख़म्याज़ा खेंचे है बुते बेदादो फ़न हनूज़ ॥ ३ ॥

(१) मृत्यूनंतर मी प्रेमाच्या शोकांतून मुक्त झालों असें समजूं नकोस. माझ्या कफनावर प्रेमाचा जो डाग आहे तो पाहा पहांटेच्या सूर्यासारखा चकाकत आहे.

(२) गतवैभवाचा एखाद्या कंगाल माणसानें अभिमान धरावा त्याप्रमाणें मी पण माझ्या प्रेमाच्या जुन्या आठवणीचा अभिमान बाळगीत आहें.

(३) माझ्या काळजाच्या मद्यशाळेंत आतां मदिरेचा एक थेंबसुद्धां शिल्लक राहिला नाहीं. तरी ती पाहा माझी प्रिया आपल्याला मदिरा अजून हवी म्हणून कशी बेचैन झाली आहे.

६४ . . . हरीफ़े मतलबे मुश्किल नहीं फ़ुसूने नियाज़
दुआ क़बूल हो यारब के उम्रे ख़िज्र दराज़ ॥ १ ॥
न हो ब हरज़ा बियाबां नवर्दे वहमे वजूद
हनूज़ तेरे तसव्वुर मे हैं नशेबो फ़राज़ ॥ २ ॥
विसाल जल्वा तमाशा है पर दिमाग़ कहां
कि दीजे आईनए इन्तिज़ार को परवाज़ ॥ ३ ॥
हर एक ज़र्रए आशिक़ है आफ़ताब परस्त
गई न ख़ाक हुए पर, हवाए जल्वए नाज़ ॥ ४ ॥
न पूछ वुसअते मैख़ानए जुनूं 'ग़ालिब'
जहां यह कासए गरदूं है एक ख़ाक अन्दाज़ ॥ ५ ॥

(१) अजीजीनें आणि लाचारीनें कोणतीही मागणी पुरी होत नाहीं. आतां परमेश्वरानें ज्या गोष्टी आधींच देऊन टाकल्या आहेत, त्याच पुन्हा मागाव्या झालें. जी गोष्ट होणें शक्य नाहीं त्याकरितां विनवणी करण्यांत काय अर्थ आहे ?

(२) हा संसार सत्य आहे. हें अस्तित्व खरें आहे. अशा वृथा भावनेंत फसूं नकोस. तुझ्या विचारक्षेत्रांत अद्याप पुष्कळ चढउतार आहेत. तुझी विचारशक्ति अद्याप प्रगल्भ झालेली नाहीं.

(३) मीलनानें सौंदर्यप्रतीति होते हें खरें आहे. पण प्रतीक्षेशिवाय मीलन नाहीं आणि येथें प्रतीक्षारूपी आरशाला साफसूफ करण्याची (प्रतीक्षा करण्याची) शक्ति कुणापाशीं आहे ?

(४) प्रेमिक मेल्यानंतरही त्याची प्रियादर्शनाची इच्छा नाहींशी होत नाहीं. त्याच्या शरीराची माती झाली पण ह्या मातीचा कणन्कण उडून सूर्याच्या तेजांत कसा चमकत आहे. प्रियेच्या स्वरूपाला सूर्याच्या तेजाची उपमा दिली आहे.

(५) गालिब, वेडाची मद्यशाळा किती विस्तीर्ण आहे हें विचारूं नकोस. अरे, हें आकाश आहे ना ? हें म्हणजे ह्या मद्यशाळेंतील कचरा टाकण्याची पेटी समज.

वुसअते सइए करम देख के सर ता सर ख़ाक
६५ . . . . गुज़रे है आबला पा अब्रे गुहर बार हनूज़ ॥ १ ॥

यक क़लम काग़ज़े आतिशज़दा है सफहे दश्त
नक्शे पा में है तपे गर्मीए रफ़्तार हनूज़ ॥ २ ॥

(१) परमेश्वरी कृपेचा मेघवर्षाव ह्या पृथ्वीवर किती होतो तें पाहा. मेघांत जलबिंदु असतात. त्यांना वाट चालून चालून पायाला येणाऱ्या फोडाची उपमा दिली आहे. परमेश्वरी कृपा म्हणजे जणूं काय मेघ आणि ह्या मेघाला भ्रमण करून करून पायांला फोड (जलबिंदु) आले तरी तो पृथ्वीवर पाण्याचा वर्षाव करून त्याचें सिंचन करतो. तद्वतच भगवंताच्या कृपावृष्टीचें आहे.

(२) माझ्या हृदयांत धगधगणाऱ्या अग्नीचा दाहकपणा माझ्या भटकण्यांत रस्त्यावर उमटणाऱ्या पायाच्या ठशांतही व्यक्त झाला आहे. हे ठसे म्हणजे जळजळीत निखारेच होत आणि त्यामुळें अरण्याला आग लागून सारा प्रदेश आगींत जळणाऱ्या कागदाच्या तुकड्यासारखा वेडावांकडा होत आहे.

६६ . . . क्योंकर रखूं उस बुत से जान अज़ीज़
क्या नहीं है मुझे ईमान अज़ीज़ ॥ १ ॥

दिल से निकला पै न निकला दिल से
है तेरे तीर का पैकान अज़ीज़ ॥ २ ॥

ताब लाए ही बनेगी 'ग़ालिब'
वाक़या सख़्त है और जान अज़ीज़ ॥ ३ ॥

(१) प्रियेपेक्षां मला माझा जीव कांहीं प्यारा नाहीं असें मी समजूं लागलों. तर ती माझें सत्त्व (इमान) हरण केल्याशिवाय राहाणार नाहीं म्हणून माझें इमान सुरक्षित ठेवण्याकरितां तरी मला आपला जीव तिच्यावरून ओवाळून टाकण्यास हवा.

(२) तुझे शर माझ्या हृदयांतून आरपार निघून गेले, तरी पण ते खरोखरच गेले का ? कारण ते शर हृदयांत रुतून बसल्यासारखे आहेत आणि म्हणून मला हवेहवेसे वाटतात.

(३) अरे गालिब, सहन करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण, एकीकडे प्रसंग निर्वाणीचा तर दुसरीकडे आपला जीव आपल्याला प्यारा आहे. ह्यामुळें सहन करण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

६७ . . . न गुले नग़मा हूं न पर्दए साज़
मैं हूं अपनी शिकस्त की आवाज़ ॥ १ ॥

तू और आराइशे ख़मे काकुल
मैं और अन्देशा हाए दूरो दराज़ ॥ २ ॥

लाफे तमकीं फ़रेबे सादा दिली
हम हैं और राज़हाए सीना गुदाज़ ॥ ३ ॥

हूं गिरफ़्तारे उल्फ़ते सैयाद
वरना बाक़ी है ताक़ते परवाज़ ॥ ४ ॥

वो भी दिन हो कि उस सितमगर से
नाज़ खेंचूं बजाय हसरते नाज़ ॥ ५ ॥

नहीं दिल में मेरे वो क़तरए खूं
जिससे मिज़गां हुई न हो गुलबाज़ ॥ ६ ॥

ऐ तेरा ग़म्ज़ा यक क़लम अंगेज़
ऐ तेरा जुल्म सर बसर अन्दाज़ ॥ ७ ।
तू हुआ जल्वागर मुबारक हो
रेज़िशे सजदए जबीने नियाज़ ॥ ८ ॥
मुझको पूछा तो कुछ ग़ज़ब न हुआ
मैं ग़रीब और तू ग़रीब नवाज़ ॥ ९ ॥
'असद उल्ला खां' तमाम हुआ
ऐ दरेग़ा वो रिन्दे शाहिद बाज़ ॥ १० ॥

(१) माझें जीवन कांहीं सुरेल वाद्य नाहीं. माझी वाणी म्हणजे माझ्या व्यथित आणि भग्न हृदयाचा ध्वनि होय. गोड आणि सुखकर गीतांशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं.

(२) प्रिये, काय सांगावें, तिकडे तूं आपल्या केशविरचनांत गुंग आहेस आणि इकडे मी निरनिराळ्या शंका-कुशंकांत गुरफटलों आहें.

(३) प्रेम, आणि त्यांत स्वस्थता ! केवळ अशक्य प्रेमांत स्वस्थता लाभूं शकते म्हणून बढाई मारणारे भ्रमांत आहेत. प्रेमिकांच्या हृदयांत तर दाहक रहस्यें लपलेलीं असतात. त्यांना स्वस्थता कुठली लाभायला ?

(४) पारध्यांच्या जाळ्यांतून मला उडून जातां येत नाहीं, असें समजूं नकोस. पण काय करूं ? मी जाळ्यांत अडकून पडलों नाहीं, पारध्याच्या प्रेमांत अडकून पडलों आहें.

(५) प्रियेचे नाच नखरे आपल्या वाटेला यावेत ही उत्कट इच्छा आहे. ही इच्छा कधीं तरी पूर्ण होवो.

(६) माझ्या हृदयांतील रक्ताच्या बिंदूबिंदूबरोबर माझ्या पापण्या खेळून चुकल्या आहेत (परिचित झाल्या आहेत.) माझें सारें रक्त नेत्रांच्या द्वारें बाहेर गेलें आहे. आतां कांहीं शिल्लक राहिलें नाहीं.

(७) हे प्रिये, तुझ्या एका कटाक्षानें आम्हांला जीवनाचा लाभ होतो. तर तुझ्या छळामुळें आमचे प्राण जातात. ह्या दोन्ही परस्पर विरोधी गोष्टी (जीवनदान आणि प्राणहरण) तुझ्यांत सामावल्या आहेत.

(८) तूं आलीस, बरें झालें. आतां माझ्या कपाळाचे शेंकडों सिजदे (नमाजाच्या वेळीं कपाळ जमिनीवर टेकण्याला सिजदा म्हणतात.) तुझ्या चरणीं रुजू होवोत.

(९) माझी तूं विचारपूस केलीस ह्यांत काय बिघडलें ? अगे, मी गरीब तर तूं गरीबनवाज (गरिबावर कृपा करणारी) नाहींस का ?

(१०) अरेरे, असदुल्लाखान आटोपला. तो सौंदर्योपासक मद्यपि काय भला माणूस होता !

६८ . . . मुज़्दा ऐ ज़ौक़े असीरी के नज़र आता है
दाम ख़ाली क़फ़से मुर्ग़े गिरफ़्तार के पास ॥ १ ॥
जिगरे तश्नए आज़ार तसल्ली न हुआ
जूए ख़ूँ हमने बहाई बुने हरख़ार के पास ॥ २ ॥
मुन्द गई खोलते ही खोलते आंखें है है
ख़ूब वक़्त आये तुम इस आशिक़े बीमार के पास ॥ ३ ॥
मैं भी रुक रुक के न मरता जो ज़बां के बदले
दश्ना इक तेज़ सा होता मेरे ग़मख़्वार के पास ॥ ४ ॥
दहने शेर में जा बैठिए लेकिन ऐ दिल
न खड़े होजिये ख़ूबाने दिल आज़ार के पास ॥ ५ ॥
देखकर तुझको चमन बसके नमू करता है
ख़ुद बख़ुद पहुंचे है गुल गोशए दस्तार के पास ॥ ६ ॥
मरगया फोड़के सर 'ग़ालिबे' वहशी है ! है !
बैठना उसका वो आकर तेरी दीवार के पास ॥ ७ ॥

(१) पक्षी पकडणारे पारधी सावज धरण्याच्या जागेजवळ एक पिंजरा ठेवून त्यांत एक पाळलेला पक्षी ठेवतात. त्या पक्षाच्या आवाजानें आकर्षित होऊन सावज जवळ येतें आणि पसरून ठेवलेल्या जाळ्यांत अडकतें. कवि म्हणतो, तुला जाळ्यांत अडकण्याची इच्छा आहे ना ? बघ. तुझी इच्छा पूर्ण होण्याची वेळ आली आहे. ते बघ पाळलेल्या पक्षाच्या पिंजऱ्याला लागूनच मोकळें जाळें पसरून ठेवलेलें दिसत आहे. मग चल तर आणि स्वतःला जाळ्यांत अडकवून घे.

(२) प्रेमवेडांत भटकतांना अरण्यांतील प्रत्येक कांटेरी झुडुपाचें आम्हीं रक्ताचे कालवे काढून सिंचन केलें. तरीपण हृदयांतील व्यथा कमी झाली नाहीं. प्रेमिक प्रेमवेडांत वणवण भटकत असतां पायांना कांटे बोचून भळभळ रक्त वाहूं लागतें त्याला उद्देशून वरील कल्पना आहे.

(३) हे प्रिये, माझ्या आयुष्याच्या अगदीं शेवटच्या घडीला तूं मला भेटण्यास आलीस. तूं आलीस म्हणून मी मोठ्या कष्टानें डोळे उघडले न उघडले तोंच ते कायमचे मिटले. हीच वेळ कां तूं माझ्यासमोर येण्याची शोधून काढलीस ? तुला डोळे भरून पाहाणेंही शक्य झालें नाहीं.

(४) प्रिया मला सारखे टोमणे देऊन अपशब्द वापरून माझा छळ करीत असते. त्यामुळें हरघडी मला मृत्यु जवळ आल्यासारखें वाटतें. उलट प्रियेच्या हातांत खंजीर असता तर एक घाव दोन तुकडे असा तडकाफडकी मृत्यु तरी आला असता.

(५) अरे हृदया, एक वेळ वाघाच्या जबड्यांत जाऊन बसणें चालेल पण छळ करणाऱ्या प्रियेच्या जवळ जाऊन उभें राहाणें नको.

(६) हे प्रिये, तूं बागेंत आल्याबरोबर पाहा फुलांफुलांना कसा बहर आला आहे ? तीं फुलें विकसित होऊन तुझ्या मस्तकापर्यंत पोहोंचण्याचा प्रयत्न करीत आहेत.

(७) अरेरे ! त्या प्रेमवेड्या गालिबनें आपलें डोकें आपटून प्राण दिला. तुझ्या घरच्या भिंतीपाशीं तो येऊन टेकत असे. तें अद्याप आठवतें.

६९ . . . न लेते गर, ख़से जौहर तरावत सब्ज़ए ख़त से
लगा दे ख़ानए आईने में रूए निगार आतिश ॥ १ ॥
फ़रोग़े हुस्न से होता है हल्‌ मुश्किले आशिक़
न निकले शम्अ के पा से निकाले गर न खार आतिश ॥ २ ॥

(१) तो आरसा पाहा. त्यांत हिरवी झांक (हिरवा रंग ओलसरपणाच्या अर्थानें वापरला आहे.) आहे म्हणून बरें आहे. नाहींतर प्रियेच्या तेजस्वी चेहऱ्याचें प्रतिबिंब त्यांत पडलें कीं आरसा आगीनें पेटून निघायचा.

(२) दिवा पेटला म्हणजे वात जळूं लागते. कवीनें वातीला दिव्याच्या पायांतील कांटा म्हणून कल्पिलें आहे. पायांतून कांटा निघून गेला म्हणजे बरें वाटतें. तसेंच प्रियेच्या सौंदर्यानें प्रेमिकाची प्रेमज्योत्स्ना भडकली आणि प्रेमिकाला जाळूं लागली कीं प्रेमिकांच्या इच्छे-प्रमाणें घडत आहे असें समजावें.

७० . . . जादए रह ख़ूर को वक़्ते शाम है तारे शुआ
चर्ख़ वा करता है माहे नौ से आग़ोशे विदा ॥ १ ॥
रुख़े निगार से है सोज़े जाविदानीए शम्अ
हुई है आतिशे गुल आबे ज़िन्दगानीए शम्अ ॥ १ ॥
ज़बाने अहले ज़बां में है, मर्गे ख़ामोशी
यह बात बज़्म में रौशन हुई ज़बानीए शम्अ ॥ २ ॥
करे है सर्फ़ बईमाए शोला क़िस्सा तमाम
बतर्ज़ अहले फ़ना है फ़साना ख़्वानीए शम्अ ॥ ३ ॥

गम उसको हसरते परवाने का है ऐ शोला
तेरे लरज़ने से ज़ाहिर है नातवानीए शम्अ ॥ ४ ॥
तेरे ख़याल से रूह एहतज़ाज़ करती है
बजल्वा रेज़िए बाद व ब पुरफ़िशानीए शम्अ ॥ ५ ॥
निशाते दाग़े ग़मे इश्क़ की बहार न पूछ
शगुफ़्तगी है शहीदे गुले ख़िज़ानीए शम्अ ॥ ६ ॥
जले है देख के बालीने यार पर मुझको
न क्यों हो दिल पे मेरे दाग़े बद गुमानीए शम्अ ॥ ७ ॥

(१) सूर्यास्तानंतर आकाशांत थोडा वेळ जो प्रकाश पडतो तो म्हणजे सूर्याच्या चालण्याच्या वाटेवरची खुणेची रेषा आहे. आकाश प्रतिपदेच्या चंद्राच्या द्वारें सूर्याला निरोप देत आहे. चंद्राची कोर म्हणजे निरोप देण्याकरितां पसरलेले बाहु होत.

(१) प्रियेच्या गालावरील लालीकडे पाहून समयींतील दिवा हेव्यानें सारखा जळत आहे. जळणें हा दिव्याचा धर्म असल्यामुळें प्रियेचे लाल गाल म्हणजे दिव्याला चिरजीवन देणारें अमृतच म्हटलें पाहिजे.

(२) मैफिलींत दिवा विझला आहे. दिव्याची वात (जबाने शमा म्हणजे दिव्याची जीभ जणू काय मैफलीला सांगत आहे कीं, अहले जबान म्हणजे सुभाष, रसिक) रसिकांची जीभ बंद होणें (त्यांचें गप्प बसून राहाणें) म्हणजे त्यांना मृत्यु प्राप्त होण्यासारखें आहे.

(३) ही ज्योत म्हणजे प्रेमिकांच्या कहाणीसारखी आहे. प्रेमिक ज्याप्रमाणें प्रेमाच्या अग्नींत दग्ध होतात तद्वतच ह्या ज्योतीची कहाणी म्हणजे प्रेमिकाप्रमाणें दग्ध होऊन नष्ट होण्याची आहे.

(४) दीपकळी थरथरते आहे. पतंगाच्या आकांक्षांची आठवण होऊन तिला वेदना होत आहेत. त्यामुळें निष्प्राण होऊन ती थरथर कांपत आहे.

(५) ह्या वाहाणाऱ्या वाऱ्याची आणि डोलणाऱ्या दीपकळीची शपथ घेऊन सांगतों कीं, तुझ्या आठवणीनें आनंदित होऊन माझा आत्मा पण डोलत आहे.

(६) प्रेमाच्या दुःखाच्या जखमा हृदयावर पडल्या आहेत. त्यांची बहार काय वर्णावी ? इतर गोष्टींचा बहर ह्या जखमांच्या बहरीपुढें कांहींच नाहीं.

(७) प्रियेच्या सान्निध्यांत मला पाहून ती दीपकळी पहा कशी हेव्यानें जळते आहे. म्हणजे प्रेमांत ती माझी प्रतिस्पर्धी आहे. ह्या शंकेनें मला अस्वस्थ कां वाटूं नये ?

७१ . . . बीमे रक़ीब से नहीं करते विदाए होश
मजबूर यां तलक हुए, ऐ इख़्तियार हैफ़ ! ॥ १ ॥
जलता है दिल, कि क्यों न हम इक बार जल गए
ऐ नातमामिए नफ़से शोला बार हैफ़ ! ॥ २ ॥

(१) प्रेमांत देहभान हरपून जाणें ह्यापरती कोणती गोष्ट हवी असूं शकेल ? पण तेंही आम्हांला शक्य होत नाहीं. कारण आमचें देहभान हरपलें कीं आमच्या ह्या अवस्थेचा लाभ घेऊन आमचा प्रतिस्पर्धी प्रियाराधन करूं लागायचा. ह्या भीतीनें आम्ही शुद्ध हरूं देत नाहीं आणि अशा रीतीनें आम्हाला प्रिय आणि हव्या असलेल्या अवस्थेला मुकत आहोंत.

(२) हे निश्वासांनो, तुम्ही तावडतोब मला आपल्या दाहकतेनें जाळून नष्ट करून कां टाकलें नाहीं ? हें हळुहळू जळणें माझ्या नशीबीं काय म्हणून आलें आहे ?

७२ . . . ज़ख़्म पर छिडकें कहां तिफ़्लाने बेपरवा नमक
क्या मज़ा होता अगर पत्थर में भी होता नमक ॥ १ ॥
गर्दे राहे यार है सामाने नाज़े ज़ख़्मे दिल
वरना होता है जहां मे किस क़दर पैदा नमक ॥ २ ॥
मुझको अरज़ानी रहे तुझको मुबारिक हो, जियो
नालए बुलबुलका दर्द और ख़न्दए गुलका नमक ॥ ३ ॥
शोरे जौलां था कनारे बहर पर किसका के आज
गर्दे साहिल है बज़ख़्मे मौज़ए दरिया नमक ॥ ४ ॥
दाद देता है मिरे ज़ख़्मे जिगर की वाह वाह
याद करता है मुझे देखे है वो जिस जा नमक ॥ ५ ॥
छोडकर जाना तने मजरूहे आशिक़ हैफ़ है
दिल तलब करता है ज़ख़्म और मांगें हैं आज़ा नमक ॥ ६ ॥
ग़ैर की मिन्नत न खेंचूंगा, पए तौक़ीरे दर्द
ज़ख़्म मिस्ले ख़न्दए क़ातिल है सर ता पा नमक ॥ ७ ॥
याद हैं वो दिन तुझे 'ग़ालिब,' के वज्दे ज़ौक़ में
ज़ख़्म से गिरता तो मैं पलकों से चुनता था नमक ॥ ८ ॥

(१) वेड लागलेल्या माणसाला मुलें रस्त्यांतून दगड मारतात त्यास उद्देशून कवि म्हणतो कीं, मुलें दगड मारतात पण त्यामुळें जखमावर मीठ चोळलें जात नाहीं. दगडांत मीठ असतें तर दोन्ही गोष्टी एकदमच साधल्या असत्या. म्हणजे वेडाच्या भरांत दगडाचा मार आणि जखमांना मिठाचा लाभ ह्या दोन्ही गोष्टी मिळून मनाला समाधान झालें असतें. प्रेमांत जितकीं दुःखें जास्त तितकें समाधान अधिक अशी कल्पना आहे.

(२) जखमावरून मीठ चोळण्याकरितां जगांत हवें तेवढें मीठ सापडतें. पण माझें मीठ म्हणजे तें नव्हे. प्रियेच्या घरच्या परिसरांतील धूळ हेंच माझ्या हृदयावरील जखमांवर चोळण्यायोग्य मीठ होय.

(३) माझ्या वांट्याला बुलबुलचें आक्रंदन आलें आहे. त्यांतच मी धन्य आहें. आणि हे प्रिये, तुझ्या वांट्याला फुलांचें कुटिल हास्याचें मीठ भरपूर आलें आहे. तें तुला लखलाभ होवो. निर्दय फूल म्हणजे प्रेयसी आणि बुलबुल म्हणजे प्रेमिक असा उर्दू काव्यांत संकेत आहे.

(४) माझ्या प्रियेनें समुद्राच्या कांठावरून फिरतांना आपल्या चंचलपणानें समुद्राच्या लाटांनाही मागे सारलें. त्या जललहरींना त्यांचा हेवा वाटून त्या व्यथित झाल्या आणि प्रियेच्या पायांखालची समुद्रकांठची धूळ जणूं मीठ बनून त्या लाटांच्या व्यथांना अधिक तीव्र करीत आहे.

(५) माझ्या हृदयव्यथेचें प्रिया कौतुकच करीत आहे असें म्हटलें पाहिजे. कारण तिला कोठेंही मीठ आढळलें कीं तिला माझी हटकून आठवण होऊं लागली आहे.

(६) हे प्रिये, आपल्या व्यथित प्रियकराला सोडून जाणें योग्य नाहीं. अजून थोडा वेळ थांब म्हणजे माझ्या जखमांवर तुला मीठ चोळायला मिळून माझ्या व्यथेची लज्जत आणखी वाढेल.

(७) मी माझ्या जखमांवर मीठ चोळा असें प्रियेशिवाय कुणालाही म्हणणार नाहीं. मला दुसऱ्याचे उपकार नकोत आणि प्रिया जखमांवर मीठ शिंपडत नसेल तरी हरकत नाहीं. भळभळ वाहाणाऱ्या ह्या तीव्र जखमा म्हणजे अंतर्बाह्य मीठच नव्हेत काय ?

(८) स्त्रियांची समजूत आहे कीं, मीठ जमिनीवर सांडलें तर तें पापण्यांनींच टिपलें पाहिजे. हलगर्जीपणानें मीठ सांडणें फार वाईट अशी समजूत आहे. कवि म्हणतो, हे गालिब, तुला ते दिवस आठवत नाहींत का ? कीं जेव्हां तुझ्या जखमांवरचें मीठ खालीं पडत होतें त्या वेळीं तूं प्रेमाच्या आत्यंतिक अवस्थेंत अक्षरशः पापण्यांनीं तें मीठ टिपून घेत होतास.

७३ . . . आह को चाहिये इक उम्र असर होने तक
कौन जीता है तेरी ज़ुल्फ़ के सर होने तक ॥ १ ॥
दाम हर मौज में है हल्क़ए सदकाम निहंग
देखें क्या गुज़रे है क़तरे पे गुहर होने तक ॥ २ ॥
आशिक़ी सब्र तलब और तमन्ना बेताब
दिल का क्या रंग करूं ख़ूने जिगर होने तक ॥ ३ ॥
हमने माना के तग़ाफ़ुल न करोगे लेकिन
ख़ाक हो जायेंगे हम तुमको खबर होने तक ॥ ४ ॥
परतवे ख़ूर से है शबनम को फ़ना की तालीम
मैं भी हूं एक् इनायत की नज़र होने तक ॥ ५ ॥
यक नज़र बेश नहीं फ़ुर्सते हस्ती ग़ाफ़िल
गर्मीए बज़्म है इक रक़्से शरर होने तक ॥ ६ ॥
ग़मे हस्ती का 'असद' किससे हो जुज़ मर्ग इलाज
शम्अ हर रंग में जलती है सहर होने तक ॥ ७ ॥

(१) निश्वासांना फळें येण्यास एक युग लागतें. तूं मला वश होईपर्यंत मी जिवंत राहीन ह्याची खात्री काय ?

(२) समुद्राच्या प्रत्येक लाटेंतून शेंकडों संकटें आहेत ह्यांतून पार होऊन मोतीं बनणाऱ्या जलबिंदूवर काय काय संकटें कोसळत नसतील कोणी सांगावें ?

(३) प्रेमाला सहनशीलता हवी आणि इकडे तर आकांक्षा बेचैन आहेत. ह्या दोन्हीच्या संघर्षांत रक्ताचें पाणी होतें आहे तोंपर्यंत माझ्या हृदयाला कसें सांभाळून ठेवूं ?

(४) तूं दुर्लक्ष करणार नाहीं हें जरी मानलें तरी तुझ्यापाशीं आमची दाद लागेपर्यंत आम्ही मातींत मिळून जाऊं ह्याची वाट काय ?

(५) सूर्याचें ऊन म्हणजे दंवबिंदूला नाश होण्याचा धडाच होय. तुझ्या प्रेमाची नजर म्हणजे सूर्याचे किरण आणि मी म्हणजे दंवबिंदू होय.

(६) अरे मूर्खा, हें जीवन म्हणजे क्षणभंगुर आहे. वीज चमकून नाहींशी होईपर्यंतच ही मैफिल सजलेली आहे असें समज.

(७) हे असद, जीवनाच्या शोकाला एका मृत्यूशिवाय दुसरा इलाज नाहीं. मृत्यु येईपर्यंत हें सारें सहन करणें भाग आहे. तो दिवा पाहा, अरुणोदय होतांच तो दिवा विझून जाईल. तोंपर्यंत कोणत्या ना कोणत्या स्थितींत कां होईना त्याला जळत राहाणें प्राप्तच आहे ना ?

७४ . . . गर तुझको है यक़ीने इजाबत दुआ न मांग
यानी बगैर यक दिले बे मुद्दआ न मांग ॥ १ ॥
आता है दाग़े हसरते दिल का शुमार याद
मुझसे मेरे गुनह का हिसाब ऐ ख़ुदा न मांग ॥ २ ॥

(१) तुझी प्रार्थना रुजू होईल असें वाटत असेल तर परमेश्वरापाशीं तूं फक्त एवढेंच माग कीं, त्यानें तुला निरिच्छ हृदय द्यावें. तें लाभलें म्हणजे तुला परमेश्वरापाशीं कांहीं मागायची इच्छाच राहाणार नाहीं.

(२) परमेश्वरा, माझ्याकडून घडलेल्या अपराधांचा हिशेब तूं मागूं नकोस. तो हिशेब मी देईन तरी कसा ? कारण अपराधांची यादी करण्यास बसलों कीं, माझ्या हृदयावर झालेल्या शेंकडों आघातांची संख्या मला आठवूं लागते. मी अपराध केले असतील, पण माझ्यावर गुजरलेल्या संकटांची संख्या पण तितकीच नव्हे काय ?

७५ . . . है किस क़दर हलाके फ़रेबे वफ़ाए गुल
बुलबुल के कारोबार पे हैं ख़न्दहाये गुल ॥ १ ॥
आज़ादीये नसीम मुबारक के हर तरफ़
टूटे पडे हैं हल्क़ए दामे हवाए गुल ॥ २ ॥
जो था सो मौजे रंग के धोके में मर गया
ऐ वाए नालए लबे ख़नीं नवाए गुल ॥ ३ ॥
खुशहाल उस हरीफे सियह मस्त का के जो
रखता हो, मिस्ले सायए गुल सर ब पाये गुल ॥ ४ ॥
ईजाद करती है उसे तेरे लिये बहार
मेरा रक़ीब है नफ़से इत्रे साए गुल ॥ ५ ॥
शर्मिन्दा रखते हैं मुझे बादे बहार से
मीनाए बेशराबो दिले बेहवाए गुल ॥ ६ ॥
सत्वत से तेरे जल्वये हुस्ने ग़यूर की
ख़ून हैं मेरी निगाह मे रंगे अदाये गुल ॥ ७ ॥
तेरे ही जल्वे का है यह धोका कि आज तक
बेइख़्तियार दौडे है गुल दर कफ़ाए गुल ॥ ८ ॥
'ग़ालिब' मुझे है उससे हम आग़ोशी आरज़ू
जिसका खयाल है गुले जेबे क़बाए गुल ॥ ९ ॥

(१) ह्या बुलबुल पक्षाची काय स्थिति सांगावी ? त्याला वाटतें कीं फुलें आपल्याशीं निष्ठा बाळगून आहेत आणि इकडे तर फुलें बुलबुलच्या वेडावर खदखदा हसत आहेत.

(२) कळींतून कोंडून राहिलेला सुगंध कळी उमलतांच बंधनांतून बाहेर पडला आहे आणि स्वैरवृत्तीनें संचार करीत आहे. सुगंधाचें हें स्वातंत्र्य त्याला मुबारक (धन्य) असो.

(३) चहूंकडे निरनिराळ्या रंगांची खैरात झालेली दिसते ती म्हणजे असंख्य फुलांचे निश्वास आणि त्यांचीं रक्तरंजित आक्रंदनेंच होत.

(४) फुलांची सावली ज्याप्रमाणें फुलांच्या पायापाशीं घुटमळते तसेंच ज्या उत्कट प्रेमिकाला आपल्या गुल (प्रेयसी) च्या पायाशीं स्थान मिळूं शकेल तो धन्यच होय.

(५) हे प्रिये, वसंतऋतूनें तुझ्याकरतां फुलें निर्माण केलीं आहेत. तूं त्यांचे हार करून गळ्यांत घालावे. त्यांच्या सुगंधाचा आस्वाद घ्यावा ह्याच हेतूनें तीं निर्माण झालीं आहेत आणि जेव्हां तूं त्या फुलांचें सेवन करतेस त्या वेळीं त्यांचा मला हेवा वाटतो. कारण तीं फुलें म्हणजे प्रेमांत माझे प्रतिस्पर्धीच नव्हेत काय ? तुझ्या सहवासाचा लाभ त्यांना होत आहे आणि मी त्या सुखाला आंचवलों म्हणून मला त्यांचा हेवा वाटतो.

(६) वसंतऋतूंत उपवनांतून विहार आणि मद्यानें भरलेलीं पात्रें अवश्य हवींत. त्यांचा लाभ मला होत नाहीं म्हणून मला वसंतऋतु नकोसा वाटतो.

(७) तुझ्या तेजस्वी सौंदर्याचा धाक विलक्षण आहे. तुझ्या प्रेमिकांनीं कोणत्याही इतर वस्तूंना प्रिय मानावें हें तुला आवडत नाहीं. म्हणून मला फुलांचें आकर्षक नखरे आणि सुगंध हीं आवडेनाशीं झालीं आहेत.

(८) एकामागून एक फुलें उमलूं लागलीं कीं तीं गतिमान झाल्याचा भास होतो. हे प्रिये, तूं बागेंत येतांक्षणींच तुला पाहाण्यासाठीं हीं फुलें जणूं एकामागें एक पळत सुटलीं आहेत. पटापट उमलूं लागलीं आहेत.

(९) जिच्या कल्पनेनें फुलेंही मस्त आहेत त्या प्रियेला आपल्या कुशींत घेण्याची उत्कट इच्छा मनांत आहे.

७६ . . . ग़म नहीं होता है आज़ादों को बेश अज़ यक नफ़स
बर्क़ से करते हैं रौशन शमए मातम ख़ाना हम ॥ १ ॥

महफ़िलें बरहम करे है गंजफ़ा बाज़े ख़याल
हैं वरक़ गरदानिए नैरंगे यक बुतख़ाना हम ॥ २ ॥

बावजूदे यक जहां, हंगामा पैदाई नहीं
हैं चिराग़ाने शबिस्ताने दिले परवाना हम ॥ ३ ॥

ज़ोफ़ से है, नै कनाअत से ये तर्के जुस्तजू
हैं वबाले तकिया गाहे हिम्मते मर्दाना हम ॥ ४ ॥

दायमुल हब्स इसमें हैं लाखों तमन्नाएं 'असद'
जानते हैं सीनए पुर ख़ूं को ज़िन्दांख़ाना हम ॥ ५ ॥

(१) आम्हां प्रेमवेड्यांचा शोक तीव्र आणि क्षणिक असतो. आमच्या शोकागाराला आम्ही आकाशांतील सौदामिनीनेंच प्रकाशित करीत असतों.

(२) गत मैफिलीच्या आठवणी आम्ही मनांतून सारखे चाळवीत असतों. गंजिफा खेळणारे हातांतील डाव पाहाण्याकरितां पत्ते सारखे चाळवीत असतात. तसेच आम्ही आठवणी चाळवीत असतों.

(३) आमचें जीवन म्हणजे अनेक घटनांनीं भरलेलें आहे. पण हे सारे पतंगाच्या हृदयांतील भडकणाऱ्या आगीसारखें आहे.

(४) मनुष्याचा दृढनिश्चय शेवटीं सहनशील होऊन गप्प बसण्यास शिकतो. पण आमचें गप्प बसणें त्यामुळें नाहीं. केवळ निःशक्त झाल्यामुळें आम्ही स्वस्थ आहोंत. इच्छा नष्ट झाली किंवा स्वस्थ बसावेंसें वाटतें म्हणून नव्हे.

(५) हे असद, आमच्या हृदयांत लाखों आकांक्षा चिरकाल कोंडून राहिल्याप्रमाणें आहेत. ह्या संवेदनाशील हृदयाला आम्ही तुरुंगच समजून आहोंत.

७७ . . . मुझको दियारे ग़ैर में मारा वतन से दूर
रखली मेरे खुदा ने मेरी बेकसी की शर्म ॥ १ ॥

वो हल्क़हाये ज़ुल्फ़े कमीं में हैं ऐ खुदा
रख लीजो मेरे दावए वारस्तगी की शर्म ॥ २ ॥

(१) परमेश्वरा, परदेशांत मला अत्यंत निराधार अवस्थेंत मृत्यु आला ह्याबद्दल मी तुझे आभार मानतों. कारण परदेशांत मला कोणी ओळखत नाहीं. अशा अवस्थेंत मला स्वदेशांत मृत्यु आला असता तर माझ्या फजीतीला पारावार उरता ना.

(२) प्रियेचे कुटिल कुंतल मला, आपल्या जाळ्यांत अडकवूं पाहाताहेत. परमेश्वरा, स्वतंत्र राहाण्याच्या माझ्या धडपडीची काळजी आतां तुलाच. नाहींतर माझें स्वातंत्र्य हरण झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

नींद उसकी है, दिमाग़ उसका है, रातें उसकी हैं

हूं वामे बख़्ते ख़ुफ़्ता से यक ख़्वाबे खुश व ले
७८ . . . 'ग़ालिब' यह ख़ौफ़ है के कहां से अदा करूं ॥ १ ॥

वो फ़िराक़ और वो विसाल, कहां
वो शबो रोज़, माहो साल कहां ॥ १ ॥

फ़ुर्सते कारोबारे शौक़ किसे
ज़ौक़े नज़्ज़ारए जमाल कहां ॥ २ ॥

दिल तो दिल वो दिमाग़ भी न रहा
शोरे सौदाए ख़त्तो ख़ाल कहां ॥ ३ ॥

थी वो इक शख़्स के तसव्वुर से
अब वो रानाइए ख़याल कहां ॥ ४ ॥

ऐसा आसां नहीं लहू रोना
दिल में ताक़त जिगर में हाल कहां ॥ ५ ॥

हमसे छूटा क़मार ख़ानए इश्क़
वां जो जावें गिरह में माल कहां ॥ ६ ॥

फ़िक्रे दुनियांमे सर खपाता हूं
मैं कहां और ये वबाल कहां ॥ ७ ॥

मुज़महिल हो गये क़वा 'ग़ालिब'
वो अनासर में एतिदाल कहां ॥ ८ ॥

(१) माझें दैव झोंपलें आहे आणि मला झोंप येत नाहीं. एखादें गोड स्वप्न दैवानें माझ्या वांट्याला द्यावें असें वाटतें पण माझी निद्रा नाहींशी झाली आहे तर तें गोड स्वप्न तरी माझ्या वांट्याला कोठून येणार ?

गतकाळाची आठवण

(१) तें मीलन, तो विरह, ते दिवस, त्या रात्री आतां परत कोठून येणार ?

(२) प्रेमव्यथा लावून घ्यायला आतां कोणाला अवकाश आहे ? आतां सौंदर्यदर्शनाचा लाभ कोठें ?

(३) हृदयाचें जाऊं दे. आतां ती विचारशक्ति कुठें ? आणि ह्याच गोष्टी नसतील तर प्रेमाचें वेड कुठलें ?

(४) हृदयांतील सारे रंग त्या प्रियेमुळें होते. आतां तीच नाहींशी झाल्यावर शिल्लक काय राहिलें आहे ?

(५) रक्ताचे अश्रु वाहविणें आतां सोपें नाहीं. आतां हृदयांत ती शक्ति नाहीं आणि काळजाची ती अवस्था नाहीं.

(६) प्रेमाचा जुगारखाना आम्हीं सोडून दिला आहे. तेथें बाजी लावण्यास आमच्यापाशीं माल कुठें शिल्लक आहे ?

(७) तसें पाहिलें तर मी स्वच्छंदी आणि स्वतंत्र वृत्तीचा. जीवनांतील प्रश्नांशीं माझा काय संबंध ? पण नेमकें त्यांतच डोकें पिकून जाण्याची वेळ आली आहे.

(८) 'गालिब', साऱ्या शक्ति आतां विगलित झाल्या आहेत. त्यांमध्यें मागचा जोम कोठून राहाणार ?

७९ . . .

की वफ़ा हमसे तो ग़ैर उसको जफ़ा कहते हैं
होती आई है के अच्छों को बुरा कहते हैं ॥ १ ॥
आज हम अपनी परीशानीये ख़ातिर उनसे
कहने जाते तो हैं पर देखिए क्या कहते हैं ॥ २ ॥
अगले वक्तों के है ये लोग इन्हें कुछ न कहो
जो मये व नग़्मे को अन्दोह रुबा कहते हैं ॥ ३ ॥
दिल में आजाये है होती है जो फ़ुर्सत ग़श से
और फिर कौन से नाले को रसा कहते हैं ॥ ४ ॥
है परे सरहदे इदराक से अपना मस्जूद
क़िब्ले को अहले नज़र क़िब्ला नुमा कहते हैं ॥ ५ ॥
पाए अफ़गार पे जब से तुझे रहम आया है
ख़ारे रहको तिरे हम मेहरे गया कहते हैं ॥ ६ ॥
इक शरर दिल में है उससे कोई घबरायेगा क्या
आग मतलब है हमको जो हवा कहते हैं ॥ ७ ॥
देखिए लाती है उस शोख़ की निख़्वत क्या रंग
उसकी हर बात पे हम नामे ख़ुदा कहते हैं ॥ ८ ॥
'वहशत' व 'शेफ़्ता' अब मरसिया कहदें शायद
"मर गया 'ग़ालिबे' आशुफ़्ता नवा" कहते हैं ॥ ९ ॥

(१) प्रिया माझ्याशीं एकनिष्ठ राहू लागली कीं, माझे प्रतिस्पर्धी म्हणतात कीं तिनें आपला छळ चालविला आहे. नाहींतरी कोणत्याही चांगल्या गोष्टीला नांवें ठेवण्याची जगाची रीतच आहे.

(२) आज आपली प्रेमकहाणी प्रियेला सांगावी असा आम्ही निश्चय केला आहे. पण तिच्या नजरेला नजर भिडल्यानंतर ही कहाणी आम्ही सांगू शकतों का आणखी कांहीं तोंडावाटे बाहेर पडतें ह्याची परीक्षा आहे.

(३) हे गतकाळचे लोक आहेत. ह्यांना वाटतें कीं, मद्य आणि संगीत म्हणजे शोकहारी आहेत. ह्यांना काय माहीत कीं, ह्यांच्यामुळें आमचीं दुःखें अजून तीव्र होतात. पण हे जुने लोक साधेभोळे आहेत ह्यांना नांवें ठेवूं नका.

(४) विरहांत प्रेमिकांचें सारखें आक्रंदन चालू आहे. इकडे त्याचें आक्रंदन प्रियेच्या कानांवर पडलें आणि तिकडे प्रेमिकाची शुद्ध गेली. शुद्धीवर आल्यावर प्रेमिकाला वाटतें कीं, आपलें आक्रंदन प्रियेच्या कानांवर गेलें. जर हें जाणार नाहीं तर सफळ आक्रंदन म्हणायचें कशाला ?

(५) माझें प्रार्थनास्थळ बुद्धीच्याही पलीकडे आहे. लोक ज्याला किब्ला (मक्का) म्हणतात ती तर माझ्या प्रार्थनागृहाची वाट दाखविणारी खूण आहे.

(६) कांट्याकुट्यांनीं रक्ताळलेल्या माझ्या पायावर तुला दया आली. हे प्रिये, त्या दिवसापासून आम्हांला ते कांटे म्हणजे औषधाच्या वल्ली वाटूं लागल्या आहेत.

(७) आमच्या हृदयांत आगीच्या ठिणग्या आहेत. त्यांना भ्यावयाची काय आवश्यकता आहे ? उलट आमच्या श्वासोच्छ्वासानें ती आग आणखी गरम होत आहे. हें आम्हांला हवेंच आहे.

(८) प्रियेच्या प्रत्येक विभ्रमाला आम्ही मोहून धन्य धन्य म्हणत आहोंत. ह्या स्तुतीनें भारून ती अजून काय नवीन नवीन रंग दाखविते ते पाहूं या.

(९) वेडाचीं गीतें गाणारा गालिब मेला कदाचित् त्याचे कविमित्र वहशत आणि शेफ़्ता त्याच्यावर शोकगीतें रचतील.

८० . . . आबरू क्या खाक उस गुल की के गुलशन में नहीं
है गरेबां नंगे पैराहन जो दामन में नहीं ।। १ ।।

ज़ोफ़ से ऐ गिरिया कुछ बाक़ी मेरे तन मे नहीं
रंग होकर उड़ गया, जो खूं के दामन में नहीं ।। २ ।।

हो गये हैं जम्अ अजज़ाए निगाहे आफ़ताब
ज़र्रे उसके घर के दीवारों के रौज़न में नहीं ॥ ३ ॥
क्या कहूं तारीकिए ज़िन्दांने ग़म अंधेर है
पम्बा नूरे सुबह से कम जिसके रौज़न में नहीं ॥ ४ ॥
रौनके हस्ती है इश्क़े ख़ाना वीरां साज़ से
अंजुमन बे शम्अ है गर बर्क़ ख़िरमन में नहीं ॥ ५ ॥
ज़ख़्म सिलवाने से मुझपर चारा जोई का है तान
ग़ैर समझा है के लज़्ज़त ज़ख़्मे सोज़न में नहीं ॥ ६ ॥
बस्के हैं हम इक बहारे नाज़ के मारे हुए
जल्वए गुल के सिवा गर्द अपने मदफ़न में नहीं ॥ ७ ॥
क़तरा क़तरा इक हयूला है नये नासूर का
ख़ूं भी जौक़े दर्द से फ़ारिग़ मेरे तन में नहीं ॥ ८ ॥
लेगई साक़ी की निख़वत क़ल्ज़ुम आशामी मेरी
मौजे मै की आज रग मीना की गर्दन में नहीं ॥ ९ ॥
हो फ़िशारे जोफ़ में क्या नातुवानी की नमूद ?
क़द के झुकने की भी गुंजाइश मेरे तन में नहीं ॥ १० ॥
थी वतन में शान क्या 'ग़ालिब' के हो ग़ुर्बत में क़द्र्
बेतकल्लुफ हूं वो मुश्ते ख़स के गल्ख़न् में नहीं ॥ ११ ॥

(१) जें फूल बागेंत नाहीं तें फूल तुच्छ होय. आणि जें कापड प्रेमवेडांत फाडलें जात नाहीं तें तुच्छ होय.

(२) हे अश्रूंनो, आत्यंतिक निःशक्ततेमुळें माझ्या आंगांत कांहीं राहिलें नाहीं. अंगांतील सारें रक्त अश्रूंच्या रूपानें वाहून गेलें आणि उरलेलें वाळून उडून गेलें. (अशक्तते-मुळें चेहरा फिक्कट होतो. निरोगी अवस्थेंत चेहेऱ्याचा लाल रंग होता तो उडून गेला.)

(३) हे प्रिये, तुझ्या घरच्या भिंतीच्या फटींतून सूर्याच्या किरणाबरोबर जे हजारों कण उडत येतांना दिसत आहेत, ते कण नव्हेत, तर सूर्यच तुझ्या दर्शनाच्या इच्छेनें घरांत प्रवेश करीत आहे.

(४) माझ्या हृदयाच्या शोकागारांत इतका अंधार पसरला आहे कीं, भिंतीच्या फटींत कापसाचा एक तुकडा ठेवला तरी उजेड आल्याचा भास होतो.

(५) जगांत जो रस आणि रंग दिसतो तो केवळ प्रेमामुळें. ही वीज जीवनांत नसेल तर तें दिव्यावांचून असलेल्या मैफिलीसारखें आहे.

(६) मी जखमांतून टांके लावून घेत आहें. हें पाहून प्रतिस्पर्ध्याला वाटतें कीं माझें प्रेम खरें नाहीं. नाहींतर जखमा शिवून घेण्याचें कारण काय? जखमा शिवून घेतांना सुईच्या टोंचण्यामुळें जी लज्जत येते, त्याची कल्पना त्याला नाहीं म्हणून तो असा संशय घेतो. जखमा भराव्या म्हणून मी टांके लावून घेत नाहीं तर सुई टोंचण्याचा आनंद अनुभवावा हा माझा हेतु आहे.

(७) आम्ही तर प्रेयसीच्या हातून मृत्युमुखीं पडलेले रसिक. मग आमच्या थडग्यांत धुळीच्या ऐवजीं फुलांचा खच पडलेला दिसणार. यांत काय आश्चर्य?

(८) माझ्या रक्ताचा प्रत्येक बिंदु म्हणजे एक जखमेचा फोडच. म्हणजे माझ्या रक्ताला व्यथेची आणि व्रणाची किती आसक्ति आहे हें समजून येईल.

(९) साकीला वाटे कीं, आपण हवी तितकी दारू पाजूं शकूं. पण माझ्या पिण्यापुढें त्यानें हात टेकले. मदिरेच्या सुरईवरही आतां गर्वाचा आणि अहंकाराचा मागमूस दिसत नाहीं.

(१०) निःशक्ततेनें मला चहूंकडून इतकें दावून धरलें आहे कीं, पोंक काढून वांकणेंही मला अशक्य होऊन बसलें आहे. (दाबणें ह्या शब्दावरून शरीर झुकणेंही अशक्य झालें अशी कल्पना केली आहे.)

(११) मी परदेशांत आहें. येथें माझी कदर कोण करणार? अतिशयोक्ति नाहीं. मी म्हणजे पानपाचोळा आणि तोही आगींत न सांपडलेला म्हणजे दग्ध होण्याचेंही नशीवीं नसलेला.

८१ . . . अहदे से मदहे नाज़ के बाहर न आसका
गर इक अदा हो तो उसे अपनी क़ज़ा कहूं ॥ १ ॥

हल्के हैं चश्महाये कुशादा ब सूए दिल
हर तारे ज़ुल्फ़ को निगहे सुरमा सा कहूं ॥ २ ॥

मैं और सद हजार नवाए जिगर खराश
तू और एक वो न शुनीदन के क्या कहूं ॥ ३ ॥

ज़ालिम मेरे गुमां से मुझे मुनफइल न चाह
है है खुदा न करदा, तुझे बेवफ़ा कहूं ॥ ४ ॥

(१) प्रियेच्या विविध लीलांची स्तुति करणें माझ्या आंवाक्याबाहेरचें आहे. तिचा एखादा विभ्रम असता तर त्याच्यावर जीव ओवाळून टाकीन असें म्हणून स्तुति केली असती. परंतु तिच्या शेंकडों विभ्रमांची तारीफ करण्यास मी असमर्थ ठरलों.

(२) तिचे कुटिल कुंतल म्हणजे माझ्या हृदयावर ताबा गाजविण्याकरितां टक लावून पाहात असलेले डोळेच आणि तिच्या कलापाचा एकेक केस म्हणजे त्या डोळ्यांची काजळच.

(३) मी म्हणजे हृदयें फाटून निघतील अशीं असंख्य आक्रंदनें करणारा आणि तूं म्हणजे एक सुद्धां ऐकून न घेणारी, ह्याला काय म्हणावें ?

(४) माझें हृदय म्हणतें कीं, प्रिया निष्ठारहित आहे. पण मन म्हणतें कीं, नाहीं. ती माझ्याशीं एकनिष्ठ आहे. पण हे प्रिये, ह्यामुळें तूं गैरसमज होऊं देऊं नकोस. मी तुला निष्ठारहित म्हणून म्हणणें शक्यतरी आहे का ?

८२ . . . मेहरबां होके बुलालो मुझे चाहो जिस वक्त
मैं गया वक्त नहीं हूं के फिर आभी न सकूं ॥ १ ॥
ज़ोफ़ में तानए अग़यार का शिकवा क्या है
बात कुछ सर तो नहीं है कि उठा भी न सकूं ॥ २ ॥
ज़हर मिलता ही नहीं मुझको सितमगर वरना
क्या क़सम है तेरे मिलने की के खा भी न सकूं ॥ ३ ॥

(१) हे प्रिये, तूं कृपावंत होऊन हवे तेव्हां मला बोलाव. मी कांहीं गतकाळ नाहीं कीं पुन्हां परत येणार नाहीं.

(२) माझ्या निःशक्ततेंत प्रतिस्पर्धी मला टोंचून बोलतात. त्याचें वाईट का वाटून घ्यायचें ? त्यांचे शब्द म्हणजे कांहीं माझें डोकें थोडेंच आहे ? कीं निशक्ततेंत मी तें वर उचलूं शकणार नाहीं ? (झेलूं शकणार नाहीं ?)

(३) मरण पत्करायला मला विष मिळत नाहीं म्हणून. नाहींतर काय, तें विष आहे, खायला काय अडचण आहे ? तुला भेटण्याची ती काय शपथ आहे कीं खातां (घेतां) येत नाहीं ?

८३ . . . हमसे खुलजाओ बवक़्ते मै परस्ती एक दिन
वरना हम छेडेंगे रखकर उज़्रे मस्ती एक दिन ॥ १ ॥
ग़ुर्रए औजे बिनाए आलमे इम्कां न पूछ
इस बलन्दी के नसींबो में है पस्ती एक दिन ॥ २ ॥

क़र्ज़ की पीते थे मै, लेकिन समझते थे के हां
रंग लायेगी हमारी फ़ाक़ा मस्ती एक दिन ॥ ३ ॥

नग़महाए ग़म को ही ऐ दिल ग़नीमत जानिए
बेसदा हो जायगा यह साज़े हस्ती एक दिन ॥ ४ ॥

धौल धप्पा उस सरापा नाज़ का शेवा नहीं
हम ही कर बैठे थे 'ग़ालिब' पेश दस्ती एक दिन ॥ ५ ॥

(१) आपल्या मदिरेच्या मैफिलींत निःसंकोचपणें वाग वरें. नाहींतर मीच एक दिवस मदिरेंत बेहोष झाल्याचें सोंग आणून तुझ्याशीं अतिप्रसंग करून वसेन.

(२) ह्या नाशवंत जगांतील आपल्या उत्कर्षावर गर्व धरूं नकोस. कारण ह्या उत्कर्षामागें नाशाचींही चिन्हें लपलीं आहेत.

(३) कर्ज काढून आम्ही दारू पीत होतों. पण एक ना एक दिवस ह्या फाकेमस्तीचा परिणाम भोगावा लागेल ह्याची आम्हांला पुरेपूर जाणीव होती.

(४) हे हृदया, ह्या शोकगीतानांच बरे समज. अरे एक दिवस जीवनाचें वाद्यच निस्तब्ध होईल. हें लक्षांत राहूं दे.

(५) अधिक प्रसंग करण्याचा त्या चंचल प्रियेचा स्वभावच नव्हे. सुरुवात आमच्या-कडूनच झाली होती.

८४ . . . हम पर जफ़ा से तर्के वफ़ा का गुमां नहीं
एक छेड है वगरना मुराद इम्तिहां नहीं ॥ १ ॥

किस मुँह से शुक्र कीजिये इस लुत्फ़े ख़ास का
पुरसिश है और पाए सुख़न दरमियां नहीं ॥ २ ॥

हमको सितम अज़ीज़ सितमगर को हम अज़ीज़
ना मेहरबां नहीं है अगर मेहरबां नहीं ॥ ३ ॥

बोसा नहीं, न दीजिये दुश्नाम ही सही
आख़िर ज़बां तो रखते हो तुम गर दहां नहीं ॥ ४ ॥

हर चन्द जां गुदाज़िए क़हरो इताब है
हर चन्द पुश्ते गर्मिए ताबो तवां नहीं ॥ ५ ॥

जां मुतरिबे तरानए हलमिन मज़ीद है
लब पर वो संजे ज़मज़मए अल अमां नहीं ॥ ६ ॥
खंजर से चीर सीना अगर दिल न हो दुनीम
दिल में छुरी चुभो मिज़ां गर खूंचकां नहीं ॥ ७ ॥
है नंग सीनये दिल, अगर आतिश कदा न हो
है आरे दिल नफ़स अगर आज़र फ़िशां नहीं ॥ ८ ॥
नुक़सां नहीं जुनूं में बला से हो घर ख़राब
सौ गज़ जमीं के बदले बियाबां गरां नहीं ॥ ९ ॥
कहते हो " क्या लिखा है तेरी सर नविश्त में
गोया जबीं पे सिजूदए बुत का निशां नहीं ॥ १० ॥
पाता हूं उससे दाद कुछ अपने कलाम की
रूहुल कुद्स अगरचे मेरा हम ज़बां नहीं ॥ ११ ॥
जां है बहाए बोसा वले क्यौं कहे अभी
'ग़ालिब' को जानता है के वो नीम जां नहीं ॥ १२ ॥

(१) प्रिया माझा छळ करीत आहे पण म्हणून तिला माझ्या प्रेमाबद्दल संशय आला आहे असें समजूं नका. हा तिचा छंद आहे. परीक्षा पाहाण्याचें तिच्या मनांत नाहीं.

(२) संकेतानें आणि खुणांनीं ती माझ्याकडे आपलें लक्ष आहे असें दाखविते. संभाषणाचा पडदा मध्यें न ठेवतां तिनें व्यक्त केलेल्या भावाबद्दल मी कोणत्या शब्दांनीं आभार मानूं ?

(३) आम्हाला छळ आवडतो. आणि प्रियेला आमचा छळ करणें आवडतें. ह्यावरून आम्ही तिला आवडतों, हें सिद्ध झालें. नाहींतरी मनुष्य आपल्याच माणसाचा छळ करतो ना. निदान आमच्यावर तिची कृपा नसली तरी अवकृपा नाहीं हें खास.

(४) चुंबन देणें नको असेल तर नको देऊं. चुंबन देण्यास तुझ्यापाशीं ओंठ नसले तरी अपशब्द बोलण्याकरितां तुझ्या तोंडांत जीभ तरी आहे ना ?

(५) तिची अवकृपा दाहक आहे. आणि ती सहन करण्यास आमच्यापाशीं शक्ति नाहीं. तरीपण आम्हाला तिनें आमचा छळ केलेला आवडतो.

(६) तिच्या छळाला आम्ही आतां पुरे कर, त्राहिमां, त्राहिमां, म्हणत नाहीं. उलट त्यामुळें आमच्या जीवनाचें वाद्य पूर्वीपेक्षांही जास्त मधुर ध्वनि करीत आहे.

१३५ . . . .

(७) तुझें हृदय दुभंगलें नसेल तर त्यांत खंजीर खुपसून त्याचे तुकडे कर आणि तुझ्या डोळ्यांना रक्ताची धार नसेल तर हृदयांत खंजीर भोसकून डोळयांतून रक्त वाहूं दे.

(८) ज्या हृदयांत दाहक अग्नि नाहीं तें हृदय तुच्छ होय. आणि ज्या श्वासोच्छ्वासांत ठिणगी नाहीं तें तुच्छ होय.

(९) प्रेमवेडांत माझें घर उध्वस्त झालें तर मला त्याची पर्वा नाहीं. त्याच्या मोबदल्यांत भटकण्यास वैराण आणि विशाल वाळवंट मिळालें हा सौदा कांहीं महाग म्हणतां यावयाचा नाहीं.

(१०) तुझ्या ललाटावर काय लिहिलें आहे असें काय विचारतोस ? अरे प्रियेच्या उंबरठ्यावर कपाळ घासून घासून त्यावर घट्टे पडलेले तुला दिसत नाहींत काय ?

(११) देवदूतांची आणि माझी वाणी वेगळी असली तरी ते माझ्या काव्याची स्तुतीच करतात. अर्थात् माझी वाणी दैवीच म्हटली पाहिजे.

(१२) एक चुंबनाची किंमत म्हणजे प्राणापेक्षां कमी नाहीं. पण प्रिया आतांच म्हणत नाहीं कीं तुझे प्राण देऊन माझें चुंबन घे, म्हणून. कारण अद्याप माझ्या कुडींत प्राण आहे. मी नीमजान होऊन म्हणजे अर्ध्या प्राणाला मुकलों म्हणजे ती म्हणेल कीं, तुला चुंबन हवें ना ? मग तुझा सगळा प्राण पाहिजे. अर्ध्यामुर्ध्या प्राणानें माझें समाधान होणार नाहीं. तेव्हां मी शाबूत प्राण कोठून आणूं ? सारांश माझा छळ करावा असा तिचा हेतु आहे, हें उघड आहे.

८५ . . . मानें दश्ते नवर्दी कोई तदबीर नहीं
एक चक्कर है मेरे पांव में ज़ंजीर नहीं ॥ १ ॥

शौक़ उस दश्त में दौडाए है मुझको के जहां
जादा ग़ैर अज़ निगहे दीदए तस्वीर नहीं ॥ २ ॥

हसरते लज़्ज़ते आज़ार रही जाती है
जादए राहे वफ़ा जुज़ दमे शमशीर नहीं ॥ ३ ॥

रंजे नौमीदिए जावीद गवारा रहियो
ख़ुश हूं गर नाला ज़बूनी कशे तासीर नहीं ॥ ४ ॥

सर खुजाता है जहां ज़ख़्मेसर अच्छा हो जाय
लज़्ज़ते संग बअन्दाज़ए तक़रीर नहीं ॥ ५ ॥

जब करम रुख़्सते बेबाकी व गुस्ताख़ी दे
कोई तक़सीर बजुज़ ख़जलते तक़सीर नहीं ॥ ६ ॥
' ग़ालिब ' अपना यह अक़ीदा है बक़ौले ' नासिख़ '
" आप बे बहरा है जो मोतक़िदे ' मीर ' नहीं ॥ ७ ॥

(१) वणवण भटकण्याचा जो छंद मला लागला आहे, त्याला इलाज नाहीं. माझ्या पायांत तुम्ही बेड्या घातल्या तरी माझ्या मतें त्या बेड्या नव्हेत. पायाला भिंगरी बांधली असेंच मी समजेन.

(२) प्रेमवेडांत मी भटकत अशा कठीण ठिकाणीं पोहोंचलों आहें कीं, तें पाहून कोणीही चित्रासारखें तटस्थ होऊन राहावें.

(३) प्रियेच्या छळामुळें जी व्यथा होते तिची लज्जत चाखावी असें नेहमीं मनांत येतें. पण काय करावें ? ती इच्छा पूर्ण होत नाहीं. कारण प्रेमनिष्ठा म्हणजे तलवारीचें तीक्ष्ण पातें होय. त्या मार्गावर पहिलें पाऊल टाकलें कीं मृत्यु आलाच. मग व्यथेची लज्जत अनुभवण्यास अवकाश कोठला ?

(४) परमेश्वरानें मला कायमचें दुःखी निराश करून ठेवावें म्हणजे माझ्या निश्वासांना सफलतेचें ऋणी होण्याची पाळी येणार नाहीं.

(५) वेडांत मुलांनीं दगड मारल्यामुळें डोकें ठेंचून निघालें आतां त्या जखमा बऱ्या होऊं लागल्या आहेत. ह्याचेंच लक्षण म्हणून डोकें खाजवूं लागलें आहे. आतां पुन्हां दगडाचा मार झेलण्यास हरकत नाहीं. कारण प्रेमवेडांत अशा अवस्थेची गोडी अवर्णनीय आहे.

(६) प्रियाच जेव्हां निःसंकोचपणें वागण्याची परवानगी देते तेव्हां संकोच करणें किंवा मागें फिरणें ह्यापेक्षां अधिक असा कोणताच गुन्हा असूं शकत नाहीं.

(७) गालिब, कवि नासिखच्या तत्त्वाप्रमाणेंच माझेंही मत आहे कीं, जो कवि मीरचा भक्त नाहीं तो अरसिक आणि कमनशीबीच समजला पाहिजे.

मत मर्दुमके दीदा में समझो ये निगाहें
८६ . . . हैं जम्अ सुवेदाये दिले चश्म में आहें ॥ १ ॥

बरशगाले गिरियए आशिक़ है देखा चाहिये
खिल गई मानिन्दे गुल सौ जा से दीवारें चमन ॥ १ ॥
उल्फ़ते गुल से ग़लत है दावए वारस्तगी
सर्व है बावस्फे आज़ादी गिरफ़तारे चमन ॥ २ ॥

(१) माझ्या डोळ्यांतील बुबुळांतून तुम्हाला दृष्टि म्हणून जी वाटते, ती दृष्टि नाहीं. माझ्या हृदयाच्या अंतरींच्या खुणा निश्वासरूप होऊन (आकांक्षा) तेथें बसल्या आहेत असें समजा.

(१) प्रेमिकांचें हें रुदन म्हणजे मुसळधार पाऊसच. त्यामुळें बागेंतील भिंतींना शंभर ठिकाणीं चिरे पडले आहेत. उमललेल्या फुलांसारखीं ह्या भिंतींनीं आपलीं तोंडें उघडलीं आहेत.

(२) फुलाच्या प्रेमाच्या बंधनांतून कोण निसटूं शकेल ? ह्या सुरूच्या झाडाकडे पाहा. हा आपल्याला स्वतंत्र आणि स्वच्छंदी म्हणवितो पण ह्या फुलांच्यामुळें बागेंतून त्याचा पाय बाहेर तरी पडतो का ?

८७ . . . इश्क़ तासीर से नौमीद नहीं
जां सुपारी शजरे बेद नहीं ॥ १ ॥
सल्तनत दस्त बदस्त आई है
जामे मै ख़ातिमे जमशीद नहीं ॥ २ ॥
है तजल्ली तेरी सामाने वजूद
ज़र्रा बे परतवे खुर्शीद नहीं ॥ ३ ॥
राज़े माशूक़ न रुस्वा हो जाय
वरना मर जाने में कुछ भेद नहीं ॥ ४ ॥
गर्दिशे रंगे तरब से डर है
ग़मे महरूमिए जावीद नहीं ॥ ५ ॥
कहते हैं जीते हैं उमीद पे लोग
हम को जीने की भी उमीद नहीं ॥ ६ ॥

(१) प्रेमाला फळासंबंधीं निराश होण्याचें कारण नाहीं. जिवाचा निर्धार म्हणजे फळ न येणारें वेताचें झाड थोडेंच आहे ?

(२) सम्राट जमशीदचा दारूचा पेला म्हणजे मद्यपानाचें शेवटचें पर्व थोडेंच होतें ? ती परंपरा तर पिढ्यानपिढ्या आमच्यापर्यंत आली आहे.

(३) ह्या सृष्टीचें अस्तित्व हे परमेश्वरा, तुझ्या कारणामुळेंच आहे. धूळीचा कण जसा सूर्यकिरणाशिवाय प्रकाशित होऊं शकत नाहीं तद्वतच् तुझ्या प्रेरणेशिवाय हें विश्व अस्तित्वांत येणें शक्य नाहीं.

(४) आम्हाला मरणाचें कांहीं भीतियुक्त गूढ वाटतें म्हणतां काय ? छे! तसें मुळींच नाहीं. त्यामुळें प्रियेचें आमच्याशीं असलेलें प्रेम उघडें पडून तिचा दुर्लौकिक होईल ह्याची भीति वाटते.

(५) मला चिरकालिन वंचनेचें दुःख वाटत नाहीं. सुख आणि दुःखाच्या फिरत राहाणाऱ्या फेऱ्यापेक्षां तें बरें नाहीं का ? कारण सुखामागें दुःख असह्य वाटतें.

(६) लोक आशेवर जगतात असें म्हणतात. आम्हाला तर जगण्याचीही आशा नाहीं.

८८ . . .

जहां तेरा नक़्शे क़दम देखते हैं
ख़ियाबां ख़ियाबां इरम देखते हैं ॥ १ ॥

दिल आशुफ्तगाने खाले कुंजे दहन के
सुवेदा में सैरे अदम देखते हैं ॥ २ ॥

तेरे सर्वे क़ामत से इक क़दे आदम
क़ियामत के फ़ितने को कम देखते हैं ॥ ३ ॥

तमाशा कर ऐ महवे आईना दारी
तुझे किस तमन्ना से हम देखते हैं ॥ ४ ॥

सुराग़े तफ़े नाला नै दाग़े दिल से
के शबरौ का नक़्शे क़दम देखते है ॥ ५ ॥

बनाकर फ़क़ीरों का हम भेस 'ग़ालिब'
तमाशाए अहले करम देखते हैं ॥ ६ ॥

(१) हे प्रिये, तुझीं पावलें ज्या ज्या ठिकाणीं पडतात तेथें नंदनवनांतील बहरून निघालेलीं हजारों फुलझाडें पाहिल्याचा मला भास होतो.

(२) तुझ्या गालावरचा तीळ जो पाहातो त्याला स्वर्गांतून फेरी मारून आल्याचा आनंद होतो.

(३) हे प्रिये, तुझी शरीरयष्टि पाहून हृदयांत जो कोलाहल माजतो त्यासमोर कल्पांताची (क़ियामत) स्थिति म्हणजे कांहींच नाहीं.

(४) हे प्रिये, आरशांत प्रतिबिंब पाहाण्यांत तूं मग्न झाली आहेस. जरा आमच्याकडे पाहाशील कीं नाहीं ? तुझी नजर आमच्याकडे वळावी म्हणून आम्ही किती उत्कंठेनें तुझ्याकडे पाहात आहों.

(५) रात्रींच्या प्रवाशाची खूण त्याच्या पदचिन्हांनीं सांपडावी तसेंच माझ्या दाहक निश्वासांचा शोध तुम्हांला माझ्या हृदयाच्या जखमांवरून सांपडेल.

(६) गालिब, मी कांहीं फकीर नाहीं पण उदारांचें औदार्य कितपत आहे हें अजमावण्याकरितां मी हीं भगवीं वस्त्रें धारण केलीं आहेत.

मिलती है ख़ूए यार से नार इल्तिहाब में
८९. . . . काफ़िर हूं गर न मिलती हो राहत अज़ाब में ॥ १ ॥
कब से हूं, क्या बताऊं जहाने ख़राब में
शबहाए हिज्र को भी रखूं गर हिसाब में ॥ २ ॥
ता फिर न इन्तिज़ार में नीन्द आये उम्र भर
आने का अहद कर गये आये जो ख़्वाब में ॥ ३ ॥
क़ासिद के आते आते ख़त इक और लिख रखूं
मैं जानता हूं जो वो लिखेंगे जवाब में ॥ ४ ॥
मुझ तक कब उनकी बज़्म में आता था दौरे जाम
साक़ी ने कुछ मिला न दिया हो शराब में ॥ ५ ॥
जो मुन्किरे वफ़ा हो फ़रेब उस पे क्या चले
क्यों बदगुमां हूं दोस्त से दुश्मन के बाब में ॥ ६ ॥
मैं मुज़तरिब हूं वस्ल में ख़ौफ़े रक़ीब से
डाला है तुमको वहम ने किस पेचो ताब में ॥ ७ ॥
में और ख़ते वस्ल ख़ुदा साज़ बात है
जां नज़्र देनी भूल गया इज़्तिराब में ॥ ८ ॥
है तेवरी चढ़ी हुई अन्दर नक़ाब के
है इक शिकन पड़ी हुई तर्फ़े नकाब में ॥ ९ ॥
लाखों लगाव एक चुराना निगाह का
लाखों बनाव एक बिगड़ना इताब में ॥ १० ॥
वो नाला दिल में ख़स के बराबर जगह न पाये
जिस नाले से शिगाफ पड़े आफ़ताब में ॥ ११ ॥

वो सहर मुद्दआ तलबी में न काम आये
जिस सहर से सफ़ीना र वां हो सराब में ॥ १२ ॥

'ग़ालिब' छुटी शराब पर अब भी कभी कभी
पीता हूं रोजे अब्रो शबे माहताब में ॥ १३ ॥

(१) गोष्टीगोष्टीला प्रिया मला ताप देते, छळते. हें तिचें वर्तन म्हणजे आगीचें जाळणें, पोळणें, तापविणें असल्यासारखेंच आहे. पण ह्यांतच मला आनंद आहे. हें मी नाकबूल करीन तर मला तुम्ही काफर म्हणा.

(२) ह्या दुःसह परिस्थितींत किती युगें लोटलीं हें कांहीं मला सांगतां यावयाचें नाहीं. त्यांत जर विरहाच्या रात्री मिळविल्या तर मग विचारणेंच नको. कारण विरहाची एकेक रात्र म्हणजे दुःखाचें एकेक युगच होय.

(३) तिनें मी भेटण्यास येईन असें मला स्वप्नांत येऊन वचन दिलें होतें. तिची लबाडी पाहा. तिच्या प्रतिक्षेंत आतां माझी झोंप उडून गेली आहे.

(४) मी तिला निरोप्याच्या हातीं पत्र पाठविलें आहे. तो परत येईपर्यंत आणखी एक पत्र लिहून ठेवतों. कारण माझ्या पत्राचें ती काय उत्तर देणार हें मला माहीत आहे.

(५) प्रियेच्या मैफिलींत साकी माझ्यापर्यंत दारूचे पेले घेऊन कधीं येत होता ? पण आज ज्याअर्थी पेला आला आहे, त्याअर्थी मला खात्री आहे कीं, साकीनें, प्रेमांतील माझ्या त्या प्रतिस्पर्ध्यानें दारूंत कांहींतरी मिसळलें असलें पाहिजे.

(६) ती कुणाशींही प्रेम करीत नाहीं ह्याची मला खात्री आहे. मग ती माझ्या प्रतिस्पर्ध्यावर प्रेम करीत असावी असा मी निष्कारण गैरसमज कां करून घ्यावा ?

(७) मीलनाच्या वेळीं माझा प्रतिस्पर्धी कुठें ऐनवेळीं भडकतो कीं काय ? ह्या काळजींत मी आहें. पण हे प्रिये, तूं कशामुळें अस्वस्थ आहेस ? हें सांगशील ? का मी दुसरीच्या नादीं लागून तिला चोरून तुझ्याकडे आलों असेन ह्या शंकेनें का तूं व्याकुळ झाली आहेस ?

(८) मी आणि मीलनाची शक्यता ? हा परमेश्वरी योगच म्हटला पाहिजे. ह्या मीलनाकरितां मला प्राणच अर्पण करण्यास हवे होते. पण मीलनाच्या आनंदांत ह्या गोष्टीचा मला विसर पडला.

(९) प्रियेनें बुरख्याच्या आंत कपाळाला आंठ्या घातलेल्या दिसतात. म्हणूनच बुरख्यावर कपाळाच्या ठिकाणीं सुरकुती पडली आहे.

(१०) प्रियेचे शेंकडों संकेत आणि इशारे असोत. पण तिची एक चोरटी नजर ह्या सर्वांपेक्षां जास्त प्रभावी आहे. तसेंच तिचे अनेक शृंगार असोत पण तिचा एक रुसवा सर्व शृंगारांपेक्षां जास्त आहे.

(११) आश्चर्य आहे! माझ्या दाहक निश्वासांनीं सूर्यालाही भेगा पडतात. पण प्रियेच्या मनावर त्याचा यत्किंचितही परिणाम होत नाहीं.

(१२) वाळवंटांत दुरून मृगजळ दिसतें. चमकणाऱ्या वाळू मृगजळांत नावासारख्या इकडून तिकडे फिरत असल्यासारखे वाटतात. पण असा चमत्कार माझ्या प्रेमपूर्तीच्या बाबतींत कां दिसून येऊं नये?

(१३) गालिब, दारू तर सोडली पण अद्यापि चांदण्या रात्रींत आणि अभ्राच्छादित आकाश असेल त्या दिवशीं मी दारू पीतच असतों.

९० . . . कल के लिये कर आज न ख़िस्सत शराब में
यह सूए ज़न है, साक़िए कौसर के बाब में ॥ १ ॥

है आज क्यों ज़लील के कल तक न थी पसन्द
गुस्ताख़िए फ़िरिश्ता हमारी जनाब में ॥ २ ॥

जां क्यौं निकलने लगती है तनसे दमे समा
गर वो सदा समाई है चंगो रबाब में ॥ ३ ॥

रौ में है रख़्शे उम्र कहां देखिये थमे
नै हाथ बाग पर है न पा है रिकाब में ॥ ४ ॥

उतना हीं मुझको अपनी हक़ीक़त से बुउद है
जितना के वहमे ग़ैर से हूं पेचोताब में ॥ ५ ॥

अस्ले शुहूदो शाहिदो मशहूद एक है
हैरां हूं फिर मुशाहदा है किस हिसाब में ॥ ६ ॥

है मुश्तमिल नमूदे सूर पर वजूदे बहर
यां क्या धरा है क़तरए मौजो हबाब में ॥ ७ ॥

शर्म इक अदाए नाज़ है अपने ही से सही
हैं कितने बेहिजाब के हैं यौं हिजाब में ॥ ८ ॥

आराइशे जमाल से फ़ारिग नहीं हनूज़
पेशे नजर है आईना दायम नक़ाब में ॥ ९ ॥

है ग़ैब ग़ैब जिसको समझते हैं हम शुहूद
हैं ख़्वाब में हनूज़ जो जागे हैं ख़्वाब में ॥ १० ॥

' ग़ालिब ' नदीमे दोस्त से आती है बूए दोस्त
मशग़ूले हक हूं बन्दगीए बूतुराब में ॥ ११ ॥

(१) हे साकी, आम्हाला दारू पाजण्यांत संकोच करूं नको बरें. तुला काय वाटतें कीं स्वर्गांत अमृत पाजणारा साकी आम्हाला पोटभर अमृत पिण्यास देणार नाहीं ? (आम्ही येथें निषिद्ध मद्य पितों म्हणून) अरे, स्वर्गांतील साकी उदार आहे. त्याच्यावर भलताच वहीम घेणें बरें नाहीं.

(२) परमेश्वरानें मानव निर्माण केला आणि फिरश्त्यांना (देवदूतांना) आज्ञा केली कीं, तुम्ही मानवाला वंदन करा. कवि म्हणतो, ' हे परमेश्वरा, कालपर्यंत तर आमचा असा मान होता कीं, आमच्याविरुद्ध देवदूतांनींही कांहीं म्हटलें तर तुम्ही ऐकून घेण्यास तयार नव्हतां मग आमची अशी हीनदशा कां झाली ?

(३) परमेश्वराचीं भजनें ऐकत असतां आमचे प्राण जाण्याची वेळ कां यावी ? उलट संगीत वाद्यांतून ज्याअर्थीं भक्तिपर सूर निघत आहेत त्यामुळें आम्हाला नवजीवन प्राप्त व्हावयास हवें होतें.

(४) जीवनाचा घोडा तुफान वेगानें चालला आहे. ह्या घोड्याची लगाम हातांत नाहीं आणि रिकिबींत आमचे पाय नाहींत. हा जीवनाचा वारू अनावर आहे.

(५) हें जग मिथ्या आहे. एक परमेश्वर सत्य आहे. म्हणून मी ह्या मायावी संसारांत जितका गुरफटतों, तितकाच परमेश्वरापासून दूर होत आहें.

(६) मुमुक्षूंना सृष्टीमध्यें कणाकणांतून परमेश्वर स्वरूपाचा प्रत्यय येतो. जेव्हां द्रष्टा (परमेश्वर) दृश्य (सृष्टि) हीं एकच आहेत तर मुशाहिदा (दृश्य) वेगळें कसें ? एक परमेश्वराशिवाय दुसरें सत्य नाहीं. तर मग हा सर्व गोंधळ कशाचा ?

(७) जलबिंदु, लाटा इत्यादींचें स्वतंत्र अस्तित्व काय आहे ? कांहींच नाहीं. हें सर्व समुद्रामुळें आहे. आणि समुद्रामुळेंच ह्या गोष्टी दिसून येत आहेत. परमेश्वरामुळेंच ही सर्व चराचरसृष्टि आहे. तिला स्वतंत्र अस्तित्व नाहीं.

(८) लज्जायुक्त होणें हाही एक विभ्रम आहे. पण प्रिया बुरखा वापरते आणि बुरख्याच्या आंत तिला लाजण्याचें कारण उरत नाहीं. म्हणजे ती पडद्यांत असून आणि

असल्यामुळें बिनपडद्यासारखें मोकळेपणानें वागत आहे. लज्जचा उपयोग भावना लपविण्याकडे असतो त्याचें तिला कारण पडत नाहीं.

(९) प्रियेचें सौंदर्यप्रसाधन आणि शृंगार हीं अद्याप संपली नाहींत. पद्दा बुरख्याच्या आंत सुद्धां ती नेहमींच आरसा बाळगून असते.

(१०) मुमुक्षूला विश्वांत परमेश्वर स्वरूपाचा अनुभव येतो. वास्तविक हें विश्व म्हणजे भ्रम आणि माया आहे. परमेश्वर हेंच सत्य आहे. विश्वांच्या आंत म्हटलें कीं विश्व ही एक वेगळी वस्तु आहे, तिला स्वतंत्र अस्तित्व आहे असा ग्रह होतो असें समजणारे झोंपेंत जागृतीचें स्वप्न पाहून आम्ही जागे आहोंत, असें समजणारे पण वास्तविक झोंपेंत असलेलेच आहेत.

(११) हजरत अली हा परमेश्वराचा लाडका. त्याच्या सहवासांत मला परमेश्वर-भक्तीचा सुगंध अनुभवास येतो म्हणून मी अलीचीच भक्ति करतों आणि त्याच्याच आराधनेंत निमग्न आहें.

११ . . .

हैरां हूं, दिल को रोऊं के पीटूं जिगर को मैं
मक़दूर हो तो साथ रखं नौहागर को मैं ॥ १ ॥
छोड़ा न रश्क ने के तेरे घरका नाम लूं
हर इक से पूछतां हूं के जाऊं किधर को मैं ॥ २ ॥
जाना पड़ा रक़ीब के दर पर हज़ार बार
ऐ काश जानता न तेरी रहगुजर को मैं ॥ ३ ॥
है क्या ! जो कसके बांधिए मेरी बला डरे
क्या जानता नहीं हूं तुम्हारी कमर को मैं ॥ ४ ॥
लो वह भी कहते हैं के " यह बेनंगो नाम है
यह जानता अगर, तो लुटाता न घर को मैं ॥ ५ ॥
चलता हूं थोड़ी दूर हर इक तेज़रौ के साथ
पहचानता नही हूं अभी राहबर को मैं ॥ ६ ॥
ख़्वाहिश को अहमक़ों ने परस्तिश दिया क़रार
क्या पूजता हूं उस बुते बेदादगर को मैं ॥ ७ ॥
फिर बेख़ुदी में भूल गया राहे कूए यार
जाता वगरना एक दिन अपनी ख़बर को मैं ॥ ८ ॥

अपने पे कर रहा हूं क़यास अहले दहर का
समझा हूं दिल पिज़ीर मताए हुनर को मैं ॥ ९ ॥

'गालिब' खुदा करे के सवारे समन्दे नाज़
देखूं अली बहादुरे आली गुहर को मैं ॥ १० ॥

(१) माझें हृदय आणि काळीज दोन्ही नष्ट होऊन गेलीं आहेत. आतां काय करावें समजत नाहीं. ह्या दोन्हींचा शोक करण्यास मला शक्ति नाहीं. का धंदेवाईक शोकगीतकांना कामाला लावूं ?

(२) हे प्रिये, तुझ्या घरचा शोध करणें आहे पण कुणाला विचारण्याची सोय नाहीं. कारण तुझ्या घरचें नांव घेऊन कुणाला विचारूं लागलों कीं तोच माझा प्रतिस्पर्धी बनायचा म्हणून वेड्यासारखें लोकांना मी हेंच विचारीत आहें कीं, अहो, मला कुठें जायचें आहे ? कुठें जायचें आहे ? अशी माझी विचित्र परिस्थिति झाली आहे.

(३) प्रिया प्रतिस्पर्ध्याच्या घरांत जाऊन राहिली आहे आणि मला त्यामुळें प्रतिस्पर्ध्याच्या घरीं वारंवार जावें लागत आहे. काय हें माझें अपमानास्पद जिणें ! त्यापेक्षां तूं कुठें राहातेस हें माहीत नसतें तरी बरें झालें असतें.

(४) थांब, तुझा छळ करण्यास मला आतां कंबर कसली पाहिजे, असें तूं म्हणतेस. मला ह्या धाकाचें हसूं येतें. अग कसायला तुला कंबर कुठें आहे ? (कृशकटीची कल्पना) हें मला माहीत कां नाहीं ?

(५) बघा, आतां प्रियाही म्हणूं लागली कीं हा अगदीं हलका आणि दरिद्री आहे. हें मला माहीत असतें तर प्रेमापायीं घरदार उध्वस्त करून कशाला बसलों असतों ?

(६) मी परमेश्वरप्राप्तीकरितां मुमुक्षू बनलों. कुणांत कांहीं दिसलें कीं मी त्याला गुरु करतों आणि मोक्षपथांत कांहीं पावलें पुढें गेलों कीं, दुसऱ्याला गुरु करतों. इतके गुरु झाले आहेत कीं ह्या रस्त्यांतील हे वाटाडे मला ओळखूं येईनासे झाले आहेत. कारण प्रत्येक वाटाड्याबरोबर मी थोडा वेळ चालल्यावर त्याची संगत सुटते आणि मी दुसऱ्या वाटाड्या-बरोबर चालूं लागतों.

(७) सकाम आराधनेला मूर्ख जग खरी भक्ति समजतें. मी त्या प्रियेची आराधना करीत आहें, ती सकाम आहे, निष्काम भक्ति नाहीं हें लोकांच्या लक्षांत येत नाहीं.

(८) प्रियेच्या घरून आल्यापासून माझी शुद्ध हरली आहे. मला आतां कोणत्याच गोष्टीची स्मृति राहिली नाहीं. नाहींतर मी पुन्हा प्रियेच्या घरीं नसतों का गेलों ?

१४५ . . . .

(९) आपल्यावरून मी जग ओळखतों. मला गुणांची चहा आहे. पण माझा जगाविषयीं अंदाज चुकला. कारण जगाला गुणांची कदर नाहीं.

(१०) आली गोहर अली बहादुरला उत्तम आणि ऐटबाज घोड्यावर आरूढ झालेले पाहावे अशी इच्छा आहे. (गज़लांतून वैयक्तिक उल्लेख मधूनमधून करण्याचा कवीचा शिरस्ता आहे.)

१२. . .

ज़िक्र मेरा ब बदी भी उसे मंज़र नहीं
ग़ैर की बात बिगड़ जाये तो कुछ दूर नहीं ॥ १ ॥
वादए सैरे गुलिस्तां है खशा ताले शौक़
मुज़्दए क़त्ल मुक़द्दर है जो मज़कूर नहीं ॥ २ ॥
शाहिदे हस्तिए मुतलक़ की कमर है आलम
लोग कहते हैं के है पर हमें मंज़ूर नहीं ॥ ३ ॥
क़तरा अपना भी हक़ीक़त में है दरिया लेकिन
हमको तक़लीदे तुनक जर्फ़ीए मन्सूर नहीं ॥ ४ ॥
हसरत ! ऐ जौक़े ख़राबी, के वो ताक़त न रहीं
इश्क़े पुर अरबदा की गूं तने रंजूर नहीं ॥ ५ ॥
मै जो कहता हूं के हम लेंगे क़यामत में तुम्हें
किस रऊनत से वो कहते है के "हम हूर नहीं" ॥ ६ ॥
ज़ुल्म कर ज़ुल्म ! अगर लुत्फ़े दरेग़ आता हो
तू तग़ाफ़ुल में किसी रंग से माज़ूर नहीं ॥ ७ ॥
साफ़ दुर्दी कशें पैमानए जम हैं हम लोग
वाए ! वो बादा के अफ़्शुर्दए अंगूर नहीं ॥ ८ ॥
हूं 'जहूरी' के मुक़ाबिल में 'ख़फ़ायी' 'ग़ालिब'
मेरे दात्रे पे यह हुज्जत है के मशहूर नहीं ॥ ९ ॥

(१) ती माझ्यावर इतकी चिडते कीं निंदा म्हणून कां होईना माझा कोणी उल्लेख केलेलाही तिला खपत नाहीं. उलट प्रतिस्पर्धी माझी निंदा करूं लागले कीं, माझा उल्लेख कां करतां म्हणून ती त्यांच्यावरही चिडूं लागली आणि अशामुळें तेही तिच्या प्रेमाला मुकूं लागले आहेत.

(२) आज माझें नशीब खुललें. प्रियेनें आज मला बागेंत भेटण्यास सांगितलें आहे. आज माझा निकाल लावण्याचा तिचा गुप्त हेतु असावा.

(३) प्रियेला कंबर जशी तशी सृष्टि ही पराशक्तीची कंबर म्हणावी. पण उर्दू काव्यांत संकेत असा कीं सुंदर स्त्रियांना कंबरच नसते. (इतकी बारीक कीं नाहींच म्हणायचें) तसेंच सृष्टि जर कंबर असेल तर सृष्टीचें अस्तित्व नाहीं ती मिथ्या म्हटली पाहिजे. सृष्टीचें अस्तित्व आम्ही मानण्यास तयार नाहीं.

(४) वस्तुतः मी एक बिंदु आहें. परमेश्वररूपी सागराचा बिंदु आहें पण मी तत्त्वज्ञानी मन्सूरसारखा अहं ब्रह्मास्मि (अनल हक़) म्हणत फिरणार नाहीं.

(५) माझी पूर्णपणें नष्ट होण्याची इच्छा मनांतच राहून गेली. कारण, प्रेमाशीं झुंजण्यानेंच माझा नाश झाला असता पण त्या प्रेमाला तोंड देण्याची अंगांत शक्ति राहिली नाहीं.

(६) मी प्रियेला म्हटलें कीं, बरें. तूं माझें ऐकत नाहींस. ऐकूं नकोस, पण उद्यां स्वर्गांत मला हूरींची निवड करण्यास सांगतीलच तेव्हां मी तुला घेतल्याशिवाय राहणार नाहीं. मग काय करशील ? तर ती गर्वानें काय म्हणते, म्हणजे तूं मला हूरी समजतोस कीं काय ? म्हणजे ती आपल्याला हूरीपेक्षां सुंदर समजते.

(७) प्रिये, तुला माझ्यावर प्रेम करणें नको असेल तर नको करूं; मग छळ तरी कर. पण कोणत्याही स्थितींत दुर्लक्ष करूं नकोस. कारण दुर्लक्ष म्हणजे कांहीं संबंध नसल्यासारखें दाखविणें आहे.

(८) दारूचा शोध सम्राट जमशीदनें लावला म्हणतात. आम्ही जमशीदच्या परंपरेचे आहोंत. हलकी दारू पिणें आमच्या परंपरेच्या विरुद्ध आहे. जी द्राक्षानें बनविलेली दारू नाहीं ती आम्हांला बरी वाटत नाहीं.

(९) मी फारशी कवि 'जहूरी'च्या तोलाचा आणि बरोबरीचा आहें. फरक हाच आहे कीं, तो जहूरी म्हणजे प्रकट आहे. आणि मी ख़फ़ायी म्हणजे अप्रसिद्ध आहें.

१३ . . . नाला जुज़ हुस्ने तलब, ऐ सितम ईजाद् नहीं
है तक़ाज़ाए जफ़ा, शिकवए बेदाद नहीं ॥ १ ॥

इश्क़ो मजदूरिए इशरत गहे ख़ुसरौ क्या ख़ब !
हमको तस्लीम निकोनामिए फ़रहाद नहीं ॥ २ ॥

कम नहीं वो भी ख़राबी में, पये वुसअत मालूम
दश्त में है मुझे वो ऐश के घर याद नहीं ॥ ३ ॥

अहले बीनश को है तूफ़ाने हवादिस मक्तब
लतमए मौज कम अज़ सेलीये उस्ताद नहीं ॥ ४ ॥

वाए महरूमिए तस्लीम ! व बदा हाले वफ़ा
जानता है के हमें ताक़ते फ़रयाद नहीं ॥ ५ ॥

रंगे तमकीने गुलोलाला परीशां क्यों है ?
गर चराग़ाने सरे रहगुज़रे बाद नहीं ॥ ६ ॥

सबदे गुल के तले बन्द करे है गुलचीं
मुज़दा ऐ मुर्ग़ के गुल्ज़ार में सैयाद नहीं ॥ ७ ॥

नफी से करती है इस्बात तराबिश गोया
दी है जाए दहन, उसको दमे ईजाद नहीं ॥ ८ ॥

कम नहीं जल्वागरी में तेरे कूचे से बिहिश्त
यही नक़्शा है वले इस क़दर आबाद नहीं ॥ ९ ॥

करते किस मुंह से हो ग़ुर्बत की शिकायत 'ग़ालिब'
तुम को बे मेहरिए याराने वतन याद नहीं ॥ १० ॥

(१) हे कठोर प्रिये, माझें आक्रंदन म्हणजे तुझें गाऱ्हाणें नव्हे. उलट तूं त्यामुळें माझ्यावर जास्त चिडून माझा छळ करावा ही माझी इच्छा आहे.

(२) फरहादनें प्रेमाकरितां शीरीनच्या बापाचें काम करून देणें पत्करलें. प्रेम आणि त्याकरितां मजुरीचीं कामें! खरें प्रेम आणि प्रेमांत अडथळा आणणाऱ्यांच्याकरितां असे श्रम करणें (सम्राट खुस्रौनें फरहादला कालवा बांधून पाणी आणण्याचें काम दिलें होतें.) आम्हांला पसंत नाहीं. ह्यांत फरहादचा चांगला लौकिक झाला असें आम्ही मानीत नाहीं.

(३) माझें घर उध्वस्त झालें आहे आणि मी प्रेमवेडांत अरण्यांत भटकत आहें. माझें घर कांहीं अरण्यापेक्षां कमी वैराण आहे असें नाहीं पण विस्तारानें अरण्य घरापेक्षां मोठें आहे आणि मला तर प्रेमवेडांत मनसोक्त भटकायला हवें. त्यामुळें घरापेक्षां अरण्यांतच मला जास्त सुख वाटतें.

(४) दूरदृष्टीच्या लोकांना संसारांतील संकटांचे प्रसंग म्हणजे अनुभवाचे पाठ वाटतात. ह्या संकटरूपी लाटांचें आपटणें म्हणजे वरील लोकांच्या बाबतींत पंतोजींनीं मुलांना दिलेली चपराकच म्हणाना !

(५) प्राप्त परिस्थितींत स्वस्थ राहावें म्हणून आम्ही गाऱ्हाणीं व आक्रंदन करीत नाहीं. तर प्रियेला वाटतें कीं, आमच्यांत शक्तीच शिल्लक राहिली नाहीं. अरेरे! काय हा गैरसमज.

(६) हीं फुललेलीं फुलें, हा वसंतऋतु हीं सर्व वाऱ्याच्या वाटेवर ठेवलेल्या आणि लवकर विझणाऱ्या दिव्यासारखीं आहेत. नाहींतर त्यांची ऐट व नखरा हीं इतक्या लौकर विलयाला गेलीं नसतीं.

(७) हे पक्ष्या, बागेंत पारधी नाहीं त्यामुळें तुला जाळ्यांत अडकण्याची आशा नाहीं, पण तो बघ माळी फुलें वेंचून परडींत ठेवीत आहे. जा, त्याच्या परडींत अडकून बैस, म्हणजे तुला फुलांचा सहवास लाभेल. हेंच तुला हवें आहे ना ?

(८) प्रिया नाहीं नाहीं म्हणते ह्याचा अर्थच होय होय असा आहे.

(९) प्रिये, तुझें घर स्वर्गापेक्षां कमी नाहीं. फरक इतकाच कीं, स्वर्ग इतका गजबजलेला नाहीं आणि तुझें घर आबाद आहे.

(१०) अरे गालिब, आपण परदेशांत येऊन पडलों ह्याचें गाऱ्हाणें कां गातोस ? तुला आपल्या देशबांधवांची अनास्था आणि दुर्लक्ष हीं आठवत नाहींत काय ?

१४ . . . दोनो जहान दे के वो समझे यह ख़ुश रहा
यां आपडी यह शर्म के तकरार क्या करें ॥ १ ॥
थक थक के हर मुक़ाम पे दो चार रह गये
तेरा पता न पायें तो नाचार क्या करें ? ॥ २ ॥
क्या शम्अ के नहीं हैं हवाख़्वाह अहले बज़्म ?
हो ग़म ही जां गुदाज़ तो ग़म ख़्वार क्या करें ? ॥ ३ ॥
हो गई है ग़ैर की शीरीं बयानी कारगर
इश्क़ का उसको गुमां हम बेज़बानों पर नहीं ॥ ४ ॥

(१) प्रियेनें आपलें सर्वस्व मला दिलें. मी गप्प राहिलों. तिला वाटलें कीं, मी आतां संतुष्ट झालों. पण आतां तक्रार करण्यास मला संकोच वाटला म्हणून मी गप्प राहिलों. अजून हवें नव्हतें म्हणून नाहीं ?

(२) हे परमेश्वरा, तुझ्या प्राप्तीच्या मार्गांत मुमुक्षूजन टप्प्याटप्प्यावर थकून थांबले आहेत. बरोबरच आहे, तुझा शोधच लागत नाहीं तर ते बिचारे तरी काय करतील ?

(३) मैफिलींतील शमा (दिवा) बद्दल मैफिलवाल्यांना सहानुभूति नाहीं असें समजूं नका. पण जेथें दुःख इतकें तीव्र आहे तेथें त्यांनीं तरी दिव्याचें कसें सांत्वन करावें ?

(४) आमच्या प्रतिस्पर्ध्याच्या मिठ्ठास वाणीनें प्रियेला हाच खरा आणि एकनिष्ठ प्रियकर आहे असें वाटूं लागलें आहे. त्याच्या मुकाबल्यांत आम्ही अगदीं वाचा नसलेले (बेजबान) बनलों आहों.

१५ . . . क़ियामत है के सुन लैला का दश्ते क़ैस में आना
ताज्जुब से वो बोला "यूं भी होता है ज़माने में" ॥ १ ॥
दिले नाज़ुक पे उसके रहम आता है मुझे 'ग़ालिब'
न कर सरगर्म उस काफ़िर को उल्फ़त आज़माने में ॥ २ ॥

(१) मी प्रियेला लैला-मजनूची गोष्ट सांगितली आणि म्हटलें कीं, मजनूंच्या प्रेमाचा प्रभाव इतका होता कीं, लैला त्याला भेटण्याकरितां त्याच्याकडे अरण्यांत गेली. हें ऐकून ती म्हणते काय, 'आश्चर्य आहे. प्रियकरांच्या मागें प्रेयसी अशा रीतीनें जातात तर.' तिला ही गोष्ट अनिष्ट वाटत होती.

(२) प्रियेकरितां मी प्राण देण्यास तयार आहें. पण ह्यामुळें तिला धक्का बसला तर. ती अतिशय नाज़ुक आणि हळव्या मनाची आहे म्हणून मला तिची काळजी वाटते.

१६ . . . दिल लगाकर लग गया उनको भी तन्हा बैठना
बारे अपनी बेकसी की हमने पाई दाद यां ॥ १ ॥
हैं ज़वाल आमादा अजज़ा आफ़रीनिश के तमाम
मेहरे गरदूं है चिराग़े रह गुज़ारे बाद यां ॥ २ ॥

(१) आमचा छळ करून ती आम्हांला धुडकावून लावीत असे. आतां तीच एकाच्या प्रेमांत सापडलीं आहे. आतां त्याचें चिंतन करीत ती एकांतांत बसून राहूं लागली आहे. चला, आमच्या छळाची फेड अशा रीतीनें तिला मिळाली.

(२) ह्या विश्वाचा प्रत्येक कणनकण नाशवंत आहे. हा सूर्य दिसतो आहे ना ? हा सुद्धां वाऱ्याच्या वाटेवर ठेवलेल्या दिव्यासारखा एक दिवस विझल्याशिवाय राहाणार नाहीं.

१७ . . . यह हम जो हिज्र में दीवारोदर को देखते हैं
कभी सबा को कभी नामाबर को देखते हैं ॥ १ ॥
वो आयें घर में हमारे ख़ुदा की क़ुदरत है
कभी हम उनको कभी अपने घर को देखते हैं ॥ २ ॥
नज़र लगे न कहीं उसके दस्तो बाज़ को
ये लोग क्यौं मेरे ज़ख़्में जिगर को देखते हैं ॥ ३ ॥
तेरे जवाहिरे तरफ़े कुलह को क्या देखें
हम औजे तालेए लालो गुहर को देखते हैं ॥ ४ ॥

(१) मी विरहावस्थेंत आहें. घटकोघटकीं कधीं भिंतीकडे तर कधीं दरवाजाकडे पाहात आहें. भिंतीच्या पलीकडून येणारा वारा प्रियेचा कांहीं निरोप आणील, किंवा दरवाजाच्या वाहेरून टपालवाला प्रियेचें पत्र आणील, ह्या आशेनें मी सारखा त्या दिशेनें पाहात आहें.

(२) प्रिया माझ्या घरीं आली. माझें हें असलें घर आणि त्यांत प्रियेचें आगमन ह्यामुळें गोंधळून जाऊन मी कधीं तिच्याकडे तर कधीं घराकडे टकमका पाहात उभा आहें.

(३) प्रियेनें माझ्या हृदयावर केलेल्या जखमांकडे हे लोक कां निरखून पाहात आहेत ? अशानें माझ्या प्रियेला दृष्ट नाहीं का लागायची ?

(४) तूं आपल्या टोपीला हिरेमाणकें जडविलीं आहेत त्यांकडे काय पाहायचें ? आम्ही तर, हिरेमाणकांचें नशीब किती बलवत्तर, त्यांना इतकें उच्च स्थान लाभलें, हें पाहात आहोंत.

नहीं, के मुझको क़ियामत का एतिक़ाद नहीं
१८ . . . शबे फ़िराक़ से रोज़े जज़ा ज़ियाद नहीं ॥ १ ॥
कोई कहे के शबे मै में क्या बुराई है
बला से आज अगर दिन को अब्रो बाद नहीं ॥ २ ॥
जो आऊं सामने उनके तो मरहबा न कहें
जो जाऊं वां से कहीं को तो ख़ैरबाद नहीं ॥ ३ ॥
कभी जो याद भी आता हूं मैं तो कहते हैं
के "आज बज़्म में कुछ फ़ितनओ फ़साद नहीं" ॥ ४ ॥
अलावा ईद के मिलती है और दिन भी शराब
गदाए कूचए मैख़ाना ना मुराद नहीं ॥ ५ ॥
जहां में हो ग़मो शादी बहम हमें क्या काम
दिया है हमको ख़ुदा ने वो दिल के शाद नहीं ॥ ६ ॥
तुम उनके वादे का ज़िक्र उनसे क्यौं करो 'ग़ालिब'
यह क्या ! के तुम कहो, और वो कहें के "याद नहीं" ॥ ७॥

(१) क़ियामत (जगाचा शेवटचा दिवस, प्रळय, कल्पांत) वर माझा विश्वास नाहीं, असें नाहीं पण हें मात्र खरें कीं, ह्या विरहाच्या रात्रीपेक्षां तो दिवस भयंकर असेल असें वाटत नाहीं.

(२) लोक म्हणतात कीं, आज आभाळ आलें नाहीं. दारू पिण्यांत मजा येणार नाहीं. असें कसें होईल ? आकाश अभ्राच्छादित नसलें म्हणून काय झालें ? रात्र तर चांदणी आहे ना ? मग मजा कां नाहीं येणार ?

(३) प्रियेची अवकृपा काय सांगावी ? तिच्याकडे जातों तर कधीं सुस्वागत म्हणत नाहीं आणि तिचा निरोप घेतों तर खैरबाद (सुखरूप राहा) असें म्हणत नाहीं.

(४) मैफिलींत ती माझी आठवण काढते, तीसुद्धां कशा पद्धतीनें पाहा. म्हणते काय, आज मैफिलींत कांहीं भांडणतंटा दिसत नाहीं, असें म्हणते (मी मैफिलींत नाहीं म्हणून).

(५) सणवार सोडून इतर दिवशींही आम्हांला दारू मिळते. मद्यालयाच्या इच्छुकांचे प्रयत्न निष्फळ होत नाहींत.

(६) जगांत मंगलकार्यें असोत वा शोककारी घटना असोत, आम्हांला त्याचें काय ? परमेश्वरानें आमचें हृदयच शोकमग्न केलें आहे, त्याला काय करायचें ?

(७) अरे गालिब, तिच्या वचनाचा उल्लेख काय करतोस ? तिला तूं आठवण द्यायची आणि तिनें म्हणायचें, ' मला आठवतच नाहीं ' म्हणून.

९९ . . . तेरे तौसन को सबा बांधते हैं
हम भी मज़मूं की हवा बांधते हैं ॥ १ ॥
आह का किसने असर देखा है
हम भी इक अपनी हवा बांधते है ॥ २ ॥
तेरी फ़ुर्सत के मुक़ाबिल ऐ उम्र !
बर्क़ को पा बहिना बांधते हैं ॥ ३ ॥
क़ैदे हस्तीसे रहाई मालूम
अश्क को बे सरो पा बांधते हैं ॥ ४ ॥
नशए रंग से है वाशुदे गुल
मस्त कब बन्दे क़बा बांधते हैं ॥ ५ ॥
ग़लती हाए मज़ामीं मत पूछ
लोग नाले को रसा बांधते हैं ॥ ६ ॥
अहले तदबीर की वा मान्दगियां
आबलों पर भी हिना बांधते हैं ॥ ७ ॥
सादा पुरकार हैं ख़ूबां ' गालिब '
हमसे पैमाने वफ़ा बांधते हैं ॥ ८ ॥

(१) आम्ही तुझ्या वाहनाची (घोड्याची) स्तुति करीत आहोंत ह्यांतच आमची भाषाशैली खुलत आहे.

(२) आमचे निश्वास प्रभावी कुठें आहेत? पण आम्ही दीर्घ निश्वास सोडून तिच्यावर प्रभाव जमविण्याचा प्रयत्न करीत आहोंत.

(३) हे जीवना, तूं इतका तीव्र गतीचा आणि क्षणभंगुर आहेस कीं, तुझ्यासमोर विजेलाही आम्ही मंदगति (मेहंदी लावून जड पावलानें व काळजीपूर्वक चालणाऱ्या युवती-प्रमाणें) समजतों.

(४) ह्या जीवनाच्या बंधनांतून सुटका नाहीं मग तें जीवन व्यर्थच कां असेना. आतां अश्रूच पाहा. त्यांत कांहीं अर्थ आहे का? पण कवि त्यांना कवितांच्या सुयांतून गुंफतातच कीं नाहीं?

(५) रंग आणि आसक्तीच्या प्रकर्षानें फुलानें बंधनें तोडून उमलण्यास सुरवात केली. नाहींतरी छंद घेतलेलीं माणसें कुठें बंधनांत पडतात?

(६) कवि काय चुका करतील नेम नाहीं. आक्रंदनाला ते आक्रंदन चालू झालें असें लिहितात. पण तें गतिमान् असेल तर त्याला कवितांतून कोंडून कसें ठेवतात.

(७) ह्या शिष्टांचा मूर्खपणा पाहा. जेथें प्रेमवेडे पायाला फोड आले तरी वैराण वाळवंटांत भटकत राहातात, तेथें हे पायाच्या फोडांना मेहेंदी लावीत बसतात. म्हणजे त्यांचें चालणें आणखी अशक्य होऊन बसतें.

(८) काय प्रिया भोळेपणाचा आव आणते आहे. माझ्याशीं एकनिष्ठ राहाण्याचीं वचनें देत आहे आणि तींही आमच्यासारख्या अनुभवी माणसांना. ती एकनिष्ठ राहाणें शक्य नाहीं हें काय आम्हांला कळत नाहीं?

१०० . . . दाइम पड़ा हुआ तिरे दर पर नहीं हूं मैं
ख़ाक ऐसी ज़िन्दगी पे के पत्थर नहीं हूं मैं ।। १ ।।

क्यों गर्दिशे मुदाम से घबरा न जाए दिल?
इन्सान हूं प्याला व साग़र नहीं हूं मैं ।। २ ।।

यारब! ज़माना मुझको मिटाता है किस लिये
लौहे जहां पे हर्फ़े मुकर्रर नहीं हूं मैं ।। ३ ।।

हद चाहिये सज़ा में उकूबत के वास्ते
आख़िर गुनाहगार हूं काफ़िर नहीं हूं मैं ।। ४ ।।

किस वास्ते अज़ीज़ नहीं जानते मुझे ?
लालो ज़मुर्रुदो ज़रो गौहर नहीं हूं मैं ॥ ५ ॥

रखते हो तुम क़दम मिरी आंखों से क्यों दरेग़
रुतबे में मेहरो माह से कमतर नहीं हूं मै ॥ ६ ॥

करते हो मुझको मन्‌ए क़दम बोस किस लिये ?
क्या आसमां के भी बराबर नहीं हूं मैं ? ॥ ७ ॥

' ग़ालिब ' वज़ीफ़ा ख़्वार हो दो शाह को दुआ
वो दिन गये के कहते थे " नौकर नहीं हूं मैं " ॥ ८ ॥

(१) हे प्रिये, तुझ्या दारावर मी कायमचा पडून राहिलेलों नाहीं. कसलें जीवन हें ? त्यापेक्षां तुझ्या उंबरठ्यावरचा दगड बनलों असतों तर बरें झालें असतें. म्हणजे मी कायमचा तुझ्या दारावर पडून राहूं शकलों असतों.

(२) ह्या चिरकालच्या भ्रमंतीनें माझें मन कां घाबरणार नाहीं ? शेवटीं मी तरी मनुष्यच आहें. सदा फिरतींत असणारा मैफिलींतील सुरेचा पेला तर नाहीं ना ?

(३) हा काळ मला पुसून टाकण्याच्या मागें कां लागला आहे ? जगाच्या पाटीवर मी काय दुसऱ्यांदा लिहिलेला आणि म्हणून पुसण्यालायक असा शब्द आहें कीं काय ?

(४) गुन्हे केले तरी शिक्षेला मर्यादा हवी. परमेश्वरा, शेवटीं मी मुसलमान आहें, काफर तर नाहीं ना ?

(५) मी तुला कां आवडूं नये ? तुला संपत्तीचा त्याग करणें आवडतें. मी तरी काय हिरा आहें ? का माणिक आहें ? का मोती आहें ? (धार्मिक कल्पना)

(६) पैगंबरांनीं एका रात्रीं (शबेमेराज) वर जाऊन परमेश्वरप्राप्ति करून घेतली असें म्हणतात. कवि म्हणतो, तुम्ही तर चंद्र आणि सूर्यलोकांवर पाय ठेवून पुढें गेलात. मग माझ्या डोक्यावर पाय ठेवण्यास (माझ्यावर कृपा करण्यास) काय हरकत आहे ? मी काय सूर्यचंद्रापेक्षां कमी आहें काय ?

(७) हे पैगंबरा, शबेमेराजच्या वेळीं आकाशानें तुमच्या पायाचें चुंबन घेतलें मग मलाही तसें कां करूं देत नाहींत ? मी काय आकाशापेक्षां कमी आहें काय ?

(८) हे गालिब, तूं आतां बादशहाचा नोकर आहेस. त्याला दुवा दे. कारण आपल्याला रोजगार नाहीं म्हणून तुला हळहळ वाटण्याचे दिवस, बादशहामुळें नाहींसे झाले आहेत.

१०१ . . . सब कहां कुछ लाला वो गुल्मे नुमायां हो गयीं
ख़ाकमे क्या सूरतें होंगीं के पिन्हां हो गयीं ॥ १ ॥
याद् थीं हम्कोभि रंगारंग् बज़्म् आराइयां
लेकिन् अब् नक़्शोनिगारे ताक़े निस्यां हो गयीं ॥ २ ॥
थीं बनातुन्नाशे गर्दूं दिन्को पर्देमे निहां
शब्को उन्के जीमे क्या आयी के उरियां हो गयीं ॥ ३ ॥
क़ैद्मे याकूब्ने ली गो न यूसुफ़की ख़बर्
लेकिन् आंखें रौज़ने दीवारे ज़िंदां हो गयीं ॥ ४ ॥
सब रक़ीबोंसे हूं नाखुश् पर ज़नाने मिस्रसे
है ज़ुलेख़ा ख़ुश के महवे माहे कनआं हो गयीं ॥ ५ ॥
जूये ख़ून् आंखोंसे बहने दो के है शामे फ़िराक़
मै ये समझूंगा के शम्मे दो फ़रोज़ां हो गयीं ॥ ६ ॥
इन परीज़ादोंसे लेंगे ख़ुल्द् मे हम इंतिक़ाम्
क़ुद्रते हक़्से यही हूरें अगर् वां हो गयीं ॥ ७ ॥
नींद् उस्की है दिमाग़् उस्का है रातें उस्की हैं
तेरी ज़ुल्फ़ें जिस्के शानोंपर् परीशां हो गयीं ॥ ८ ॥
मै चमन्मे क्या गया गोया दबिस्तां खुल् गया
बुल्बुलें सुन्कर् मेरे नाले ग़ज़ल्ख़्वां हो गयीं ॥ ९ ॥
वो निगाहें क्यौं हुयी जाती हैं यारब् दिल्के पार्
जो मेरी कोताहिये क़िस्मत्से मिज़्गां हो गयीं ॥ १० ॥
बस्के रोका मैने और् सीनेमे उभरीं पयेबपये
मेरी आहें बख़ीये चाके गरेबां हो गयीं ॥ ११ ॥
वां गया भी मै तो उनकी गालियोंका क्या जवाब्
याद थीं जित्नीं दुवायें सर्फ़े दरबां हो गयीं ॥ १२ ॥
जांफ़िज़ा है बादा जिसके हाथमें जाम् आगया
सब लकीरें हाथ्की गोया रगेजां हो गयीं ॥ १३ ॥
हम् मुवहिद् हैं हमारा केश है तर्के रुसूम
मिल्लतें जब मिट् गयीं अजज़ाये ईमां हो गयीं ॥ १४ ॥

रंजसे ख़ूगर् हुवा इन्सान् तो मिट् जाता है रंज
मुश्किलें इतनी पडीं मुझपर् के आसां हो गयीं ॥ १५ ॥
यौंहि गर् रोता रहा ग़ालिब तो अये अहले जहां
देखना इन् बस्तियोंको तुम के वीरां हो गयीं ॥ १६ ॥

(१) मृत्युमुखीं पडलेल्या आणि मातीमोल होऊन गेलेल्या सुंदर स्त्रीपुरुषांपैकीं सर्व कांहीं फुलांच्या रूपानें थोडेच प्रकट झाले आहेत. नेहमींकरितां नष्ट झालेली अशी सौंदर्य-सृष्टि कितीतरी असेल.

(२) रसिकांनीं प्रफुल्लित असलेल्या मैफिली आम्हांलाही आठवतात. त्या आठवणीं आतां विस्मृतीच्या कोनाड्यांत जाऊन बसल्या आहेत.

(३) आकाशांत उत्तर दिशेकडील सप्त तारकांना उर्दूंत सात सख्या असें म्हणतात. कवि म्हणतो दिवसां या सात मैत्रिणी पडद्याआड लपल्या होत्या. रात्रीच्या वेळीं त्यांच्या मनांत काय आलें कुणास ठाऊक पडदा सोडून त्या बाहेर पडल्या आहेत.

(४) वरवर असें वाटेल कीं यूसुफ कैदेंत असतांना याकूबनें त्याच्याकडे लक्षच दिलें नाहीं; पण असें जरीं असलें तरी त्याचे डोळे यूसुफकडे अनिमिषपणें तुरुंगांतील भिंतीच्या उघड्या फटीप्रमाणें पाहात होते.

(५) प्रेमिकांना प्रतिस्पर्धी आवडत नाहीं. पण जुलेखाला आपल्या प्रियकराचें—यूसुफचे सौंदर्य सख्यांना दाखवावयाचें होतें. यूसुफ आला तेव्हां जुलेखाच्या सख्या फळें चिरीत होत्या. यूसुफचें सौंदर्य पाहून त्यांचें देहभान हरपलें अन् त्या अवस्थेंत त्यांनीं फळां-ऐवजीं आपलीं बोटें कापून घेतलीं. ही त्यांची मनःस्थिति पाहून जुलेखाला आनंद वाटला. मत्सराची भावना तिला झाली नाहीं. कवि म्हणतो कीं यूसुफच्या सौंदर्यानें तिच्या सख्या मुग्ध झाल्या ह्याचा जुलेखाला आनंद वाटला.

(६) आज विरहाची काळीकुट्ट अवसेची रात्र आहे. माझ्या नेत्रांतून रक्ताच्या धारा वाहूं द्या. माझ्या शोकसागराला प्रदीप्त करणाऱ्या ह्या धारा म्हणजे दोन दिवेच होत असें मी समजेन.

(७) ह्या सुंदरी येथें हातीं लागत नाहींत पण नशिबानें जर कां ह्या स्वर्गांतील हूरी (अप्सरा) बनल्या तर तिथें त्यांचा सूड उगविल्याशिवाय आम्हीं राहाणार नाहीं.

(८) तुझे अलक पाश ज्यांच्या खांद्यावर खेळतील त्यांच्या रात्री, त्यांच्या निद्रा, अन् त्यांचे कल्पनाविलास काय वर्णावे !

(९) मी बागेंत गेलों मात्र, एक मैफिलच तिथें जमली. माझीं आक्रंदनें ऐकून बागेंतील बुलबुल गज़लगायक बनले.

(१०) माझ्या कमनशिबामुळें तिनें नेत्र अर्धेच उघडले. पण त्या अर्धोन्मीलित नेत्रांतील शरसुद्धां हे परमेश्वरा, हृदयाच्या आरपार निघून गेले.

(११) माझे निश्वास मी थांबविण्याचा प्रयत्न करतों परंतु ज्याप्रमाणें कपड्यांचें शिवण उसवून पुन्हां पुन्हां वर यावेत त्याप्रमाणें हे निश्वास पुन्हां पुन्हां उसळून वर येत आहेत.

(१२) प्रियेकडे मी गेलों आणि तिनें माझी निर्भर्त्सना केली तर मी तिला काय उत्तर देणार ? कारण माझ्यापाशीं काकुळतीचे जेवढे म्हणून शब्द होते ते सारे शब्द तिच्या घरच्या पहारेकऱ्याची विनंती करण्यांतच सरून गेले आहेत.

(१३) ज्याच्या हातांत दारूचा पेला आला त्याला नवजीवन प्राप्त झाल्यासारखें आहे. प्राणाच्या सर्वशक्ति त्याच्या हातांतील शिरांतून एकवटल्यासारख्या दिसत आहेत.

(१४) आम्ही एकेश्वरवादी आहोंत. धर्मांचीं अवडंबरें सोडून देणें हा आमचा भाव आहे. होऊन गेलेल्या अनेक संस्कृतीचे जे अवशेष राहिले आहेत ते आमच्या धर्माचे अंग झाले आहेत.

(१५) दुःखांची संवय झाली म्हणजे तें दुःख वाटत नाहीं. माझ्यावर इतकीं संकटें आलीं कीं तीं आतां संकटें वाटत नाहींत.

(१६) गालिबचें रुदन असेंच जर चालू राहिलें तर तुम्ही पाहाल कीं गजबजलेलीं नगरें एक दिवस त्याच्या अश्रूंच्या पुरांत वाहून जातील.

दीवानगीसे दोशपे ज़ुन्नार भी नहीं
१०२ . . . यानी हमारी जेब्मे एक् तार भी नहीं ॥ १ ॥

दिल् को नियाज़े हस्रते दीदार् कर चुके
देखा तो हम्मे ताक़ते दीदार् भी नहीं ॥ २ ॥

मिलना तेरा अगर नहीं आसान् तो सहल् है
दुश्वार् तो यही है के दुश्वार भी नहीं ॥ ३ ॥

बे इश्क़ उमर कट नहीं सकती है और् यां
ताक़त् बक़दरे लज्ज़ते आज़ार् भी नहीं ॥ ४ ॥

शोरीदगीके हातसे है सर् वबाले दोश्
सहरामे अये ख़ुदा कोई दीवार भी नहीं ॥ ५ ॥

गुंजाइशे अदावते अग़यार् यक तरफ़
यां दिल्मे ज़ोफ़से हवसे यारभी नहीं ॥ ६ ॥

डर नालहाये ज़ार्से मेरे ख़ुदाको मान्
आख़िर नवाये मुर्ग़ गिरफ़्तार भी नहीं ॥ ७ ॥
दिलमें है यारकी सफ़े मिज़गांसे रूकशी
हालांके ताक़ते ख़लिशे ख़ार भी नहीं ॥ ८ ॥
इस् सादगीपे कौन न मर्जाये अये ख़ुदा
लडते हैं और् हाथमे तलवार् भी नहीं ॥ ९ ॥
देखा असद्को ख़िल्वतो जल्वत् मे बारहा
दीवाना गर् नहीं है तो हूशियार् भी नहीं ॥ १० ॥

(१) आम्ही प्रियेचे उपासक म्हणजे मूर्तिपूजक आहोंत. आमच्या गळ्यांत जानवें असायला पाहिजे पण प्रेमवेडांत आम्हीं अंगांतून तेंहि काढून टाकलें आहे. आतां अंगावर एक दोरहि शिल्लक राहिला नाहीं.

(२) प्रियेच्या दर्शनाच्या लालसेंत आम्हीं आपलें हृदय देऊन टाकलें पण दर्शनाची वेळ आली तेव्हां आम्हांला समजलें कीं तिच्याकडे पाहाण्याची आमच्यांत शक्ति नाहीं.

(३) तुझें दर्शन अगदीं अशक्य नाहीं आणि अगदीं सोपेंहि नाहीं. म्हणून तर हुरहूर लागली आहे. अशक्यच असतें तर निराश होऊन बसलों असतों. पण ह्या परिस्थितीमुळें हुरहूर मात्र नशिबीं आली आहे.

(४) प्रेमाशिवाय जीवन जगणें अशक्यच आहे. पण प्रेमाचीं दुःखें भोगण्याचीहि आम्हांला शक्ति नाहीं.

(५) प्रेमवेडांत डोकें माझें शरीराला ओझें बनून बसलें आहे. बरें, तें कोठें तरी टेकावें म्हटलें तरी ह्या वाळवंटांत भिंतीचा आसरा कोठें दिसत नाहीं.

(६) प्रतिस्पर्ध्यांचा द्वेष जाऊं द्या. दुर्बलतेमुळें आतां हृदयांत प्रियेच्या आसक्तीलाहि स्थान राहिलें नाहीं.

(७) माझ्या आक्रंदनाकडे लक्ष दे. परमेश्वराची कांहीं भीति मनांत आहे कीं नाहीं. माझीं आक्रंदनें प्रभावीं झाल्याशिवाय राहाणार नाहींत. तीं माझीं आक्रंदनें आहेत. बंधनांत टाकलेल्या पक्ष्याचीं नाहींत.

(८) माझी अशक्तता तरी पाहा. एक कांटा मोडला तरी सहन करण्याची शक्ति नाहीं. पण प्रियेच्या पापण्याचे आघात झेलावे ही दांडगी हौस मनांत बाळगून आहें.

(९) तिच्या साधेपणावर जीव ओवाळून टाकावासा वाटतो. ती भांडायला उठली आहे आणि हातांत कांहीं शस्त्रहि नाहीं.

(१०) आम्हीं गालिबला एकांतांत आणि बाहेर दोन्हीं प्रसंगीं पुष्कळदां पाहिलें आहे. तो वेडा नसेल पण शहाणाहि म्हणतां येणार नाहीं.

१०३ . . . नहीं है ज़ख्म कोई बख़ीयाके दरख़र मेरे तन्मे
हुवा है तारे अश्के यास रिश्ता चश्मे सोज़न् मे ॥ १ ॥

हुयी है माने जौंके तमाशा ख़ाना वीरानी
कफ़े सैलाब् बाक़ी है बरंगे पंबा रोज़न् मे ॥ २ ॥

दौलियत ख़ानये बेदादे काविशहाये मिजगां हूं
नगीने नाम् शाहिद् है मेरा हर क़तरये खूं तनमे ॥ ३ ॥

बयां किस्से हो ज़ुल्मत् गुस्तरी मेरे शबिस्तांकी
शबे माह हो जो रखदें पंबा दीवारोंके रौज़न् मे ॥ ४ ॥

निकोहिश माने बे रब्तीये शोरे जुनूं आयी
हुवा है खंदये अहबाब् बख़ीया जेबो दामन् मे ॥ ५ ॥

हुये उस् मेहरवश् के जल्वये तिमसालके आगे
पुर् अफ़्शां जोहरे आयीनेमे मिस्ले ज़र्रा रौज़नमे ॥ ६ ॥

न जानूं नेक हूं या बद् हूं पर सोहबत् मुख़ालिफ़् है
जो गुल हूं तोहूं गल्ख़न् मे जो ख़स् हूं तो हूं गुलशनमें ॥७॥

हजारों दिल दिये जोशे जुनूने इश्क़ ने मुझको
सियाह होकर सुवैदा हो गया हर क़तरये खूं तन् में ॥ ८ ॥

असद् ज़िंदानीये तासीरे उल्फ़त् हाये ख़बां हो
खुमे दस्ते नवाजिश् हो गया है तौक़ गर्दनमें ॥ ९ ॥

(१) मला प्रेमांत झालेल्या जखमा अशा स्वरूपाच्या आहेत कीं, त्यांना टाके घालणेंहि शक्य नाहीं. त्यामुळें सुईंतील दोरा हा मूर्तिमंत हळहळीचा दोरा बनून गेला आहे.

(२) अश्रूंचे पूर मी याकरितां वाहविले होते कीं त्यांत माझें घर वाहून जावें आणि भिंतीच्या फटींतून मी ती घटना पहावी. पण तें शक्य झालें नाहीं. कारण पुराच्या पाण्यामुळें भिंतीच्या फटी भरून गेल्या; जणूं काय या फटींतून कुणी कापूस भरला आहे त्यामुळें मला माझें घर उध्वस्त होत असलेलें पाहण्याची हौस फेडून घेतां आली नाहीं.

(३) माझ्या हृदयांतील रक्ताचा प्रत्येक बिंदु म्हणजे एक दागिना आहे आणि त्यावर प्रियेनें आपल्या पापण्याद्वारें आपलें नांव कोरून शिक्कामोर्तब केलें आहे. ह्यामुळें माझें हृदय म्हणजे दुसऱ्यांनीं ठेवलेल्या ठेवींचें भांडारच झालें आहे.

१५९ . . . .

(४) माझ्या शोकागारांत पसरलेला अंधार अवर्णनीय आहे. त्यांतील फटींतून कापूस ठेवला तरी चांदणें पसरल्यासारखें वाटतें. गडद अंधारांत साधी पांढरी वस्तुसुद्धां चमकत असल्याचा भास होतो. त्याला उद्देशून ही कल्पना आहे.

(५) माझें प्रेमवेड पाहून माझ्या मित्रांनीं माझी निर्भर्त्सना केली आणि माझ्या वेडावर ते हसले त्यामुळें त्या वेडाच्या भरांत माझे कपडे फाडून टाकावयाचे टाळले.

(६) प्रियेच्या सौंदर्याचें प्रतिबिंब आरशांत पडलें आहे. सूर्यप्रकाशांत धूलीचे कण प्रकाशमान होऊन इतस्ततः फिरत रहावेत तसेंच ह्या सौंदर्यप्रचीतींमुळें आरशाचे कणान् कण इकडे तिकडे विखुरले गेले आहेत.

(७) मी वाईट कीं चांगला हें सांगूं शकत नाहीं. पण वातावरण प्रतिकूल आहे हें मात्र खरें. मी जर फूल आहें तर बागेंत न पडतां कचऱ्यांत जाऊन पडलों आहें आणि कचरा आहें तर बागेंत जाऊन पडलों आहें.

(८) प्रेमवेडाच्या आत्यंतिकतेमुळें माझ्या हृदयांतील रक्ताचा प्रत्येक बिंदु काळा ठिक्कर होऊन डाग बनला आहे.

(९) हे असद्, मी सुंदरीच्या प्रेमप्रभावाचा कैदी बनलों आहें. तिनें माझ्या गळ्यांत आपले बाहूपाश घातले आहेत म्हणजे गळ्याभोंवतीं सांखळीच अडकवली असें झालें आहे.

१०४ . . . मज़े जहांके अपनी नज़र् में ख़ाक् नहीं
सिवाये ख़नेजिगर् सोजिगर् में ख़ाक् नहीं ॥ १ ॥
मगर् ग़ुबार् हुये पर हवा उडाले जाये
वगरना ताबो तवां बालो पर् में ख़ाक् नहीं ॥ २ ॥
ये किस् बिहिश्ते शमायल की है आमद् आमद्
के ग़ैर जल्वये गुल रह गुज़र् में ख़ाक् नहीं ॥ ३ ॥
भला उसे न सही कुछ मुझीको रहम आता
असर् मेरे नफ़से बे असर् में ख़ाक् नहीं ॥ ४ ॥
ख़ियाले जल्वये गुलसे ख़राब हैं मैकश्
शराब ख़ाने के दीवारो दर् में ख़ाक नहीं ॥ ५ ॥
हुआ हूं इश्क़की ग़ारत् गरीसे शर्मिंदा
सिवाये हस्रते तामीर घरमें ख़ाक नहीं ॥ ६ ॥
हमारे शेर हैं अब् सिर्फ़् दिल्लगीके असद्
खुला के फ़ायदा अर्ज़े हुनरमें ख़ाक् नहीं ॥ ७ ॥

(१) माझी प्रत्येक बाबतींत निराशा झाली आहे. जगाचीं वैभवें माझ्या दृष्टींत तुच्छ आहेत. एके काळीं प्रेमवेडांत हृदयाचें रक्त मी पीत होतों पण आतां तेथेंही कांहीं शिल्लक राहिलेलें नाहीं.

(२) बागेपर्यंत उडून जाण्याची शक्ति पंखांत राहिली नाहीं. मेल्यानंतर माझी माती वाऱ्यानें उडून बागेपर्यंत पोहोंचेल तर पोहोंचो.

(३) आज कोणती सुंदरी बागेंत येणार आहे. कारण जिकडे तिकडे फुलांचा सडा पडला आहे. त्यामुळें जमिनीवरची मातीसुद्धां दिसत नाहीं.

(४) माझ्या आक्रंदनानें आणि निश्वासांनीं तिला जरासुद्धां दया आली नाहीं. माझ्या निश्वासांत कांहीं प्रभाव दिसून आला नाहीं. शेवटीं मला स्वतःवरच दया आली आणि मी आपलें आक्रंदन थांबविलें.

(५) मद्यालयांत कांहीं शिल्लक नाहीं. मद्यपी वसंताची बहर पाहाण्याच्या कल्पनेंतच मग्न झालेले आहेत.

(६) प्रेमांत माझें सर्व कांहीं उध्वस्त झालें आहे. आतां ह्या घरांत अतृप्त आकांक्षा आणि हुरहुरीशिवाय कांहींही शिल्लक असें नाहीं.

(७) हे गालिब, माझ्या कविता लोक फक्त करमणूक म्हणून वाचतात. त्या समजण्याची वा समजावून घेण्याची रसिकता त्यांच्यांत नाहीं. मग आपली प्रतिभा दाखवीत फिरण्यांत काय बरें अर्थ आहे.

१०५ . . . दिल् ही तो है न संगोख़िश्त दर्दसे भर न आये क्यौं
रोयेंगे हम् हज़ार बार् कोयी हमें सताये क्यौं ॥ १ ॥
दैर् नहीं हरम नहीं दर नहीं आस्तां नहीं
बैठे हैं रह गुज़र पे हम् ग़ैर हमे उठाये क्यौं ॥ २ ॥
जब् वो जमाले दिल् फ़रोज़् सूरते मेहरे नीमरोज़्
आपही हो नज़्ज़ारा सोज़ पर्देमें मूंह छुपाये क्यौं ॥ ३ ॥
दश्नये ग़मज़ा जांसितां नावके नाज़ बेपनाह
तेराहि अक्से रुख़ सही सामने तेरे आये क्यौं ॥ ४ ॥
क़ैदे हयातो बंदे ग़म् अस्लमें दोनों एक हैं
मौत्से पहले आदमी ग़म्से नजात पाये क्यौं ॥ ५ ॥
हुस्न् और उस्पे हुस्न ज़न् रहगयी बूल्ह हवस् की शरम
अपने पे एतिमाद है ग़ैर् को आज़माये क्यौं ॥ ६ ॥

वां वो ग़ुरूरे इज़्ज़ोनाज़् यां ये हिजाबे पासे वज़्
राहमें हम् मिले कहां बज़्ममें वो बुलाये क्यौं ॥ ७ ॥

हां वो नहीं ख़ुदा परस्त जावो वो बेवफ़ा सही
जिसको हो दीनोदिल् अज़ीज़् उसकी गलीमें जाये क्यौं ॥ ८ ॥

ग़ालिबे ख़स्ता के बग़ैर कौनूसे काम बंद हैं
रोइये ज़ार ज़ार क्या कीजिये हाये हाये क्यौं ॥ ९ ॥

(१) शेवटीं हें हृदय आहे. हें कांहीं दगडधोंडा नव्हे. तें व्यथेनें कां भरून येणार नाहीं ? आम्ही हवा तितका वेळ रुदन करूं. कोणी आमच्या मागें कां बरें लागावें ?

(२) हें कांहीं देऊळ नाहीं कीं मशीद नाही कीं कुणाचें घर नाहीं कीं उबरठा नाहीं. आम्ही वाटेवर बसलों आहोंत. कुणी आम्हांला कां बरें उठवावें येथून ?

(३) तिचें सौंदर्य अप्रतिम आहे. पहाणाऱ्याची दृष्टि जाळून टाकणाऱ्या मध्यान्हीच्या सूर्यासारखें तेजस्वी आहे. जर तिच्याकडे पाहाण्याची कुणालाच शक्ति नाहीं तर तिनें तरी तोंडावर बुरखा घेण्याची काय आवश्यकता आहे ?

(४) तुझ्या नाजनखऱ्याचे खंजीर प्राण हरण करतात. तुझ्या नयनशरापासून कुणी वाचूं शकत नाहीं. तुझ्यासमोर कुणींच उभा राहूं शकत नाहीं. फार काय आरशांतील तुझ्या प्रतिबिंबालाही तुझ्याकडे पाहून आघात होण्याचा संभव आहे.

(५) जीवनाचें बंधन आणि शोकाचें बंधन हीं दोन्हीं वस्तुतः एकच होत. मग मृत्यूच्या पूर्वी शोकांतून मुक्त होण्याची शक्यता कोठून असणार ?

(६) ती जितकी सुंदर तितकाच तिचा आत्मविश्वास दांडगा आहे. आपल्या माऱ्यापुढें कुणी वाचूं शकत नाहीं ह्याची तिला खात्री आहे. मग विनाकारण परीक्षा पहा कशाला ?

(७) तिच्या स्वभावांत अहंकार आणि गर्व आहे आणि आमचा स्वभाव संकोची आणि अभिमानी आहे. आमची गांठ कुठें बरें पडावी आणि तिनें तरी आम्हांला आपल्या मैफिलींत कां बरें बोलवावें ?

(८) ती परमेश्वराची भक्त नाहीं. ती एकनिष्ठ नाहीं. हें माहीत आहे ना ? मग ज्याला धर्म आणि प्राण प्रिय आहेत त्यांनीं तिच्याकडे जायचेंच तरी कशाला ?

(९) गालिब, तुझ्यावांचून कांहीं जगाचे व्यापार अडले नाहींत. मग ही हळहळ आणि हीं आक्रंदनें कशाला बरें ?

गुचये नाशिगुफ़्ता को दूरसे मत दिखा के यौं
१०६ . . . बोसे को पूछता हूं मैं मूंहसे मुझे बता के यौं ॥ १ ॥

पुर्सिशे तर्ज़े दिल्बरी कीजिये क्या के बिन् कहे
उस्के हरएक् इशारेसे निक्ले है ये अदा के यौं ॥ २ ॥

रात्के वक्त् म्ये पिये साथ रक़ीब को लिये
आये वो यां ख़ुदा करे पर् न करे ख़ुदा के यौं ॥ ३ ॥

गैर् से रात् क्या बनी ये जो कहा तो देखिये
साम्ने आन् बैठना और् ये देखना के यौं ॥ ४ ॥

बज़्म्में उसके रूबरू क्यौं न ख़मूश बैठिये
उसकी तो खामुशी में भी है यही मुद्दुवा के यौं ॥ ५ ॥

मैंने कहा के बज़्में नाज़् चाहिये ग़ैर् से तिही
सुन्के सितम् ज़रीफ़ने मुझको उठा दिया के यौं ॥ ६ ॥

मुझसे कहा जो यार्ने जाते हैं होश् किस् तरह
देखके मेरी बेख़ुदी चल्ने लगी हवा के यौं ॥ ७ ॥

कब मुझे कूये यारमें रहनेकी वज़ याद थी
आईना दार् बन् गयी हैरते नक़्शेपा के यौं ॥ ८ ॥

गर् तेरे दिल्में हो ख़ियाले वस्लमें शौक़ का ज़वाल
मौजे मुहीते आबमें मारे है दस्तोपा के यौं ॥ ९ ॥

जो ये कहे के रेख़्ता क्यौंकर हो रश्के फ़ारसी
गुफ़्ता ग़ालिब एकबार पढ़के उसे सुना के यौं ॥ १० ॥

(१) मी चुंबन मागत आहें. न उमललेल्या कळीसारखें तोंड करून चुंबन असें असतें असें सांगण्यांत काय बरें अर्थ आहे! जरा जवळून येऊन प्रात्यक्षिक करून दाखवीत जा.

(२) ती हृदय कसें हरण करते हें तिला काय विचारायचें! तिचा प्रत्येक संकेत हृदय अशा रीतीनें हरण करतात असेंच जणूं सांगत आहे.

(३) रात्रीं प्रतिस्पर्ध्यांना बरोबर घेऊन ती मदिरेचें सेवन करीत होती. तिनें मजकडे यायला हवें होतें; पण प्रतिस्पर्ध्याला घेऊन नव्हे, तर अगदीं एकटेंच.

(४) प्रतिस्पर्ध्याबरोबर कालची रात्र घालविलीस असें विचारतां ती माझ्यासमोर येऊन बसली आणि अशा रीतीनें तिनें माझ्याकडे पाहिलें कीं तिला जणूं असें दाखवावयाचें होतें कीं पहा अशा प्रकारें मीं रात्र कंठली.

(५) मैफिलींत तिच्या समोर गप्प बसणेंच बरें. कारण तीसुद्धां कांहीं बोलत नाहीं. ह्यावरून आम्हीं पण कांहीं बोलूं नये अशी तिची इच्छा दिसते.

(६) तिच्या मैफिलींत मीं म्हटलें कीं येथें कुणी परका असतां उपयोगी नाहीं. पण काय आश्चर्य तिनें मलाच मैफिलींतून उठवून लावलें.

(७) मला प्रियेनें विचारलें कीं शुद्ध हरतें म्हणतात ती कशी तो काय चमत्कार सांगावा. माझी बेशुद्धावस्था पाहून वातावरणसुद्धा बेहोष बनलें.

(८) प्रियेच्या परिसरांत कसें वागावें हें मला कुठें ठाऊक होतें. प्रियेच्या वाटेंतील तिच्या पदचिह्नांनीं मला शिकविलें कीं माझ्यासारखें आश्चर्यमग्न होऊन राहावें.

(९) मीलनानंतर आसक्ति कमी होते. त्या समुद्राच्या लाटा पाहा. समुद्राशीं मीलन झाल्यानंतर त्यांची आसक्ति कमी होऊन त्या किनाऱ्याकडे परत येऊं लागल्या आहेत.

(१०) कुणी म्हणेल कीं फारशीला उर्दूचा हेवा कसा वाटेल! त्याला उत्तर हेंच कीं एकदां गालिबच्या उर्दू कविता वाचून दाखवा म्हणजे मग समजून येईल.

१०७ . . . हसद् से दिल् अगर अफ़्सुर्दा है गरमे तमाशा हो
के चश्में तंग शायद् कसरते नज्ज़ारेसे वा हो ॥ १ ॥
बक़दरे हसरते दिल् चाहिये ज़ौक़े मआसी भी
भरूं यक् गोशये दामन् गर् आबे हफ़्त दरिया हो ॥ २ ॥
अगर् वो सर्वक़द् गर्मे ख़िरामें नाज़् होजावे
कफ़े हर ख़ाके गुल्शन् शक्ले कुमरी नाला फ़रसा हो ॥ ३ ॥

(१) संकुचित वातावरणांत राहिल्यानें मनुष्याला दुसऱ्यांच्याबद्दल हेवा आणि मत्सर वाटूं लागतात. त्या उलट विशाल वातावरणांत वावरल्यानें हेव्यानें संकुचित झालेले डोळे अक्षरशः उघडल्याशिवाय राहात नाहींत.

(२) इतकीं पापें करण्याची मला हुरहूर आहे. पण काय करावें. सात समुद्र भरून जरीं पापें जगांत असलीं तरी त्यांनीं माझ्या अंगरख्याचें एक टोंक भिजेल. माझ्या हुरहुरीच्या मानानें त्यांची संख्या कांहींच नाहीं.

(३) सुरूसारखी उंच आणि सडपातळ अशी ती प्रिया बागेंत येऊं द्या तरी. बागेंतील मातीसुद्धा कुमरी पक्ष्याचा आकार घेऊन तिच्याकरितां आक्रंदन करूं लागेल. कुमरीचें सुरू झाडाबद्दलचें प्रेम हा उर्दू काव्यांतील एक संकेत आहे.

१०८... काबे में जारहा तो न दो ताना क्या कहें
भूला हूं हक़्के सोहबते अहले कुनिश्त को ॥ १ ॥
ताअत् में ता रहे न मये व अंगबीं की लाग्
दोज़ख़मे डाल् दो कोई लेकर् विहिश्त को ॥ २ ॥
हूं मुन्हरिफ़ न क्यौं राहो रस्में सवाबसे
टेढा लगा है क़त् क़ल्मे सरनविश्त को ॥ ३ ॥
ग़ालिब् कुछ अपनी सअीसे कहना नहीं मुझे
ख़िर्मन् जले अगर न मल्ख़ खाये किश्त को ॥ ४ ॥

(१) मी काव्याची माया करूं लागलों तर मला टोमणें मारूं नका. पूर्वी काव्यांतही मूर्ति होत्या ना ? मी मूर्तिपूजकांचा सहवास विसरलों नाहीं असें समजा.

(२) लोक परमेश्वराची आराधना स्वर्गप्राप्तिकरितां करतात आणि ती तरी कशासाठीं तर स्वर्गांत अमृत (मध) मिळतें म्हणून. पण अशी सकाम उपासना काय बरें कामाची ? म्हणून स्वर्गाला उचलून नरकांत फेंकून द्या कसें. म्हणजे ही वासना तरी राहायची नाहीं.

(३) मला पुण्यसंपादनाची भावना तरी कशी व्हावी. परमेश्वरानेंच माझा ललाट-लेख वेडावांकडा लिहिला आहे त्याला मी तरी काय करूं !

(४) प्रयत्न करून त्याचें फळ भोगणें हें माझ्या नशिबांतच नाहीं. टोळधाडीनें माझ्या पिकाचा नाश केला नाहीं तर वीज पडून तीं जळून जायचीं हें मला दिसत आहे.

१०९... वारस्ता इस्से हैं के महब्बतही क्यौं न हो
कीजे हमारे साथ अदावतही क्यौं न हो ॥ १ ॥
छोडा न मुझमे जोफ़ने रंग इख़्तिलात्का
है दिल्पे बार नक्शे महब्बतही क्यौं न हो ॥ २ ॥
है मुझ्को तुझ्से तज़्किरे ग़ैर् का गिला
हरचंद् बर सबीले शिकायत्ही क्यौं न हो ॥ ३ ॥
पैदा हुयी है कहते हैं हर् दरद की दवा
यौं हो तो चारये ग़मे उल्फ़त् ही क्यौं न हो ॥ ४ ॥
डाला न बेकसीने किसीसे मुआमिला
अपूने से खींचता हूं ख़जालत् ही क्यौं न हो ॥ ५ ॥

है आदमी बजाये खुद् एक् महशरे ख़ियाल्
हम अंजुमन् समझते हैं ख़िल्वतही क्यौं न हो ॥ ६ ॥

हंगामये ज़बूनीये हिम्मत है इन्फ़िआल
हासिल्‌ न कीजे दहरसे इब्रतही क्यौं न हो ॥ ७ ॥

वारस्तगी बहानये बेगानगी नहीं
अपनेसे गर न ग़ैरसे वहशत् ही क्यौं न हो ॥ ८ ॥

मिट्‌ता है फ़ौते फ़ुर्सते हस्तीका ग़म् कोई
उम्रे अजीज़् सर्फ़े इबादत्‌ही क्यौं न हो ॥ ९ ॥

उस् फ़ित्ना खूके दरसे अब् उठते नहीं असद्
उसमे हमारे सर्‌पे क़ियामत ही क्यौं न हो ॥ १० ॥

(१) माझ्याशीं प्रेम करावयाचें नसेल तर नको करूंस, द्वेष कर पण कोणत्याही परिस्थितींत आपला संबंध मात्र तोडूं नकोस.

(२) मी इतका शक्तिहीन झालों आहें कीं प्रकृतींत प्रेमाची भावना शिल्लक राहिली नाहीं. आतां हृदयाला प्रेमाच्या आठवणीचेंही ओझें वाटूं लागलें आहे.

(३) तूं परक्याच्या गोष्टी मला सांगतेस ह्यावर माझा आक्षेप आहे. मग त्यांचीं गाऱ्हाणीं म्हणून कां होईना त्यांचा उल्लेख तूं करतेस ना. तो उल्लेखही मला नको आहे.

(४) प्रत्येक रोगाला औषध आहे असें म्हणतात तें खरें वाटत नाहीं. असें असतें तर प्रेमरोगाला औषध कां लाभत नाहीं ?

(५) मी लाचार अन् निराश्रित आहें पण दुःखांत सुख एवढेंच कीं मी कुणाकडे पदर पसरून एकाही कणाचा ऋणाईत झालों नाहीं. मी कुणाचा शरमिंधा असा पण नाहीं. असलोंच तर स्वतःचा आहें.

(६) मनुष्य हा एकटा असला तरी त्याच्या मनांत विचारांची आणि कल्पनांची गर्दी उसळत असते म्हणून माझा एकांत हा एकांत आहे अशी जर समजूत झाली असेल तर ती चुकीची आहे. ती मैफिलच म्हणावयास हवी.

(७) कुणाचे उपकार घेणें म्हणजे आपल्या दुर्बळतेचें लक्षण आहे. काळापासून धडा किंवा बोध घेऊं नये कारण तोही एक उपकारच नाहीं का ?

(८) जगापासून पळून जाणें हें स्वातंत्र्य अगर मुक्ति नव्हे. स्वार्थापासून मुक्त होणें हें स्वातंत्र्य-संसाराशीं संबंध तोडल्यानें नव्हे.

(९) सगळें आयुष्य परमेश्वराची आराधना करण्यांत घालविलें तरी आयुष्य हळूहळू नाश पावत असल्याची जाणीव दुःखदायक वाटतेच.

(१०) त्या चंचलेच्या दारावरून आम्ही आतां हालत नाहीं. मग आमच्यावर त्यासाठीं कल्पांत कोसळला तरी चालेल.

११० . . .
क़फ़स् मे हूं गर अच्छा भी न जानें मेरे शेवन् को
मेरा होना बुरा क्या है नवा संजाने गुल्शन को ॥ १ ॥
नहीं गर हम् दमी आसां न हो ये रश्क क्या कम् है
न दी होती ख़ुदाया आरज़ूये दोस्त दुश्मन् को ॥ २ ॥
न निकला आंखसे तेरी एक् आंसू उस जराहत् पर
किया सीने मे जिसने ख़ूंचकां मिज़्गाने सोज़न् को ॥ ३ ॥
ख़ुदा शरमाये हाथोंको के रखते हैं कशाकश्मे
कभी मेरे गरेबांको कभी जानांके दामन को ॥ ४ ॥
अभी हम् क़त्लगह का देखना आसां समझते हैं
नहीं देखा शिनावर जूये ख़ूं मे तेरे तौसन् को ॥ ५ ॥
हुवा चर्चा जो मेरे पांवकी ज़ंजीर बन्ने का
किया बेताब कान् मे जुंबिशे जौहर्ने आहन् को ॥ ६ ॥
ख़ुशीक्या खेतपर् मेरे अगर् सौबार् अब्र आवे
समझ्ता हूं के ढूंढे है अभीसे बर्क़ खिर्मन् को ॥ ७ ॥
वफ़ादारी बशर्ते उस्तुवारी अस्ले ईमां है
मरे बुत्ख़ाने मे तो कावे मे गाडो ब्रेहेमन को ॥ ८ ॥
शहादत् थी मेरी किस्मत्मे जो दी थी ये ख़ू मुझ्को
जहां तल्वार्को देखा झुका देता था गर्दन् को ॥ ९ ॥
न लुट्ता दिन्को तो कब् रात्को यौं बेखबर् सोता
रहा खट्का न चोरीका दुवा देता हूँ रहज़न् को ॥ १० ॥
सुखन् क्या कह नहीं सक्ते के जोयां हों जवाहरके
जिगर् क्या हम नहीं रखते के खोदें जाके मादिन् को ॥ ११ ॥
मेरे शाहे सुलेमां जाह् से निस्बत् नहीं ग़ालिब्
फ़रीदूं व जम् व कैख़ुस्रौ व दाराब् व बहमन् को ॥ १२ ॥

(१) मी पिंजऱ्यांत अडकून पडलों आहें. माझीं शोकगीतें आवडलीं नाहींत तरी स्वतंत्र आणि संतुष्ट व मुक्त कंठांनीं गाणाऱ्या बागेंतील पक्ष्यांनीं मला वाईट कां म्हणावें हें मला समजत नाहीं.

(२) प्रतिस्पर्धी माझा मित्र होऊं शकत नाहीं हें खरेंच. ह्याचें वाईट वाटत नाहीं. पण परमेश्वरा, प्रतिस्पर्ध्याच्या मनांत प्रियेच्या सहवासाची आकांक्षा कां उत्पन्न केलीस ? ती आकांक्षा त्याला दिली नसतीस तर मला त्याचा मत्सर वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें.

(३) माझ्या हृदयांतील जखमांचे टांके शिवतांना सुईच्या पापण्यासुद्धां रक्तानें भरून आल्या (सुईला सुद्धा रक्त लागलें). पण हे निर्दये, तुझ्या डोळ्यांत अश्रूंचा एक बिंदू-सुद्धा दिसला नाहीं.

(४) माझे हात सारखे ओढाताणींत गुंतलेले असतात. कधीं प्रियेचा अनुनय करीत असतांना तिचा पदर ओढण्यांत गुंतलेले असतात. तर कधीं विरहावस्थेंत माझ्याच अंगावरचे कपडे फाडण्यांत गुंतलेले असतात. सारांश त्यांची चुळबुळ ही सारखी चालूच असते. ह्या त्यांच्या अस्वस्थतेची मला लाज वाटते.

(५) वधस्थान अगदीं साधारण असेल असें आम्हांला वाटतें. कारण आम्हीं तें अद्याप पाहिलेलें नाहीं. तेथें प्रियकरांच्या हृदयाच्या चिंधड्या उडाल्या आहेत. रक्ताचे पाट वाहताहेत आणि त्यांत तुझा तुफान आणि विजयी घोडा रक्ताच्या नद्यांतून पोहत चालला आहे. हें भयंकर दृश्य आम्हीं पाहिलें आहे कुठें ?

(६) माझ्या पायांत शृंखला पडणार ही बातमी समजतांच खाणींतील लोखंडांत एकच खळबळ उडाली; आणि हें भाग्य आपल्यापैकीं कुणाला लाभतें हें जाणून घेण्याकरितां त्यांच्यांत अस्वस्थता निर्माण झाली.

(७) माझ्या शेतावर शंभरदां ढग आले तरी मला त्यांत काय आनंद वाटायचा ? उलट माझीं पिकें जाळायला मिळतील म्हणून आतांपासूनच वीज ढगाआडून माझें शेत न्याहाळून पहाण्याकरितां आली असेंच मी समजतों.

(८) कोणत्याही गोष्टींत श्रद्धा आणि निष्ठा ह्यांचें महत्त्व आहे. ब्राह्मण मूर्तिपूजक खरा पण त्यांतही त्यानें अतुल निष्ठा आणि श्रद्धा दाखविली आहे. मग त्याला मृत्यूनंतर काब्यापाशीं जागा देण्यास काय हरकत आहे ?

(९) बळी जाणें हेंच माझ्या नशिबांत असलें पाहिजे नाहींतर कुठेंही तलवार दिसली कीं माझ्या मानेला आपोआप वाकण्याची सवय लागली नसती.

(१०) दिवसा चोरांनीं माझें घर लुटून नेलें त्यामुळें रात्रीं निश्चिंत झोंप येत आहे. आतां चोरांची भीति राहिली नाहीं ह्याकरितां मी चोरांना दुवा देत आहें.

(११) आम्ही काय वाङ्मयरत्नें उधळूं शकत नाहीं. आम्हीं रत्नाचा हव्यास कां बरें धरावा? आमच्या हृदयांत साहित्य-सोन्याची खाण आहे. इतर खाणींच्या मागें आम्हीं कां बरें लागावें?

(१२) सुलेमान, फरीदून, जमशीद, कैखुसू, दारा, वहमन इत्यादि प्राचीन काळचे राजे माझे बादशहा वहादूरशहा यांच्या पासंगालाही लागत नाहींत.

१११ . . . धोता हुं जव् मैं पीने को उस् सीमतन्के पांव्
रखता है ज़िद्से खींचके बाहर लगन् के पांव् ॥ १ ॥
दी सादगीसे जान् पडूं कोहूकन् के पांव
हैहात् क्यौं न टूट गये पीरज़न् के पांव ॥ २ ॥
भागे थे हम बहोत् सो उसीकी सज़ा है ये
होकर् असीर दाबते हैं राहज़न् के पांव ॥ ३ ॥
मरहम् की जुस्तजू मे फिरा हूं जो दूर दूर्
तन्से सिवा फ़िगार् हैं इस् खस्तातन् के पांव ॥ ४ ॥
अल्लाहरे ज़ौके दश्ते नवर्दी के बाद मर्ग्
हिलते है खुद् बखुद् मेरे अंदर् कफ़न् के पांव ॥ ५ ॥
है जोशे गुल् बहार मे या तक के हर तरफ़
उड़ते हुये उलझते हैं मुर्ग़ चमन के पांव ॥ ६ ॥
शब् को किसीके ख्वाब् मे आया न हो कहीं
दुखते हैं आज उस् बुते नाज़ुक् बदन् के पांव ॥ ७ ॥
ग़ालिब् मेरे कलाममे क्यौं कर् न हो मज़ा
पीता हुं धोके खुस्रवे शीरीं सुख़न् के पांव ॥ ८ ॥

(१) त्या सुंदरीचें चरणामृत प्राशन करण्याच्या इच्छेनें तिचे पाय धुवावे म्हणतों तर तिला माझ्या प्रेमाचा इतका तिटकारा आहे कीं ती आपले पाय मागें खेंचून घेते.

(२) अरेरे, फरहादला म्हातारीनें शीरीनच्या मृत्यूची खोटी बातमी देऊन कसें फसविलें! त्या बातमीमुळें फरहादनें आत्महत्या केली. त्या म्हातारीचे पाय वाटेंतच तुटून कां बरें पडले नाहींत. म्हणजे फरहादची अशी दुर्दशा झाली नसती.

(३) चोर लुटतील ह्या भीतीनें आम्ही पळून गेलों. त्याचेंच फळ म्हणून त्याच चोरांच्या तावडींत सांपडून आम्ही आज त्यांचे गुलाम बनलों आहोंत.

(४) आमची दुर्दशा काय बरें सांगावी ! जखमांना मलम शोधण्याकरितां आम्ही इतके भटकलों कीं त्या जखमांपेक्षांही भयंकर अशा भेगा आमच्या पायाला पडल्या आहेत.

(५) प्रेमवेडांत रानोमाळ भटकण्याची हद्द झाली. हें वेड इतकें वाढलें आहे कीं मृत्यूनंतरही कफनाच्या आंत माझे पाय चुळबूळ करीत आहेत.

(६) ह्या वर्षी वसंतऋतूंत फुलांना इतका बहर आला आहे कीं उडणाऱ्या पक्ष्यांचे पाय फुलांत अडकूं लागले आहेत.

(७) नाजूक प्रियेचे पाय आज कां बरें दुखत आहेत. ती कुणाच्या तरी स्वप्नांत चालत तर गेली नसेल ना ?

(८) माझ्या काव्यांतून अमृत कां बरें स्रवणार नाहीं ? मधुरवाणीच्या कविसम्राट खुस्रौचे पाय धुऊन तें चरणामृत मी प्राशन करीत आहें ना ?

११२ . . . वां उसको हौलदिल् है तो यां मै हूं शरम् सार्
यानें ये मेरी आहकी तासीर् से न हो ॥ १ ॥
अपने को देख्ता नहीं ज़ौक़े सितम् को देख्
आयीना ता के दीदये नख़्चीर से न हो ॥ २ ॥

(१) आज प्रिया अस्वस्थ आहे. माझ्या विश्वासामुळें तर तिला हा त्रास होत नाहींना ह्या कल्पनेनें मीच लाजेनें अर्धमेला झालों आहें.

(२) प्रियेची हौस तर पहा. तिला शृंगार करण्यास आरसा नको आहे. प्रियकराच्या शिकार बनलेल्या डोळ्यांना आरसा समजून त्यांच्या समोर शृंगारानें नटण्याची तिला हौस वाटते आहे.

११३ . . . वां पहोंचकर् जो ग़श् आता पैहम है हम्को
सद्रहे आहंगे जमींबोस क़दम् है हम्को ॥ १ ॥
दिल्को मैं और मुझे दिल् महवे वफ़ा रखता है
किस् क़दर् ज़ौक़े गिरफ़्तारीये हम् है हम्को ॥ २ ॥
ज़ोफ़से नक़्शे पये मोर है तौक़े गरदन्
तेरे कूचेसे कहां ताक़ते रम् है हम्को ॥ ३ ॥
जान्कर् कीजे तग़ाफ़ुल् के कुछ उम्मीद भी हो
ये निगाहे ग़लत् अंदाज़् तो सम् है हम्को ॥ ४ ॥
रश्के हम् तरही व दर्दे असरे बांगे हज़ीन्
नालये मुर्ग़ी सहर तेग़े दोदम् है हम्को ॥ ५ ॥

सर उडानेके जो वादेको मुकर्रर् चाहा
हंस्के बोले के तेरे सर्की क़सम् है हम्को ॥ ६ ॥
दिल्के खूं करनेकी क्या वजह व लेकिन् नाचार
पासे बेरौनक़ीये दीदा अहम् है हम्को ॥ ७ ॥
तुम् वो नाजुक्के खुमूशीको फ़ुग़ां कहते हो
हम् वो आजिज़् के तग़ाफ़ुल भी सितम् है हम्को ॥ ८ ॥
लखनऊ आनेका बाइस नहीं खुल्ता यानी
हवसे सैरो तमाशा सो वो कम् है हम्को ॥ ९ ॥
मक़्तये सिल्सिले शौक़् नही है ये शहर्
अज़्मे सैरे नजफ़ व तौफ़े हरम् है हम्को ॥ १० ॥
लिये जाती है कहीं एक् तवक़्को ग़ालिब्
जादये रहे कशिशे काफ़े करम् है हम्को ॥ ११ ॥

(१) प्रियेपाशीं पोहोंचल्यावर मला घेऱ्यावर घेऱ्या येत आहेत अन् मी जमिनीवर पडत आहें. ह्या निमित्तानें तरी पायाखालच्या जमिनीचें मला चुंबन घेण्यास मिळत आहे. इतका मला प्रियेच्या दर्शनानें आनंद झाला आहे.

(२) मी हृदयाच्या तावडींत आणि हृदय माझ्या तावडींत सांपडलें आहे. प्रेमामुळें आम्हां दोघांनाही बंधनाची किती ओढ आहे, हें ह्यावरून दिसून येईल.

(३) मी इतका निःशक्त झालों आहें कीं मुंग्यांच्या पावलांचीं चिन्हें सुद्धा माझ्या शरीराला भार वाटूं लागलीं आहेत. मग मला तुझ्यापासून निघून जाण्याची शक्ति कुठून बरें असणार ?

(४) जाणूनबुजून तूं दुर्लक्ष केलेंस तरी हरकत नाहीं. त्यांत मी तुझा प्रियकर आहें. ह्याचा भास तरी होईल. पण अगदीं अपरिच्तितासारखा दृष्टिक्षेप नको करूंस. आपण त्या गांवचे नाहीं असें वागणें मला खरोखरच विषतुल्य वाटतें.

(५) प्रभातकाळच्या पक्ष्यांचें कूजन मला दुधारी तलवारीसारखें वाटतें. एकतर तो पक्षी माझा प्रतिस्पर्धी आहे कीं काय असें वाटतें. दुसरें म्हणजे त्याचें व्यथित आणि तळमळीचें कूजन मला ताप देत आहे.

(६) माझें शिरकाण करणार होतीस ना म्हणून मी तिला तिच्या वचनाची आठवण करून दिली. तर ती हसून म्हणते काय कीं तें कसें बरें शक्य होईल ! मी तुझ्या डोक्याची शपथ घेतली आहे ना. मग मी तुझें शीर कसें बरें उडवीन !

(७) हृदयाचें रक्त डोळ्यांत आलें नाहीं तर डोळ्यांना अवकळा येते म्हणून तर आम्हांला आमचें हृदय रक्तरंजित करावें लागलें आहे.

(८) तुझी स्थिति अशी आहे कीं आम्ही गप्प राहिलों तरी तुला तें आमचें आक्रंदन वाटतें आणि आम्ही इतके असहाय कीं तुझी उपेक्षा म्हणजे आम्हांला मोठा जुल्म वाटतो.

(९) आम्ही लखनौला कां आलों तें कांहीं कळत नाहीं. बरें, प्रवासाची हौस म्हणावी तर ती कांहीं आम्हांला विशेष नाहीं.

(१०) लखनौमध्यें आमचा प्रवास पूर्ण झाला असें नाहीं. आम्हांला अजून करबला आणि मक्केची यात्रा पूर्ण करावयाची आहे.

(११) आम्ही कुठेंही गेलों तरी बरोबर आशा घेऊन जातों. करम (कृपा) शब्दांतील ' क ' हें अक्षर आमचें लक्ष्य बनलें आहे. (आपल्या पेन्शनीच्या प्रकरणाकरितां गालिबनें कलकत्त्याचा प्रवास केला होता त्याला उद्देशून ही ओळ आहे.)

११४ . . . तुम् जानो तुम्को ग़ैर्से जो रस्मो राह हो
मुझ्कोभि पूछते रहो तो क्या गुनाह हो ॥ १ ॥
बचते नहीं मुआख़िज़ये रोज़े हश्र्से
क़ातिल् अगर रक़ीब है तो तुम् गवाह हो ॥ २ ॥
क्या वो भि बेगुनाह कुश् व हक् नाशिनास् हैं
माना के तुम् बशर् नहीं ख़ुर्शीदो माह हो ॥ ३ ॥
उभरा हुआ नक़ाब् मे है उनके एक तार
मरता हूं मैं के ये न किसीकी निगाह हो ॥ ४ ॥
जब् मैकदा छुटा तो फिर् अब् क्या जगह कि कैद
मस्जिद् हो मदरिसा हो कोई ख़ानक़ाह हो ॥ ५ ॥
सुन्ते हैं जो बिहिश्तकी तारीफ़ सब दुरुस्त
लेकिन् ख़ुदा करे वो तेरी जल्वा गाह हो ॥ ६ ॥
ग़ालिब् भी गर् न हो तो कुछ ऐसा ज़रर् नहीं
दुनिया हो यारब और् मेरा बादशाह हो ॥ ७ ॥

(१) दुसऱ्याशीं तुझे काय संबंध असतील ते असोत पण माझी विचारपूस केलीस तर कांहीं गुन्हा होणार आहे काय ?

(२) कल्पांताच्या वेळीं तूं परमेश्वराच्या निर्णयांतून सुटून जाऊं शकत नाहींस. तूं आपल्या प्रतिस्पर्ध्याकडून माझा वध करविलास. मी कांहीं वध केला नाहीं असें म्हणून तूं सुटून जाऊं शकणार नाहींस. कारण वध त्यानें जरी केला असला तरी तूं साक्षीदार होतीसच कीं.

(३) मला चंद्रसूर्य म्हण, माणूस म्हणूं नकोस ; असा तुझा आग्रह आहे. पण हें सांग कीं चंद्र आणि सूर्य काय तुझ्यासारखे निरपराधी लोकांना पीडा देतात ? कां अन्यायाची दाद घेत नाहींत ?

(४) तिच्या बुरख्यावर मला एक तंतु दिसतो तो कुणा प्रतिस्पर्ध्याच्या दृष्टीचा तर तंतू नसेल ना.

(५) मद्यालयच सुटलें तर जागेचें बंधन आम्हांला काय होय. मग मशीद, मठ, शाळा आणि दरगा हीं आम्हांला सर्व सारखींच आहेत. कुठेंही पिण्याची आमची तयारी आहे.

(६) लोक स्वर्गाची तारीफ करतात म्हणून तिथें तूं पाहिजेस. तिथें जर तूं नसलीस तर तो स्वर्ग आम्हांस तुच्छ होय.

(७) मी नसलों तरी चालेल पण हें जग मात्र असावें आणि आमचा बादशहाही दीर्घायु असला तरी पुरे.

११५ . . . गयी वो बात् के हो गुफ़्तगू तो क्यौंकर हो
कहे से कुछ न हुवा फिर कहो तो क्यौंकर हो ॥ १ ॥
हमारे ज़हन् मे उस फ़िकर् का है नाम् विसाल
के गर् न हो तो कहां जायें हो तो क्यौंकर हो ॥ २ ॥
अदब् है और यही कशमकश् तो क्या कीजे
हया है और यही गोमगो तो क्यौंकर हो ॥ ३ ॥
तुम्ही कहो के गुज़ारा सनम् परस्तोंका
बुतोंकी हो अगर ऐसीहि ख़ू तो क्यौंकर हो ॥ ४ ॥
उलझते हो तुम् अगर देखते हो आयीना
जो तुम्से शहरमे हों एक दो तो क्यौंकर हो ॥ ५ ॥
जिसे नसीब हो रोज़े सियाह मेरा सा
वो शख़्स् दिन् न कहे रातको तो क्यौंकर हो ॥ ६ ॥
हमें फिर उनसे उम्मीद् और उन्हें हमारी क़दर
हमारी बात ही पूछें न वो तो क्यौंकर हो ॥ ७ ॥
ग़लत् न था हमें ख़तपर गुमां तसल्लीका
न माने दीदये दीदार जो तो क्यौंकर हो ॥ ८ ॥
बताव उस मिज़्ह को देखकर के मुझको क़रार
ये नेश हो रगे जां में फ़िरो तो क्यौंकर हो ॥ ९ ॥

मुझे जुनूं नहीं ग़ालिब् वले बक़ौले हुज़ूर
फ़िराक़े यार में तस्कीन् हो तो क्योंकर हो ॥ १० ॥

(१) तिची जर गांठ पडली तर बोलणें-चालणें करूं असें वाटलें होतें. पण गांठ पडून बोललों तरी त्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं. आतां उपाय काय ?

(२) आमच्या मनांत फक्त मीलनाची चिंता आहे. हें मीलन कसें घडावें आणि घडलें नाहीं तर काय करावें हीच एक काळजी मनाला लागून राहिली आहे.

(३) माझ्या मनांत तिच्याबद्दल आदर आहे. दुसरीकडे तिच्याबद्दलची ओढ आहे अशी माझ्या मनाची ओढाताण चालली आहे. तिकडे प्रियेचा स्वभाव संकोची आहे त्यामुळें तीही कसें बोलावें, काय बोलावें ह्या विचारानें बुचकळ्यांत पडली आहे.

(४) हे प्रिये, जगांतील सर्व तरुणींचा स्वभाव तुझ्यासारखाच असेल तर प्रियकरांची काय स्थिति होत असेल !

(५) अगे, आरशांत प्रतिबिंबित झालेल्या स्वतःच्या सौंदर्याचा तुला मत्सर वाटतो. मग तुझ्यासारख्या एक-दोन सुंदर स्त्रिया गांवांत असल्या तर विचारायला नको.

(६) माझ्यासारखी आपत्ति अन् संकटांचा गडद अंधार ज्यांच्यासमोर पसरला आहे त्यानें रात्रीला दिवस म्हणूं नये. (संकटांच्या अंधारासमोर रात्रही दिवसाप्रमाणें प्रकाशमान वाटते) तर काय करावें.

(७) ती आमच्याशीं बोलायला तयार नाहीं तर तिला आमची कदर काय कळणार आणि आम्ही तरी तिच्यापासून कोणती आशा बरें बाळगावी.

(८) तिचें पत्र आल्यानें मनाला समाधान होईल ही अपेक्षा खरी ठरली; पण डोळे तिच्या दर्शनाचे भुकेले राहिले त्याला काय करावें !

(९) प्रियेच्या पापण्या पहा आणि मग सांगा कीं ह्या पापण्याचे कांटे ज्याच्या नसानसांत बसले आहेत त्याला स्वस्थता कशी लाभावी !

(१०) मी कांहीं वेडा नाहीं. पण प्रियेच्या विरहांत मला स्वस्थता मिळूं शकते हें कसें शक्य आहे.

किसी को देके दिल् कोई नवासंजे फ़ुग़ां क्यौं हो
११६ . . . न हो जब् दिलहि सीने मे तो फिर् मुंह में ज़बां क्यौं हो ॥ १ ॥
वो अपूनी ख़ू न छोड़ेंगे हम् अपनी वज़ा क्यौं छोड़ें
सबुक् सर् बन्के क्या पूछें के हम्से सरगरां क्यौं हो ॥ २ ॥
किया ग़म् ख़्वारने रुसवा लगे आग इस महब्बत् को
न लाये ताब् जो ग़म्की वो मेरा राज़्दां क्यौं हो ॥ ३ ॥

वफ़ा कैसी कहांका इश्क़ जब सर् फोडना ठहरा
तो फिर अये संगदिल् तेराही संगे आस्तां क्यौं हो ॥ ४ ॥
कफ़स् मे मुझसे रुदादे चमन् कहते न डर हमदम्
गिरी है जिस्पे कल् बिजली वो मेरा आशियां क्यौं हो ॥ ५ ॥
ये कह सकते हो हम् दिल् मे नहीं हैं पर ये बतलावो
के जब् दिल्मे तुम्हि तुम् हो तो आंखोंसे निहां क्यौं हो ॥ ६ ॥
गलत् है जज़्बे दिल्का शिकवा देखो जुर्म किस्का है
न खींचो गर तुम् अपनेको कशाकश् दरमियां क्यौं हो ॥ ७ ॥
ये फ़ित्ना आदमीकी ख़ाना वीरानी को क्या कम है
हुये तुम् दोस्त जिस्के दुश्मन् उसका आसमां क्यौं हो ॥ ८ ॥
यही है आज़माना तो सताना किस्को कहते हैं
अदूके हो लिये जब् तुम् तो मेरा इम्तिहां क्यौं हो ॥ ९ ॥
कहा तुम्ने के क्यौं हो ग़ैर् के मिलनेमे रुसवाई
बजा कहते हो सच कहते हो फिर कहियो के हां क्यौं हो ॥ १० ॥
निकाला चाहता है काम क्या तानोंसे अय ग़ालिब्
तेरे बेमेहर कहनेसे वो तुझपर् मेहरबां क्यौं हो ॥ ११ ॥

(१) एखाद्याला आपलें हृदय अर्पण केल्यानंतर मग तक्रार आणि रुदन कशाकरितां ? आपल्यापाशीं जर हृदय शिल्लक नाहीं तर वाणीचा उपयोग तरी काय ?

(२) ती आपला जुल्म करण्याचा स्वभाव सोडीत नाहीं. आम्ही आपला स्वाभिमान सोडीत नाहीं. मग तूं आमच्यावर कां बरें चिडतेस हें विचारून आम्हीं आमची अप्रतिष्ठा कां करून घ्यावी.

(३) माझ्या मित्रांनींच माझ्या प्रेमाचा स्फोट करून माझा दुर्लौकिक केला. माझ्या शोकाचें रहस्य ज्यांना संभाळतां येत नाहीं त्या मित्रांची मैत्री कसली ?

(४) कसलें प्रेम आणि कसली निष्ठा ! हे पाषाणहृदये, डोकें फोडून घ्यायचें ठरविल्यावर मला तुझ्याच उंबरठ्याचा दगड कशाला हवा ?

(५) मित्रा, मी बंधनांत आहें, आणि तूं स्वतंत्र आहेस. बागेंत काय घडलें हें मला मोकळ्या मनानें सांग. घाबरू नकोस. अरे काल बागेंत वीज कडाडली ती माझ्या घरट्यावरच पडली हें कशावरून ? दुसऱ्या कुणाचें तें घरटें असेल.

(६) मी तुझ्या हृदयांत नाहीं हें तर तूं म्हणूं शकत नाहींस आणि मग हृदयांत तूंच आहेस तर माझ्या डोळ्यांसमोर कां नाहींस हें सांगशील कीं नाहीं ?

(७) तुझ्याकडे मी आकर्षिली जात आहें ही तुझी तक्रार रास्त नाहीं. ह्यांत माझा दोष नाहीं. तूं प्रतिकार करते आहेस, मागेंपुढें करीत आहेस म्हणूनच ना, ही ओढाताण चालली आहे.

(८) तुझी मैत्री म्हणजे उध्वस्त होण्याची पूर्वतयारी. ती पुरे नाहीं का. मग काळानेंही अशा माणसाशीं वैर कां बरें धरावें ?

(९) तूं माझ्याशीं कायमचें वैर पत्करलेंस तर माझ्या प्रेमाची परीक्षा काय बघतेस आणि तूं जें करतेस ती परीक्षा तर पीडिणें कशाला म्हणायचें ?

(१०) प्रतिस्पर्ध्यांशीं भेटूं नकोस त्यांत फजिती आहे असें मीं तिला म्हटलें तेव्हां ती चिडून म्हणते काय कीं ह्यांत फजिती कसली ? ह्यावर काय म्हणावयाचें ? तूं जें जें म्हणतेस तें ठीक आहे हेंच म्हणावें झालें.

(११) हे गालिब, टोमणे मारून आणि टोचून बोलून कां ती तुला वश होणार आहे ?

११७ . . . रहिये अब् ऐसी जगे चलकर् जहां कोई न हो
हम् सुख़न् कोई न हो और् हम् ज़बां कोई न हो ॥ १ ॥
बेदरो दीवार्सा एक घर बनाया चाहिये
कोई हमसाया न हो और पासबां कोई न हो ॥ २ ॥
पडिये गर बीमार तो कोयी न हो तीमारदार
और अगर मर जाइये तो नौहाख़्वां कोई न हो ॥ ३ ॥

(१) हे हृदया, चल आपण कोठेंतरी लांब आणि निर्जन जागीं राहूं. तिथें आपल्याशीं कुणी बोलणारा किंवा आपलें बोलणें ऐकणारा नको.

(२) दारें आणि भिंती नसलेलें असें एक घर आपण बनवूं. आपल्याला कुणी रखवालदार नको आणि कुणी शेजारी नको.

(३) अशा ठिकाणीं आजारी पडलों तर शुश्रूषा करणारा कुणी नको अन् मृत्यु आला तर आपल्याकरितां रुदन करणाराही कुणी नको.

११८ . . . अज़ मेहर तावज़र्रये दिल् व दिल है आयीना
तूती को शश जिहत्से मुक़ाबिल है आयीना ॥ १ ॥

(१) सूर्यापासून धुळीच्या कणापर्यंत सर्वत्र आत्माच आहे. अन् हा आत्मा म्हणजे आरसा असून त्याचा अनुभव करणें म्हणजे पोपटानें आरशांत आपलें प्रतिबिंब चहूंकडे पाहाण्यासारखें आहे. उर्दू काव्यांत पोपट आणि आरसा ह्यांचें प्रेम हा कविसंकेत आहे.

११८ (अ)... है सब्ज़ाज़ार हर दरोदीवारे ग़म्कदा
जिसकी बहार ये हो फिर उसकी ख़ज़ां न पूछ ॥ १ ॥

नाचार बेकसी की भी हसरत् उठाइये
दुश्वारीये रह व सित्मे हमरहां न पूछ ॥ २ ॥

(१) आमच्या घरावर ठिकठिकाणीं गवत उगवलें आहे (घर बेचिराग झाल्याचें हें लक्षण होय) ज्याचा वसंतऋतु इतका भयानक तर हिंवाळा कसा असेल ह्याची कल्पना केलेली बरी.

(२) आधींच रस्ता वाईट त्यांत सोबती मिळाले ते पण वाईट. मग आमच्या दुर्दशेसंबंधीं बोलणेंही कठीण. पण वाईट कां असेनात ते सोबत तर करीत होते ना!

११९... सद् जल्वा रूबरू है जो मिज़गां उठाइये
ताक़त् कहां के दीद् का एहसां उठाइये ॥ १ ॥

है संग पर् बराते माशे जुनूने इश्क़
यानी हनूज़् मिन्नते तिफ़्लां उठाइये ॥ २ ॥

दीवार बारे मिन्नते मज़दूर्से है ख़म्
अये ख़ानमां ख़राब् न एहसां उठाइये ॥ ३ ॥

या मेरे ज़ख़्मे रश्कको रुसवा न कीजिये
या पर्दये तबस्सुमे पिनहां उठाइये ॥ ४ ॥

(१) डोळे उघडून पहा परमेश्वराच्या स्वरूपाचे शेंकडो साक्षात्कार दिसतील. पण त्यांचा अनुभव घेण्याची आमच्या डोळ्यांत शक्ति कुठें आहे?

(२) प्रेमवेडांत कुणाचे ऋण लागू नयेत. पण मुलें दगड फेंकतात तेसुद्धा वेडाला आवश्यक आहे. म्हणून वेडाला दगडांचें ऋण लागतें. कवि म्हणतो कीं दगड म्हणजे वेडाच्या मूल्याची हुंडी कां म्हणूं नये?

(३) जगांत कुणाचे उपकार घेऊं नयेत. निर्जीव भिंतीसुद्धा मजुरांच्या श्रमानें (उपकारानें) वांकतात मग मनुष्याचें काय?

(४) प्रतिस्पर्ध्यामुळें माझ्या हृदयावर जे आघात झाले आहेत त्यांची हे प्रिये, टिंगल उडवूं नकोस; आणि प्रतिस्पर्ध्याशीं मिळून माझी थट्टा करूं नकोस. हें नाहींतर तुझें स्मित तरी झळकूं दे.

१२० . . . मस्‌जिद्‌ के ज़ेरे साया ख़राबात्‌ चाहिये
भौं पास्‌ आंख्‌ क़िब्लये हाजात्‌ चाहिये ॥ १ ॥
आशिक़्‌ हुये हैं आप भी एक्‌ और शख़्स पर
आखिर सितम्‌की कुछ तो मुकाफ़ात्‌ चाहिये ॥ २ ॥
दे दाद्‌ अये फ़लक्‌ दिले हस्‌रत्‌ परस्त्‌ की
हां कुछ न कुछ तलाफ़िये माफ़ात्‌ चाहिये ॥ ३ ॥
सीखे हैं माहरुख़ोंके लिये हम्‌ मुसव्विरी
तक़रीब्‌ कुछ्‌ तो बहरे मुलाक़ात्‌ चाहिये ॥ ४ ॥
मये से ग़रज़ निशात्‌ है किस्‌ रुसियाह को
यक्‌ गूना बेखुदी मुझे दिन्‌रात्‌ चाहिये ॥ ५ ॥
है रंगे लाला व गुल्‌ व निस्‌रीं जुदाजुदा
हर रंग मे बहार का इसबात्‌ चाहिये ॥ ६ ॥
सर पाये खुम्‌पे चाहिये हंगामे बेख़ुदी
रू सूये क़िब्ला वक्ते मुनाजात्‌ चाहिये ॥ ७ ॥
यानी बहसबे गर्दिशे पैमानये सिफ़ात्‌
आरिफ़ हमेशा मस्ते मये ज़ात्‌ चाहिये ॥ ८ ॥
नशोनुमा है अस्लसे ग़ालिब्‌ फ़रोग़ को
ख़ामोशीहीसे निकले है जो बात्‌ चाहिये ॥ ९ ॥

(१) मशीदीच्या जवळ मद्यालय हवें. परमेश्वरानें नाहीं का मशीदींतील कमानी-सारख्या दिसणाऱ्या भुंवयापाशीं वारुणीसारखे नेत्र निर्माण केले.

(२) शेवटीं तूं एकाच्या प्रेमांत फसलीस. बरें झालें. इतरांचा इतका छळ केलास त्याची शिक्षा म्हणून तुझ्यावर ही पाळी आली.

(३) हे काळा, माझ्या शेंकडो आकांक्षांचा तूं नाश केलास. आतां माझी एखादी इच्छा तरी पूर्ण कर, म्हणजे माझ्यावर झालेल्या अन्यायाची अंशतः तरी फेड होईल.

(४) सुंदरीशीं आम्हांला भेटायला मिळावें म्हणून आम्ही चित्रकला शिकतों. भेटायला कांहींतरी कारण हवें ना!

(५) आनंद मिळावा म्हणून येथें कोण मदिरा पितो. केवळ रात्रंदिवस दुःखाची विस्मृति पाहिजे म्हणून मी मधु प्राशन करतों.

(६) फुलांचे रंग, मग ते अहिपुष्प असो कीं, गुलाब असो कीं शेवंतीं असो, विविध असतात, पण रसिकांना त्याचें महत्त्व वाटत नाहीं. ते फुलांना बहर आला आहे कीं नाहीं हें पाहतात.

(७) विस्मृतीच्या अवस्थेंत डोकें मदिरापात्रापाशीं टेकलेलें असावें आणि प्रार्थनेच्या वेळेला तोंड मक्केच्या दिशेकडे असावें.

(८) परमात्म्याची आराधना करावी ती स्वतःला विसरून आणि देहभान हरवून करावी. योग्यानें नेहमीं परमात्म-मदिरेंत धुंद असावें.

(९) आधीं मूळ आणि नंतर विस्तार तसेंच आधीं विचार आणि नंतर त्यांतून वाणीचा आविष्कार होतो.

१२१ . . . बिसाते अजज़् मे था एकदिल्ह यकूक़तरये ख़ून वो भी
सो रहता है बू अंदाज़े चकीदन् सरनिगूं वो भी ॥ १ ॥
रहे उस शोख़से आज़ुर्दा हम् चंदे तकल्लुफ़्से
तकल्लुफ़् बरतरफ़् था एक् अंदाज़े जुनूं वो भी ॥ २ ॥
ख़ियाले मर्ग् कब् तस्कीन दिले आज़ुर्दा को बख़्शे
मेरे दामे तमन्नामे है एक् सैदे ज़बूं वो भी ॥ ३ ॥
न करता काश् नाला मुझको क्या मालूम था हम्दम्
के होगा बाइसे अफ़्ज़ाइशे दर्दे दरूं वो भी ॥ ४ ॥
न इत्ना बुरिशे तेग़े जफ़ा पर नाज़् फ़रमावो
मेरे दरियाये बेताबी मे है एक् मौजे ख़ूं वो भी ॥ ५ ॥
म्ये इश्रत् की ख़्वाहिश् साक़ीये गर्दूंसे क्या कीजे
लिये बैठा है एक् दो चार जामे वाज़गूं वो भी ॥ ६ ॥
मेरे दिल्मे है ग़ालिब् शौक़े वस्ल व शिकूवये हिज्रां
खुदा वो दिन् करे जो उस्से मै ये भी कहूं वो भी ॥ ७ ॥

(१) माझी असहाय अवस्था पहा. आहे एक हृदय त्यांत सुद्धा रक्ताचा एकच बिंदु आहे. शोकामुळें त्याची स्थिति अशी झाली आहे कीं तो केव्हां गळून पडेल त्याचा नेम नाहीं.

(२) प्रियेशीं आम्ही नाराज होतों अथवा नाराजी कशाची म्हणावयाची तोही एक वेडाचाच प्रकार म्हणावयास हवा.

(३) मरणाच्या कल्पनेनें माझ्या शोकमग्न हृदयाला काय समाधान होणार आहे अन् ती कल्पना तरी प्रबल आहे काय ? जाळ्यांत अडकलेल्या दुबळ्या आणि निरुपयोगी सावजासारखी ती क्षीण आणि दुबळी झाली आहे.

(४) मला वाटतें कीं आक्रंदनानें मनावरचा भार हलका होईल. त्यानें उलट दुःख वाढेल असें वाटलें असतें तर मी प्रेमाचें गाऱ्हाणें गायिलें नसतें.

(५) तुझ्या तलवारीच्या तीक्ष्ण पात्याचा गर्व करूं नकोस. माझ्या भावनांच्या तुफान दर्यांत तुझ्या पात्याहूनही तीक्ष्ण अशा किती तरी लहरी आहेत.

(६) आम्ही काळरूपी साकीकडून मद्याची काय अपेक्षा करावी. त्याचे मद्याचे पेले उलटे आहेत. त्याच्यापाशीं काय लाभायचें. आकाशाच्या घुमटाला येथें उलटा पेला म्हटलें आहे.

(७) मला मीलनाची आसक्ति आहे आणि विरहाचें गाऱ्हाणें पण आहे. तिला मी आपलें गाऱ्हाणें सांगून मीलनाची इच्छा प्रकट करूं शकेन असा एखादा दिवस उजाडेल कां ?

१२२ . . . है बज़्मे बुतांमे सुख़न् आज़ुर्दा लबोंसे
तंग आये हैं हम् ऐसे ख़ुशामद् तलबोंसे ॥ १ ॥
है दौरे क़दहा वजेहे परेशानीये सह्बा
यकबार लगादो ख़ुमे म्ये मेरे लबोंसे ॥ २ ॥
रिंदाने दरे म्येकदाह गुस्ताख़ हैं ज़ाहिद्
ज़िनहार न होना तरफ़् इन् बेअदबोंसे ॥ ३ ॥
बेदादे वफ़ा देख् के जाती रही आखि़र
हरचंद् मेरी जान् को था रब्त् लबोंसे ॥ ४ ॥

(१) प्रियेच्या मैफिलींत खुशामद करणाऱ्या लोकांचा इतका कंटाळा आला आहे कीं तिथें मला तोंड उघडायलाही नको वाटतें.

(२) थांबून थांबून दारू पिणें आम्हांला कांहीं आवडत नाहीं. ती सुरईच उचलून आमच्या तोंडाला कां लावीत नाहींत.

(३) अरे धर्मप्रचारका, मद्यालयाच्या दारांत जमलेले हे मद्यपि फार उद्धट आहेत. त्यांच्या नादीं लागूं नकोस कसा.

(४) माझे प्राण नेहमीं ओठांशीं घुटमळत पण निष्फळ प्रेमानें ह्या दोघांची ताटातूट केली आणि प्राण ओठांना सोडून गेले.

१२३... ता हम्को शिकायत् कीभी बाक़ी न रहे जा
सुन् लेते हैं गो जिक्र हमारा नहीं करते ॥ १ ॥
ग़ालिब् तेरा अहवाल सुना देंगे हम् उनको
वो सुन्के बुलालें ये इजारा नहीं करते ॥ २ ॥
घरमे था क्या के तेरा ग़म् उसे ग़ारत करता
वो जो रखते थे हम् वो एक हसरते तामीर सो है ॥ ३ ॥

(१) प्रियेची वागणूक तर पहा. माझा उल्लेख आला कीं ती ऐकून घेते पण एक शब्द बोलत नाहीं. म्हणजे आमचा उल्लेखही तिला नको आहे असें गाऱ्हाणें धरण्याचीही तिनें सोय ठेवली नाहीं.

(२) गालिब, तुझी हकीकत तिच्या कानांवर घालीन पण ती ऐकून ती तुला जवळ बोलावील ह्याची खात्री मी देऊं शकणार नाहीं.

(३) तुझ्या शोकानें उध्वस्त करायला हृदयांत शिल्लक काय राहिलें होतें. हो, एक गोष्ट शिल्लक होती आणि ती म्हणजे आशेची हुरहुर.

१२४... ग़मे दुनियासे गर पायीभी फ़ुर्सत सर उठानेकी
फ़लक् का देखना तक़रीब् तेरे याद् आनेकी ॥ १ ॥
खुलेगा किस् तरह मज़्मूं मेरे मक्तूब का यारब्
क़सम खायी है उस् काफ़िरने काग़ज़्के जलानेकी ॥ २ ॥
लिपट्ना परनियां मे शोलये आतिश् का आसां है
वले मुश्किल् है हिक्मत् दिलमे सोज़े ग़म् छुपानेकी ॥ ३ ॥
उन्हे मंज़र अपूने ज़ख़्मियोंको देख् आना था
उठे थे सैरे गुलको देखना शोख़ी बहानेकी ॥ ४ ॥
हमारी सादगी थी इल्तिफ़ाते नाज़ पर मरना
तेरा आना न था ज़ालिम् मगर तम्हीद् जानेकी ॥ ५ ॥
लकद्कूबे हवादिस्का तहम्मुल् कर नही सकती
मेरी ताक़त् के ज़ामिन् थी बुतोंके नाज़् उठानेकी ॥ ६ ॥
कहूं क्या ख़ूबिये अव्ज़ाए अब्नाये ज़मां ग़ालिब्
बदी की उस्ने जिस्से हम्ने की थी बारहा नेकी ॥ ७ ॥

(१) जीवनाच्या शोकांतून डोकें वर काढण्यास अवकाश मिळाला कीं डोळे आकाशाकडे वळतात आणि आकाश (नियति) पीडा देणारे असल्यामुळें त्यामुळें तुझ्या छळणाच्या स्वभावाची आठवण होते.

(२) माझ्या पत्राचा मजकूर तिला कसा समजावा ? कारण माझें प्रत्येक पत्र न वाचतांच जाळून टाकण्याची तिनें शपथ घेतली आहे.

(३) रेशमी कपड्यांत एक वेळ आग लपविणें सोपें आहे परंतु हृदयांतील दुःखाची आग लपविणें कठीण आहे.

(४) तिनें बागेंत फिरण्याचें नुसतें निमित्त केलें. वास्तविक तिच्या मनांत आपले पीडित कोणत्या स्थितींत तळमळत पडले आहेत हें पहावयाचें होतें.

(५) तूं आलीस. आम्हांला वाटलें कीं आमच्यावर तुझी कृपा आहे. तुझ्यावरून आम्ही जीव ओवाळून टाकण्यास तयार झालों. पण येतांक्षणींच मला जायचें आहे म्हणून तूं म्हणूं लागलीस तर हा सुद्धा एक प्रकारचा छळ नाहीं का.

(६) पूर्वी प्रियेचे नाजनखरे सांभाळण्याची शक्ति होती पण आतां संकटांचें आघात सहन करण्याचीही शक्ति राहिली नाहीं.

(७) जगाची रीत काय सांगावी. ज्यांचें आम्हीं चांगलें केलें ते आमचें वाईटच करीत आले आहेत.

१२५ . . . हासिल से हात् धो बैठ् अये आरज़ू ख़िरामी
दिल जोशे गिरिया मे है डूबी हुयी असामी ॥ १ ॥

उस शमाकी तरहसे जिसको कोयी बुझादे
मै भी जले हुवोंमे हूं दाग़े नातमामी ॥ २ ॥

(१) हे आकांक्षांनो, तुम्ही आतां कशाचीही आशा धरूं नका कारण हृदय शोकमग्न झालें आहे. तें आतां कांहीं हालचाल करण्याच्या परिस्थितींत नाहीं.

(२) माझ्या निष्फळ जीवनाची मला खंत वाटते. माझें जीवन म्हणजे दिवा कुणी मर्येच विझवूं पहावा पण तो पूर्णपणें न विझतां अर्धवट जळत रहावा अशाप्रमाणेंच आहे.

१२६ . . . क्या तंग् हम् सितम् ज़दगांका जहां है
जिसमे के एक बैज़ये मोर आसमां है ॥ १ ॥

है कायनात् को हरकत तेरे ज़ौक़्से
परतौसे आफ़ताब् के ज़र्रेमे जान् है ॥ २ ॥

हालांके है ये सेलीये ख़ारासे लालरंग्
गाफ़िल को मेरे शीशे पे म्ये का गुमान् है ॥ ३ ॥
की उसने गरम् सीनये अहले हवसमे जा
आवे न क्यौं पसंद् के ठंडा मकान् है ॥ ४ ॥
क्या ख़ूब् तुम्ने ग़ैरको बोसा नहीं दिया
बस चुप् रहो हमारेभि मूहमे ज़बान् है ॥ ५ ॥
बैठा है जो के सायये दीवारे यार मे
फ़र्मांरवाये किश्वरे हिंदूसितान् है ॥ ६ ॥
हस्तीका एतिबार भी ग़म्ने मिटा दिया
किससे कहूँ के दाग़े जिगर का निशान है ॥ ७ ॥
है बारे एतिमादे वफ़ादारी इसक़दर
ग़ालिब हम इसमे ख़ुश हैं के नामेहरबान है ॥ ८ ॥

(१) आम्हां पीडितांचें जग किती संकुचित आहे तें पहा. मुंगीचें अंडें (क्षुल्लक वस्तु) सुद्धा आम्हांला विशाल आकाशापेक्षांही जड आणि सर्वव्यापी वाटत आहे.

(२) धुळीच्या कणांत सूर्याचे किरण प्रविष्ट झाले कीं ते कण इकडे तिकडे धावूं लागतात. त्याप्रमाणेंच हे परमेश्वरा, इच्छा झाली कीं सृष्टीचा कणन् कण चळवळ करूं लागतो.

(३) माझें मधुपात्र (धातूचें) दगडानें ठोकून ठोकून तांबडेलाल झालें आहे. पण लोकांना वाटतें कीं त्यांत लाल वारुणी भरली आहे म्हणून माझें पात्र लाल दिसत आहे. ह्या कवितेंत हृदयाच्या स्थितीकडे इषारा केलेला आहे.

(४) प्रिया प्रतिस्पर्ध्याच्या हृदयांत जाऊन बसली आहे. त्याचें हृदय भावनाविरहित आणि म्हणून थंड आहे अन् अशीं थंडगार आसनें कुणाला प्रिय नसतात.

(५) मी प्रतिस्पर्ध्याला चुंबन दिलें नाहीं असें तूं म्हणतेस पण मला हें पटत नाहीं. थांब, मला तुझें चुंबन घेऊनच ह्याची शहानिशा करून घेऊं दे.

(६) हा प्रेमवेडा जो भिंतीच्या सावलींत बसला आहे त्याकडे पहा. तो हिंदुस्थानचा बादशहाच वाटतो.

(७) शोकावेगानें माझें काळीज नाहींसें झालें आहे. आतां मी कुणाला सांगूं लागलों कीं माझ्या जखमा म्हणजे माझ्या काळजाचीं चिन्हें होत, तर त्यांना खरें वाटणार नाहीं.

(८) ती आमच्यावर अवकृपा करते आहे ह्यांतही आम्हांला आनंद आहे; कारण तिला आमच्या निष्ठेबद्दल खात्री आहे. आपण कितीही ह्यांना छळलें तरी हे सहन करतात, असें तिला वाटतें. मग तिच्या छळण्यानें आम्हांला आनंद कां होऊं नये.

दर्दसे मेरे है तुझको बेक़रारी हाये हाये
१२७ . . . क्या हुयी जालिम् तेरी ग़फ़लत् शिआरी हाये हाये ॥ १ ॥
तेरे दिल्मे गर न था आशोबे ग़म् का हौसला
तूने फिर क्यौं की थी मेरी ग़म् गुसारी हाये हाये ॥ २ ॥
क्यौं मेरी ग़म् ख़ारगीका तुझको आया था ख़ियाल
दुश्मनी अपनी थी मेरी दोस्तदारी हाये हाये ॥ ३ ॥
उम्र भर का तूने पैमाने वफ़ा बांधा तो क्या
उम्र को भी तो नही है पायदारी हाये हाये ॥ ४ ॥
ज़हर लगती है मुझे आबो हवाये ज़िंदगी
यानी तुझ्से थी उसे नासाज़गारी हाये हाये ॥ ५ ॥
गुलफ़िशानीहाये नाज़े जल्वेको क्या हो गया
ख़ाकपर होती है तेरी लालाकारी हाये हाये ॥ ६ ॥
शर्मे रुसवाईसे जा छिपूना नक़ाबे ख़ाकमे
ख़त्म् है उल्फ़त्कि तुझपर पर्दादारी हाये हाये ॥ ७ ॥
ख़ाक्मे नामूस पैमाने महब्बत मिल् गयी
उठ गयी दुनियासे राहोरस्मे यारी हाये हाये ॥ ८ ॥
हाथ ही तेग़् आज़मा का कामसे जाता रहा
दिल्पे इश्क़् लगने न पाया ज़ख़्मकारी हाये हाये ॥ ९ ॥
किस् तरह काटे कोयी शब्हाये तारे बरशगाल्
है नज़र ख़ूकरदये अख़्तर शुमारी हाये हाये ॥ १० ॥
गोश् महजूरे पयाम् व चश्म् महरूमे जमाल्
एक् दिल् तिस् पर ये ना उम्मेदवारी हाये हाये ॥ ११ ॥
इश्क़ने पकडा न था ग़ालिब अभी वहशत्का रंग
रह गया था दिल्मे जो कुछ ज़ौक़ख़ारी हाये हाये ॥ १२ ॥

गालिबच्या तारुण्यांत वयाच्या बावीस-तेवीसाव्या वर्षी त्याची एका तरुणीशीं ओळख झाली. ह्या ओळखीचें पुढें प्रेमांत रूपांतर झालें. पण तें प्रेम फलद्रूप होण्याच्या आधीं तिला मृत्यु आला. ह्या घटनेनें गालिबला अत्यंत दुःख झालें. चाळीस वर्षांनंतर आपल्या बासष्टाव्या वर्षी गालिबनें आपल्या खाजगी पत्रांत ह्या घटनेचा उल्लेख करून, प्रियेच्या मृत्यूनें आपल्याला किती हळहळ वाटली आणि अद्याप तिची किती आठवण होते हें दाखविलें आहे. ही शोक-कविता गालिबनें प्रियेच्या मृत्यूवर लिहिली आहे.

(१) हे प्रिये, माझें दुःख पाहून तुझ्या मनाला यातना होत आहेत. प्रियकरांची उपेक्षा करण्याचा तरुणींचा स्वभावधर्मच असतो. तो तूं ह्या वेळीं विसरून जाऊन कां बरें माझ्या दुःखानें स्वतःला त्रास करून घेत आहेस.

(२) अगे, शोकाचा भार वाहण्याचें तुझ्यांत सामर्थ्य नव्हतें तर माझ्याबद्दल तूं कां बरें जिव्हाळा दाखविलास.

(३) माझ्यावर प्रेम करून तूं कां बरें आपला नाश करून घेतलास. माझ्याशीं प्रेम म्हणजे तूं तुझ्या स्वतःशीं शत्रुत्व केल्यासारखें आहे.

(४) जीवनभर मी एकनिष्ठ राहीन असें तूं म्हणाली होतीस, पण अरेरे, हें जीवन क्षणभंगुर ठरलें ना!

(५) मला सभोंवतालचें वातावरण विषतुल्य लागत आहे. कारण हें वातावरण तुलाही मानवलें नाहीं.

(६) एके काळीं तूं सौंदर्याचे रंग उधळीत होतीस पण आतां तुझ्या कबरीवर फुलांच्या राशी पडून रंग भरूं लागला आहे.

(७) प्रेमाचें गुपित उघडें पडेल म्हणून तूं मातीच्या पडद्याआड कां जाऊन लपलीस ? पडदापद्धतीची तूं हद्द केलीस म्हणायची ?

(८) एकनिष्ठेचीं वचनें मातींत मिळून गेलीं म्हणजे जगांतून प्रेमाची रीत नाहींशी झाली असेंच म्हटलें पाहिजे.

(९) हृदयावर जीवघेणी आघात करण्यापूर्वीच तुझा हात जायबंदी व्हावा ह्यापेक्षां दुर्दैव तें कोणतें ?

(१०) प्रेमांत आकाशांतील तारे पाहाण्याची आमची सवय. आतां तुझ्या विरहाचा वर्षाऋतु आम्हीं कसा काय घालवावयाचा ? (तारे वर्षाकाळांत दिसत नाहींत).

(११) आमचे कान तुझ्या संदेशापासून आणि डोळे तुझ्या दर्शनाला वंचित झाले आहेत. एक हृदय आणि त्यावर निराशेचा जबरदस्त आघात झाला आहे. काय हें दुर्दैव !

(११) अद्याप माझ्या प्रेमाला वेडाचें स्वरूप आलें नव्हतें. प्रेमपूर्तीची हौस फिटली नव्हती. तोच हा आघात माझ्यावर झाला आहे.

१२८ . . . सरगश्तगीमे आलमे हस्तीमे यास् है
तस्कीन् को दे नवेद् के मरने की आस है ॥ १ ॥
लेता नही मेरे दिले आवाराकी खबर
अब्तक् वो जान्ता है के मेरेही पास है ॥ २ ॥
कीजे बयां सुरूरे तपे ग़म् कहां तलक्
हर मू मेरे बदन् पे ज़बाने सिपास् है ॥ ३ ॥
है वो ग़ुरूरे हुस्नसे बेगानये वफ़ा
हरचंद् उसके पास दिले हक़्शिनास है ॥ ४ ॥
पी जिस क़दर मिली शबे महताब् मे शराब्
अब बलग़मी मिज़ाज को गरमी ही रास है ॥ ५ ॥
हर एक् मकां को है मकींसे शर्फ़् असद्
मज्नूं जो मरगया है तो जंगल् उदास है ॥ ६ ॥

(१) प्रेमवेडामध्यें मी जीवनाला कंटाळून गेलों आहें. आतां ह्या उदासीनतेला लौकरच येणाऱ्या मृत्यूची खुषखबर द्या; कारण मृत्यूनेंच हीं दुःखें दूर होणार आहेत.

(२) प्रिया माझ्या हृदयाची कांहीं दखल घेत नाहीं. तिला वाटतें हें हृदय अद्याप माझ्यापाशीं आहे; पण तें कधींच माझ्या ताब्यांतून निघून गेलें आहे.

(३) माझ्या शोकाची दाहकता काय वर्णावी ? ह्या दाहकतेनें माझ्या अंगावर रोमांच उभे रहातात. त्यावरून माझ्या स्थितीची कल्पना येईल.

(४) ती सहृदय नाहीं असें नाहीं, पण सौंदर्याच्या अहंकारामुळें तो माझा छळ आणि उपेक्षा करीत आहे.

(५) चांदण्या रात्रींत मिळेल तितकें मद्य पी वरें. कारण ह्या शीत प्रकृतीला मानवणारी मदिरा हीच वस्तु आहे.

(६) घरांत रहाणाऱ्याचा घरालाही चटका लागतो. पहा, मजनू मरून गेला म्हणून अरण्य खिन्न झालें आहे.

१२९ . . . गर ख़ामुशीसे फ़ायदा इख़्फ़ाये हाल् है
ख़ुश् हूं के मेरी बात समझनी मुहाल् है ॥ १ ॥
किसको सुनावूं हसरते इज़हार का गिला
दिल् फ़र्दे जमो खर्चे ज़बानहाये लाल् है ॥ २ ॥

किस पर्देमे है आयीना पर्दाज़् अये ख़ुदा
रहमत्‌को उज़रख़्वाहे लबे बेसवाल है ॥ ३ ॥

है है ख़ुदा नख़्वास्ता वो और दुश्मनी
अये शौक़े मुन्फ़्इल् ये तुझे क्या ख़ियाल है ॥ ४ ॥

मुश्कीं लिबासे काबा अलीके क़दम् से जान्
नाफ़े जमीन् है न के नाफ़े ग़ज़ाल है ॥ ५ ॥

वहशत् पे मेरी अर्सये आफ़ाक़् तंग् है
दरिया ज़मीन् को अर्क़े इन्फ़िआल है ॥ ६ ॥

हस्तीके मत् फरेबमे आजाइयो असद्
आलम् तमाम् हल्क़ये दामे खियाल है ॥ ७ ॥

(१) गप्प राहिल्यानें आपली मनस्थिति बाहेर दिसून येत नाहीं. माझें वागणें असें आहे ह्यामुळें लोकांना अर्थबोध होत नाहीं हें बरें आहे नाहीं का ?

(२) माझ्या अतृप्त आकांक्षांचें गाऱ्हाणें कुणासमोर सांगू ? माझें हृदय म्हणजे अशा गाऱ्हाण्यांचें एक मोठें दप्तर बनलें आहे.

(३) परमेश्वरा, मी पापी आहें. माझ्या तोंडून शब्द निघत नाहींत. तुझ्या कृपा-दृष्टि कुठें गुंतून पडल्या आहेत ? त्या माझ्याकडे कां वळत नाहींत ?

(४) प्रिया अन् तुझ्याशीं वैर, अशा विचारांची, हे लज्जित रसिकते, सवय सोडून दे बरें.

(५) काब्यावर काळा कपडा चढवितात. त्याला सुगंध अलीच्या सहवासानें आला आहे (मक्क्यांत अलीचा जन्म झाला.) हा सुगंध कस्तुरीमृगाचा नव्हे. काब्याला पृथ्वीची नाभि समजत. कस्तुरीमृगाची नाभि काबा नव्हे. पृथ्वीची नाभि आहे. कपड्याला सुगंध अलीमुळें लाभला अशी कल्पना केली आहे.

(६) माझ्या प्रेमवेडाला हें जग अगदीं आकुंचित झालें आहे. आपण इतके लहान आणि क्षुद्र झालों ह्याची विश्वाला लाज वाटली. तुम्हांला समुद्र आणि जलाशय दिसतात ते ह्या विश्वाला संकोच आणि लज्जा ह्यांमुळें आलेला घाम होय.

(७) हे असद, ह्या अस्तित्वाच्या भ्रमांत गुरफटूं नकोस. अरे, ही सारी सृष्टि म्हणजे कल्पनांचें जाळें आहे.

१३० . . . तुम् अपने शिकवेकी बातें न खोद् खोदके पूछो
उज़र करो मेरे दिलसे के इसमे आग दबी है ॥ १ ॥

दिला ये दर्दे अलम् भी तो मुग़तनम है के आख़िर
न गिरियये सहरी है न आहे नीम्‌शबी है ॥ २ ॥

(१) माझी स्थिति खोदून खोदून विचारूं नकोस बरें. कारण माझ्या हृदयांत आग सुप्त आहे ती ह्यामुळें भडकायची.

(२) हे हृदया, हा जीवनशोक बरा समज. कारण क्षणभरानें हे निःश्वास आणि हीं रुदनें नेहमींकरितां नाहींशीं होतील.

१३१ . . . एक्‌जा हर्फ़े वफ़ा लिखा था वो भी मिट् गया
ज़ाहिरा काग़ज़् तेरे ख़त्‌का ग़लत् बर्दार है ॥ १ ॥

जी जले ज़ौक़े फ़नाकी नातमामी पर न क्यौं
हम् नहीं जलते नफ़स हरचंद आतिश् बार है ॥ २ ॥

आग्से पानीमे बुझते वक्त उठती है सदा
हरकोयी दर्‌मांदगी मे नालेसे लाचार है ॥ ३ ॥

है वही बद् मस्तिये हर ज़र्रेका ख़ुद् उज़्‌रख़्वा
जिसके जल्वेसे ज़मींता आसमां सरशार है ॥ ४ ॥

मुझसे मत् कह तू हमें कहता था अपनी ज़िंदगी
ज़िंदगीसे भी मेरा जी इन् दिनों बेज़ार है ॥ ५ ॥

आंखकी तस्वीर सरनामे पे खींची है के ता
तुझपे खुल जावे के उसको हस्‌रते दीदार है ॥ ६ ॥

(१) हे प्रिये, तुझ्या पत्रांत एके ठिकाणीं निष्ठा हा शब्द लिहिलेला दिसतो पण तो शब्द पुसून गेला होता. साहजिकच आहे. मनांत नसतांना कागदावर उतरलेले शब्द टिकतील तरी कसे ? ते आपोआप पुसले जाणारच.

(२) नाहींसे होण्याची आमची इच्छा दृढ दिसत नाहीं. नाहींतर श्वासोच्छ्वास इतका दाहक असतांना आम्हांला मृत्यु कधींचाच यावयास हवा होता. आमच्या मनाच्या निर्धाराचा हा अभाव हृदयाला सारखा जाणवतो.

(३) पाण्यांत जळते निखारे घातले कीं आवाज झाल्याशिवाय राहात नाहीं. कोणतीही वस्तु असो, दुःख हृदयांत वसलें कीं आक्रंदनाच्या स्वरूपांत तोंडावाटे बाहेर पडल्याशिवाय राहात नाहीं.

(४) परमेश्वराच्या स्वरूपाच्या आविष्कारानें कणन्‌कण गतिमान झाला आहे. पण ही आपलीच शक्ति आहे ह्या कल्पनेनें त्याला बेचैन केलें आहे.

(५) हे प्रिये, तूं माझा प्राण आहेस, माझें जीवन आहेस असें तूं म्हणायची. आतां त्यांचा पुनरुच्चार करूं नकोस. कारण आतां मला ह्या जीवनाचा कंटाळा आला आहे.

(६) मी पत्राच्या पाकिटावर डोळ्याचें चित्र काढलें आहे. तुला पाहाण्याकरितां डोळे किती भुकेले आहेत ह्याची तुला कल्पना यावी हा हेतु आहे.

१३२ . . . पीनस पे गुज़रते हैं जो कूचेसे वो मेरे
कंधा भी कहारोंको बदलने नहीं देते

१३२ (अ) . . . मेरी हस्ती फ़ज़ाये हैरताबादे तमन्ना है
जिसे कहते हैं नाला वो इसी आलम का अनक़ा है ॥ १ ॥
खज़ाँ क्या फ़स्ले गुल कहते हैं किसको कोई मोसम हो
वही हम हैं क़फ़स है और मातम बालोपर का है ॥ २ ॥
वफ़ाये दिलबरां है इतिफ़ाक़ी वर्ना अये हम्‌दम
असर फ़र्यादे् दिल हाये हज़ींका किसने देखा है ॥ ३ ॥
न लायी शोख़ीये अंदेशा ताबे रंजे नौमीदी
कफ़े अफ़सोस मलना अहदे तज्‌दीदे तमन्ना है ॥ ४ ॥

ती उघड्या पालखींतून माझ्या आळींतून जाते तेव्हां माझ्या घरासमोर पालखी वाहणारे खांदे बदलण्याकरितां थांबावें म्हणतात तर ती त्यांना तिथें खांदेही बदलूं देत नाहीं इतका तिला माझा कंटाळा आहे.

(१) मनुष्य अति दुःखानें सुन्न झाला कीं आक्रंदन करण्याचें विसरून जातो. कवि म्हणतो कीं ह्या वेळीं मी पण सुन्न झालों आहें. त्यामुळें निःश्वास टाकणें, आक्रंदन करणें दिसून येत नाहीं, इतकेंच. पण ह्यावरून ते भाव माझ्यांत नाहींत असें मात्र समजूं नका.

(२) कुठला हिंवाळा अन् कुठला वसंतऋतु. कोणताही ऋतु असो तेच आम्ही, तेच हे कारागार आणि तीच आमच्या असहाय स्थितीची हळहळ चालू आहे.

(३) प्रिया एकनिष्ठ आहे तर तो प्रकार केवळ योगायोग समजावा. नाहींतर निःश्वास आणि आक्रंदन ह्याचा परिणाम झालेला कुणी पाहिला आहे.

(४) माझ्या आसक्तीला निराशा सहन झाली नाहीं. निराशेनें मी हातावर हात चोळीत आहें. हातावर हात देऊन जणूं काय मी तळमळ चालू ठेवण्याचें वचन देत आहे.

१३३ . . . रहम कर ज़ालिम के क्या बूदे चिराग़े कुश्ता है
नब्ज़े बीमारे वफ़ा दूदे चिराग़े कुश्ता है ॥ १ ॥
दिल्लगीकी आरज़ू बेचैन् रखती है
वर्ना यां बेरौनक़ीये सूदे चिराग़े कुश्ता है ॥ २ ॥

(१) हे प्रिये, तुझ्या ह्या प्रियकरावर थोडीशी तरी दया कर. त्याचें महत्त्व काय आहे. त्यांच्या नाड्या म्हणजे विझलेल्या दिव्याच्या धुरासारख्या आहेत. त्या केव्हां नाहींशा होतील ह्याचा कांहीं नेम नाहीं.

(२) प्रीतीच्या छंदामुळें आमचें हृदय सारखें तळमळत आहे. प्रीति नसती तर हृदयाची अशी स्थिति कां झाली असती ? तो दिवा पहा. सारखा जळत आहे. ह्या दाहकतेनेंच त्याचा शेवटीं नाश होणार. ही दाहकता नसती तर तेल काय, वाती काय अन् दिवा काय कोणतेंच नुकसान झालें नसतें.

१३४ . . . चश्मे ख़ूबां ख़ामुशीमे भी नवा पर्दाज़ है
सुर्मा तू कहवे के दूदे शोलये आवाज़ है ॥ १ ॥
पैकरे उश्शाक़ साज़े तालेए नासाज़् है
नाला गोया गर्दिशे सय्यारेकी आवाज़् है ॥ २ ॥
दस्तगाहे दीदये ख़ूंबारे मज्नूं देखना
यक् बियाबां जल्वये गुल फ़र्श् पा अंदाज़् है ॥ ३ ॥

(१) प्रिया गप्प असली तरी तिचे डोळे बोलके आहेत. असें वाटतें कीं, तिच्या डोळ्यांतील काजळ हें ध्वनींतून निर्माण झालें आहे.

(२) प्रियकराचें शरीर म्हणजे दुर्दैवाचें वाद्य होय. त्यांचीं गाऱ्हाणीं आणि आक्रंदन म्हणजे सतत फिरणाऱ्या ग्रहांचा ध्वनि होय.

(३) मजनूंच्या रक्तरंजित नेत्रांची शक्ति पाहा. त्यामुळें वाळवंट फुलांचा सडा पडलेल्या उपवनाप्रमाणें भासत आहे.

१३५ . . . इश्क़् मुझ्को नहीं वहशत् ही सही
मेरी वहशत् तेरी शुहरत् ही सही ॥ १ ॥
क़ता कीजिये न ताल्लुक़ हमसे
कुछ नही है तो अदावत् ही सही ॥ २ ॥

मेरे होने मे है क्या रुसवायी
अये वो मज्लिस् नही ख़िल्वत् ही सही ॥ ३ ॥
हम् भी दुश्मन् तो नहीं हैं अपने
ग़ैर्को तुझ्से महब्बत् ही सही ॥ ४ ॥
अप्नी हस्तीहीसे हो जो कुछ् हो
आगही गर् नही ग़फ़लत् ही सही ॥ ५ ॥
उमर् हर्चंद् के है बर्क़ेख़िराम्
दिल्के ख़ून् कर्नेकी फ़ुर्सत् ही सही ॥ ६ ॥
हम् कोयी तर्के वफ़ा करते हैं
न सही इश्क़् मुसीबत् ही सही ॥ ७ ॥
कुछ् तो दे अये फ़ल्के ना इन्साफ़्
आह् व फ़रयाद् की रुख़्सत् ही सही ॥ ८ ॥
हम् भी तस्लीम् की ख़ू ड़ालेंगे
बे नियाज़ी तेरी आदत् ही सही ॥ ९ ॥
यार् से छेड चली जाये असद्
गर् नही वस्ल तो हस्रत ही सही ॥ १० ॥

(१) प्रिये, माझें प्रेम म्हणजे तुला वेड वाटतें. बरें तें वेड कां असेना ह्यामुळें तुझा लौकिक झाला हें काय कमी समाधान आहे.

(२) प्रिये, माझ्याशीं आपला संबंध तोडूं नकोस. अगे, प्रेम नसलें तर द्वेष तरी कर. ज्याचा ती द्वेष करते तो हा प्रियकर हें तरी आपलें नातें कायम राहील.

(३) मी तुझ्याजवळ असलों तर काय वाईट आहे. मी मैफिलींत तुला नकोसा असलों तर माझी एकांतांत गांठ घे.

(४) परक्याशीं तुझें प्रेम असेल ही गोष्ट खरी असो वा नसो पण आम्ही तुझे शत्रु तर नाहीं ना !

(५) आपल्या अस्तित्वाशीं संबंध असावयास हवा. आपल्या अस्तित्वाची जाणीव नसेल तर विस्मृति हवी.

(६) आयुष्य हें विजेसारखें क्षणभंगुर असेल पण त्यांत सुद्धा प्रेमापायीं हृदयाचें रक्त वाहावण्यास वेळ मिळनोच.

(७) संकटाच्या भीतीनें आम्ही प्रेमाचा त्याग करणारे नव्हेत. प्रेमांत संकटें असलीं तरी त्यांना आम्ही संकटें समजूनच तोंड देऊं.

(८) हे कालचक्रा, आमच्यावर थोडी तरी दया दाखवशील कीं नाहीं. निदान गाऱ्हाणें आणि आक्रंदन करण्याची तरी परवानगी दे.

(९) उपेक्षा करण्याची तुझी सवय आहे अन् आम्ही पण ती सहन करण्याची सवय लावून घेऊं.

(१०) हे असद्, कसा का होईना प्रियेशीं संबंध आला पाहिजे. मीलन नसेल तर निदान तिच्या मीलनाची हुरहूर तरी लाभो.

१३६ . . . है आर्मीदगी मे निकोहिश बजा मुझे
सुब्हे वतन् है खंदये दंदा नुमा मुझे ॥ १ ॥
ढूंढे है उस् मुगन्नीये आतिश् नफस् को जी
जिसकी सदा हो जल्वये बर्क़े फ़ना मुझे ॥ २ ॥
मस्ताना तै करू हूं रहे वादीये ख़ियाल
ता बाज़गश्तसे नरहे मुद्दुआ मुझे ॥ ३ ॥
कर्ता है बस्के बाग़मे तू बेहिजाबियां
आने लगी है नकहते गुल्से हया मुझे ॥ ४ ॥
खुल्ता किसी पे क्यौं मेरे दिल् का मुआमिला
शेरोंके इन्तिख़ाब रुस्वा किया मुझे ॥ ५ ॥
ज़िंदगी अपनी जब् इस् शक्लसे गुजरी ग़ालिब्
हम भी क्या याद करेंगे के खुदा रखते थे ॥ ६ ॥

(१) प्रियेनें आम्हांला वणवण भटकविण्यास हवें होतें. आम्ही स्वस्थ बसलों आहोंत म्हणूनच कीं काय प्रभात माझ्याकडे पाहून हसत आहे.

(२) मला असा कुणी गायक हवा कीं ज्याच्या दर्दभरे गीतांनीं माझें जीवन वीज पडल्यासारखें क्षणार्धांत जळून जाईल.

(३) उन्मत्तावस्थेंत मी कल्पनांच्या खोऱ्यांतून प्रवास करीत होतों. ह्यामुळें प्रवासांतून परत फिरण्याचें भान मला राहिलें नाहीं.

(४) मी बहरणाऱ्या फुलांना बेपडदा नि निःसंकोच समजत होतों. पण तूं तर त्यांच्यावरही ताण केलीस. मला आतां त्या फुलांचा संकोच वाटूं लागला आहे.

(५) माझी मनस्थिति लोकांना कशाला कळली असती पण माझ्या कवितांनीं माझ्या भावना उघड्या करून दाखविल्या.

(६) आमचें आयुष्य इतक्या दुःखांतून, संकटांतून आणि आपत्तींमधून गेलें आहे. आम्ही तरी कोणत्या तोंडानें म्हणावें कीं परमेश्वर आमचा वाली आहे.

१३७ . . . उस् बज़्ममे मुझे नही बन्ती हया किये
बैठा रहा अगर्चे इशारे हुवा किये ॥ १ ॥
दिल् ही तो है सियासते दर्बांसे डर गया
मै और जावूं दरसे तेरे बिन् सदा किये ॥ २ ॥
रखता फिरूं हूं ख़िर्का व सज्जादा रहने मूये
मुद्दत हुयी है दावते आबो हवा किये ॥ ३ ॥
बे सर्फ़ा ही गुज़रती है हो गर्चे उम्रे ख़िज़्र
हज़रत् भी कल् कहेंगे के हम् क्या किया किये ॥ ४ ॥
मक़दूर् हो तो ख़ाक़ुसे पूछूं के अये लयीम्
तूने वो गंजहाये गिरान माया क्या किये ॥ ५ ॥
किस् रोज़ तोहमतें न तराशा किये अदू
किस् दिन् हमारे सर्पे न आरे चला किये ॥ ६ ॥
सोहबत् मे ग़ैर्की न पडी हो कहीं ये ख़ू
देने लगा है बोसा बग़ैर् इल्तिजा किये ॥ ७ ॥
जिद् की है और् बात् मगर ख़ू बुरी नहीं
भूलेसे उसने सैंकडों वादे वफ़ा किये ॥ ८ ॥
ग़ालिब् तुम्ही कहो के मिलेगा जवाब क्या
माना के तुम् कहा किये और वो सुना किये ॥ ९ ॥

(१) तिच्या बैठकींत मी अगदीं निर्लज्ज बनून बसून राहिलों. बैठकींतील लोकांनीं मला पुष्कळ टोमणे दिले आणि माझी कुचेष्टा केली, पण मी कशाला ऐकतों.

(२) तुझ्या घरावरून यावें आणि तुला हाक देऊं नये असें कधीं झालें आहे. पण काय करावें ? तुझ्या घरच्या पहारेकऱ्याची मला भीति वाटली. हें हृदय आहे, दगड नाहीं कीं धोंडा नाहीं. त्याच्या निंदेच्या आणि कठोरपणाच्या भीतीनें मला संकोच वाटला.

(३) मदिरा पिऊन पुष्कळ दिवस झाले. आतां मदिरेपायीं माझी कफनी आणि नमाजाचें आसन गहाण टाकावें असें वाटूं लागलें आहे.

(४) मनुष्य कितीही दीर्घायू असला तरी जीवनांतील संकटांमुळें त्याला कांहीं भरीव काम करण्यास वेळ मिळत नाहीं. प्रत्यक्ष खिजर (उर्दू साहित्यांतील मार्कंडेय) झाला तरी तो शेवटीं हेंच म्हणणार कीं आमचें आयुष्य असेंच संपून गेलें आणि आम्ही कांहीं करूं शकलों नाहीं.

१९३ . . . .

(५) मला शक्य असतें तर कृपण वसुंधरेला विचारलें असतें कीं, बोल, इतकीं अमूल्य नररत्नें तूं दडवून ठेवलीं आहेस त्यांचें तूं काय केलेंस. त्यांचा तुलाही लाभ नाहीं आणि जगालाही त्यांचा लाभ तूं मिळूं दिला नाहींस.

(६) माझ्या प्रतिस्पर्ध्यांनीं माझ्यावर भलभलते आरोप लादले आणि माझा सारखा छळ केला.

(७) आज विनवणी न करतांही प्रिया चुंबनें देत आहे ह्याचें काय कारण. प्रतिस्पर्ध्यांच्या बैठकींत तर तिला ही सवय लागली नसेल ना.

(८) ती हट्टाला पेटली असेल तर गोष्ट दुसरी. पण दिलेलीं अनेक वचनें तिनें पाळलीं हें आमच्या पथ्यावर पडलें.

(९) गालिब, तूंच सांग, तूं कोणत्या उत्तराची अपेक्षा करतोस. तूं आपलें गाऱ्हाणें सांगितलेंस आणि तिनें तें ऐकून घेतलें ह्यापलीकडे तुला उत्तर काय मिळणार आहे.

१३८ . . . रफ़्तारे उम्र क़तए रहे इज़्तिराब् है
इस् साल के हिसाब् क़ो बर्क़ आफ़ताब् है ॥ १ ॥
मीनाये मये है सर्वे निशाते बहार से
बाले तदरौ जल्वये मौजे शराब् है ॥ २ ॥
ज़ख़्मी हुवा है पाश्ना पाये सबात् का
ने भागने की गूं न इक़ामत् की ताब् है ॥ ३ ॥
जादादे बादा नोशीये रिंदां है शषजिहत्
ग़ाफ़िल् गुमां करे है के गीती ख़राब् है ॥ ४ ॥
नज़्ज़ारा क्या हरीफ़् हो उस् बर्क़े हुस्नका
जोशे बहार जल्वेको जिस्के नक़ाब है ॥ ५ ॥
मै नामुराद् दिलकी तसल्लीको क्या करूं
मानाके तेरे रुख़्से निगह कामयाब है ॥ ६ ॥
गुज़रा असद् मसर्रते पैग़ामे यार्से
क़ासिद् पे मुझको रश्के सवालो जवाब् है ॥ ७ ॥

(१) वर्षाची गणना सूर्याच्या गतीवरून करतात. मनुष्याच्या आयुष्याची गणना खरें म्हटलें तर विजेच्या गतीवरून करावयाला पाहिजे, इतकें आयुष्य क्षणभंगुर आहे. अन् ह्याशिवाय दगदगीचें आणि संकटाचें आहे म्हणून कालगणनेला विजेची गती धरावी हेंच योग्य आहे.

(२) मदिरेची सुरई वसंतऋतूंत सुरूच्या झाडासारखी प्रफुल्लित झाली आहे आणि मधुलहरी चकोराच्या पंखांप्रमाणें भासतात.

(३) आमच्या निर्धाराचे पाय पंगू झाले आहेत. प्रेमाच्या क्षेत्रांत आतां धावण्याची काय किंवा टिकून राहाण्याची काय शक्ति राहिली नाहीं.

(४) लोकांना वाटतें कीं आम्ही मद्यपी म्हणजे कफल्लक आहोंत. खरें म्हणजे सगळें जग ही आम्हां मद्यप्यांची जहागीर आहे. आम्ही स्वतःला जगाचे अधिपति समजतों.

(५) त्या सुंदरीच्या चेहेऱ्याला पडदा म्हणजे बहरलेल्या वसंताचा होय. त्या चेहेऱ्याकडे पाहाण्याची आमच्या दृष्टींत शक्ति नाहीं.

(६) तुला पाहून माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें; पण निराश हृदयाचें समाधान कसें करूं. हृदयाची ओढ वेगळीच आहे.

(७) दूतांच्या द्वारें प्रियेचा संदेश येणें ही आनंदाची गोष्ट आहे. पण मला तो आनंद नको आहे. कारण दूत ह्या कर्माच्या निमित्यानें प्रियेशीं बोलेल ह्याचा मला हेवा वाटतो.

१३९ . . . देखना क़िस्मत् के आप् अपने पे रश्क आजाये है
मै उसे देखूं भला कब् मुझ्से देखा जाये है ॥ १ ॥

हात् धो दिल्से यही गर्मी गर् अंदेशे मे है
आबगीना तुंदीये सहबासे पिघ्ला जाये है ॥ २ ॥

ग़ैर् को यारब् वो क्यौंकर् मनए गुस्ताखी करे
गर् हया भी उसको आती है तो शरमा जाये है ॥ ३ ॥

शौक़् को ये लत् के हरदम् नाला खींचे जाइये
दिल्की वो हालत् के दम् लेनेसे घबरा जाये है ॥ ४ ॥

दूर् चश्मे बद् तेरी बज़्मे तरब्से वाहवा
नग़्मा हो जाता है वां गर नाला मेरा जाये है ॥ ५ ॥

गर्चे है तर्ज़े तग़ाफ़ुल् पर्दादारे राज़े इश्क़्
पर् हम् ऐसे खोये जाते हैं के वो पा जाये है ॥ ६ ॥

उसकी बज़्म् आराइयां सुन्कर् दिले रंजूर् यां
मिस्ल नक्शे मुद्दआये ग़ैर् बैठा जाये है ॥ ७ ॥

होके आशिक् वो परीरुख़ और नाज़ुक् बन् गया
रंग खुल्ता जाये है जित्ना के उड्ता जाये है ॥ ८ ॥
नक़्शको उस्के मुसव्विर पर भी क्या क्या नाज़ हैं
खींचता है जिस् क़दर उतनाही खींचा जाये है ॥ ९ ॥
साया मेरा मुझ्से मिस्ले दूद् भागे है असद्
पास मुझ् आतिश बजांके किससे ठहरा जाये है ॥ १० ॥

(१) आमच्या मत्सराची हद्द झाली. स्वतः आम्ही प्रियेकडे पाहातों तर स्वतःबद्दलही मत्सर वाटूं लागतो. ह्या मत्सरी स्वभावामुळें प्रियेच्या दर्शनाला आम्ही आपण होऊन वंचित झालों. काय हें आमचें दुर्दैव !

(२) तुझ्या भावना इतक्या दाहक आहेत तर हृदयाची आशा सोडून दे कसा. कारण हृदयाच्या नाजूक पात्राचे तुझ्या भावनारूपी जळजळीत मद्यानें विरघळून पाण्यांत रूपांतर झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

(३) प्रतिस्पर्ध्यानें लगट केली तर तिनें प्रतिकार कसा करावा. कारण लज्जेनें संकोचाला पारावार राहात नाहीं.

(४) एकीकडे आसक्तीला दीर्घ निश्वास सोडण्याची हौस तर दुसरीकडे हृदय इतकें दुबळें झालें आहे कीं एवढ्याशा श्वासोच्छ्वासानें त्याला घाबरल्यासारखें होतें.

(५) प्रिये, तुझ्या आनंदी बैठकीला दृष्ट न लागो. तुझ्या बैठकीचें वातावरण काय वर्णावें ? आमचीं गाऱ्हाणीं बैठकींत पोहोंचेपर्यंत स्तुतिगीतांमध्यें तीं बदलून जातात.

(६) आंतून प्रेम असलें तरी तिनें आमचा छळ करूं नये, म्हणून आम्ही वरकरणी दुर्लक्षाचें सोंग आणण्यास जातों पण तिच्यापाशीं पोहोंचल्यावर आमचें हें वरपांगी सोंग पार नाहींसें होतें आणि वस्तुस्थिति दिसून येते.

(७) परक्याबरोबर ती मौज करीत असल्याचें वृत्त कानांवर पडलें कीं दुःखानें मटकन् बसावें अशी मनाची स्थिति होते आणि तिकडे प्रतिस्पर्धी बैठकींत आनंदांत बसलेले असतात.

(८) प्रेमांत सांपडून ती अप्सरा अधिकच नाजूक दिसूं लागली आहे. म्हणजे प्रेमचिंतनानें चेहेऱ्यावरचा रंग जितका उडून चालला आहे तितकाच प्रणयरंगाला बहर येतो असें म्हटलें पाहिजे.

(९) प्रियेच्या चित्रानेंही नखरा करावा काय ? चित्रकार प्रियेचें चित्र काढूं इच्छितो पण त्याला तें जमत नाहीं. म्हणजे प्रियेचें चित्रही स्वतःला ओढून धरीत आहे असें म्हटलें पाहिजे.

(१०) धुराप्रमाणें माझी सावली माझ्यापासून लांब पळते आहे. आमच्या हृदयांत अग्नि पेटलेला आहे. त्यामुळें त्यापुढें आमची सावलीही टिकाव धरीत नाहीं मग इतरांची गोष्ट सोडून द्या.

१४० . . . गर्मे फ़रयाद रखा शकूले निहालीने मुझे
तब अमां हिज्रमे दी बुर्दे ल्यालीने मुझे ।। १ ।।
निसया व नक़दे दो आलम् की हक़ीक़त माऌम्
लेलिया मुझसे मेरी हिम्मते आलीने मुझे ।। २ ।।
कसरत आरायीये वहदत है परस्तारीये वहम
कर दिया काफ़िर इन् असूनाम् ख़ियालीने मुझे ।। ३ ।।
हवसे गुल्का तसव्वुरमे भी खटका न रहा
अजब् आराम दिया बेपरोवालीने मुझे ।। ४ ।।

(१) विरहाच्या रात्रीं शय्येवर रंगीबेरंगी चित्रें काढलेली चादर पाहून मला दुःखानें भडभडून आलें; कारण त्यामुळें मला प्रियेच्या छबीची आठवण झाली. हाय, प्रियेची मूर्ति डोळ्यांसमोर दिसते पण प्रिया जवळ नाहीं. विरहाच्या शीत रात्रींत माझ्या दाहक निश्वासानें थोडी तरी ऊब लाभली, नाहीं तर माझे हाल वर्णन करतां येण्यासारखे नव्हते.

(२) माझा निर्धार दांडगा आहे त्यामुळें मी स्वतःला इह काय पर काय कोणत्याही गोष्टीनें स्वतःला विकलें नाहीं. मी माझा स्वाभिमान टिकविला आहे.

(३) एकमेवाद्वितीय परमेश्वराचें स्वरूप अनत कणाकणांतून दिसून येतें असें म्हणतात. पण मला तें पटत नाहीं. कारण आम्हां एकेश्वरवाद्यांना ह्यांत अनेक देवतांच्या आराधनेचा भास होतो आणि हें आमच्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे.

(४) मी बंधनांत आणि वर पंख कापलेला अशा स्थितींत मला बागेंतील फुलावरही आसक्ति नाहींशी झाली आहे.

१४१ . . . कारगाहे हस्तीमे लालादाग़ सामान् है
बर्क़े ख़िमन् राहत् ख़ूने गरमे देहक़ान् है ।। १ ।।
ग़ुंचये नाशिगुफ़्तहा बर्गे आफ़ियत माऌम
बावजूदे दिल् जमयी रख़्वाबे गुल् परीशान है ।। २ ।।
हम् से रंजे बेताबी किस तरह उठाया जाये
दाग़े पुश्ते दस्ते अज्ज़ शोला ख़स् बदंदान् है ।। ३ ।।

उग् रहा है दरोदीवार् पे सब्ज़ा ग़ालिब्
हम् बियाबांमे हैं और् घरमे बहार् आयी है ॥ ४ ॥

(१) हें अस्तित्व शोकमय आहे. कितीही कष्ट करा सारें कांहीं क्षणभंगुर आहे. फुलांचा रंग आकर्षक आहे पण त्यावरचा डाग हें त्याच्या क्षणैक आयुष्याचें लक्षण आहे. शेतकरी काबाडकष्ट करतो. ह्या कष्टानें त्याचें रक्त तापतें. पण त्याला मिळणारें फळ हें टिकत नाहीं म्हणजे त्याचें तापलेलें रक्त हें त्याच्या कष्टाच्या फळाला विजेसारखें दुःखपूर्ण करतें म्हटलें पाहिजे. सारांश, हें जीवन कष्टमय एतएव दुःखमय आहे.

(२) कळ्या उमलतात पण त्या उमलल्यानंतर आपण किती काळ टिकूं ह्या चिंतेनें कळ्यांना स्वस्थता लाभत नाहीं. क्षणभंगुर आयुष्याची त्यांना काळजी लागली आहे.

(३) ह्या भयंकर जगांत अग्नीनेंही दांतीं तृण धरावें आणि निर्धारानें जमिनीवर गुडघे टेकावे अशी स्थिति आहे. मग आमचीं दुःखें दूर कशीं बरें व्हावीं ?

(४) हे गालिब, काय आमची शोचनीय स्थिति आहे. घरांत ठिकठिकाणीं हिरवळ उगवून जंगल झालें आहे. हिरवळ म्हणजे वसंतऋतूच. आमच्या घरीं वसंतऋतु फुलावा आणि आम्हीं मात्र वनवासांत भटकत फिरावें हें आमचें दुर्दैव. (घरांत ठिकठिकाणीं गवत उगवणें हें घर उध्वस्त झाल्याचें चिन्ह आहे. कवीनें वसंतऋतूचा उल्लेख आपली केविलवाणी स्थिति निदशण्यासाठीं केला आहे.)

१४२ . . . सादगीपर उम्के मर जानेकी हस्रत दिलमे है
बस् नही चल्ता के फिर खंजर कफ़े क़ातिल् मे है ॥ १ ॥

देखना तक़रीर् की लज़्ज़त् के जो उसने कहा
मैंने ये जाना के गोया ये भी मेरे दिल्मे है ॥ २ ॥

गर्चे है किस् किस् बुरायीसे व ले बाईहमा
जिक्र मेरा मुझसे बेहतर् है के उस् महफ़िल् मे है ॥ ३ ॥

बस् हुजूमे ना उम्मीदी खाक् मे मिल् जायेगी
ये जो एक् लज़्ज़त् हमारी सओए बेहासिल् मे है ॥ ४ ॥

रंजे रह क्यौं खींचिये वामांदगीको इश्क़ है
उठ नहीं सकता हमारा जो क़दम् मंज़िल् मे है ॥ ५ ॥

जल्वाज़ारे आतिशे दोज़ख़ हमारा दिल सही
फ़ित्नये शोरे क़ियामत किस्के आब्रोगिल् मे है ॥ ६ ॥
है दिले शोरीदये ग़ालिब्र तिलिस्मे पेचोताब
रहम् कर् अपनी तमन्ना पर के किस् मुश्किल् मे है ॥ ७ ॥

(१) प्रियेच्या नैसर्गिक साधेपणावर जीव ओवाळून टाकावा ही आकांक्षा मनांत आहे पण तिच्या हातांत वध करण्याकरितां खंजीर आहे. मग आपण होऊन मरून जाण्याची आमची इच्छा कशी फलद्रूप होणार !

(२) तिच्या मनांत विचार आला कीं माझ्याही मनांत तोच विचार येतो आणि मग ती मनासारखें जेव्हां बोलूं लागते तेव्हां त्या संभाषणाची गोडी काय बरें वर्णावी !

(३) तिच्या बैठकींत माझी चर्चा होते ना हेंच माझें भाग्य समजतों. मग ती चर्चा माझ्या विरुद्ध असली तरी हरकत नाहीं.

(४) आमच्या निष्फळ प्रयत्नांत जी गोडी आहे तिला हे निराशेच्या झुंडींनो, नाहींशी करूं नका.

(५) माझे पाय थकले आहेत. जणूं काय शांततेला माझ्या पायाशीं प्रेम जडावें असें वाटत आहे म्हणूनच कीं काय ती प्रेमाच्या कठीण रस्त्यांत पाय उचलूं देत नाहीं.

(६) आमच्या हृदयांत भयंकर दाहकता असेल कबूल. पण हे प्रिये, प्रलय उडवून देण्याची शक्ति तर तुझ्या रोमारोमांत भरली आहे.

(७) हे प्रिये, माझें हृदय म्हणजे एक अद्‌भुत चक्रव्यूह झाला आहे आणि त्यांत तुझ्याबद्दलची आकांक्षा अडकून पडली आहे. त्या आकांक्षांवर कृपा दाखवून तिला ह्या पेचांतून सोडव (म्हणजेच माझी तुझ्यासंबंधीची आकांक्षा फळाला येऊं दे)

१४३ . . . दिल्से तेरी निगाह जिगर् तक् उतर गयी
दोनोंको इक् अदामे रज़ामंद कर गयी ॥ १ ॥
शक़ हो गया है सीना ख़ुशा लज़्ज़ते फ़िराक
तक्लीफ़े परदादारीये ज़ख़्मे जिगर गयी ॥ २ ॥
वो बादये शब्रानाकी सरमस्तियां कहां
उठिये बस् अब् के लज़्ज़ते ख़्वाबे सहर गयी ॥ ३ ॥
उडती फिरे है ख़ाक् मेरी कूये यार मे
बारे अब अये हवा हवसे बालो पर गयी ॥ ४ ॥

देखो तो दिल्‌ फ़रेबीये अंदाज़े नक़्शे पा
मौजे ख़िरामे यारभी क्या गुल्‌ कतर गयी ॥ ५ ॥

हर बूल हवस ने हुस्न परस्ती शिआर की
अब्‌ आबरूये शेवये अहले नज़र गयी ॥ ६ ॥

नज़्ज़ारे ने भी काम्‌ किया वां नक़ाब्‌ का
मस्तीसे हर निगाह तेरे रुख़पर बिखर गयी ॥ ७ ॥

फ़र्दा वदीका तफ़र्क़ा यक्बार मिट्‌ गया
कल्ह्‌ तुम्‌ गये के हम्पे क़ियामत्‌ गुज़र गयी ॥ ८ ॥

मारा ज़माने ने असदुल्लाख़ां तुम्हें
वो वल्वले कहां वो जवानी किधर गयी ॥ ९ ॥

(१) तुझी दृष्टि हृदयांतून उतरून काळजाला जाऊन भिडली म्हणजे एका दृष्टिक्षेपांत तूं हृदय आणि काळीज काबीज करून टाकतेस.

(२) विरहाच्या वेदना मी फार कष्टानें लपवून ठेवीत होतों. आतां ह्या वेदनांमुळें छाती फाटून गेली. त्यामुळें वेदनांवरील पडदा हटला ; ही मोठ्या समाधानाची गोष्ट घडली.

(३) त्या रात्रींच्या मैफिलीची गोडी आतां कुठें? आतां उठा, पहांटेच्या स्वप्नाचीही लज्जत आतां संपली.

(४) मी धुळीला मिळालों. हे वायो, माझी धूळ उडवून तूं प्रियेच्या परिसरांत नेऊन टाकीत आहेस हें बरें झालें. आतां मला उडण्याची किंवा धडपड करण्याची आकांक्षा राहिली नाहीं.

(५) प्रियेचीं पदचिन्हें जिथें जिथें उमटलीं गेलीं आहेत तिथें तिथें मनाला लुब्ध करील असा त्या जागेंत रंग भरून राहिला आहे.

(६) सौंदर्याची उपासना रसिकांनीं करावी पण आजकाल कोणीही छचोर आणि आंबटषोकी माणूस सौंदर्याच्या मागें लागतो मग त्याची रसिकता खरी असो वा नसो त्यामुळें खऱ्या रसिकांची किंमत कमी होऊन गेली आहे.

(७) माझी दृष्टि तुझ्या मुखापर्यंत पोहोंचून बेभान झाली. ती विखरल्यामुळें तुझें दर्शन घडणें अशक्य झालें. जणूं काय माझी विखुरलेली दृष्टि हाच तुझा पडदा बनला.

(८) तूं निघून गेल्यामुळें जी मनःस्थिति झाली त्यामुळें काळाचें भान मला राहिलें नाहीं. कल्पांताच्या वेळीं असेंच होतें असें म्हणतात. म्हणजे माझ्यावर कल्पांत कोसळला असें म्हणावयास हवें.

(९) हे असदुल्लाखान, (कवीचें नांव) काळानें तुझापुरताच निकाल लावला. तें तुझें तारुण्य अन् तारुण्यसुलभ आकांक्षा आणि हुरहुरी कुठें गेल्या.

१४४... तस्कीन् को हम् न रोयें जो ज़ौक़े नज़र मिले
हूराने खुल्दमे तेरी सूरत मगर मिले ॥ १ ॥
अपनी गलीमे मुझको न कर दफ़्न् बाद क़त्ल
मेरे पतेसे ख़ल्क़को क्यौं तेरा घर मिले ॥ २ ॥
साक़ी गरी की शर्म् करो आज वर्ना हम्
हरशब् पियाही करते हैं म्ये जिस क़दर मिले ॥ ३ ॥
तुझसे तो कुछ कलाम् नहीं लेकिन् अये नदीम्
मेरा सलाम् कहियो अगर नामाबर मिले ॥ ४ ॥
तुम्को भी हम् दिखायें के मजनूंने क्या किया
फ़ुर्सत् कशाकशे ग़मे पिनहांसे गर मिले ॥ ५ ॥
लाज़िम् नहीं के ख़िज़्रकी हम् पैरवी करें
जाना के एक् बुज़ुर्ग् हमे हमसफ़र मिले ॥ ६ ॥
अये साकिनाने कूचये दिल्दार देखना
तुम्को कहीं जो ग़ालिबे आशुफ़्तासर मिले ॥ ७ ॥

(१) स्वर्गांत तुझ्या स्वरूपाची अप्सरा लाभली तर मनाचें थोडें तरी समाधान होईल. पण तें अशक्य आहे.

(२) माझा वध केल्यानंतर आपल्या आळींत मला पुरूं नकोस. नाहींतर त्यामुळें माझ्या प्रतिस्पर्ध्यांना तुझ्या घरचा पत्ता कळायचा.

(३) अरे साकी (मद्य पाजणारा), रोज मिळेल तितकी पिऊन आम्ही समाधान मानतों. आज आपल्या धंद्याचा कांहीं तरी अभिमान बाळग आणि आम्हांला हवी तितकी पिऊं दे पाहूं.

(४) अरे मित्रा, निरोप देऊन मी एकाला माझ्या प्रियेकडे पाठविला तर तो तिच्या प्रेमांत गुरफटून वेडा होऊन रानोमाळ भटकतो आहे. तुझ्या विश्वासावर त्याच्या हातीं निरोप पाठविला. तुला मी कांहीं म्हणत नाहीं. पण तो वेडा भेटला तर त्याला माझा हात जोडून नमस्कार सांग.

(५) अगे, ह्या प्रेमशोकांतून थोडी उसंत तर मिळूं दे मग मी पण दाखवून देईन कीं मजनू (सुविख्यात प्रेमिक) माझ्यापुढें कांहींच नाहीं.

(६) खिजर (उर्दू–फारसी. वाङ्मयांतील परमेश्वरी वाटाड्या. हा चिरंजीव आहे असें समजतात.) ह्याचें अनुयायित्व आम्हांला पत्करण्यास नको आहे. त्याच्याप्रमाणें आम्हींही परमेश्वरीमार्गांत भटकत आहोंत. फार तर तो आमच्यासारखा मुमुक्षु होता एवढें आम्ही मानूं.

(७) हे प्रियेच्या परिसरांत वावरणाऱ्यांनो, त्या प्रेमवेड्या गालिबचा कुठें शोध लागतो कां पहा बरें !

१४५ . . . कोयी दिन् गर ज़िंदगानी और है
अपने जी मे हम्ने ठानी और है ॥ १ ॥
आतिशे दोज़ख़मे ये गरमी कहां
सोज़े ग़म्हाये निहानी और है ॥ २ ॥
बार हा देखी हैं उन्की रंजिशें
पर कुछ् अबकी सरगिरानी और है ॥ ३ ॥
देके ख़त् मूह देखता है नामाबर
कुछ तो पैग़ामे ज़बानी और है ॥ ४ ॥
क़ातेए आमार हैं अक्सर नुजूम्
वो बलाये आस्मानी और हैं ॥ ५ ॥
हो चुकीं ग़ालिब् बलायें सब् तमाम्
एक मर्गे नागहानी और है ॥ ६ ॥

(१) आम्हांला अद्याप आयुष्य असलें तर आम्ही कांहीं तरी करून दाखविण्याचा निर्धार केला आहे.

(२) आमच्या हृदयांत पेटलेली जी आग आहे ती नरकांतील उष्णतेंत कुठें सांपडणार ?

(३) तिचें रुसणें-फुगणें पुष्कळदा पाहिलें आहे पण तिचा आजचा रंग औरच दिसत आहे.

(४) प्रियेनें दिलेलें पत्र मला दूत देऊन माझ्या तोंडाकडे कां पाहात आहे. प्रियेनें कांहीं तोंडी निरोप पण दिला आहे कीं काय ?

(५) वक्रदृष्टीनें ग्रह मनुष्याचा नाश करतात पण ही प्रिया त्यांच्यापेक्षांही भयंकर आहे, कारण ती मरूं देत नाहीं तर जीवंतपणीं मरणाच्या यातना भोगण्यास लावीत आहे.

(६) गालिब, सारीं संकटें संपलीं. आतां फक्त एक आकस्मिक घटना घडणें राहिलें आहे. ती घटना म्हणजे मृत्यु होय.

१४६ . . . कोयी उम्मीद बर् नहीं आती
कोयी सूरत् नज़र् नहीं आती ॥ १ ॥
मौत का एक़् दिन् मोऐयन है
नींद क्यौं रात्भर् नहीं आती ॥ २ ॥
आगे आती थी हाले दिल्पे हंसी
अब् किसी बात् पर् नही आती ॥ ३ ॥
जान्ता हूं सवाबे ताअतो ज़हद्
पर तबीयत उधर् नहीं आती ॥ ४ ॥
है कुछ् ऐसीही बात् जो चुप् हूं
वर्ना क्या बात् कर् नहीं आती ॥ ५ ॥
क्यौं न चीख़ू के याद् करते हैं
मेरी आवाज़ गर् नहीं आती ॥ ६ ॥
दाग़े दिल् गर् नज़र नहीं आता
बूभि अये चारागर् नहीं आती ॥ ७ ॥
हम् वहां हैं जहांसे हम्को भी
कुछ हमारी ख़बर् नहीं आती ॥ ८ ॥
मरते हैं आरज़ूमे मरनेकी
मौत आती है पर नहीं आती ॥ ९ ॥
काबा किस् मूँह् से जावोगे ग़ालिब्
शरम् तुम्को मगर नहीं आती ॥ १० ॥

(१) मला आतां कोणतीच आशा राहिली नाहीं. कोणताही मार्ग दिसत नाहीं.

(२) मृत्यूचा दिवस ठरलेला असतो ना मग तो त्याशिवाय कांहीं येत नाहीं. पण ह्या झोपेला काय झालें आहे कुणास ठाऊक. ती कां बरें येत नाहीं ?

(३) मागें मला स्वतःच्या स्थितीबद्दल हसूं येत असे. पण आतां कोणत्याच गोष्टीचें हसूं येत नाहीं इतका मी निराश झालों आहें.

(४) पुण्याचरणाचें महत्त्व मला पटत नाहीं असें नाहीं. पण काय करूं ? माझें मनच तिकडे वळत नाहीं.

(५) आम्ही गप्प बसलों त्याला कांहीं तरी कारण असलें पाहिजे. आम्हांला बोलतां येत नाहीं असं थोडंच आहे.

(६) मी गान्हाणें गायिलें नाहीं कीं प्रियेला वाटतें कीं आपल्यावरचें ह्याचें लक्ष उडालें म्हणून तिच्या समाधानाकरितां तरी मला सारखें सारखें आक्रंदन करावें लागतें.

(७) अरे वैद्या, माझ्या हृदयाच्या जखमा तुला दिसत नसतील पण म्हणून त्यांचा वास लपून राहील काय ? मांस जळूं लागलें कीं त्याचा वास सुटतो तसेंच हृदय जळत आहे तें दिसत नसलें तर जाणवत नाहीं असें थोडेंच आहे.

(८) आमचें वेड ह्या थराला गेलें आहे कीं, आम्हांला स्वतःचीच जाणीव राहिली नाहीं.

(९) मरणाच्या इच्छेवर आम्ही जीव द्यायला बसलों आहोंत. पण मरण येत नाहीं, त्याला काय करावें.

(१०) हे गालिब, तुला लाज कशी काय वाटत नाहीं. अरे, तूं हा असा, मक्क्याची यात्रा करायला तुला तोंड आहे का ?

१४७ . . . दिले नादां तुझे हुवा क्या है
आखिर् इस दर्द् की दवा क्या है ॥ १ ॥
हम हैं मुश्ताक़् और वो बज़ोर्
या इलाही ये माजरा क्या हैं ॥ २ ॥
मै भी मूँह् मे ज़बान रखता हूं
काश् पूछो के मुद्दआ क्या है ॥ ३ ॥
जबके तुझ बिन् नहीं कोयी मौजूद
फिर् ये हंगामा अये खुदा क्या है ॥ ४ ॥
ये परी चेहरा लोग कैसे हैं
ग़म्ज़वो इश्ववो अदा क्या है ॥ ५ ॥
शिक्ने जुल्फ़् अंबरीन् क्यौं है
निगहे चश्मे सुर्मासा क्या है ॥ ६ ॥
सब्ज़ा वो गुल् कहांसे आये हैं
अब्र क्या चीज़् है हवा क्या है ॥ ७ ॥
हम को उन्से वफ़ा की है उम्मीद्
जो नहीं जानूते वफ़ा क्या है ॥ ८ ॥

हां भला कर तेरा भला होगा
और दरवेश् की सदा क्या है ।। ९ ।।
जान् तुम्पर् निसार करता हूं
मैं नहीं जान्ता दुवा क्या है ।। १० ।।
मैने माना के कुछ नहीं गालिब्
मुफ़्त हात आये तो बुरा क्या है ।। ११ ।।

(१) हे दुबळ्या जीवा, तुला झालें आहे तरी काय ? ह्या व्यथेचा इलाज तरी काय ?

(२) आम्हांला तिची आसक्ति आणि तिला आमचा कंटाळा. परमेश्वरा, ही काय भानगड आहे ?

(३) मलाही तोंड आहे म्हटलें, पण काय बोलायचें आहे हें विचारशील तर ना ?

(४) परमेश्वरा, जर तुझ्याशिवाय दुसरे कुणीं नाहीं तर जगांत हा गोंधळ कशाचा माजून राहिला आहे ?

(५) ह्या सुंदर स्त्रिया, अन् त्यांचे हे नाजनखरे हीं काय आहेत पाहा तरी !

(६) सुगंधित केशकलापाची ही कुटिलता काय आहे आणि काजळ लावलेले डोळे काय दर्शवतात बरें !

(७) हा वसंतऋतु कोठून आला ? हे मेघ, हा वायु हें सारें आहे तरी काय ?

(८) आम्ही तिच्याकडून निष्ठेची अपेक्षा करतों अन् तिला निष्ठा ही काय भानगड आहे हें धड माहीत नाहीं.

(९) लोकांचें कल्याण कर. तुझेंही कल्याण होईल ह्यापरती फकीराची प्रार्थना ती काय असणार ?

(१०) तुझ्यासाठीं जीव द्यावा एवढेंच काय तें मला माहीत आहे. प्रार्थना, विनवण्या हें कांहीं मी जाणत नाहीं.

(११) हे गालिब, कशांत कांहींच नाहीं हें मलाही पटतें पण विनायास पदरांत पडत असेल तर काय हरकत आहे ?

१४८ . . . कहते हो तुम् सब के बुते ग़ालिया मू आये
एक् मर्तबा घबराके कहो कोयी के वो आये ।। १ ।।
हूं कश्मकशे नज़ामे हां जज़्बे महब्बत्
कुछ कह न सकूं पर वो मेरे पूछने को आये ।। २ ।।
है साइक़ा व शोला व सीमाब्का आलम्
आनाही समझ्मे मेरी आता नहीं गो आये ।। ३ ।।

ज़ाहिर है के घबराके न भागेंगे नकीरैन्
हां मूँह्से मगर् बादये दोशीना की बू आये ॥ ४ ॥
जह्लादसे डरते हैं न वाइज़्से झगडते
हम् समझे हुये हैं उसे जिस् भेसमे जो आये ॥ ५ ॥
हां अह्ले तलब् कौन् सुने तानये नायाफ़्त
देखाके वो मिल्ता नहीं अपनेहीको खो आये ॥ ६ ॥
अपूना नहीं वो शेवा के आरामसे बैठें
उस् दरपे नहीं बार तो काबेहीको हो आये ॥ ७ ॥
की हम् नफ़सोंने असरे गिरियामे तक़रीर्
अच्छे रहे आप् उस्से मगर् मुझको डुबो आये ॥ ८ ॥
उस् अंजुमने नाज़ की क्या बात् है ग़ालिब्
हम् भी गये वां और तेरी तक़दीर को रो आये ॥ ९ ॥

(१) प्रियेच्या विरहांत माझी क्लांत अवस्था झालेली पाहून, मित्रांनो, तुम्ही ती सुगंधित केशकलापाची प्रिया सत्वर यावी अशी प्रार्थना करीत आहांत. पण हें पाहा, ती आलीच असें तुमच्यापैकीं कोणीच कां म्हणत नाहीं.

(२) माझ्या मनाची विलक्षण ओढाताण चालली आहे. प्रियेला पुष्कळ सांगावयाचें आहे पण ती येथें येईल तेव्हां ना. वा प्रेमा, तूं आपल्या प्रभावानें तिला इकडे त्वरित कां आणत नाहींस ?

(३) प्रिया आली पण ती आली हें मला कळलें नाहीं. कारण मला जो भास झाला तो चपळ सौदामिनीच्या पेटलेल्या ज्वालेचा आणि चंचल पान्याचा. मग प्रिया मला दिसणार तरी कशी ?

(४) माझ्या पापपुण्याचा झाडा घेणारे देवदूत अंतकाळीं येऊं तर द्या. माझ्या तोंडाला येणाऱ्या दारूच्या वासानें ते पळून गेल्याशिवाय राहाणार नाहींत.

(५) प्रत्येक वस्तूंत मला परमेश्वराचा साक्षात्कार होतो; मग तो वधकाच्या स्वरूपांत आला तर आम्हांला त्याची भीति नाहीं आणि धर्मप्रचारकाच्या स्वरूपांत आला तर आम्ही त्याच्याशीं भांडणार सुद्धा नाहीं.

(६) आम्ही परमेश्वराच्या प्राप्तीसाठीं निघालों पण त्यांत आम्हांला यश आलें नाहीं. त्यांत आम्हांला वेड मात्र लागलें तें बरें झालें. लोकांचे टोमणे आणि निंदा समजण्याची आम्हांला क्षमता राहिली नाहीं.

(७) आम्हांला स्वस्थ बसून राहाण्याची सवय नाहीं. तिच्या दारावर नाहींतर आम्ही काब्याच्या पायरीवर जाऊन बसून आलों.

(८) माझ्या मित्रांनीं रुदन आणि आक्रंदन ह्याची हकीकत प्रियेला सांगितली. तिच्यावर त्याचा कांहीं प्रभाव झाला नाहीं. उलट मी मात्र शरमिंदा झालों.

(९) काय त्या प्रियेच्या बैठकींतील मजा? आम्हांला तर आनंद वाटला. पण गालिब, तूं तिच्या सहवासाला मुकतो आहेस हें पाहून आम्हांला वाईट वाटतें.

१४९ . . . फिर् कुछ् एक् दिलको बेक़रारी है
सीना जोयाये ज़ख़्मकारी है ॥ १ ॥
फिर् जिगर् खोदने लगा नाख़ुन्
आमदे फ़स्ले लालाकारी है ॥ २ ॥
क़िब्लये मक़्सदे निगाहे नियाज़
फिर वही पर्दये अमारी है ॥ ३ ॥
चश्मे दल्लाल जिन्से रुसवायी
दिल ख़रीदारे ज़ौक़ ख़्वारी है ॥ ४ ॥
वोही सद्रंग् नाला फ़र्सायी
वही सद् गूना अश्कबारी है ॥ ५ ॥
दिल हवाये ख़िरामे नाज़से फिर्
महशरिस्ताने बेक़रारी है ॥ ६ ॥
जल्वा फिर् अर्ज़े नाज़ करता है
रोज़ बाज़ारे जांसिपारी है ॥ ७ ॥
फिर् उसी बेवफ़ापे मरते हैं
फिर् वही ज़िंदगी हमारी है ॥ ८ ॥
फिर् खुला है दरे अदालते नाज़्
गरम बाज़ारे फ़ौज़दारी है ॥ ९ ॥
हो रहा है जहांमे अंधेर्
ज़ुल्फ़की फिर् सिरश्तेदारी है ॥ १० ॥
फिर् दिया पारये जिगर्ने सवाल
एक् फ़रयादे आहोज़ारी है ॥ ११ ॥
फिर् हुये हैं गवाहे इश्क़ तलब्
अश्कबारीका हुक्म जारी है ॥ १२ ॥

दिल् व मिज़्गांका जो मुक़द्दमा था
आज् फिर् उसकी रूबकारी है ॥ १३ ॥
बेखुदी बेसबब् नहीं ग़ालिब्
कुछ् तो है जिसकी पर्दादारी है ॥ १४ ॥

(१) मला सारखें अस्वस्थ वाटत आहे. फिरून एकदा हृदयाला मर्मावर आघात व्हावा असें वाटत आहे.

(२) आतां वसंतऋतु आला आहे. फिरून एकदा भरलेल्या जखमा उकरून काढण्याकरितां नखांची धडपड चालली आहे.

(३) पुन्हा आमचे निष्ठेनें भरलेले डोळे प्रियेच्या आसनाकडे वळले आहेत.

(४) डोळे हृदयाला पुन्हा आसक्तींत फसवूं पाहात आहेत.

(५) हृदयाचें आक्रंदन पहिल्यासारखें पुन्हा चालू झालें आहे. अश्रूंच्या धारा पुन्हा पूर्वीसारख्या वाहूं लागल्या आहेत.

(६) प्रियेच्या हंसगतीच्या विचारानें हृदय पुन्हा अस्वस्थ होऊन प्रलयाचें स्थान बनलें आहे.

(७) प्रियेच्या सौंदर्याचा पुन्हा आविष्कार होत आहे आणि त्याकरितां लोक पुन्हा प्राण पणाला लावूं लागले आहेत.

(८) त्या चंचल प्रियेवर आम्ही पुन्हा आपला जीव द्यावयास बसलों आहोंत आणि मागचें तेंच जीवन आम्हांला अनुभवास येऊं लागलें आहे.

(९) प्रेमाचें न्यायालय पुन्हा उघडलें आहे आणि प्रेमाच्या गुन्ह्याची फिरून चौकशी चालू झाली आहे.

(१०) केशकलापांनीं न्यायालयाचें काम हातीं घेतलें आहे आणि त्यामुळें जगांत अंधार पसरला आहे.

(११) पुन्हा हृदयानें न्यायालयांत हाक दिली. जिकडे तिकडे गाऱ्हाणींच गाऱ्हाणीं आतां ऐकूं येत आहेत.

(१२) प्रेमाच्या साक्षीदारांना पुन्हा बोलावण्यांत आलें आहे आणि न्यायालयाकडून अश्रु ढाळण्याचा हुकूम निघालेला आहे.

(१३) हृदय आणि पापण्या ह्यांचा खटला होता त्याची आज पुन्हा सुनावणी आहे.

(१४) गालिब, ही स्वतःची विस्मृति विनाकारण दिसत नाहीं. ह्याच्या मागें कांहीं तरी दडलेलें दिसत आहे.

१५०... जूनून् तोहमत्‌कशे तस्कीन् न हो गर् शाद्‌मानी की
नमक्‌पाशे ख़राशे दिल है लज्ज़त् ज़िंदगानी की ॥ १ ॥
कशाकश्‌हाये हस्तीसे करे क्या सओए आज़ादी
हुयी ज़ंजीर मौजे आब्‌को फुर्सत रवानी की ॥ २ ॥
पस् अज़ मुर्दन भी दीवाना ज़ियारत्‌गाहे तिफ़्‌लां है
शरारे संग्‌ने तुर्‌बत् पे मेरी गुल्‌फ़िशानी की ॥ ३ ॥

(१) दुःखानंतर थोडेंसें सुख लाभलें तर त्या सुखानंतर येणाऱ्या दुःखाची तीव्रता अधिक भासते. आमच्या वेडापासून थोडी उसंत मिळाली म्हणून आम्हांला नांवें ठेवू नका. कारण त्यापाठोपाठ येणाऱ्या वेडाच्या रोगावर ही उसंत म्हणजे मीठ शिंपडण्यासारखें आहे.

(२) जीवनाच्या संग्रामांतून मुक्ति कशी मिळेल ? ती पाहा समुद्रावरची लाट, पुढें सरकतांना तिला वाटतें आपण समुद्रांतून मुक्त होऊं. लगेच सांखळीनें ओढल्यासारखें तिला परतावें लागतें.

(३) प्रेमवेड्याच्या मृत्यूनंतरही मुलें त्याच्या थडग्यावर दगड फेंकतात. जणूं काय दगडांतील सुप्त अग्निपुष्पांची त्याच्या थडग्यावर वृष्टि होत आहे.

१५१... निकोहिश है सज़ा फ़र्यादीये बेदादे दिल्बर् की
मबादा खंदये दंदानुमा हो सुबहे महशर् की ॥ १ ॥
रगे लैलाको खाके दश्ते मज्‌नूं रेशगी बख्‌शे
अगर् बो दे बजाये दाना दिहक़ान् नोक् निश्तर् की ॥ २ ॥
परे परवाना शायद् बादबाने कश्तीये मये था
हुयी मज्‌लिस् की गर्‌मी से रवानी दौरे साग़र् की ॥ ३ ॥
करूं बेदादे ज़ौक़े पुरफ़िशानी अर्ज़क्या क़ुद्‌रत्
के ताक़त् उडगयी उडने से पहले मेरे शहपर् की ॥ ४ ॥
कहांतक् रोवूं उस्‌के खैमे के पीछे क़ियामत् है
मेरी क़िस्मत् मे यारब क्या न थी दीवार पत्थर् की ॥ ५ ॥

(१) प्रेमिकाच्या गाऱ्हाण्याला उत्तर म्हणजे त्याची निर्भर्त्सना ठरलेलीच. त्याप्रमाणें कल्पांताचा दिवस पण माझी चेष्टा उडवील कीं काय अशी भीति वाटते.

(२) एकदा लैलानें आपली शीर उघडविली तर असें म्हणतात कीं तिचा प्रियकर मजनून ह्याच्या हातांतून रक्त वाहूं लागलें. कवि म्हणतो, मजनून ज्या अरण्यांत वणवण भटकत होता तेथें शेतकऱ्यांनीं दाण्याऐवजीं खंजिरांचीं टोंकें पेरावीं म्हणजे तीं उगवलीं कीं लैलाला मजनूनसारखी पीडा होईल.

(३) मैफिलींत दारूचे पेले धारण केलेलें तबक फिरत आहे. ह्या नावेला जणूं दिव्यामागें येणारे पतंगांचे पंख बादबानाचे म्हणजे शीड हाकणाऱ्याचें काम करीत आहेत.

(४) स्वैर भरारीचीं सुखदुःखें मी काय वर्णन करूं! उडण्याच्या पूर्वी माझ्या पंखांतील शक्ति नष्ट झाली आहे.

(५) प्रियेच्या तंबूच्या मागोमाग रुदन करीत मीं किती फिरावें? परमेश्वरा, त्याऐवजीं दगडी भिंत माझ्या नशीबांत दिली असतीस तर त्यावर डोकें आपटून मरून तरी गेलों असतों.

१५२ . . . बे एतिदालियोंसे सबुक सबमे हम् हुये
जित्ने ज़्यादा होगये उतनेही कम् हुये ॥ १ ॥
पिन्हां था दाम् सख्त् क़रीब आशियाने के
उडने न पाये थे के गिरफ़्तार् हम् हुये ॥ २ ॥
हस्ती हमारी अपनी फ़नापर् दलील् है
यां तक मिटे के आप् हम् अपनी क़सम हुये ॥ ३ ॥
सख्तीकशाने इश्क़की पूछे है क्या खबर्
वो लोग रफ़्ता रफ़्ता सरापा अलम् हुये ॥ ४ ॥
तेरी वफ़ासे क्या हो तलाफ़ी के दहर् मे
तेरे सिवा भी हम् पे बहोत से सितम् हुये ॥ ५ ॥
लिख्ते रहे जुनूं की हिकायाते खूंचिकां
हरचंद इसमे हाथ हमारे क़लम हुये ॥ ६ ॥
अल्लाहरे तेरी तुंदीये खू जिसके बीम्से
अजज़ाये नाला दिल् मे मेरे रिज़्क हम हुये ॥ ७ ॥
अहले हवस की फ़तह है तर्के नबर्दे इश्क़
जो पांव उठ गये वही उनके अलम हुये ॥ ८ ॥
नाले अदम् मे चंद हमारे सिपुर्द थे
जो वां न खिंचसके सो वो यां आके दम् हुये ॥ ९ ॥
छोडी असद् न हम्ने गदायी मे दिल्लगी
साइल् हुये तो आशिक़े अहले करम् हुये ॥ १० ॥

(१) स्वतःच्या अनिर्बंध वागणुकीनें आम्ही लोकांच्या नजरेंत तुच्छ ठरलों म्हणजे आम्ही जितके वर चढूं पाहात होतों तितकेच खालीं पडलों.

(२) माझ्या घरट्याजवळच पारध्यानें जाळें लावून ठेवलें होतें. मी अजून उडण्यास सुरवात केली होती नव्हती तोंच मी जाळ्यांत अडकून पडलों.

(३) आमचें जीवन म्हणजे केवळ माया आहे. तें अस्तित्वांत नाहीं. फार तर शपथेलाही जीवन आमच्यापाशीं नाहीं अशी शपथ घेण्याइतपत ह्या जीवनाचा आम्हांला आधार आहे.

(४) प्रेमपीडितांची स्थिति काय विचारावी ? ते हळूहळू अंतर्बाह्य शोकमय झाले.

(५) तूं निष्ठा दाखवून काय होणार आहे ? तुझ्याशिवाय इतरांनीं माझा जो छळ केला त्याची भरपाई कशी होणार ?

(६) आपल्या प्रेमवेडाची रक्तरंजित कहाणी, आमचे हात त्यांत कलम झाले (छाटले) तरी आम्ही लिहीतच राहिलों.

(७) हे प्रिये, काय तुझा कडक स्वभाव ! तुझ्या भीतीनें माझे निःश्वास आणि आक्रंदनें आंतल्या आंतच विलीन झालीं, तीं बाहेर पडूं शकलीं नाहींत.

(८) प्रेमाचें उसनें अवसान आणणाऱ्या आंबटषोकी प्रेमिकांचे पाय प्रेमक्षेत्रांत फार वेळ टिकत नाहींत. लवकरच उखडतात.

(९) मृत्युलोकांत येण्यापूर्वी जे निःश्वास आमच्या नशीबांत लिहिले होते त्यांपैकीं कांहीं ह्या लोकांत आमचे श्वासोच्छ्वास बनले आहेत. म्हणजे तुम्हांला जे आमचे श्वासोच्छ्वास वाटतात ते वास्तविक आमचे प्रेमनिःश्वासच होत.

(१०) फकीरी नशीबीं आली पण प्रेम सुटलें नाहीं. पूर्वी सुंदर स्त्रियांच्या मागें लागत होतों. आतां उदारहृदयी लोकांच्या मागें लागलों आहें.

१५३ . . . जो न नक़्दे दाग़े दिल्की करे शोला पासबानी
तो अफ़सुर्दगी निहां है ये मकीने बेज़बानी ॥ १ ॥
मुझे उसूसे क्या तवक़्क़ो बज़माने जवानी
कभी कोदकी मे जिस्ने न सुनी मेरी कहानी ॥ २ ॥
यौंही दुख किसीको देना नहीं ख़ूब् वर्ना कहता
के मेरे अदूको यारब् मिले मेरी ज़िंदगानी ॥ ३ ॥

(१) हृदयावरील डाग सोन्याच्या नाण्यासारखा तळपत आहे. माझ्या प्रेमज्वालांनीं त्याचें रक्षण केलें नाहीं तर हृदय उद्विग्न होऊन जाईल.

(२) बालकांना गोष्टी आवडतात; पण प्रियेनें लहानपणीं कुठें माझी गोष्ट ऐकिली म्हणून तरुणपणीं तिला माझ्या प्रेमाची कहाणी आवडणार आहे.

(३) कुणाला दुःख देणें चांगलें नाहीं म्हणून नाहींतर मी परमेश्वराला विनवणी केली असती, कीं हें प्रभो, माझ्यासारख्याचें संकटमय जीवन माझ्या शत्रूच्या नशीबीं येऊं दे.

१५४ . . . ज़ुल्मत्कदेमे मेरे शबे ग़म्का जोश है
इक् शमा है दलीले सहर् सो ख़मूश है ॥ १ ॥

नै मुज़्दये विसाल न नज़्ज़ारये जमाल
मुद्दत् हुयी है के आश्तीये चश्मो गोश् है ॥ २ ॥

मये ने किया है हुस्ने ख़ुद्आरा को बेहिजाब्
अय् शौक़ यां इजाज़ते तस्लीमो होश् है ॥ ३ ॥

गौहर को अक़्दे गर्दने ख़ूबां मे देखना
क्या औजपर् सितारये गौहर फ़रोश है ॥ ४ ॥

दीदारे बादा हौसला साक़ी निगाह मस्त्
बज़्मे ख़ियाल मैकदये बे ख़रोश् है ॥ ५ ॥

अय् ताज़ावारदाने बिसाते हवाये दिल
ज़िन्हार अगर् तुम्हे हवसे नायेव नोश् है ॥ ६ ॥

देखो मुझे जो दीदये इब्रत् निगाह हो
मेरी सुनो जो गोशे नसीहत नियोश है ॥ ७ ॥

साक़ी बजल्वये दुश्मने ईमानो आगही
मत्रिब् बनग़मा रहज़ने तम्कीनो होश है ॥ ८ ॥

या शब् को देखते थे के हर गोशये बिसात्
दामाने बाग़बानो कफ़े गुल्फ़रोश है ॥ ९ ॥

लुत्फ़े ख़िरामे साक़ी व ज़ौक़े सदाये चंग्
ये जन्नत् निगाह वो फ़िरदौस् गोश है ॥ १० ॥

या सुबहदम् जो देखिये आकर तो बज़्म मे
नै वो सुरूरे सोज़् न जोशो ख़ुरोश है ॥ ११ ॥

दाग़े फ़िराक़े सुहबते शब्की जली हुयी
इक् शमा रहगयी है सो वो भी ख़ुमूश है ॥ १२ ॥

आते हैं ग़ैब् से ये मज़ामीं ख़ियालमे
ग़ालिब् सरीरे ख़ामा नवाये सरोश है ॥ १३ ॥

(१) माझ्या हृदयांत शोकाची रात्र पसरली आहे. ती विरत चालली आहे ह्याचें प्रमाण म्हणजे दिवा असावा पण तोही विझलेला आहे.

(२) युगें लोटलीं आहेत. कानांनीं प्रियामीलनाचें गीत ऐकिलें नाहीं आणि डोळ्यांनीं प्रियेला पाहिलें नाहीं. आपसांतील प्रतिस्पर्धेचें कारण राहिलें नाहीं म्हणून डोळे आणि कान ह्यामध्यें आजकाल सलोखा झालेला दिसतो.

(३) प्रिया मद्यपान करून बेपडदा आणि निःसंकोच झाली आहे. हे रसिकते, आतां तुला मोकळेपणानें वागण्यास पूर्ण संमति आहे.

(४) प्रियेच्या गळ्यांतील मोत्यांची माळ पाहा. मोतीविक्याचें नशीब काय जोरांत आहे पहा !

(५) मद्यालयांत नेहमीं गोंगाट आणि गोंधळ चालतो ; पण कल्पनेच्या मद्यालयांत हा प्रकार नाहीं. प्रियेचें चिंतन म्हणजे कधीं न संपणारी दारू आहे. गोंगाट न करतां तिचें हवें तितकें पान करतां येतें.

(६) हे प्रेमक्षेत्रांत नव्यानें पदार्पण करणाऱ्यांनो, तुम्हांला संगीत ऐकण्याची आणि मद्य पिण्याची (प्रेमाचे) इच्छा आहे ना ?

(७) मग माझ्याकडे पाहा. माझी काय स्थिति झाली आहे ती पाहा आणि माझे उपदेशाचे बोल ऐका.

(८) साकी (प्रिया) आपल्या सौंदर्यानें तुमची बुद्धि आणि धर्मावरील श्रद्धा हरण करून टाकील आणि गायक आपल्या मधुर संगीतानें तुम्हांला देहभान विसरण्यास लावील.

(९) रात्रीं मैफिलींत फुलांचा सडा पडलेला दिसतो. जणूं काय माळ्याची फुलांची रास मैफिलींत येऊन पडली आहे.

(१०) साकीचें, (प्रिया) आकर्षक चालणें म्हणजे डोळ्यांना स्वर्गदर्शनाचें सुख लाभणें आणि गायकाचें गाणें म्हणजे कानांना स्वर्गीय संगीताचा लाभ होणें आहे.

(११) पण ह्याच मैफिलींत दिवसा उजेडीं येऊन पाहा. ती रात्रीची मौज आणि कर्णमधुर संगीत कुठें ? चहूंकडे उदास वातावरण दिसतें.

(१२) ह्या मैफिलीचा अवशेष म्हणजे एक दिवा शिल्लक राहिलेला आणि तोही मैफिल संपली ह्या दुःखानें विझून गेला आहे.

(१३) ह्या कल्पना मला अंतराळांतून येत असल्या पाहिजेत. कागदावर ह्या कल्पना उतरवीत असतां लेखणीचा जो ध्वनि होतो तो म्हणजे देवदूतांचे संदेश म्हटले पाहिजेत.

१५५ . . . आ के मेरी जान को क़रार नहीं है
ताक़ते बेदादे इंतिज़ार् नहीं है ॥ १ ॥
देते हैं जन्नत हयाते दहर के बदले
नशा ब अंदाज़ये ख़ुमार् नहीं है ॥ २ ॥
गिरिया निकाले है तेरी बज़्मसे मुझको
हाये के रोनेपे इख़्तियार नहीं है ॥ ३ ॥
हम्से अबस है गुमाने रंजिशे खातिर्
खाक़ मे उश्शाक़्के ग़ुबार् नहीं है ॥ ४ ॥
दिल्से उठा लुत्फ़े ज़ल्वहाये मआनी
ग़ैरे गुल्द आयीनये बहार् नहीं है ॥ ५ ॥
क़त्ल का मेरेकिया है अहद तो बारे
वाये अगर् अहदे उस्तुवार नहीं है ॥ ६ ॥
तूने क़सम् मैकशी की खायी है ग़ालिब्
तेरी क़सम् का कुछ एतिबार् नहीं है ॥ ७ ॥

(१) हे प्रिये, लवकर ये. माझें मन अस्वस्थ आहे आणि प्रतीक्षेची शक्ति माझ्यांत राहिली नाहीं.

(२) जगांतील दुःखाच्या मोबदल्यांत आम्हांला स्वर्गांतील सुखें लाभलीं तर ते कांहीं परमेश्वराचे उपकार नव्हत; कारण जगांतील दुःखें इतकीं आहेत कीं स्वर्गीयसौख्य हा कांहीं त्यांचा पुरेसा मोबदला नव्हे. मद्यपानानंतरचा उतार आणि आधीची नशा ह्यांचें प्रमाण बरोबर नाहीं.

(३) अरेरे, तुझ्या बैठकींत मला आपलें आक्रंदन थांबवितां आलें नाहीं आणि ह्यांच्या पायींच मला तुझ्या बैठकींतून बाहेर काढण्यांत आलें.

(४) तुझ्याबद्दल माझ्या मनांत गैरसमज किंवा अढी आहे असें समजू नकोस. आम्हा प्रेमिकांच्या मातींत धूळ मुळीच नाहीं.

(५) वसंतऋतूचें प्रतिबिंब उमटलेल्या फुलांत दिसायचें, तसेंच आमच्या वाणीचें सौख्य अनुभवायचें असेल तर आमच्या हृदयाच्या दर्पणांत डोकावून पाहा.

(६) तिनें माझ्या वधाचा निश्चय केला आहे ही समाधानाची गोष्ट आहे; पण तो निश्चय टिकावू नसेल तर मात्र आमचें दुर्दैव !

(७) हे गालिब, आतां मद्यपान करणार नाहीं अशी तूं शपथ घेतली आहेस; पण तुझ्या शपथेचा आम्हांला विश्वास येत नाहीं.

हुजूमे ग़मूसे यांतक् सरनिगूनी मुजको हासिल् है
१५६ . . . के तारे दामन् व तारे नज़र मे फ़र्क मुश्किल् है ॥ १ ॥
रफ़ूये ज़ख्मसे मतूलब् है लज़्ज़त् ज़ख्मे सोज़न् की
समूझियो मत् के पासे दर्दसे दीवाना ग़ाफ़िल् है ॥ २ ॥
वो गुल् जिस् गुलिस्तांमे जल्वाफ़रमायी करे ग़ालिब्
चटकना गुंचावो गुल्का सदाये खंदये दिल् है ॥ ३ ॥

(१) अपार शोकामुळें माझें डोकें मांडीवर टेकलें आहे. त्यामुळें डोळे आणि कूस एक झाल्यासारखे वाटत आहेत.

(२) माझ्या जखमांना टांके पडत आहेत. ह्यावरून प्रेम कमी झालें असें समजूं नकोस. सुईनें जखमा जेव्हां शिवल्या जातात त्या वेळीं सुईच्या टोंचण्यानें जखमांची औरच लज्जत वाटते.

(३) प्रिया बागेंत आली त्या वेळीं फुलें उमलतात; जणूं काय त्यांनीं तिच्या आगमनाप्रीत्यर्थ आनंदानें आपलीं हृदयें उघडीं केलीं.

पाबदामन् हो रहाहूं बस्के मै सहरा नवर्द
१५७ . . . ख़ारेपा हैं जौहरे आयीनये ज़ानू मुझे ॥ १ ॥
देखना हालत् मेरे दिल्की हम् आग़ोशी के वक्त
है निगाहे आशना तेरा सरे हर मू मुझे ॥ २ ॥
हूं सरापा साज़े आहंगे शिकायत् कुछ् न पूछ्
है यही बेहतर के लोगों मे न छेडे तू मुझे ॥ ३ ॥

(१) उर्दू काव्यांत मांडीला आरशाची उपमा देतात. कारण शृंगारांत आरसा मांडीवर ठेवून केशविरचना किंवा डोळ्यांत काजळ घालण्याची पद्धत आहे. मांडी आणि आरसा ह्यांच्या ह्या सांनिध्यामुळें मांडीला आरशाची उपमा देतात. कवि म्हणतो, प्रेमवेडांत मी रानोमाळ भटकून थकून गेलों आहें आणि आतां पाय मांडीवर टाकून बसलों आहें. माझे पाय म्हणजे मांडीवर टेकलेला आरसा आणि पायांत बोंचलेले कांटे म्हणजे त्या आरशाचे घटक होत.

(२) मीलनाच्या वेळीं माझ्या मनस्वी आनंदाचा प्रियेला रोमरोमांतून अनुभव येईल; कारण तिला माझ्या प्रेमाची पूर्ण जाणीव आहे.

(३) मी निःश्वास आणि गाऱ्हाणीं ह्यांनीं परिपूर्ण असलेलें वाद्य बनलों आहें. उगीच चारचौघांत मला छेडूं नकोस; नाहीं तर माझे गाऱ्हाण्याचे सूर बाहेर पडूं लागतील.

१५८. . . जिस् बज़्म मे तू नाज़से गुफ़्तार मे आवे
जान काल्बुदे सूरते दीवार मे आवे ॥ १ ॥
साये की तरह साथ फिरें सर्व व सनोबर
तू इस् क़दे दिल्कश्से जो गुल्ज़ार मे आवे ॥ २ ॥
तब् नाज़े गिरांमायगीये अश्क बजा है
जब् लख्ते जिगर् दीदये खूंबार् मे आवे ॥ ३ ॥
दे मुझ्को शिकायत की इजाज़त् के सितम्गर्
कुछ तुझको मज़ाभी मेरे आज़ार् मे आवे ॥ ४ ॥
उस चश्मे फ़ुसूंगर् का अगर पाये इशारा
तूती की तरह आयीना गुफ़्तार् मे आवे ॥ ५ ॥
कांटोंकि ज़बां सूख् गयी प्यास से यारब्
इक् आबलापा वादीये पुरख़ार मे आवे ॥ ६ ॥
मरजावूं न क्यौं रश्कसे जब वो तने नाज़ुक्
आग़ोशे खमे हल्क़ये ज़ुन्नार् मे आवे ॥ ७ ॥
ग़ारतगरे नामूस नहो गर हवसे ज़र्
क्यौं शाहिदे गुल् बाग़से बाज़ार् मे आवे ॥ ८ ॥
तब् चाके गरेबांका मज़ा है दिले नालां
जब् यक् नफ़स उलझा हुवा हरतार मे आवे ॥ ९ ॥
आतिश् कदा है सीना मेरा राज़े निहांसे
अये वाये अगर मारिज़े इज़हार मे आवे ॥ १० ॥
गंजीनये मानी का तिलिस्म उसको समझिये
जो लफ़्ज़् के ग़ालिब् मेरे अशआर मे आवे ॥ ११ ॥

(१) प्रिये, बैठकींत तूं मधुर संभाषण करूं लागलीस कीं भिंतीवरील चित्रांतून प्राण भरूं लागतात, ह्यांत काय आश्चर्य !

(२) हे प्रिये, आपला उंच आणि सडपातळ बांधा घेऊन तूं बागेंत फिरूं लागलीस कीं सुरूचीं झाडें आपला बांधा विसरून तुझ्या मागें सावलीसारखी फिरूं लागतात.

(३) काळजाचें रक्त नेत्रांपर्यंत चढेल, (भावनेच्या व्याकुळतेमुळें) तेव्हांच अश्रूंना आपल्या वैभवाचा वाटणारा अभिमान हा योग्य आहे असें म्हणतां येईल.

(४) मला गाऱ्हाणें सांगण्याची तरी; हे प्रिये, मला परवानगी दे म्हणजे माझीं दुःखें ऐकण्यांत तुला आनंद वाटेल.

(५) पोपटाला बोलायला शिकवितांना त्याला आरशासमोर ठेवतात. कवि म्हणतो, कीं प्रियेचे मोहक आणि बोलके डोळे आरशांत प्रतिबिंबित झाले कीं पोपटाप्रमाणें आरशालाही वाचा फुटेल.

(६) ह्या भयाण वनांत उष्णतेनें कांट्यांच्या जिभा सुकून गेल्या आहेत. कोणी प्रेमवेडा भटकत इकडे येवो म्हणजे त्याच्या पायाचा फोड ह्या कांट्यांवर फुटून त्यांच्या जिभांना ओलावा तरी लाभेल.

(७) प्रियेच्या गळ्यांत माळ पडली आहे. ह्या माळेला प्रियेचें सान्निध्य लाभावें आणि मला लाभूं नये ह्याचा मला हेवा वाटतो.

(८) प्रसिद्धीची आणि लाभाची हौस स्वाभिमानाला मारक ठरते. पहा कळी उमलून तिनें लाभाच्या अपेक्षेनें आपले हात पसरले आणि तीं बाजारांत जाऊन पडली. तिनें असे हात पसरले नसते तर बाजारांत जाऊन पडण्याची तिच्यावर पाळी कशाला आली असती !

(९) प्रेमवेडांत कपडे फाडण्याची मौज आहे; पण केव्हां ? कपड्याच्या एकेका तंतूंत एकेक निःश्वास कालवला जाईल तेव्हां.

(१०) प्रेमरहस्यामुळें माझें हृदय म्हणजे अग्निकुंड बनलें आहे. जर कां तें उघडें पडलें तर कहर गुदरेल.

(११) माझ्या काव्यांत जे शब्द येतात त्यांना तुम्ही मोहक आणि अर्थपूर्ण कल्पनांचा खजिना समजा.

हुस्ने माह् गरचे बहंगामे कमाल् अच्छा है
१५९ . . . उमूसे मेरा माहे ख़ुर्शीद् जमाल अच्छा है ॥ १ ॥
बोसा देते नहीं और् दिल्पे है हर लहज़ा निगाह
जी मे कहते हैं के मुफ़्त आये तो माल अच्छा है ॥ २ ॥
और् बाज़ारसे ले आये अगर टूट् गया
साग़रे जम्‌से मेरा जामे सिफ़ाल् अच्छा है ॥ ३ ॥
बे तलब् दें तो मजा उसमे सिवा मिलता है
वो गदा जिसको न हो ख़ूये सवाल् अच्छा है ॥ ४ ॥
उन्के देखेसे जो आजाती है मूंहपर् रौनक़
वो समझते हैं के बीमार् का हाल् अच्छा है ॥ ५ ॥
देखिये पाते हैं क्या उश्शाक़ बुतोंसे फैज़
एक् बरहमन्‌ने कहा हैं के साल् अच्छा है ॥ ६ ॥

हम् सुख़न् तेशाने फ़रहाद् को शीरीं से किया
जिस् तरहका के किसी मे हो कमाल अच्छा है ॥ ७ ॥
क़त्रा दरियामे जो मिल्र जाये तो दरिया हो जाये
काम अच्छा है वो जिस्का के माआल्र अच्छा है ॥ ८ ॥
ख़िज़्र् सुल्तान्को रखे खालिक़े अकबर् सरसब्ज़्
शाहके बाग़ मे ये ताज़ानिहाल्र अच्छा है ॥ ९ ॥
हम्को माल्रुम् है जन्नत् की हक़ीकत् लेकिन्
दिल्रके खुश रखने को ग़ालिब् ये ख़ियाल अच्छा है ॥ १० ॥

(१) पौर्णिमेचा चंद्र सुंदर आहे पण सूर्यासारखें तेजस्वी सौंदर्य धारण करणारी माझी प्रिया त्यापेक्षांही सुंदर आहे.

(२) हे प्रिये, तूं चुंबन देत नाहींस आणि माझ्या हृदयाकडे तुझें सारखें लक्ष आहे. तुला वाटतें विनामोबदला हृदय हस्तगत झालें तर काय हरकत आहे.

(३) माझें मदिरापात्र जमशीदच्या पात्रांपेक्षांही चांगलें आहे. कारण माझें पात्र मातीचें आहे. फुटलें तर बाजारांतून नवीन आणतां येतें. जमशीदच्या पात्राची गोष्ट तशी नाहीं.

(४) न मागतां वस्तु मिळण्यांत मौज आहे. ज्याला हात पसरण्याची संवय नाहीं तो भिक्षेकरी चांगला म्हटला पाहिजे.

(५) प्रियेला पाहून आजारी प्रियकराच्या चेहऱ्यावर कळा येते आणि मग तिला वाटतें कीं त्याची प्रकृति सुधारली म्हणून.

(६) बघावें प्रेमिकांना प्रेयसींच्याकडून काय लाभ होतो तो. कारण यंदाचें वर्ष चांगलें जाणार असें ज्योतिषि म्हणतो.

(७) फरहाद हा साधा मजूर होता आणि शीरीन ही राजकन्या. पण आपल्या धंद्यांत तो वाकबगार होता म्हणून त्याला शीरीनशीं बोलायला मिळालें. धंदा कोणता कां असेना त्यांत पूर्ण कौशल्य हें अशा रीतीनें लाभदायक ठरतें.

(८) जलबिंदु समुद्रांत मिसळून समुद्र बनला. आत्म्याचें परमात्म्यांत विलीन होणें हें ध्येय आणि त्याची पूर्ति ही योग्य घटना आहे, तद्वतच जलबिंदूचें होय. ज्याचा शेवट चांगला तें काम चांगलेंच म्हटलें पाहिजे.

(९) बहादुरशहाचा मुलगा खिजर सुल्तान ह्याला, परमेश्वरा, सुखांत ठेव. राजघराण्यांतील बागेंतील हें रोप फार चांगलें आहे.

(१०) स्वर्गांत काय आहे आणि काय नाहीं हें आम्हांला कोणी सांगावयास नको. आम्हांला सगळें माहीत आहे. पण मनाच्या करमणुकीकरितां स्वर्गाची कल्पना करायला बरी. ह्यापेक्षां जास्त कांहीं नाहीं.

१६० . . . न हुयी गर मेरे मरने से तसल्ली न सही
इम्तिहां और भी बाक़ी हो तो ये भी न सही ॥ १ ॥
खारेखार अलमे हसरते दीदार् तो है
शौक़े गुल्चीने गुलिस्ताने तसल्ली न सही ॥ २ ॥
मय् परस्तान खुमे मय् मूहसे लगाये ही बने
एक् दिन् गर न हुवा बज़्म मे साक़ी न सही ॥ ३ ॥
नफ़से क़ैस के है चश्मो चिराग़े सहरा
गर नही शमये सियाखानये लैला न सही ॥ ४ ॥
एक हंगामे पे मौक़ूफ़् है घर की रौनक्
नौहे ग़म् ही सही नग़्म्ये शादी न सही ॥ ५ ॥
न सतायिश् की तमन्ना न सिलेकी पर्वा
गर नहीं हैं मेरे अशआर मे मानी न सही ॥ ६ ॥
इशरते सुहबते खबांही ग़नीमत् समझो
न हुयी ग़ालिब् अगर उम्रे तबई न सही ॥ ७ ॥

(१) प्रिये, तुझ्या पायीं मी आपला जीव दिला आहे. इतक्यानें तुझें समाधान झालें नाहीं तर सांग अजून कोणत्या रीतीनें माझी परीक्षा घेण्याचें तूं ठरविलें आहेस ? त्यालाही माझी तयारी आहे.

(२) रसिकतेला बाग पाहून समाधान लाभलें नाहीं तर हरकत नाहीं. प्रियादर्शनाची हुरहुर तिला लागली आहे हें काय कमी आहे ?

(३) अरे मद्यप्यांनो, आज मैफलींत साकी नसला म्हणून काय झालें ? तुम्हांला मदिरा मनसोक्त पिण्यास हवी आहे ना ? मग सुरईच तोंडाला लावीनात कसे !

(४) मजनूनच्या निःश्वासांना हें लैलाच्या घरांतील ज्योत बनून राहाणें लाभलें नाहीं तर हरकत नाहीं. त्याच्या निःश्वासांनीं रानेंवनें उजळलीं हें काय कमी आहे ?

(५) सुखदुःखें हीं सारखींच आहेत. तीं जीवनाचीं लक्षणें होत. म्हणून घरांचें जीवन कांहींना कांहीं घडण्यावर अवलंबून आहे. मग त्या सुखकारक असोत कीं दुःखकारक, हें जीवन संपलें तर सुख काय, दुःख काय दोन्ही राहाणार नाहींत.

(६) माझ्या काव्यांत अर्थ नसला तर नसूंदे, मला कोणाच्या बक्षीसाची किंवा वाखाणणीची पर्वा नाहीं.

(७) प्रेमामुळें तुझें आयुष्य कमी झालें तर काय बिघडलें ! पण जें आयुष्य तुला लाभलें तें सुंदरीच्या सहवासांत व्यतीत झालें हें काय कमी समाधान आहे !

१६१ . . . अजब् निशातसे जल्लादके चले हैं हम् आगे
के अपने सायेसे सर पांवसे है दो क़दम आगे ॥ १ ॥
क़ज़ाने था मुझे चाहा खराबे बादये उल्फ़त्
फ़क़त् खराब् लिखा बस् न चल् सका क़लम आगे ॥ २ ॥
ग़मे ज़माने ने झाडी निशाते इश्क़की मस्ती
वर्ना हम् भी उठाते थे लज़्जते अलम् आगे ॥ ३ ॥
खुदाके वास्ते दाद इस जुनूने शौक़की देना
के उस्के दर्पे पोहोंचते है नामाबर्से हम् आगे ॥ ४ ॥
ये उम्र भर् जो परीशानियां उठायी हैं हम्ने
तुम्हारे आये वाये तुर्‍हाये खमूब खम् आगे ॥ ५ ॥
दिलो जिगरमे पुर् अफ़शां जो एक मौजये खं है
हम् अपने ज़ोम्मे समझें हुये थे उसको दम् आगे ॥ ६ ॥
क़सम् जनाज़े पे आनेकी मेरे खाते हैं ग़ालिब
हमेशा खाते थे जो मेरी जान की क़सम् आगे ॥ ७ ॥

(१) वधकाकडे आम्ही आनंदानें आणि उत्कंठेनें चाललों आहों. आमची सावली आमच्यापुढें आहे. म्हणजे आमचें डोकें (सावली) आमच्या पायांपेक्षांही दोन पावलें पुढें आहे. इतकी आमची उत्सुकता शिगेला पोहोंचली आहे.

(२) परमेश्वरानें माझ्या नशीबीं प्रेममदिरेपायीं दुर्दशा हें लिहिण्याचें ठरविलें पण तें जमलें नाहीं. फक्त दुर्दशा हाच शब्द लिहिला गेला. त्यामुळें फक्त दुर्दशाच नशीबीं आली. प्रेममदिरेचा लाभ झाला नाहीं.

(३) जीवनाच्या शोकापुढें आम्हांला प्रेमभावना विसरावी लागली नाहीं तर पूर्वी आम्ही प्रेमव्यथेची गोडी अनुभवीत होतों.

(४) आमचें प्रेमवेड किती विलक्षण आहे पाहा ! प्रियेकडे संदेश पाठविला पण दूताच्या आधीं आम्हीं घाईघाईनें प्रियेच्या दारावर जाऊन थडकतों.

(५) हे प्रियेच्या कुरळ्या कुंतलांनो, तुमच्यामुळें मला त्रास भोगावा लागला. तुमच्यामुळें माझें सर्व कांहीं विस्कटून (परेशान) गेलें आहे. हीच स्थिति तुमच्या नशीबीं येवो.

(६) आमच्या हृदयांत रक्त सळसळत होतें त्याला आम्ही श्वास समजत होतों. प्रेमामुळें हृदयांतलें रक्त बाहेर पडूं लागलें तेव्हां आमची खात्री झाली कीं हा श्वासोच्छ्वास नव्हे तर हृदयांतील रक्त बाहेर पडत आहे.

(७) पूर्वी प्रिया माझ्या प्राणाची शपथ घेत असे पण आतां ती माझ्या प्रेतयात्रेलाही न येण्याची शपथ घेत आहे. काय दैवगति विचित्र आहे पाहा !

१६२ . . . शिकवे के नामसे बे मेहर ख़फ़ा होता है
ये भी मत् कह के जो कहिये तो गिला होता है ॥ १ ॥
पुर् हूं शिकवेसे यौं रागसे जैसे बाजा
इक ज़रा छेडिये फिर् देखिये क्या होता है ॥ २ ॥
गो समझता नहीं पर् हुस्ने तलाफ़ी देखो
शिकवये जोर से सरगरमेजफ़ा होता है ॥ ३ ॥
इश्क़ की राहमे है चर्ख़े मकौकब् की वो चाल
सुस्तरौ जैसे कोयी आबलापा होता है ॥ ४ ॥
क्यौं न ठहरे हदफ़े नावके बेदाद् के हम्
आप् उठालाते हैं गर् तीर खता होता है ॥ ५ ॥
ख़ूब था पहलेसे होते जो हम् अपने बद्ख़्वा
के भला चाहते हैं और् बुरा होता हैं ॥ ६ ॥
नाला जाता था परे अर्शसे मेरा और् अब्
लब् तक आता है जो ऐसाहि रसा होता है ॥ ७ ॥
ख़ामा मेरा के वो है बार्बदे बज़्मे सुख़न
शाह की मदह मे यौं नग़्मासरा होता हैं ॥ ८ ॥
अये शहन्शाहे कवाकब सिपाह व मेहरे अल्म्
तेरे इक्राम्का हक़ किससे अदा होता है ॥ ९ ॥
सात् इक़्लीम् का हासिल् जो फ़राहम् कीजे
तो वो लष्कर् का तेरे नाले बहा होता है ॥ १० ॥
हर महीनेमे जो ये बदरसे होता है हिलाल्
आस्तान पर तेरे माह नासियासा होता है ॥ ११ ॥
मै जो गुस्ताख़ हूं आयीने ग़ज़ल् ख़्वानी मे
येभि तेराही करम् जौक़ फ़िज़ा होता है ॥ १२ ॥
रखियो ग़ालिब् मुझे इस् तल्ख़ नवाई मे मुआफ़्
आज कुछ दर्द् मेरे दिल मे सिवा होता है ॥ १३ ॥

. . . . २२२

(१) गाऱ्हाण्याचें नांव काढलें कीं ती निष्ठुर रागावते. ती अशी रागावते हेंसुद्धा म्हटलेलें तिला खपत नाहीं.

(२) वाद्यांत सुर भरलेले असावेत तसा मी गाऱ्हाण्यांनीं भरलों आहें. जरा छेड तर खरें मग पहा काय होतें तें.

(३) माझ्या गाऱ्हाण्याचा अर्थ अल्लडपणामुळें ती समजूं शकत नाहीं. पण तिची हुशारी पाहा कीं गाऱ्हाणें केलें कीं ती अधिक छळ करूं लागते.

(४) प्रेमाच्या प्रवासांत माझे ग्रह इतके हळूहळू चालत आहेत कीं कुणाला वाटावें कीं ते पायांत फोड आलेल्या प्रवाशासारखे रेंगाळत आहेत.

(५) त्या शरसंधान करणाऱ्या प्रियेनें आमची चेष्टा कां करूं नये? तिचा बाण एखादेवेळीं हुकला तर तो आम्ही तिला परत नेऊन देतों.

(६) स्वतःचें भलें चिंतावें तों वाईटच घडतें. आतां आपलें अनिष्ट चिंतणें बरें म्हणजे त्याच्या उलट तरी घडेल.

(७) माझें आक्रंदन पूर्वी आकाशापर्यंत पोहोंचत असे, पण अशक्ततेमुळें हें आक्रंदन जास्तींत जास्त ओठांपर्यंत येतें. पुढें जाऊं शकत नाहीं.

(८) माझी लेखणी म्हणजे काव्यमैफिलींतील गायिका होय. बादशाहाच्या स्तुतींत ती आपलें मधुर संगीत अशा रीतीनें सुरू करते.

(९) हे बादशाहा, तुझी फौज आकाशांतील तारकांसारखी अगणित आणि तुझा ध्वज म्हणजे सूर्यासारखा तेजस्वी. तुझ्या कृपेचे उतराई होण्याची कुणाला शक्ति आहे?

(१०) जगाचें उत्पन्न गोळा करून आणलें तर फक्त तुझ्या सैन्याच्या नालबंदीचा खर्च भागेल.

(११) चंद्र तुझ्या दारावर विनवणी करीत करीत क्षीण होतो आणि शेवटीं त्याची बारीक कोर बनते.

(१२) गजलांची रीत मोडून मी तुझी स्तुति करीत आहें पण त्याला सुद्धा तुझ्या कृपेमुळें उत्तेजन मिळालें आहे.

(१३) माझ्या तोंडून आज कटु शब्द निघत आहेत त्याची क्षमा करा, कारण आज हृदय तळमळीमुळें अस्वस्थ झालें आहे.

१६३ . . . हर एक़ बात पे कहते हो तुम के तू क्या है
तुम्हीं कहो के ये अंदाज़े गुफ़्तगू क्या है ॥ १ ॥
न शोलेमे ये किरिश्मा न बर्क़मे ये अदा
कोयी बतावो के वो शोखे तुंदख़ू क्या है ॥ २ ॥

ये रश्क है के वो होता है हम् सुखन् तुम्से
वगरना खौफ़े बद् आमोज़ीये अदू क्या है ॥ ३ ॥
चमक् रहा है बदन्पे लहूसे पैराहन्
हमारी जेबको अब् हाजते रफ़ू क्या है ॥ ४ ॥
जला है जिस्म् जहां दिल्र भी जल गया होगा
कुरीदते हो जो अब् राख जुस्तजू क्या है ॥ ५ ॥
रगोंमे दौडने फिरनेके हम् नहीं क़ाइल्र
जब् आंखहीसे न टपका तो फिर लहू क्या है ॥ ६ ॥
वो चीज़ जिस्के लिये हम्को हो बिहिश्त अज़ीज़
सिवाये बादये गुल्फ़ामे मिश्कबू क्या है ॥ ७ ॥
पिऊं शराब् अगर् खुमू भी देख लूं दोचार
ये शीशा व क़दह व कूज़ा व सुबू क्या है ॥ ८ ॥
रही न ताकते गुफ़्तार् और अगर् हो भी ।
तो किस् उम्मीदपे कहिये के आरज़ू क्या है ॥ ९ ॥
हुवा है शाहका मुसाहिब फिरे है इतराता
वगरना शहरमे ग़ालिब् की आबरू क्या है ॥ १० ॥

(१) प्रत्येक गोष्टीवर मला तूं अरेतुरे करूं लागली आहेस. तूंच सांग ही काय भाषणाची रीत झाली ?

(२) तिच्या तीक्ष्ण स्वभावामुळें मी तिला आग म्हणावी तर आगींत इतका प्रभाव दिसत नाहीं. बरें, तिला वीज म्हणावी तर विजेंत हे नाजनखरे दिसत नाहींत. तिला उपमा द्यायची तरी कशाची ?

(३) प्रतिस्पर्धी माझ्या विरुद्ध तुझे कान भरतात ह्याचें मला कांहीं वाटत नाहीं. हेवा वाटतो तो त्यांना तुझ्याशीं बोलण्याची संधि मिळते ह्याचा.

(४) प्रेमवेडांत माझे फाटलेले कपडे परत शिवण्याची आवश्यकता नाहीं, कारण माझ्या रक्तानें भरलेल्या शरीराला ते बेमालूमपणें चिकटलेले आहेत.

(५) अगे, माझ्या राखेंत काय शोधीत बसली आहेस ? जेथें माझें शरीर जळून गेलें आहे, तेथें माझें हृदयही जळून गेलें असणार.

(६) धमन्यांतून संथपणें वाहणाऱ्या रक्ताला आम्ही रक्त म्हणण्यास तयार नाहीं. जें नेत्रावाटे वाहात नाहीं तें रक्त कसलें ?

(७) आम्हांला स्वर्ग कां आवडतो माहीत आहे ? अहो, तेथें उंची दारू आणि तीही हवी तितकी मिळेल म्हणून.

(८) दारूच्या दोनचार सुरया तोंडाला लावण्याची माझी तयारी आहे. त्या मला ह्या बाटल्या आणि पात्रें डोळ्यांत थोडेच भरणार आहेत ?

(९) आतां बोलण्याची शक्ति राहिली नाहीं. ती शक्ति असती तरी आम्ही कोणत्या आशेवर तिला आमची इच्छा काय आहे हें कळवायचें ?

(१०) बादशहाचा आवडता म्हणून, ग़ालिब, तूं ऐटीनें फिरत आहेस. नाहींतर शहरांत तुझी किंमत काय आहे !

१६४ . . . मै उन्हे छेडूं आर् कुछ न कहें
चल् निकल्ते जो मय् पिये होते ॥ १ ॥
क़हर् हो या बला हो जो कुछ हो
काश् के तुम् मेरे लिये होते ॥ २ ॥
मेरी क़िस्मत्मे ग़म् गर इतना था
दिल् भी यारब् कयी दिये होते ॥ ३ ॥
आही जाता वो राह पर ग़ालिब्
कोयी दिन् और भी जिये होते ॥ ४ ॥

(१) मी तिला चिडवावें आणि तिनें चिडूं नये, हें मोठें आश्चर्य आहे. हेंच तिनें मदिरेचें पान केलें असतें तर तिनें माझें चिडविणें मुकाट्यानें ऐकून घेतलें असतें कां ?

(२) तूं कांहींही ऐस, प्रळय ऐस कीं महत्संकट ऐस. पण माझ्यासाठीं तूं असतीस तर किती बरें झालें असतें ?

(३) परमेश्वरा, माझ्या नशीबीं अनंत दुःखें लिहून ठेविलीं होतींस तर त्या मानानें सहन करण्याकरितां म्हणून अनंत हृदयें कां नाहीं दिलींस ? ह्या एका हृदयानें काय काय म्हणून सहन करावें ?

(४) ग़ालिब, तूं अजून कांहीं दिवस जिवंत राहिला असतास तर ती सामोपचारानें वागूं लागली असती.

१६५ . . . ग़ैर लें महफ़िल् मे बोसे जाम् के
हम् रहें यौं तिश्नालब् पैग़ाम् के ॥ १ ॥
ख़स्तगी का तुम्से क्या शिकवा के ये
हथकंडे है चर्ख़े नीली फ़ाम् के ॥ २ ॥

ख़त् लिखेंगे गर्चे मत्लब् कुछ न हो
हम् तो आशिक़् हैं तुम्हारे नाम् के ॥ ३ ॥
रात पी ज़म्ज़म् पे मय् और सुब्हदम्
धोये धब्बे जामये एहराम के ॥ ४ ॥
दिल् को आंखोंने फंसाया क्या मगर्
ये भी हल्क़े हैं तुम्हारे दाम्के ॥ ५ ॥
शाह की है ग़ुस्ले सेहत् की ख़बर्
देखिये कब्‌ दिन् फिरें हम्माम् के ॥ ६ ॥
इश्क़ ने ग़ालिब् निकम्मा करदिया
वर्ना हम्भी आदमी थे काम् के ॥ ७ ॥

(१) परक्यांनीं तुझ्या मैफिलींत तूं दिलेल्या मद्यपात्रांना ओंठ लावावेत आणि आम्हीं मात्र तुझ्या संभाषणालाही मुकावें हें काय दुर्दैव आहे !

(२) आमच्या दुर्दैवाचा बोल तुला कां लावावा ? हा तर नियतीचा खेळ आहे.

(३) आम्ही तुला पत्र लिहूं. पत्रांत मजकूर नसला तरी चालेल. वर तुझ्या नांवाचा पत्ता राहील आणि आम्ही तर तुझ्या नांवाचे भोक्ते आहोंत.

(४) जमजमच्या पवित्र विहिरीवर बसून आम्हीं मद्यपान केलें आणि आमच्या यात्रेच्या कपड्यावर मद्याचे पडलेले डाग आम्ही धूत आहोंत.

(५) तुझ्या डोळ्यांनीं माझें हृदय काबीज केलें. ते डोळे नव्हत तर तूं पसरलेलें गोल जाळें आहे.

(६) बादशहाची प्रकृति सुधारत आहे असें ऐकतों आणि ते आरोग्यनिदर्शक स्नान करणार असें ऐकण्यांत आहे म्हणजे स्नानगृहाचें भाग्य आतां लवकरच उदयाला येईल म्हणायचें.

(७) ह्या प्रेमामुळें गालिब, आम्ही निकामी झालों, नाहीं तर आम्हीही कामाचीं माणसें होतों.

फिर् उस् अंदाज़्से बहार आयी
१६६ . . . के हुये मेहरो माह् तमाशायी ॥ १ ॥
देखो अय् साकिनाने ख़ित्तये ख़ाक्
इस्को कहते हैं आलम् आरायी ॥ २ ॥

२२५ . . . .

के ज़मीं होगयी है सर ता सर्
रूकशे सतहे चर्खे मीनायी ॥ ३ ॥
सब्ज़े को जब कहीं जगह न मिली
बन् गया रूये आब पर्कायी ॥ ४ ॥
सब्ज़ावो गुल् के देखने के लिये
चश्मे नर्गिस् को दी है बीनायी ॥ ५ ॥
है हवामे शराब् की तासीर्
बादा नोशी है बादपैमायी ॥ ६ ॥
क्यौं न दुनिया को हो ख़ुशी ग़ालिब्
शाहे दीन्दारने शफ़ा पायी ॥ ७ ॥

(१) वसंतऋतूचें आगमन अशा थाटांत झालें आहे, कीं सूर्य आणि चंद्र पाहातच राहिले आहेत.

(२) हे भूलोकींच्या रहिवाशांनो, ह्याला सृष्टीची सुंदर सजावट म्हणतात.

(३) पृथ्वी हिरव्या वनश्रीनें नटली आहे आणि ह्या गोष्टींत आकाशाशीं प्रतिस्पर्धा करीत आहे.

(४) जगांत सगळीकडे भरल्यानंतर पुरून उरलेली हिरवळ आतां पाण्यावर शेवाळे बनून तरंगूं लागली आहे.

(५) नर्गिसचें फूल आंधळें असतें असा कविसंकेत आहे; पण कवि म्हणतो, कीं वसंतऋतूची बहार लुटण्याकरितां परमेश्वरानें नर्गिसला सुद्धा दृष्टि दिली आहे.

(६) ह्या वसंतऋतूंत वायूमध्यें मदिरेचा प्रभाव निर्माण झाला आहे. आतां मदिरेचें सेवन करणें व्यर्थ आहे.

(७) बादशहाला आरोग्याचा लाभ झाला मग साऱ्या जगाला आनंद कां वाटूं नये ?

१६७ . . . तग़ाफ़ुल्दोस्त हूं मेरा दिमाग़ अजज़ आली है
अगर् पहलूतही कीजे तो जा मेरी भी ख़ाली है ॥ १ ॥
रहा आबाद् आलम् अहले हिम्मत् के न होनेसे
भरे हैं जिस् क़दर् जामो सुबू मैख़ाना ख़ाली है ॥ २ ॥

(१) मी तग़ाफ़ुल म्हणजे स्वस्थतेचा शोकीन आहें आणि माझी अवस्था लाचारीची झाली आहे. “ माझ्याशीं ” तूं पहलूतही म्हणजे दुर्लक्ष करूं लागलीस तर तुझें माझ्यावर प्रेम आहे असें समजून माझ्या मनांत तुझ्याबद्दल आदर निर्माण होईल.

(२) जगांत सगळींच माणसें निर्धाराचीं आणि जगाला तृणप्राय समजणारीं असतीं तर जगांत कोणीच शिल्लक राहिलें नसतें. पण जग तर माणसांनीं गजबजलेलें आहे. मद्यालयांत सुरया आणि पात्रें मद्यांनीं भरलेलीं आहेत ह्याचा अर्थच असा कीं मद्यालयांत मद्यपी नाहींत तसेंच जग माणसांनीं गजबजलेलें असणें ह्याचाच अर्थ म्हणजे जगांत निर्धाराच्या माणसांची वाण आहे.

कब् वो सुन्ता है कहानी मेरी
१६८ . . . और् फिर् वो भी ज़बानी मेरी ॥ १ ॥
खलिशे ग़म्ज़ये खूंरेज़् न पूछ्
देख् खूंनाबा फ़िशानी मेरी ॥ २ ॥
क्या बयां करके मेरा रोयेंगे यार्
मगर् आशुफ्ता बयानी मेरी ॥ ३ ॥
हूं अज़् खुद् रफ्तये बेदाये खियाल्
भूल जाना है निशानी मेरी ॥ ४ ॥
मुतक़ाबिल् है मुक़ाबिल् मेरा
रुक् गया देख् रवानी मेरी ॥ ५ ॥
क़दरे संगे सरे राह रखता हूं
सख़्त् अर्ज़ां है गिरानी मेरी ॥ ६ ॥
गरदे बादे राहे बेताबी हूं
सर्सरे शौक़् है बानी मेरी ॥ ७ ॥
दहन् उसका जो न मालूम् हुवा
खुल् गयी हेचूमदानी मेरी ॥ ८ ॥
कर दिया ज़ोफ़ने आजिज़् ग़ालिब्
नंगे पीरी है जवानी मेरी ॥ ९ ॥

(१) ती माझी हकीकत आणि तीही माझ्या तोंडून, ऐकते कुठें ?

(२) तिच्या खुनी नयनशराची तीव्रता विचारूं नकोस. माझ्या रक्ताश्रूंकडे पाहा म्हणजे समजेल.

(३) माझे मित्र माझी कोणती आठवण काढून रडणार आहेत ? माझ्या प्रेमवेडाचीच ना ?

(४) कल्पनेच्या वाळवंटांत, स्वतःला विसरून गेलेला मी प्रवासी आहें. माझी विस्मृतावस्था हीच माझी खूण आहे.

(५) माझा आणि प्रियेचा स्वभाव सारखा आहे. ती चंचल, मीही चंचल. माझ्या स्वभावांतील चंचलपणा पाहून तिनें आपल्या चंचलपणाला मुरड घातली.

(६) मी वाटेवर पडलेल्या दगडासारखा आहें. कुणीही यावें आणि डोक्यावर पाय देऊन जावें. पहावा तर मी जड (मूल्यवान) आहें पण लोकांच्या वागणुकीनें मी मूल्यानें हलका बनलों आहें.

(७) मी रसिकतेच्या वादळांतून निर्माण झालेला धुलिकण आहें आणि म्हणून वादळासारखा अस्वस्थ आणि सारखा भटकणारा आहें.

(८) सुंदरीचें दहन म्हणजे तोंड (ओष्ठद्वय) इतकें लहान असतें कीं कमरेप्रमाणेंच त्याचें अस्तित्व नाहीं असा कविसंकेत आहे. कवि म्हणतो कीं प्रयत्न करूनही मला प्रियेचें तोंड सापडलें नाहीं ह्यांत माझी अप्रतिष्ठा दिसून आली.

(९) अशक्ततेनें मला लाचार करून सोडलें आहे. माझें तारुण्य म्हणजे जरठ जराच होय.

१६९ . . .

नक़्शे नाज़े बुते तन्नाज़ ब आग़ोशे रक़ीब
पाये तावूस् पये ख़ामये मानी मांगे ॥ १ ॥
तू वो बदख़ू के तहैयुर को तमाशा जाने
ग़म् वो अफ़साना के आशुफ़्ता बयानी मांगे ॥ २
वो तपे इश्क़ तमन्ना है के फिर सूरते शमा
शोला ता नबज़े जिगर रेशा दवानी मांगे ॥ ३ ॥

(१) मोर हा सुंदर असला तरी त्याचे पाय दिसायला कुरूप असतात. कवि म्हणतो कीं प्रिया संकेत करीत प्रतिस्पर्ध्याच्या अंकावर बसली आहे. तेव्हां हें चित्र काढतांना प्रिया मोरासारखी सुंदर आणि प्रतिस्पर्धी मोराच्या पायासारखा कुरूप असें चित्र चित्रकारानें काढावें.

(२) मी अचंब्यांत पडलों आहें आणि तूं स्वभावानें इतकी वाईट आहेस कीं माझा अचंबा म्हणजे तुला करमणूक वाटते आहे. बरें, मी गप्प कां तर आमची दुःखद कहाणी सांगणें मला शक्य होत नाहीं. म्हणून दुःख व्यक्त करायला प्रेमवेड लागायला पाहिजे आणि तें तर तुला आवडत नाहीं. ह्या ओढाताणीनें मी गप्प बसलों आहें.

(३) मला असा प्रेमाग्नि हवा आहे कीं ज्यांच्या ज्वाळा नसानसांतून भडकून शरीर जाळून टाकतील.

१७० ... गुलशन् को तेरी सुहबत अज़् बस्के ख़ुश आयी है
हर् गुंचेका गुल्ह होना आग़ोशकशायी है ॥ १ ॥
वां कुंगुरे इस्तिग़ना हरदम् है बलंदी पर
यां नालेको और् उल्टा दावये रसायी हैं ॥ २ ॥
अज़् बस्के सिखाता है ग़म्ज़ब्त के अंदाज़े
जो दाग़् नज़र आया इक् चश्म नुमायी है ॥ ३ ॥

(१) हे प्रिये, उपवनाला तुझा सहवास आवडलेला दिसतो. त्या पहा कळ्या तुला पाहून आनंदानें विकसित होत आहेत.

(२) तिकडे प्रिया उपेक्षेची कमाल करीत आहे, उलट आमच्या निःश्वासांना वाटतें कीं आपला प्रभाव तिच्यावर पडूं लागला आहे.

(३) शोक मला संयम शिकवूं पाहात आहे आणि हृदयावरचे डाग हे शिक्षकाचे डोळे बनून मला संयम बाळगण्याची जणूं खूण करीत आहेत.

१७१ ... जिस् ज़ख़्म की हो सकती हो तद्बीर रफ़ूकी
लिख दीजियो यारब् उसे क़िस्मत् मे अदूकी ॥ १ ॥
अच्छा है सर् अंगुश्ते हिनायी का तसव्वुर
दिल्मे नज़र आती तो है इक् बूंद् लहूकी ॥ २ ॥
क्यों डरते हो उश्शाक़ की बे हौसलगीसे
यां तो कोयी सुन्ता नहीं फ़रयाद् कसूकी ॥ ३ ॥
दश्ने ने कभी मूंह न लगाया हो जिगर् को
ख़ंजर ने कभी बात न पूछी हो गल्हकी ॥ ४ ॥
सद् हैफ़ वो नाकाम् के इक् उम्रसे ग़ालिब्
हस्रत् मे रहे एक बुते अर्बदाजू की ॥ ५ ॥

(१) ज्या जखमांना टांके लावणें शक्य आहे त्या मला नकोत. अशा जखमा, हे परमेश्वरा, माझ्या प्रतिस्पर्ध्यांच्या नशिबांत लिही कसा. आणि मला कधीं न भरून येणाऱ्या जखमा दे.

(२) नेत्रांवाटे रक्त जाऊन जाऊन आतां हृदयांत रक्ताचा एक बिंदु राहिला नाहीं. तुझ्या नखावरची मेहंदी माझ्या हृदयांत ठसली आहे. तेवढाच एक तांबडा रंग माझ्या हृदयांत शिल्लक राहिला आहे.

(३) आम्ही आपलीं गाऱ्हाणीं आणि आक्रंदन परमेश्वरापाशीं सांगूं ह्याची, हे प्रिये, तुला भीति वाटते होय ? पण भिण्याचें कारण नाहीं कारण आमचीं गाऱ्हाणीं ऐकून घेण्यास कोणी तयार नाहीं.

(४) प्रियेचें खंजीर आणि कट्यारींनीं ज्या प्रियकराच्या गळ्याचा किंवा काळजाचा ठाव घेतला नाहीं त्याच्या मनाची हुरहुर काय वर्णावी ?

(५) ज्या प्रियकराला तापट प्रेयसीची तळमळ जन्मभर लागावी आणि तरीही ती पूर्ण होऊं नये ह्यापरतें दुर्दैव काय असूं शकेल !

१७२ . . . सीमाबपुश्त गरमीये आयीना दे है हम्
हैरां किये हुये हैं दिले बे क़रारके ॥ १ ॥
आग़ोशे गुल्‌कुशूदा बराये विदाअ् है
अय अंदलीब् चल के चले दिन् बहारके ॥ २ ॥

(१) कांचेवर पारा लावला कीं त्याचा आरसा बनतो तसेंच अस्वस्थतेचा पारा आमच्या हृदयावर चढला आहे आणि त्यामुळें हृदय आरशासारखें हैरान म्हणजे बुचकळ्यांत पडलें आहे. (उर्दू काव्यांत बुचकळ्यांत पडणाऱ्या स्थितीला आरशाची उपमा देतात. आरशासारखा बुचकळ्यांत पडला असें म्हणणें उर्दूत रूढ आहे.)

(२) जीवन क्षणभंगुर आहे. फुलांचें उमलणें म्हणजे त्यांचें आयुष्य संपत आलें ह्याची सूचना होय. कवि म्हणतो कीं हे कोकिळे, पाहा कळ्या उमलल्या आहेत. आतां त्या परलोकीं जाण्याच्या तयारींत आहेत. वसंतऋतूही लवकरच निघून जाईल. फुलांचा निरोप घेऊन तूंही चालायला लाग कशी.

१७३ . . . है वस्ल हिज्र आलमे तम्कीनो ज़ब्त मे
माशूक़ शोख़ व आशिक़े दीवाना चाहिये ॥ १ ॥
उस् लब्से मिल ही जायेगा बोसा कभी तो हां
शौक़े फ़ुज़ूल व जुरते रिंदाना चाहिये ॥ २ ॥

(१) मीलनाची गोडी चाखण्यास प्रेयसी चंचल आणि प्रियकर धीट हवा नाहींतर दोघेंही संयम पाळीत बसलीं तर तें मीलन कसलें ! तो विरह होय.

(२) तिच्या ओठांचीं चुंबनें हटकून मिळतील. त्याकरितां फक्त दोन गोष्टी हव्या. एक आसक्ति आणि दुसरें मद्यप्यासारखें धाडस म्हणजे कांहीं अवघड नाहीं.

चाहिये अच्छों को जित्‌ना चाहिये
१७४ . . . ये अगर्‌ चाहें तो फिर्‌ क्या चाहिये ॥ १ ॥
सुहब्‌ते रिंदांसे वाजिब्‌ है उज़र्‌
जाये मय अप्‌ने को खींचा चाहिये ॥ २ ॥
चाहने को तेरे क्या समझा था दिल
बारे अब्‌ इस्‌सेभि समझा चाहिये ॥ ३ ॥
चाक्‌ मत्‌ कर जेब बे अय्यामे गुल
कुछ्‌ इधर्‌ का भी इशारा चाहिये ॥ ४ ॥
दोस्ती का पर्दा है बेगानगी
मूंह छिपाना हम्‌से छोडा चाहिये ॥ ५ ॥
दुश्मनीनें मेरी खोया ग़ैर को ·
किस्‌ क़दर्‌ दुश्मन्‌ है ? देखा चाहिये ॥ ६ ॥
अप्‌नी रुसवायीमे क्या चलती है सअी
यार ही हंगामा आरा चाहिये ॥ ७ ॥
मुनहसिर्‌ मरनेपे हो जिसकी उमीद्‌
ना उमीदी उसकी देखा चाहिये ॥ ८ ॥
ग़ाफ़िल इन्‌ माहतलअतोंके वास्‌ते
चाहने वाला भी अच्छा चाहिये ॥ ९ ॥
चाहते हैं खूबरूयोंको असद्‌
आपकी सूरत्‌ तो देखा चाहिये ॥ १० ॥

(१) माणसानें सुंदर स्त्रियांशीं प्रेम करावें आणि त्यांच्या प्रेमाला जर कां त्या सुंदरींनीं साद दिली तर त्यापरतें सुदैव कोणतें ! त्याला आणखी काय हवें !

(२) मद्यप्यांची संगत टाळावी हें बरें आणि दारू आपल्याकडे ओढण्याऐवजीं आपण आपल्याला दारूपासून ओढून धरावें हें बरें.

(३) प्रेम करणें आणि निभावणें ही हृदयाला एक सोपी गोष्ट वाटली पण त्यांत फसल्यानंतर हृदयाची काय स्थिति झाली हें त्यालाच विचारावें.

(४) प्रेमाला भरती वसंतऋतूंत येते. कवि म्हणतो कीं, हे प्रेमिका, फुलांना उमलूं दे आणि मग तूंही प्रेमाचें वेड आपल्यावर ओढून घे.

(५) प्रिये, तूं तोंड कां लपवितेस? प्रतिस्पर्ध्याशीं मोकळेपणानें बोलतेस तसेंच माझ्याशींही कर. कारण तूं तोंड लपवितेस ह्याचा अर्थ संकोच करतेस आणि संकोच म्हणजे प्रेमाचें लक्षण समजतात. तुझ्या अशा वागणुकीनें तुझें माझ्याकडे लक्ष आहे हें समजून नाहीं कां येणार?

(६) प्रतिस्पर्धी हा माझी निंदा करी. निंदेच्या निमित्तानें कां होईना माझा उल्लेख प्रियेला सहन झाला नाहीं आणि ह्याचा परिणाम म्हणजे माझ्या प्रतिस्पर्ध्याशीं ती शत्रुत्व करूं लागली.

(७) आम्ही प्रेमरहस्याचा स्फोट करूं म्हटलें तरी शक्य नाहीं; पण प्रियेनें मात्र आपल्या सौंदर्याचा आविष्कार केला कीं आमच्या भावना उघड्या पडून आमचें प्रेम जग-जाहीर होईल, ह्यांत शंका नाहीं.

(८) केवळ मृत्यूवरच ज्याच्या सर्व आशा केंद्रित झाल्या आहेत, त्याची निराशा किती भयंकर असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी.

(९) अरे मूर्खा, त्या चंद्रमुखींच्या वर प्रेम करण्याचा हव्यास ज्याला आहे तोसुद्धा चांगला आणि देखणा हवा.

(१०) हे असद्, तुला सुंदर स्त्रिया आवडतात. पण तूं आपला चेहरा कधीं आरशांत पाहिलास काय?

१७५... हर् क़दम् दूरीये मंज़िल् है नुमायां मुझसे
मेरी रफ़्तार्से भागे है बियाबां मुझ्से ॥ १ ॥
दर्से उन्वाने तमाशा बतग़ाफ़ुल् ख़ुश्तर
है निगाह रिश्तये शीराज़ये मिज़्गां मुझ्से ॥ २ ॥
वहशते आतिशे दिल्से शबे तन्हायी मे
सूरते दूद रहा साया गुरेज़ां मुझ्से ॥ ३ ॥
ग़मे उश्शाक् न हो सादगी आमोज़े बुतान्
किस क़दर खानये आयीना है वीरां मुझ्से ॥ ४ ॥
असरे आबलासे जादये सहराये जुनून्
सूरते रिश्तये गौहर है चिराग़ां मुझ्से ॥ ५ ॥
बेख़ुदी बस्तये तम्हीदे फ़राग़त् हो जो
पुर् है साये की तरह मेरा शबिस्तां मुझ् से ॥ ६ ॥
शौक़े दीदार् मे गर तू मुझे गर्दन् मारे
हो निगाह मिस्ले गुलेशमा परीशां मुझ्से ॥ ७ ॥

बेकसीहाये शबे हिज्र की वहशत है है
साये खुर्शीद् क़ियामत मे है पिन्हां मुझ्से ॥ ८ ॥
गर्दिशे साग़रे सद् जल्वये रंगीं तुझ्से
आयीनादारीये यक् दीदये हैरां मुझ्से ॥ ९ ॥
निगहे गरम् से इक् आग् टपकती है असद्
है चराग़ां खसो खाशाके गुलिस्तां मुझ्से ॥ १० ॥

(१) आपलें ध्येय गांठण्याकरितां मी जितक्या जलद चालत आहें तितकेंच ध्येय दूरदूर सरकत चालल्यासारखें वाटतें. जणूं काय माझ्या इतक्याच तीव्र गतीनें माझ्या समोरचें मैदान पुढें सरकूं लागलें आहे.

(२) प्रियेच्या मुखरूपी ग्रंथाचें आम्ही सतत पारायण करावें आणि तिचें लक्ष आमच्याकडे नसावें ह्यापेक्षां आनंद कोणता ?

(३) विरहावस्थेंत माझ्या हृदयांत पेटलेल्या अग्नीमुळें माझी सावली सुद्धा माझ्या-पाशीं टिकेनाशी झाली आहे. अग्नीपासून धुराचे लोट दूर जावेत तसेच माझी सावली पण माझ्यापासून दूर चालली आहे.

(४) आम्हा प्रेमिकांच्या शोकाचा प्रभाव पडून प्रेयसींनीं सौंदर्यप्रसाधनांचा त्याग केला तर मोठी पंचायत पडेल. मी मेल्यानंतर प्रियेनें आरशांत आपलें रूप न्याहाळणें सोडून दिलें आहे आणि त्यामुळें आरसा निर्जन झाला आहे. सर्व प्रेयसींची ही स्थिति झाली तर जगांतील आयनेमहाल उध्वस्त होऊन जातील ह्यांत शंका नाहीं.

(५) प्रेमवेडांत वैराण वाळवंटांत भटकतां भटकतां माझ्या पायांत जे फोड आले आहेत ते मोत्यासारखे चमकत आहेत आणि त्यांचीं चिन्हें रस्त्यांत उमटल्यामुळें हा रस्ता म्हणजे मोती ओवलेल्या सूत्रासारखा वाटत आहे आणि वाळवंटांत प्रकाशाची आरास झाली आहे.

(६) माझी विस्मृतावस्था ही माझ्या अंतिम नाशाची प्रस्तावना ठरो ; कारण माझ्या विस्मृतावस्थेनें माझें हृदयागार अंधारानें रात्र भरून जावी तसें भरून टाकलें आहे.

(७) तुझ्याकडे पाहातों म्हणून तूं माझें डोकें उडविलेंस तरी दिव्याची वात थोडी छाटल्यावर दिवा जसा पुन्हां प्रज्वलित होतो त्याप्रमाणें माझी दृष्टि तुझ्याकडे आणखी तीव्र-पणानें पाहूं लागेल.

(८) विरहरात्रींत माझ्या हृदयांत जी आग पेटली आहे त्यामुळें माझी सावली माझ्यापासून लपली आहे. सूर्याची सावली सूर्यापासून तोंड लपविते तद्वत् माझी स्थिति झाली आहे.

(९) सौंदर्याची मदिरा हे प्रिये, तुझ्यामुळें चहूंकडे फिरत आहे आणि अचंब्याचा आरसा माझ्यामुळें स्तब्ध आहे.

२३३ . . . .

(१०) हे असद्, माझ्या तप्त नेत्रांतून अग्नीचा वर्षाव होत आहे आणि उपवनांत ह्या ज्वाळा भडकतांना दिसतात त्या माझ्या नेत्रांतील अग्नि होत.

१७६ . . . नुक्ताचीं है ग़मे दिल उस्को सुनाये न बने
क्या बने बात जहां बात् बनाये न बने ॥ १ ॥
मै बुलाता तो हूँ उसको मगर् अय् जज़्बये दिल्
उस्पे बन् जाये कुछ ऐसी के बिन् आये न बने ॥ २ ॥
खेल् समझा है कहीं छोड न दे भूल् न जाये
काश् यौं भी हो के बिन् मेरे सताये न बने ॥ ३ ॥
ग़ैर् फिरता है लिये यौं तेरे ख़त्को के अगर्
कोयी पूछे के ये क्या है तो छिपाये न बने ॥ ४ ॥
इस् नजाकत् का बुरा हो वो भले हैं तो क्या
हाथ आवें तो उन्हे हात लगाये न बने ॥ ५ ॥
कह सके कौन् के ये जलवागरी किस्की है
पर्दा छोडा है वो उसने के उठाये न बने ॥ ६ ॥
मौत् की राह न देखूं के बिन् आये न रहे
तुम् को चाहूं के न आवो तो बुलाये न बने ॥ ७ ॥
बोझ वो सरसे गिरा है के उठाये न उठे
काम् वो आन् पडा है के बनाये न बने ॥ ८ ॥
इश्क़ पर् ज़ोर् नहीं है ये वो आतिश् ग़ालिब्
के लगाये न लगे और् बुझाये न बने ॥ ९ ॥

(१) प्रिया प्रत्येक गोष्टींत बारकाई काढते आहे. तिला हृदयाचें दुःख ऐकविण्याची सोय नाहीं. जेथें सोयीचें बोलणें नाहीं तेथें काय बोलायचें ?

(२) हे भावने, मी तिला बोलावतों पण ती येईल असें वाटत नाहीं. बघ तूं तिला माझ्याकडे ओढून आणण्यांत मदत करूं शकशील काय ?

(३) छळ करणें म्हणजे तिला खेळ वाटतो. कुठें तिनें खेळ विसरून जाऊं नये म्हणजे बरें ; कारण आम्हांला छळ झालेला आवडतो. तिला छळण्याची सवय जडावी. म्हणजे घटकाभरचें खेळणें समजून ती विसरून जाणार नाहीं.

(४) अगे, तूं प्रतिस्पर्ध्याला लिहिलें आहेस तें पत्र तो इतक्या उघडपणें मिरवीत आहे कीं तें पत्र लपविण्याची सोय राहिली नाहीं. तुझ्या प्रेमाचें गुपित उघडें पडायचें.

(५) ती इतकी नाजुक कशी ? हातीं लागली तर तिला हात लावावा कीं नाहीं ह्याचा संकोच वाटूं लागतो.

(६) ही सृष्टि कुणाच्या सौंदर्याचा अविष्कार आहे ? त्या शक्तीवर पडलेला पडदा उचलणें कुणालाही शक्य दिसत नाहीं.

(७) मृत्यूची वाट पाहाण्यांत काय अर्थ ! तो तर येणारच आहे ; पण तूं यावेंस असें वाटलें तरी तूं येणार नाहींस ह्या भीतीनें तुला बोलावण्यास संकोच वाटतो.

(८) माझ्या डोक्यावरून एक ओझें खालीं पडलें आहे. मी तें ओझें उचलूं शकत नाहीं. हें काम माझ्याच्यानें सुधरत नाहीं.

(९) हे गालिब, प्रेमावर कुणाचा प्रभाव चालू शकेल ? ती एक आग आहे. लावूं म्हटल्यानें लागत नाहीं आणि विझवूं म्हटल्यानें विझत नाहीं.

१७७ . . . चाक की ख़्वाहिश अगर वहशत ब उर्यानी करे
सुबह के मानिंद् ज़ख्मे दिल् गरेबानी करे ॥ १ ॥
जल्वे का तेरे वो आलम् है के गर् कीजिये ख़ियाल्
दीदये दिल् को ज़ियारत् गाहे हैरानी करे ॥ २ ॥
है शिकस्तन से भी दिल् नौमीद यारब् कब् तलक्
आबगीना कोहपर् अर्ज़े गिरांजानी करे ॥ ३ ॥
मैकदा गर चश्मे मस्ते नाज़ से पावे शिकस्त्
मूयेशीशा दीदये साग़र् की मिज़्गानी करे ॥ ४ ॥
ख़ते आरिज़ से लिखा है ज़ुल्फ़ को उल्फ़त् ने अहद
यक् क़लम् मंज़ूर् है जो कुछ परीशानी करे ॥ ५ ॥

(१) वेडांत कपडे फाडण्याची इच्छा होते पण अंगावर कपडे नसले तर अंगावरील जखमा फाटल्या जातात. जशी प्रभात हळुहळू उघडत जाते तसे माझ्या जखमा उघडूं लागतात.

(२) तुझ्या सौंदर्याचा आविष्कार पाहून माझेंही मन अचंब्याचें आगर बनलें आहे.

(३) प्रियेचें हृदय म्हणजे कठिण पाषाणाचा डोंगर आणि माझें हृदय म्हणजे नाजूक कांचेचें पात्र. माझा शेवट कर असें कांचपात्रानें डोंगराला किती वेळ विनवावें ! त्यांतही निराशा पदरीं पडत आहे.

(४) प्रियेच्या चंचल नेत्रांमुळें सारें मद्यालय प्रभावित झालें आहे आणि मद्यपात्रें प्रियेकडे अचंब्यानें पाहात आहेत.

(५) प्रियेच्या गालावर लव आहे ती लव नव्हे तर प्रेमानें केशकलापाला लिहून दिलेला हा करार आहे कीं तुला प्रेमक्षेत्रांत जें कांहीं करावयाचें आहे तें मला पूर्णपणें संमत आहे.

१७८ . . . वो आके ख़्वाब् मे तस्कीने इज़्तिराब् तो दे
व ले मुझे तपिशे दिले मजाले ख़्वाब तो दे ॥ १ ॥
करे है क़त्ल लगावट मे तेरा रो देना
तेरी तरह कोयी तेग़े निगाह को आब् तो दे ॥ २ ॥
दिखाके जुंबिशे लब् ही तमाम् कर हम् को
न दे जो बोसा तो मूंह से कहीं जवाब् तो दे ॥ ३ ॥
पिला दे अवक से साक़ी जो हम् से नफ़रत है
प्याला गर् नहीं देता न दे शराब् तो दे ॥ ४ ॥
असद् ख़ुशीसे मेरे हात पांव फूल गये
कहा जो उस्ने ज़रा मेरे पांव दाब तो दे ॥ ५ ॥

(१) प्रिया स्वप्नांत येऊन माझें समाधान करील कदाचित् पण हृदयांतील अस्वस्थतेमुळें झोप येत नाहीं ह्याला काय करावयाचें ?

(२) तुझ्या डोळ्यांत प्रेमाश्रु पाहून त्यावर जीव द्यावासा वाटतो. अगे, ते अश्रु नव्हेत तर प्रेमिकांचा वध करण्यास नयनाच्या समशेरीला अधिक पाणीदार करीत आहेत.

(३) नुसते ओठ हलवून आमचा निकाल लाव कसा. अगे, चुंबन देण्यास तुझ्यापाशीं ओठ नसले तरी दोन शब्द बोलण्यास तोंड आहे ना ?

(४) साकी, आम्ही तुला आवडत नाहीं आणि म्हणून आम्हांला तूं दारूचीं पात्रें देत नाहींस ना ? नको देऊंस. आम्ही ओंजळीनें दारू पिण्यास तयार आहोंत. आम्हांला दारू पिण्याशीं मतलब. पात्रें घेऊन काय करायचें आहे ?

(५) प्रियेनें म्हटलें कीं माझे हातपाय दाबून दे. तें ऐकून आनंदानें माझें अंगन् अंग फुलून आलें.

१७९ . . . तपिश् से मेरी वक़्फ़े कश् म्कश हर तारे बिस्तर है
मेरा सर् रंजे बालीन है मेरा तन् बारे बिस्तर है ॥ १ ॥
सरश्के सरबसहरा दादा तूरूल ऐने दामन् है
दिल बेदस्तोपा उफ़्तादा बरखुरदारे बिस्तर है ॥ २ ॥

खुशा इक़्बाले रंजूरी इयादत को तुम् आये है
फ़रोग़ शमेए बालीन ताले बेदारे बिस्तर है ॥ ३ ॥
ब तूफ़ानूगाहे जोशे इज़्तिराबे शामे तन्हायी
शुआये आफ़्ताबे सुबहे महशर् तारे बिस्तर है ॥ ४ ॥
अभी आती है बू बालिश् से उसकी ज़ुल्फ़े मिश्कीं की
हमारी दीदको ख़्वाबे ज़ुलेख़ा आरे बिस्तर है ॥ ५ ॥
कहूं क्या दिल की क्या हालत् है हिज्रे यार् मे ग़ालिब्
के बेताबीसे हर यक् तारे बिस्तर ख़ारे बिस्तर है ॥ ६ ॥

(१) माझ्या अस्वस्थतेमुळें माझ्या बिछान्याचा एकेक तंतू अस्वस्थ झाला आहे. उशांना माझ्या डोक्याचा आणि बिछान्याला माझ्या शरीराचा भार वाटत आहे.

(२) माझे अश्रु वाहत वाहत वाळवंटापर्यंत जाऊन पोहोंचले आहेत. त्यामुळें तेथपर्यंत माझी एक तार वांधली गेल्यासारखें झालें आहे; आणि इकडे मात्र मी असहाय स्थितींत बिछान्यावर पडलों आहें. जणूं काय माझ्या बिछान्याला माझ्या हृदयाबद्दल प्रेमाचा पुळका आला आणि तो (बिछाना) मला सोडूं इच्छित नाहीं.

(३) माझ्या आजाराचें नशीब पाहा ! तूं विचारपूस करण्याकरितां माझ्या उशाशीं आली आहेस. जणूं काय तूं आल्यानें माझें नशीब दुखणाइताच्या उशागतीं ठेवलेल्या दिव्यासारखें प्रज्वलित झालें आहे.

(४) ह्या विरहाच्या रात्रीं तळमळीचीं वादळें उठलीं आहेत आणि बिछान्याचा धागान्‌धागा कल्पांतीच्या सूर्याचा तप्तकिरण बनल्यासारखा भासत आहे.

(५) माझ्या उशीला अजून प्रियेच्या केशकलापाचा सुगंध येत आहे. प्रियानें मीलनानंतर नुक्ताच शय्यात्याग केला आहे. जुलेखासारखें स्वप्नांतील मीलन म्हणजे शय्येचा अपमान होय.

(६) विरहाची अवस्था काय वर्णूं ! ह्या शय्येचा प्रत्येक तंतू म्हणजे खोल रुतणारा एकेक कांटा बनला आहे.

१८० . . . खतर है रिश्तये उल्फ़त् रगे गर्दन् न होजावे
गुरूरे दोस्ती आफ़त् है तू दुश्मन् न होजावे ॥ १ ॥
समझ इस् फ़सल् मे कोताहीये नशो नुमा ग़ालिब्
अगर् गुल् सर्व की क़ामत् पे पैराहन न होजावे ॥ २ ॥

(१) आपल्या प्रेमामुळें मला गर्व चढेल कीं काय अशी भीति वाटते आणि मी असा गर्व करूं लागलों कीं तूं माझ्यावर चिडशील ह्याची भीति वाटते.

(२) वसंतऋतूंत फुलें इतकीं फुलतात कीं सुरूच्या झाडालाही झांकून टाकतात. असें झालें नाहीं तर समजावें कीं यंदाचा वसंतऋतु पूर्ण बहरांत नव्हता.

१८१ . . . फरयाद् की कोयी लय् नहीं है
नाला पाबंदे नय् नहीं है ॥ १ ॥
क्यौं बोते हैं बाग़्बान तोंबने
गर् बाग़ गदाये मय् नहीं है ॥ २ ॥
हरचंद् हर एक् शय् मे तू है
पर् तुझसे तो कोयी शय् नहीं है ॥ ३ ॥
हां खाइयो मत् फ़रेबे हस्ती
हरचंद् कहें के है नहीं है ॥ ४ ॥
शादीसे गुज़र् के ग़म् न होवे
उर्दी जो न हो तो दय् नहीं है ॥ ५ ॥
क्यौं रद्दो क़दह करे हैं जाहिद्
मय् है ये मगस् की क़य् नहीं है ॥ ६ ॥
हस्ती है न कुछ् अदम् है ग़ालिब्
अख़िर् तू क्या है अय् नहीं है ॥ ७ ॥

(१) गाऱ्हाणें कोणीही गावें त्याला कुणाचें बंधन नाहीं. तसेंच आक्रंदनाची त्यांत कृत्रिमता नसली म्हणजे झालें.

(२) माळी शेतांत भोपळयाच्या बिया कां पेरतात ? भोपळ्यांतून फकीराचें भिक्षापात्र आणि भोपळ्यांतून दारू काढतात. खात्रीनें बागेलाही दारू हवीशी वाटते. नाहीं तर भोपळे बागेंत लावण्याचें काय कारण ?

(३) परमेश्वरा, तूं प्रत्येक वस्तूंत आहेस. पण कोणतीही वस्तु तुझ्यासारखी नाहीं.

(४) ह्या जगाच्या धोक्यांत पडूं नका. ही सर्वसृष्टि म्हणजे माया आहे.

(५) सुखें लावून घेऊं नकोस म्हणजे तुला दुःखें भासणार नाहींत. वसंतऋतु नसला तर हिंवाळाही नाहीं असें समज.

(६) हा प्रवचनकार मागें पुढें काय करीत आहे ? त्याला म्हणावें ही दारू आहे. मधमाशीचें वमन (मध) नाहीं.

(७) अस्तित्वही नाहीं आणि मायाही नाहीं. मग हे गालिब, हें सगळें आहे तरी काय ?

१८२ . . . न पूछ् नुस्ख़ा मरहमे जराहते दिल् का
के उस्मे रेज़ये अल्मास् जुज़्वे आज़्म् है ॥ १ ॥
बहोत दिनों मे तग़ाफ़ुल् ने तेरे पैदा की
वो यक् निगाह् के बज़ाहर निगाह्से कम् है ॥ २ ॥

(१) हृदयाच्या जखमांचा इलाज काय हें मला विचारूं नकोस. अरे, औषधांत वज्राचा चुरा वापरावा लागतो आणि त्यामुळें जखमा आणखी चिघळतात.

(२) इतके दिवस तूं उपेक्षा करीत होतीस. आतां माझ्याकडे दृष्टिक्षेप करते आहेस तीसुद्धा ओझरती.

१८३ . . . हम् रश्क को अपने भी गवारा नहीं कर्ते
मर्ते हैं वले उन्की तमन्ना नहीं कर्ते ॥ १ ॥
दर्पर्दा उन्हे ग़ैरसे है रब्ते निहानी
ज़ाहिर का ये पर्दा है के पर्दा नहीं कर्ते ॥ २ ॥
ये बाइसे नौमीदीये अरबाबे हवस् है
ग़ालिब् को बुरा कहते हो अच्छा नहीं कर्ते ॥ ३ ॥

(१) तिच्या प्रेमांत आम्हांला स्वतःचाही मत्सर वाटूं लागला आहे. आम्ही मरून जाऊं पण तिची इच्छा करणार नाहीं. कारण त्यामुळें आमचा आम्हांलाच मत्सर वाटूं लागेल.

(२) आंतून तिला माझ्या प्रतिस्पर्ध्यांची ओढ लागली आहे. पण ती दिसून येऊं नये म्हणून आणि आपल्या मनांत कांहीं नाहीं हें दाखविण्याकरितां ती बेपडदा होऊन प्रतिस्पर्ध्यांशीं बोलते. कारण संकोच करणें आणि पडदा पाळणें ह्यावरून आंतून आपलें लक्ष कुणावर तरी आहे असें सुचविण्यासारखें आहे.

(३) गालिब तुझा खरा प्रेमिक आहे. त्याला वाईट म्हणतेस हें बरें नाहीं. ह्यामुळें इतर प्रतिस्पर्धी आपल्या प्रेमाबाबत निराश होतील ह्यांत काय नवल ?

१८४ . . . करे है बादा तेरे लब्से कसबे रंगे फ़रोग़्
ख़ते प्याला सरासर निगाहे गुल्चीं है ॥ १ ॥
कभी तो इस दिले शोरीदा की दाद् मिले
के एक् उम्र से हस्रत् परस्ते बालीन् है ॥ २ ॥
बजा है गर् न सुने नालहाये बुल्बुले ज़ार्
के गोशे गुल् नमे शब्नम् से पंबा आगीन है ॥ ३ ॥

असद् है नज़अ मे चल बेवफ़ा बराये ख़ुदा
मुक़ामे तर्के हिजाब् व विदाये तमकीन् है ।। ४ ।।

(१) मदिरेला तुझे ओठ लागल्यामुळें तिचा तांवडा रंग अधिक खुलून दिसत आहे आणि मदिरापात्रावरील रेघा तुझ्या फुलासारख्या भासणाऱ्या ओठाच्या संसर्गानें अधिक खुलून दिसत आहेत.

(२) ह्या प्रेमवेड्याची कांहीं तरी दाद घे. बघ सगळें आयुष्य उशीवर डोकें टेकून तो तळमळत पडला आहे.

(३) फुलें बुलबुलचीं आक्रंदनें कशीं ऐकतील ? दंवबिंदूच्या रूपानें त्यांच्या कानांत कापूस भरला आहे ना ?

(४) हे प्रिये, असद् अंतकाळची घटिका मोजीत आहे. आतां तरी त्याची विचारपूस कर. ही वेळ स्वाभिमान व संकोच सोडून देण्याची आहे.

१८५ . . . क्यौं न हो चश्मे बुतान् महवे तग़ाफ़ुल क्यौं न हो
यानी इस् बीमार को नज़्ज़ारे से परहेज़ है ।। १ ।।
मरते मरते देखनेकी आरज़ू रहजायेगी
वाये नाकामी के उस् काफ़िर का ख़ंजर तेज़ है ।। २ ।।
आरिज़े गुल देख रूये यार याद् आया असद्
जोशिशे फ़स्ले बहारी इश्तियाक़ अंगेज़ है ।। ३ ।।

(१) उर्दू काव्यांत प्रेयसीच्या डोळ्यांना प्रेमरोग्याचे डोळे म्हणण्याचा प्रघात आहे. कवि म्हणतो कीं प्रिया आमची उपेक्षा करते. तिच्या डोळ्यांना आमच्याकडे न बघण्याचें पथ्य सांगितलें आहे असें वाटतें.

(२) मरतांना तिच्याकडे डोळे भरून पाहाण्याची हौस मनांतच राहून जाईल. प्रियेचा खंजीर इतका तीक्ष्ण आहे कीं डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोच आमचा शिरच्छेद व्हावयाचा.

(३) गुलाबाचें उमललेलें फूल पाहून प्रियेचा चेहेरा आठवला. वसंतऋतूच्या आगमनाबरोबर जणूं प्रेमाचे विचार पुन्हां मनांत खेळूं लागले.

१८६ . . . दिया है दिल् अगर उस्को बशर है क्या कहिये
हुवा रक़ीब् तो हो नामाबर है क्या कहिये ।। १ ।।
ये ज़िद के आज न आवे और आये बिन् न रहे
क़ज़ासे शिकवा हमे किस्क़दर है क्या कहिये ।। २ ।।

रहे है यौं गह् व बेगह के कूये दोस्त को अब्
अगर न कहिये के दुश्मन् का घर है क्या कहिये ॥ ३ ॥
ज़हे किरिश्मा के यौं दे रखा है हम को फ़रेब्
के बिन् कहे ही उन्हें सब ख़बर है क्या कहिये ॥ ४ ॥
समझ्के करते हैं बाज़ार मे वो पुर्सिशे हाल्
के ये कहे के सरे रहगुज़र है क्या कहिये ॥ ५ ॥
तुम्हे नहीं है सिररिश्तये वफ़ा का ख़ियाल
हमारे हाथ् मे कुछ है मगर है क्या कहिये ॥ ६ ॥
उन्हें सवाल मे ज़ोमे जुनूं है क्यौं लडिये
हमे जवाब् से क़ता नज़र है क्या कहिये ॥ ७ ॥
हसद् सज़ाये कमाले सुख़न् है क्या कीजे
सितम् बहाये मताए हुनरर है क्या कहिये ॥ ८ ॥
कहा है किस्ने के ग़ालिब् बुरा नही लेकिन्
सिवाये इस्के के आशुफ़्ता सर है क्या कहिये ॥ ९ ॥

(१) मी दूताबरोबर प्रियेकडे निरोप पाठविला. निरोप पोहोंचवून तो दूत तिच्या प्रेमांत सांपडला. तिचें सौंदर्य इतकें मादक आहे कीं दूत प्रेमांत सांपडावा ह्यांत नवल नाहीं. कारण तोही मनुष्यच आहे.

(२) आज मृत्यूनें यावें आणि आमच्या दुःखाचा शेवट करावा असें वाटतें. मृत्यु येईल, आल्याशिवाय राहाणार नाहीं, पण तो आज हवा आहे तेव्हां हटकून येणार नाहीं. फार हट्टी आहे तो.

(३) आमचा प्रतिस्पर्धी जेव्हां दिवसरात्र प्रियेच्या घरीं पडून राहतो तेव्हां प्रियेचें घर म्हणजे आम्हांला शत्रुस्थान वाटूं लागलें आहे.

(४) प्रियेचा नखरा पाहा. ती असा आव आणते जणूं काय तिला माझी मनःस्थिति पूर्णपणें माहीत आहे. ह्या भ्रमामुळें मी तिला आपली हकीकत सांगूं शकत नाहीं.

(५) ती जाणूनबुजून रस्त्यांत उभी राहून माझी चौकशी करी; कारण तिला माहीत कीं रस्त्यांत उभे राहून बोलणें आम्हांला आवडत नाहीं आणि तिनें चौकशी केली तरी आम्ही गप्प राहातों हें तिला माहीत आहे.

२४१ . . . .

(६) तिला निष्ठा म्हणजे काय शब्द आहे माहीत नाहीं. आम्ही आपली निष्ठा मुठींत धरून बसलों आहोंत. आमच्या मुठींत काय आहे हें विचारलें तर ती उत्तर देऊं शकत नाहीं.

(७) मी प्रश्न विचारले कीं तिला वाटतें मला वेड लागलें आहे. त्यामुळें तिच्याकडून उत्तराची अपेक्षा करणें मीं सोडून दिलें आहे.

(८) प्रतिभाशाली माणसाबद्दल जगाला नेहमीं हेवा वाटतो. म्हणजे प्रतिभा ही शिक्षा झाली आणि कलाकारांचा जग छळ करते म्हणजे कलेचें मूल्य छळ होय.

(९) गालिब वाईट नाहीं फक्त त्याचें डोकें फिरलें आहे म्हणतात.

१८७ . . . देखकर दरपरदा गरमे दामन् अफ़शानी मुझे
कर् गयी वाबस्तये तन् मेरी उरियानी मुझे ॥ १ ॥

बन् गया तेग़ेनिगाहे यार् का संगेफ़िसां
मर्हबा मै क्या मुबारक् है गिरांजानी मुझे ॥ २ ॥

क्यौं नहो बेइल्तफ़ाती उसकी खातिरजमअ है
जानता है महवे पुरसिशहाये पिन्हानी मुझे ॥ ३ ॥

मेरे ग़म्खाने की क़िस्मत् जब रक़म् होने लगी
लिखदिया मिन्जुम्लये असबाबे वीरानी मुझे ॥ ४ ॥

बद्गुमां होता है वो क़ाफ़िर् न होता काश के
इस्क़दर जौक़े नवाये मुर्ग़े बुस्तानी मुझे ॥ ५ ॥

वाये वांभी शोरे महशरने न दम् लेने दियां
ले गया था गोर मे जौक़े तन् आसानी मुझे ॥ ६ ॥

वादा आनेका वफ़ा कीजे ये क्या अंदाज़् है
तुम्ने क्यौं सोंपी है मेरे घरकी दर्बानी मुझे ॥ ७ ॥

हां निशाते आमदे फ़स्ले बहारी वाहवाह
फिर् हुवा है ताज़ा सौदाये गजल ख्वानी मुझे ॥ ८ ॥

दी मेरे भाईको हक़्ने अज़्सरेनौ जिंदगी
मीर्ज़ा यूसुफ़् है ग़ालिब यूसुफ़ेसानी मुझे ॥ ९ ॥

(१) वस्त्रें त्यागिल्यानें मी जीवन्मुक्त झालों असें समजत होतों; पण शरीराचें वस्त्र आत्म्याला चिकटलें तें कांहीं त्यागतां येईना.

(२) माझ्या शरीराचें भाग्य काय समजावें ! प्रिया आपल्या नयनांची कट्यार माझ्या शरीराला दगड समजून त्याच्यावर कट्यार घासून धार तीक्ष्ण करीत असते.

(३) ती माझी उपेक्षा करीत आहे; कारण तिला माहीत आहे कीं, मी तिचें मनोमय चिंतन करण्यांत गर्क झालों आहें. तोंडानें शब्द काढीत नाहीं. आपली उपेक्षा मला जाणवणार नाहीं, ह्याची तिला खात्री आहे.

(४) माझें घर उध्वस्त होण्याचें जेव्हां परमेश्वर माझ्या नशीबीं लिहीत होता, त्यांत उध्वस्ततेला कारण मी होणार हेंही त्यानें लिहून टाकलें.

(५) मला पक्ष्यांचें संगीत आवडतें, त्यामुळें प्रिया माझ्यावर चिडते. तिला वाटतें, आपल्याशिवाय इतर कोणत्याही गोष्टीची आसक्ति मला राहूं नये. पक्ष्यांचें कूजन ऐकण्याचा मला शौक नसता तर बरें झालें असतें.

(६) कबरेंत तरी मला स्वस्थता मिळेल असें मी समजत होतों; पण दुर्दैव माझें ! कल्पांताच्या हलकल्लोळानें मला तेथें पण विश्रांति घेऊं दिली नाहीं.

(७) येईन म्हणून वचन दिलेंस तें पूर्ण कर ना. हें काय ? तुझ्या प्रतीक्षेंत माझ्या घराचा मी राखणदार बनून बसलों आहें.

(८) बा वसंतऋतो, तूं आलास त्यामुळें मनाला किती हर्ष होतो आहे म्हणून सांगूं ! आतां पुन्हां काव्यरचनेला बहर येऊं लागला आहे.

(९) परमेश्वरानें माझा भाऊ मिर्जा यूसुफ ह्याला (हा वेडा होता) नवजीवन दिलें हे त्याचे आभार होत. माझा भाऊ यूसुफ हा प्राचीन कालचा प्रतियूसुफच होय.

१८८ . . .

याद् है शादी मे भी हंगामये यारब् मुझे
सुबहाये ज़ाहिद् हुवा है खंदा ज़ेरेलब् मुझे ॥ १ ॥
है कुशादा ख़ातिर वाबस्ता दर रहने सुख़न
था तिलिस्मे कुफ़्ले अब्जद् ख़ानये मक्तब् मुझे ॥ २ ॥
यारब इस आशुफ़्तगी की दाद किससे चाहिये
रश्क आसाइश पे है जिंदानीयोंकी अब् मुझे ॥ ३ ॥
तब्रा है मुश्ताक़े लज़्ज़तहाये हस्रत् क्या करूं
आरज़ू से है शिकस्ते आरज़ू मतलब् मुझे ॥ ४ ॥
दिल लगाकर आप भी ग़ालिब मुझी से होगये
इश्क़ से आते थे माने मीरज़ा साहब् मुझे ॥ ५ ॥

(१) आनंदाच्या प्रसंगीं ‘ हे परमेश्वरा, हे प्रभो, ’ असें मी म्हणत असतों. माझे ओठ म्हणजे जपमाळ बनले आहेत.

(२) विशिष्ट प्रकारचीं कुलपें जशीं विशिष्ट शब्द जुळल्याबरोबर उघडतात आणि म्हणून त्या विशिष्ट शब्दांवर अवलंबून असतात. तद्वत् माझ्या तब्येतीची खुलावट माझ्या काव्यरचनेवर अवलंबून आहे.

(३) माझें वेड पाहा. पूर्वी कारागारांत होतों तेव्हां वाळवंटाची उपेक्षा करीत होतों. आतां वाळवंटांत आहें तर कारागारांतील सुखांचा हेवा वाटूं लागला आहे.

(४) मला हुरहुर आणि हळहळ ही आवडतात आणि आकांक्षा आवडतात. ह्याचा अर्थ अतृप्त आकांक्षा आवडतात हा होय.

(५) गालिब, प्रेम करूं नका म्हणून तूं आम्हांला सांगत होतास, पण तूंही त्यांत फसून आमच्यासारखाच झाला आहेस.

१८९ . . . हुज़ूरे शाह् मे अहले सुख़न् की आज़माइश् है
चमन् मे खुश्नवायाने चमन् की आज़माइश् है ॥ १ ॥
क़द् व गेसू मे क़ैस् व कोह्कन् की आज़माइश है
जहां हम् हैं वहां दारो रसन् की आज़माइश् है ॥ २ ॥
करेंगे कोहकन् के हौसलेका इम्तिहां आख़िर्
हनूज़् उस् ख़स्ताके नैरुये तन् की आज़माइश् है ॥ ३ ॥
नसीमे मिस्र को क्या पीरे कन्आं की हवाख़्वाही
उसे यूसुफ़की बूये पैरहन् की आज़माइश् है ॥ ४ ॥
वो आया बज़्म मे देखो न कहियो फिर् के ग़ाफ़िल् थे
शिकेबो सब्रे अहले अंजुमन् की आज़माइश् है ॥ ५ ॥
रहे दिल्ही मे तीर अच्छा जिगर् के पार हो बेहतर्
ग़रज़् शुस्ते बुते नावक्फ़गन् की आज़माइश है ॥ ६ ॥
नहीं कुछ सुबहा व ज़ुन्नार के फंदे मे गीरायी
वफ़ादारी मे शेखो ब्रेहमन् की आज़माइश है ॥ ७ ॥
पडा रह अय् दिले वाबिस्ता बेताबीसे क्या हासिल्
मगर फिर् ताबे ज़ुल्फ़े पुरशिकन् की आज़माइश है ॥ ८ ॥

रगो पये मे जब् उतरे ज़हरे ग़म् तब् देखिये क्या हो
अभी तो तल्ख़ीये कामो दहन् की आज़माइश है ॥ ९ ॥
वो आयेंगे मेरे घर् वादा कैसा देखना ग़ालिब
नये फ़ितूनोंमे अब् चर्खे कुहन् की आज़माइश है ॥ १० ॥

(१) आज दरबारांत कवींची परीक्षा आहे. जणूं काय उपवनांत पक्ष्यांची कूजना-बावत स्पर्धा आहे.

(२) मजनू आणि फरहाद ह्यांच्या प्रेमाची परीक्षा प्रेयसीचा बांधा, तिचा केशकलाप इत्यादि भौतिक गोष्टींच्यावरून केली जाते. पण आमची परीक्षा त्याहूनही कठीण आहे.

(३) फरहाद कालवा खणून आणण्याच्या प्रयत्नांत आहे. सध्या त्याच्या शारीरिक श्रमाची परिक्षा आहे. ह्याच्या पुढची पायरी म्हणजे त्याच्या निर्धाराची परीक्षा राहील.

(४) यूसुफ इजिप्त देशामध्यें कैदेंत असतांनाची हकीकत. कवि म्हणतो, इजिप्तकडून येणारा वारा यूसुफच्या शरीराचा सुगंध घेऊन यूसुफचा बाप याकूब ह्याच्याकडे आला. ह्यांत त्या वाऱ्याला याकूबचें कुशल जाणण्याची इच्छा नव्हती, तर त्या सुगंधाचा याकूबवर काय परिणाम होतो, हें पाहावयाचें होतें.

(५) ती पहा मैफिलींत आली. पुन्हा म्हणूं नका कीं आम्ही गाफील होतों. म्हणून आतां मैफिलीच्या सहनशक्तीची आणि शांततेची परीक्षा आहे.

(६) बाण हृदयांत रुतून राहिला तर बरें; तो काळजाच्या आरपार निघून गेला तर त्याहूनही उत्तम. त्या शरसंधान करणाऱ्या प्रियेच्या नेमबाजीची आतां परीक्षा आहे.

(७) मुसलमानाची स्मरणी आणि ब्राह्मणाचें जानवें ह्यांत सर्व कांहीं आलें असें नाहीं. खरा प्रश्न श्रद्धेचा आणि त्यांत ह्या दोघांची खरी परीक्षा आहे.

(८) अरे बद्ध हृदया, उगाच कां तळमळतो आहेस? प्रियेच्या केशकलापाच्या बंधनांत तूं किती तरी वेळा अडकला आहेस. आतां पुन्हां परीक्षा पाहायची आहे काय?

(९) हें शोकाचें विष सध्यां फक्त डोक्यापर्यंतच मर्यादित आहे तर ही स्थिति आहे. उद्यां तें नसानसांतून पसरलें तर परमेश्वर जाणें काय अनर्थ होणार आहे!

(१०) ती काय माझ्या घरीं येते? कसलीं वचनें न् काय? आतां बघावें तिच्या न येण्यानें नियति माझ्यासाठीं काय नवीन नवीन संकटें निर्माण करणार आहे.

१९० . . . कभी नेकी भी उस्के जीमे गर् आजाये है मुझसे
जफ़ायें कर्के अपनी याद शरमा जाये है मुझसे ॥ १ ॥
ख़ुदाया जज़्बये दिल्र की मगर् तासीर उल्टी है
के जितना खींचता हूं और् खिंचता जाये है मुझसे ॥ २ ॥

वो बद्ख़ू और् मेरी दास्ताने इश्क़ तूलानी
इबारत् मुख़्तसर क़ासिद् भी घबरा जाये है मुझसे ॥ ३ ॥
उधर वो बद्गुमानी है इधर ये नातुवानी है
न पूछा जाये है उस्से न बोला जाये है मुझसे ॥ ४ ॥
सम्हलने दे मुझे अय् नाउमीदी क्या क़ियामत् है
के दामाने ख़ियाले यार छूटा जाये है मुझसे ॥ ५ ॥
तकल्लुफ़् बरतरफ़ नज़्ज़ारगी मे भी सही लेकिन
वो देखा जाये कब् ये ज़ुल्म् देखा जाये है मुझसे ॥ ६ ॥
हुये हैं पांवही पहले नबर्दे इश्क़मे जख़मी
न भागा जाये है मुझसे न ठहरा जाये है मुझसे ॥ ७ ॥
क़ियामत् है के होवे मुद्दई का हसम्फ़र ग़ालिब्
वो काफ़िर जो ख़ुदाको भी न सोंपा जाये है मुझसे ॥ ८ ॥

(१) प्रियेच्या मनांत माझें चांगलें करावें असें आलें तरी आपण पूर्वी केलेल्या छळांची तिला आठवण होऊन, चांगलें करण्यास तिला संकोच वाटतो.

(२) माझ्या हृदयींच्या भावनांचें लक्षण सारें उलटें दिसतें. मी भावनांना जितकें जवळ करावें म्हणतो तितक्याच त्या दूर जात आहेत.

(३) प्रिया चिडखोर आणि माझी प्रेमकहाणी दीर्घ. ती तिच्यापर्यंत पोहोंचवूं कशी ह्या कल्पनेनेंच माझा दूत घाबरला आहे.

(४) ती माझ्यासंबंधीं गैरसमज करून बसली आहे. इकडे माझ्यांत बोलण्याची शक्ति नाहीं. ती विचारपूस करीत नाहीं आणि इकडे आम्हांला बोलवत नाहीं.

(५) हे निराशे, आतां हा छळ पुरा कर. बघ तुझ्या आघातामुळें प्रियासंबंधीं विचारही मनांतून हळुहळू नाहींसे होऊं लागले आहेत.

(६) तिच्याकडे पाहात राहाणाऱ्यामध्यें मीही आहें. पण खरें पाहिलें तर तिच्याकडे कोणी पाहिलेलें मला खपत नाहीं.

(७) प्रेमाच्या क्षेत्रांत प्रथम माझे पाय कामांतून गेले आहेत. धड पळ तांयेत नाहीं, धड उभे राहतां येत नाहीं, अशी स्थिति झाली आहे.

(८) काय कहर आहे पहा! जिला निरोप देतांना तुला परमेश्वरावर सोंपविली आहे असें मला म्हणवत नाहीं, तिला माझ्या प्रतिस्पर्धाच्या सोबत जातांना पाहाणें माझ्या कपाळीं आलें आहे.

१९१ . . . अज़बसूके मश्क़े तमाशा जुनून् अलामत् है
कुशादो बस्ते मिज़ह सेलीये नदामत है ॥ १ ॥

न जानूं क्यौंकरे् मिटे दाग़ो ताने बद्अहदी
तुझे के आयीना भी वर मलाये मलामत् है ॥ २ ॥

ब पेचोताबे हवस् सिल्के आफ़ियत् मत् तोड
निगाहे अज़्ज़ सररिश्तयें सलामत् है ॥ ३ ॥

वफा मुक़ाबिल व दावये इश्क़ बेबुनियाद्
जुनूने साख़्ता व फ़स्ले गुल् कियामत् है ॥ ४ ॥

(१) सौंदर्याचें सारखें सारखें निरीक्षण हें वेडाचें लक्षण आहे. सुंदर स्त्रियांच्या-कडे पाहातांना आपल्या नेत्रांची जी उघडझाप होते, त्याचा अर्थ हा कीं पापण्या आपल्याला सारखे टोंचत असतात कीं, सौंदर्याची इतकी आसक्ति बरी नव्हे.

(२) तूं वचनें पाळीत नाहींस असा अपवाद तुला कायमचा चिकटला आहे. तो डाग कांहीं धुतला जाणार नाहीं आणि तूं सौंदर्यप्रसाधना करत आरसा समोर घेऊन बसतेस त्या वेळीं आरसासुद्धां तुला आरोपी समजतो.

(३) आसक्तीच्या मागें लागून आपला नाश करून घेऊं नकोस. आसक्तीचा त्याग करण्यांत सुरक्षितता आहे.

(४) उपरोधानें कवि म्हणतो कीं, तूं एकनिष्ठ बनावीस आणि आमचा प्रेमाचा दावा खोटा निघावा हीं मोठींच आश्चर्यें होत. जसा वसंतऋतु यावा पण प्रेमवेड हें बनावटी असावें असाच हा प्रकार आहे.

१९२ . . . लाग़र् इत्ना हूं के गर् तू बज़्म मे जा दे मुझे
मेरा ज़िम्मा देख के गर् कोयी बतला दे मुझे ॥ १ ॥

क्या ताज्जुब् है के उस्को देख़कर् आजाये रहम्
वां तलक् कोयी किसी हीलेसे पोहोंचा दे मुझे ॥ २ ॥

मूंह न दिखलादे न दिखला पर् बअंदाजे इताब्
खोलकर पर्दा ज़रा आंखेंही दिख़लादे मुझे ॥ ३ ॥

यांतलक् मेरी गिरफ़्तारीसे वो ख़ुश है के मैं
ज़ुल्फ़ गर बन् जावूं तो शाने मे उल्झा दे मुझे ॥ ४ ॥

(१) मी प्रियेच्या विरहांत इतका रोड झालों आहें कीं तिच्या बैठकींत तुम्ही मला जाऊं दिलेंत तर तिची नजर कांहीं माझ्यावर पडणार नाहीं, ह्याची मला खात्री आहे.

(२) कोणत्या तरी निमित्तानें मला तिच्यापर्यंत पोहोंचवा कसें ! कदाचित् माझी स्थिति पाहून तिला माझी दया येण्याचा संभव आहे.

(३) तुला आपलें तोंड मला दाखवायचें नाहीं, तर नको दाखवूं; पण वटारून पाहाण्याच्या निमित्तानें कां होईना तोंडावरचा बुरखा बाजूला सारून डोळे तरी दाखविशील कीं नाहीं ?

(४) मला बंधनांत अडकविण्यांत तिला मोठा आनंद वाटतो. मी जर तिचे अलक बनलों तरी ती मला बांधून मानेवर अडकवून ठेवल्याशिवाय राहाणार नाहीं.

१९३ . . . बाज़ीचये अतफ़ाल् है दुनिया मेरे आगे
होता है शबो रोज़् तमाशा मेरे आगे ॥ १ ॥

इक् खेल् है औरंगे सुलेमां मेरे नज़दीक्
इक बात् है एजाज़े मसीहा मेरे आगे ॥ २ ॥

जुज़् नाम् नहीं सूरते आलम् मुझे मंज़ूर्
जुज़् वहम् नहीं हस्तीये अशिया मेरे आगे ॥ ३ ॥

होता है निहां गर्दमे सहरा मेरे होते
घिस्ता है जबीं ख़ाक पे दरिया मेरे आगे ॥ ४ ॥

मत् पूछ् के क्या हाल है मेरा तेरे पीछे
तू देख् के क्या रंग है तेरा मेरे आगे ॥ ५ ॥

सच् कहते हो ख़दबीं व ख़ुद्आरा हूं न क्यौं हूं
बैठा है बुते आयीनासीमा मेरे आगे ॥ ६ ॥

फिर देखिये अंदाज़े गुलफ़्शानीये गुफ़्तार
रखदे कोयी पैमाना व सहबा मेरे आगे ॥ ७ ॥

नफ़रत् का गुमां गुज़रे है मै रश्क से गुज़रा
क्योंकर कहूं लो नाम् न उन्का मेरे आगे ॥ ८ ॥

ईमां मुझे रोके है तो खींचे है मुझे कुफ़्र
काबा मेरे पीछे है कलीसा मेरे आगे ॥ ९ ॥

आशिक़् हूं पे माशूक़् फ़रेबी है मेरा काम
मजनूं को बुरा कहती है लैला मेरे आगे ।। १० ।।

खुश होते हैं पर् वस्ल मे यौं मर् नहीं जाते
आयी शबे हिज्रां की तमन्ना मेरे आगे ।। ११ ।।

है मौजज़न इक् कुल्ज़ुमे खूं काश् यही हो
आता है अभी देखिये क्या क्या मेरे आगे ।। १२ ।।

गो हाथ् को जुंबिश् नहीं आंखोंमे तो दम है
रहने दो अभी साग़रो मीना मेरे आगे ।। १३ ।।

हम् पेशा व हम् मश्रब् व हम्राज़् है मेरा
गालिब् को बुरा क्यौं कहो अच्छा मेरे आगे ।। १४ ।।

(१) हें जग म्हणजे माझ्या नजरेंत पोरांचा खेळ आहे. दिवस आणि रात्र माझ्या-समोर हा खेळ चालला आहे.

(२) सुलेमानचें उडणारें सिंहासन आणि प्रेषिताचे चमत्कार हीं मला क्षिरकोळ वाटतात.

(३) ह्या सृष्टीला मी नाममात्र समजतों आणि जडपदार्थांना मी एक भ्रम समजतों. एक परमेश्वर सोडून मी कोणत्याही वस्तूचें अस्तित्व मानण्यास तयार नाहीं.

(४) प्रेमवेडांत माझ्या भटकण्यामुळें धूळ उडून वाळवंट दिसेनासें होतें आणि बेफाम अश्रु वाहविण्यामुळें समुद्राला स्वतःच्या जलाशयाची लाज वाटूं लागली आहे.

(५) माझ्या मागें तुझें कसें होईल असें काय विचारतेस ? तूं आतां ज्याप्रमाणें संकोचून आणि शरमून माझ्यासमोर बसली आहेस त्याप्रमाणें मलाही तुझ्या विरहामुळें अस्वस्थ वाटेल.

(६) मी गर्विष्ठ आणि अहंकारी आहें असें तूं म्हणतेस. खरें आहे; तुझ्यासारखी सुंदरी माझ्यासमोर असल्यावर मला कां बरें गर्व चढणार नाहीं ?

(७) माझ्या समोर कोणी मद्यपात्र ठेवून द्या. आणि मग पाहा माझ्या वाणींतून वाक्यसुमनें कशीं उधळतात तीं !

(८) माझ्या प्रियेचें नांव दुसऱ्या कोणी उच्चारलें कीं मला मत्सर वाटतो. बरें, नांव उच्चारूं नका म्हणण्याची सोय नाहीं. त्यामुळें कुणाला वाटायचें कीं माझें आणि माझ्या प्रियेचें बिनसलें आहे.

(९) धर्म आणि अधर्म ह्यांच्या संघर्षांत मी सांपडलों आहें. एकीकडे काबा तील पवित्र स्थान) ओढीत आहे तर दुसरीकडे कलीसा (ख्रिस्ती देऊळ) मला आपल्याकडे ओढूं पाहात आहे.

(१०) मी प्रेमिक आहें. प्रेयसींच्या तावडींत मी जायला हवें होतें. उलट मी प्रेयसींना आपल्या तावडींत झुलत ठेविलें आहे. फार काय लैलासुद्धा मजनूंच्या तुलनेंत मला चांगला समजत आहे.

(११) विरहांत मी प्रार्थना करी कीं हे परमेश्वरा, मला मीलनरात्रींत मरण येऊं दे. काय दुर्दैव ! मीलनाच्या रात्रींत नेमकी ती प्रार्थना फळास यावी.

(१२) माझ्या हृदयांत रक्ताचें तुफान उसळलें आहे. आतां प्रेमामुळें ह्यापुढें काय होणार आहे पाहिलें पाहिजे.

(१३) माझ्या हातांत शक्ति नसेल पण डोळ्यांत तरी आहे ना? माझ्या समोर मदिरेची सुरई आणि पात्रें अजून थोडा वेळ राहूं द्या.

(१४) गालिब हा सहृदय आणि समव्यवसायी आहे. त्याला वाईट कां म्हणतां ?

१९४ . . . कहूं जो हाल् तो कहते हो मुद्दुआ कहिये
तुम्ही कहो के जो तुम् यों कहो तो क्या कहिये ॥ १ ॥

न कहियो तानसे फिर् तुम् के हम् सितम्गर् हैं
मुझे तो ख़ू है के जो कुछ कहो बजा कहिये ॥ २ ॥

वो नेश्तर सही पर् दिल् मे जब उतर् जावे
निगाहे नाज़् को फिर क्यौं न आशना कहिये ॥ ३ ॥

नहीं ज़रीये राहत् जराहते पैकान्
वो ज़ख्मे तेग़् है जिस्को के दिल्कशा कहिये ॥ ४ ॥

जो मुद्दई बने उस्के न मुद्दई बनिये
जो नासज़ा कहे उसको न नासज़ा कहिये ॥ ५ ॥

कहीं हक़ीक़ते जान्काहीये मरज़् लिखिये
कहीं मुसीबते नासाज़ीये दवा कहिये ॥ ६ ॥

कभी शिकायते रंजेगिरांनशीं कीजे
कभी हिकायते सब्रे गुरेज़्पा कहिये ॥ ७ ॥

रहे न जान् तो क़ातिल्को ख़ंबहा दीजे
कटे ज़बान् तो खंजरको मरहबा कहिये ॥ ८ ॥
नहीं निगार् को उल्फ़त् न हो निगार् तो है
रवानीये रविश् व मस्तीये अदा कहिये ॥ ९ ॥
नहीं बहार को फ़ुर्सत् न हो बहार् तो है
तरावते चमन् व ख़ूबीये हवा कहिये ॥ १० ॥
सफ़ीना जब्के किनारे पे आलगा ग़ालिब्
ख़ुदासे क्या सितम् व जोरे नाख़ुदा कहिये ॥ ११ ॥

(१) माझी स्थिति मी वर्णूं लागलों कीं मुद्द्याची गोष्ट बोला म्हणून तूं म्हणतेस. तूंच असें बोलूं लागलीस तर आम्ही काय म्हणायचें हें तूंच सांग.

(२) तुझ्या प्रत्येक गोष्टीला योग्य, ठीक, बरोबर असें म्हणण्याची मला संवय पडली आहे. बघ बरें, मी तुझा छळ करतें असें दुसऱ्यांदा म्हणूं नकोस. नाहींतर बरोबर असे शब्द माझ्या तोंडून निघायचे आणि मग तूंच बरें माझ्यावर चिडशील.

(३) तो शर असला तरी नयनशर आहे. शर कोणालाच आवडत नाहीं पण नयन-शराला हृदयानें धारण केलें, ह्यामुळें नयनशर हृदयाचा आवडता आहे हें सिद्ध होतें.

(४) बाणानें फक्त हृदयांत चीर पडते म्हणून मला आवडत नाहीं. त्या उलट खंजीरीमुळें हृदय फाटतें म्हणून मला बाणापेक्षां खंजीरीचे आघात आवडतात.

(५) शत्रूला शत्रू म्हणूं नका आणि आपल्याशीं वाईट करणाऱ्याचें बरें होवो अशी इच्छा करा.

(६) आमची स्थिति काय वर्णावी? कधीं आपल्या रोगाचें वर्णन करतो आणि कधीं ह्या रोगावर कोणतेंच औषध कसें लागू पडत नाहीं हें सांगत सुटतो.

(७) कधीं आमच्या आपत्तींची आम्ही कहाणी गातों तर कधीं आमची सहनशक्ति कशी नाहींशी झाली आहे हें सांगतों.

(८) तुमच्या शरीरांत प्राण शिल्लक राहिला नाहींतर प्रियेला खूनबहा (कुणाचा वध केला तर आरोपीनें मेलेल्या माणसाच्या वारसांना द्यायची रक्कम) द्या. कारण तिला देण्याकरितां तुमच्यापाशीं जीव शिल्लक नाहीं आणि जीभ कापली गेली तर खंजीरीला धन्यवाद द्या.

(९) ती सुंदरी प्रेम करीत नसेल तर काय झालें? तिच्या शरीरसौष्ठवाची आणि चंचल गतीची स्तुति करण्यास काय हरकत आहे?

(१०) वसंतऋतु अल्पायु असेल म्हणून काय झालें ? वसंतऋतूचा वायू आणि बहरलेलीं उपवनें ह्यांचा आनंद लुटण्यास काय हरकत आहे ?

(११) आपली नाव किनाऱ्याला लागली. आतां नावाड्यानें आम्हांला छळलें म्हणून गाऱ्हाणें गाण्यांत अर्थ नाहीं. गत संकटें विसरून जाणें हें बरें !

रोनेसे और इश्क़ मे बेबाक होगये
१९५ . . . धोये गये हम् ऐसे के बस् पाक् होगये ॥ १ ॥
सर्फ़े बहाये मय् हुये आलाते मय् कशी
थे येही दो हिसाब सो यौं पाक् होगये ॥ २ ॥
रुसवाये दहर गो हुये आवारगीसे तुम्
बारे तबीयतोंके तो चालाक होगये ॥ ३ ॥
कहता है कौन नालये बुल्बुल् को बे असर्
पर्दे मे गुल् के लाख जिगर् चाक् होगये ॥ ४ ॥
पूछे है क्या वजूद व अदम् अहले शौक़ का
आप अपनी आग के ख़सो ख़ाशाक् होगये ॥ ५ ॥
करने गये थे उसूसे तग़ाफुल् का हम् गिला
की एकही निगाह के बस् ख़ाक् होगये ॥ ६ ॥
इस् रंगसे उठायी कल् उसने असद् क़ी नाश
दुश्मन् भी जिस्को देखके ग़म्नाक् होगये ॥ ७ ॥

(१) जोंपर्यंत डोळ्यांतून अश्रु वाहात नव्हते तोंपर्यंत आमच्या प्रेमरहस्याचा स्फोट होऊं नये म्हणून काळजी घेत होतों. पण एकदा अश्रु वाहूं लागल्यानंतर कोणत्याच प्रकारचा संकोच राहिला नाहीं आणि आम्ही स्वैर आणि स्वच्छंदपणें वागूं लागलों.

(२) दारू पिण्यांत दारू गाळण्याचीं साधनें आम्हीं विकून टाकिलीं. आतां तीं बाळगण्याची भानगड मिटली.

(३) तुझ्या स्वच्छंदी वागणुकीनें तुझा दुर्लौकिक झाला; पण त्याबरोबर तूं चतुर आणि धीट बनलीस हा लाभ पण झाला.

(४) बुलबुलच्या आक्रंदनांना निष्फळ कोण म्हणेल ! त्या फुलाकडे पाहा. त्याच्या पाकळ्यांचे (काळजाचे) कसे असंख्य तुकडे पडले आहेत !

(५) प्रेमिकांची हालहवाल काय विचारतोस ? ते आपल्याच प्रेमाग्नींत केरकचऱ्याप्रमाणें जळून भस्म झाले आहेत.

(६) तिच्या उपेक्षेचें गाऱ्हाणें सांगण्यास आम्ही तिच्याकडे गेलों पण तिनें एका दृष्टिक्षेपानें आम्हांला भस्म करून टाकलें.

(७) तिनें काल असद् (कवि) चें प्रेत अशा पद्धतीनें उचललें कीं तें पाहून प्रतिस्पर्ध्यांनाही दुःख वाटलें.

१९६ . . . नशाहा शादाबे रंगो साज़्हा मस्ते तरब्
शीशये मय् सर्वे सब्ज़े जोयबारे नग़्मा है ।। १ ।।
हम्नशीं मत् कह के बरहम् कर् न बज़्मे ऐशे दोस्त
वां तो मेरे नाले को भी एतिबारे नग़्मा है ।। २ ।।

(१) मैफिल ऐन रंगांत आली आहे. संगीताचा दर्या वाहूं लागला आहे आणि हिरव्या मधु पात्रांमुळें मैफिलींत उपवनांतील सुरूचीं झाडें डुलत असल्याचा भास होत आहे.

(२) हे मित्रा, माझ्या निःश्वासांनीं आणि आक्रंदनांनीं मैफिलीचा रंग मी बिघडवूं नये असें म्हणूं नकोस. अरे, तेथें पोहोंचून माझी दुःखद आक्रंदनें मधुर गीतें बनतात.

१९७ . . . अर्ज़े नाज़े शूख़िये दंदां बराये ख़ंदा है
दावये जमीयते अहबाब् जाये ख़ंदा है ।। १ ।।
है अदम् मे गुंचा महूवे हैरते अंजामे गुल्
यक जहां ज़ानूये ताम्मुल् दर् क़फ़ाये ख़ंदा है ।। २ ।।
कुल्फ़ते अफ़्सुर्दगीको ऐशे बेताबी हराम्
वर्ना दंदां दरदिल्अफ़्शुर्दन् बिनाये ख़ंदा है ।। ३ ।।
सोज़िशे बातिन् के हैं अहबाब मुन्किर् वर्ना यां
दिल् मुहीते गिरिया व लब् आशनाये ख़ंदा है ।। ४ ।।

(१) स्मिताच्या द्वारें दंतपंक्तींना आपलें सौंदर्य दाखविण्यास संधि मिळते. पण हे दांत तरी दीर्घकाळपर्यंत एकत्र कुठें टिकून राहातात.

(२) कळी उमलली आणि तिचें फूल बनलें म्हणजे कळी नाहींशी झाली आणि फुलानें तिची जागा घेतली. आपला असा शेवट झाल्याबद्दल कळीला विस्मय आणि चिंता वाटत आहे.

(३) उदासपणांत तळमळीचा अनुभव कोठें ? तशी तळमळ असती तर आम्हीं तिच्या आत्यंतिकतेनें आमचीं हृदयें दांतांनीं कडकडा चावलीं नसतीं कां ?

(४) हृदयांत दडवून ठेवलेलें दुःख माझ्या मित्रांना आवडत नाहीं म्हणून मी हृदयांत अपार दुःख सांठवून ठेवलें आहे आणि ओंठावर हंसू असल्यासारखें दाखवीत आहे.

१९८ . . . हुस्ने बेपर्वा ख़रीदारे मताये जल्वा है
आयीना ज़ानूये फ़िक्रे इख़्तिराए जल्वा है ॥ १ ॥
ता कुजा अय् आगही रंगे तमाशा बाख़्तन्
चश्मे वा गर्दीदा आग़ोशे विदाये जल्वा है ॥ २ ॥

(१) सौंदर्याचा स्वभावच असा आहे कीं त्यानें इतरांची उपेक्षा करावी पण नवनव्या प्रकारानें आविष्कार व्हावा ह्याची सौंदर्याला मोठी हौस म्हणून सुंदर स्त्रिया आरशांत आपलें रूप न्याहाळण्यांत सदा गुंतलेल्या असतात.

(२) हे प्रतिभे, तूं कितीकाळ हा सृष्टीचा चमत्कार अनिमिष डोळ्यांनीं पाहाते आहेस ! हें सारें क्षणभंगुर आहे आणि डोळ्यांसमोरून सरकत आहे. म्हणजे तुझें पाहाणें आणि सृष्टीला निरोप देणें ही एकदमच घडत आहेत.

१९९ . . . जब् तक् दहाने ज़ख़्म न पैदा करे कोयी
मुश्किल् के तुझसे राहे सुख़न् वा करे कोयी ॥ १ ॥
आलम ग़ुबारे वहशते मजनूं है सरबसर्
कबूतक् ख़ियाले तुर्‍रये लैला करे कोयी ॥ २ ॥
अफ़्सुर्दगी नहीं तरब्अफ़्शाये इल्तिफ़ात्
हां दरद् बनके दिल्मे मगर् जा करे कोयी ॥ ३ ॥
रोने से अय् नदीम् मलामत् न कर् मुझे
आख़िर् कभी तो उक़दये दिल् वा करे कोयी ॥ ४ ॥
चाके जिगर्से जब् रहे पुर्सिश् न वा हुयी
क्या फ़ायदा के हबीब को रुसवा करे कोयी ॥ ५ ॥
लख़्ते जिगर् से है रगे हर ख़ार् शाख़े गुल्
ता चंद् बाग़बानीये सहरा करे कोयी ॥ ६ ॥

नाकामीये निगाह् है बर्क़े नज़्ज़ारासोज़्
तू वो नहीं के तुझको तमाशा करे कोयी ॥ ७ ॥

हर संगो ख़िश्त है सद्फ़े गोहर शिकेब
नुक़्सां नहीं जुनूंसे जो सौदा करे कोयी ॥ ८ ॥

सर्बर् हुयी न वादये सबर्आज़्मा से उम्र्
फुर्सत् कहां के तेरी तमन्ना करे कोयी ॥ ९ ॥

है वहशते तबीयते ईजाद् यासख़ेज़्
ये दर्द वो नहीं है के पैदा करे कोयी ॥ १० ॥

बेकारीये जुनूं को है सर् पीटनेका शग़ूल
जब् हाथ टूट् जायें तो क्या करे कोयी ॥ ११ ॥

हुस्ने फ़रोग़े शम्मेये सुख़न् दूर है असद्
पहले दिले गुदाख़्ता पैदा करे कोयी ॥ १२ ॥

(१) हे परमेश्वरा, तुझ्याशीं संभाषण करण्यास ही जीभ आणि हें तोंड उपयोगाचीं नाहींत. त्याला व्यथा आणि तळमळीचें तोंड उघडें झालें पाहिजे.

(२) हें जग म्हणजे मजनूंच्या वेडाची धूळ आहे. ह्याला लैलाचा आकर्षक शिरपेंच असें कोण किती काळपर्यंत समजणार! कवीचा संकेत असा कीं हें जग म्हणजे माया आणि भ्रम आहे. हें आकर्षक आणि मनोहर आहे असा भ्रम किती काळ टिकणार आहे?

(३) उदास बनल्यानें प्रेयसींच्या मनांत काय परिणाम होणार! अंतर्बाह्य व्यथा आणि तळमळ दाखविल्यानें तिच्या हृदयांत जागा मिळण्याची शक्यता आहे.

(४) मला मोकळेपणानें रुदन करूं दे बरें. अरे, माणसानें शेवटीं किती दिवस कुढत राहायचें?

(५) आमचें हृदय उघडें करून दाखविल्यानें तिच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. आतां वेडाच्या भरांत कपडे फाटल्यानें काय होणार आहे?

(६) माझ्या काळजाचे तुकडे वनांतील कांट्याकांट्यावर विखुरले आहेत म्हणून कांटे रंगीबेरंगी फुलासारखे दिसत असून त्यामुळें वनाला विलक्षण शोभा आली आहे.

(७) परमेश्वरा, तुला कोण पाहूं शकेल. कोणीं प्रयत्न केलाच तर त्याची दृष्टि वीज पडल्यासारखें होऊन भस्म होऊन जाईल.

(८) वेडाशीं सौदा कांहीं महाग पडणार नाहीं. कारण वेड लागल्यावर मुलें मागें लागून दगड फेंकतात ते दगड नव्हेत ! आंत तत्त्वाचे मोती धारण करणाऱ्या शिंपल्या होत.

(९) तुझीं वचनें सहनशक्तीची सीमा पाहतात. येण्याचें वचन देऊन तूं आली नाहींस आणि तळमळींत आमचा अंत झाला.

(१०) प्रेमाची व्यथा निर्माण करूं म्हटल्यानें निर्माण होऊं शकत नाहीं आणि असा कोणी प्रयत्न केल्यास त्याच्या पदरीं निराशा येते.

(११) वेडांत माणसें आपले कपडे फाडतात. कपडे फाडून झाल्यावर डोक्यावर हात आपटून घेतात ; पण आपटून आपटून हात नाहींसे झाले तर काय करावें ! कारण वेड्यांना गप्प बसवत नाहीं.

(१२) काव्याची ज्योत उजळणें कठीण आहे. त्याला प्रथम हृदयाची तळमळ आणि व्यथा संपादलीं पाहिजेत. त्याशिवाय काव्यदीपाला सौंदर्याचा साज चढत नाहीं.

२०० . . . इब्ने मरियम् हुव करे कोयी
मेरे दुख की दवा करे कोयी ॥ १ ॥

शरा व आईन् पर् मदार् सही
ऐसे क़ातिल का क्या करे कोयी ॥ २ ॥

चाल जैसे कडी कमान् का तीर्
दिल मे ऐसे के जा करे कोयी ॥ ३ ॥

बात पर् वां जबान् कटती है
वो कहें और् सुना करे कोयी ॥ ४ ॥

बक् रहा हूं जुनून् मे क्या क्या कुछ
कुछ न समझे ख़ुदा करे कोयी ॥ ५ ॥

न सुनो गर् बुरा कहे कोयी
न कहो गर् बुरा कहे कोयी ॥ ६ ॥

रोकलो गर ग़लत् चले कोयी
बख़्श् दो गर् ख़ता करे कोयी ॥ ७ ॥

कौन् है जो नहीं है हाजत्मंद
किस् की हाजत् रवा करे कोयी ॥ ८ ॥

क्या किया खिज़्र ने सिकंदर् से
अब् किसे रहनुमा करे कोयी ॥ ९ ॥
जब् तवक़्क़ोही उठ् गयी ग़ालिब्
क्यों किसी का गिला करे कोयी ॥ १० ॥

(१) कोणी येशु ख्रिस्त मृतांना जिवंत आणि पीडितांना बरे करणारा असेल, मला काय त्याचें. माझा रोग कोणी बरा करील, तर मी खरें म्हणेन.

(२) जग कायदेकानूप्रमाणें चाललें आहे. वध करणाऱ्यांना कायद्याप्रमाणें शिक्षा होते पण शिरच्छेद न करतां प्राण हरणाऱ्या प्रेयसींना कोण काय शिक्षा करणार !

(३) तिचें चालणें पाहून हृदयांतून बाण आरपार गेल्यासारखें वाटतें. तिच्या हृदयांत स्थान कसें मिळावें ?

(४) तिच्या समोर शब्द काढला कीं जीभ छाटली जाते. ह्याचा अर्थच असा कीं तिनें हवें तें बोलावें आणि आम्हीं ऐकून घ्यावें.

(५) वेडाच्या भरांत मी काय काय बडबडतों कुणास ठाऊक. देव करो आणि माझी वडबड कुणाला न समजो.

(६) तुम्हांला कोणीं वाईट म्हटलें तर ऐकून न ऐकल्यासारखें करा आणि कोणीं तुमचें वाईट केलें तर तिकडे दुर्लक्ष करा.

(७) कोणी रस्ता भटकत असेल तर त्याला थांबवा. कोणीं चूक केली असेल तर त्याला क्षमा करा.

(८) तुमची अडचण कोणीं दूर केली नाहीं तर त्यावर रागावूं नका कारण ज्याला अडचण नाहीं असा जगांत कोण आहे ?

(९) खिजर (स्वर्गाचा वाटाड्या) नें सिकंदरला अमृताजवळ नेलें पण सिकंदरला अमृत लाभलें नाहीं. जर खिजर सिकंदरला अमृताचा लाभ करून देण्यास असमर्थ ठरला तर मार्गदर्शक म्हणून कुणाला पत्करायचें ?

(१०) गालिब, आतां ज्या अर्थीं आशा नांवालाही शिल्लक राहिली नाहीं तर आतां कुणाच्या नांवानें कसलें गाऱ्हाणें करायचें ?

२०१ . . . बहोत् है ग़मे गीती शराब कम् क्या है
ग़ुलामे साक़ीये कौसर हूं मुझ्को ग़म् क्या है ॥ १ ॥
तुम्हारी तर्ज़े रविश् जान्ते हैं हम क्या है
रक़ीब् पर है अगर लुत्फ़ तो सितम् क्या है ॥ २ ॥
सुखन् मे ख़ामये ग़ालिब् की आतिश् अफ़्शानी
यक़ीन है हम्को भी लेकिन् अब् इस्मे दम् क्या है ॥ ३ ॥

(१) जीवन शोकमय आहें हें खरें पण मला हवी तितकी कृपेची मदिरा पाजणारे हजरत अली ह्यांचा मी दास आहें. मला कशाची वाण आहे ?

(२) तुला मी पूर्ण ओळखून आहें. तुझ्यावर मी जुल्म करीत नाहीं असें तूं म्हणतेस पण प्रतिस्पर्ध्यांवर तुझी कृपा म्हणजे आमचा छळ नाहीं तर काय आहे !

(३) गालिबचीं काव्यें म्हणजे स्फुलिंगें होतीं पण आतां त्यांच्यांत जीव राहिला नाहीं.

२०२ . . . बाग़ पाकर खफ़क़ानी ये डराता है मुझे
साययेशाख़े गुल्र् अफ़ई नज़र आता है मुझे ॥ १ ॥
जौहरे तेग़् बसरचश्मये दीगर् मालूम्
हूं वो सब्ज़ा के ज़हराब उगाता है मुझे ॥ २ ॥
मुद्दुआ महवे तमाशाये शिकस्ते दिल्र् है
आयीनाख़ानेमे कोयी लिये जाता है मुझे ॥ ३ ॥
नाला सरमाये यक आलम् व आलम् कफ़े खाक
आसमां बैज़ये क़ुमूरी नज़र आता है मुझे ॥ ४ ॥
ज़िंदगी मे तो वो महफ़िल्र् से उठा देते थे
देखूं अब् मर् गये पर कौन् उठाता है मुझे ॥ ५ ॥

(१) मला दुर्बल हृदयाचा समजून उपवन मला प्रत्येक वेळेस घाबरवीत असतें. बागेंतील फुलफांद्यांच्या सावलीनें तिला साप समजून मी घाबरून जातों.

(२) तलवारीच्या पात्यावर जी हिरवी छटा दिसते ती रसायन मिसळलेल्या पाण्यांत तलवार बुडविल्यानें निर्माण होते. माझें जीवन सुद्धां शोकरसायन मिसळलेल्या पाण्यांत बुडविल्यामुळें विशिष्ट प्रकारानें बहरलें आहे.

(३) ध्येयपूर्ति न झाल्यामुळें माझ्या हृदयरूपी आरशाचे शेंकडो तुकडे उडाले आहेत आणि माझ्या अतृप्त आकांक्षा ह्या तुकड्याकडे स्तिमित होऊन पाहात आहेत.

(४) हें जग मला तुच्छ वाटतें. हें जग आहे काय ? एक शोकगीताचें भांडवल आणि मूठभर धूळ. आकाश म्हणजे धुळीच्या रंगाचा आक्रंदन करणारा बुलबुल पक्षी आहे.

(५) मी जीवंत असतांना ती मला आपल्या मैफिलींतून उठवून लावीत असे. आतां बघावें, मी मेल्यावर माझें प्रेत कोण उचलील तें.

२०३ . . . रौंदी हुयी है कौकबये शहरयार् की
इत्राये क्यों न ख़ाक् सरे रहगुज़ार् की ॥ १ ॥

जब् उसके देखने के लिये आयें बादशाह्
लोगोंमे क्यौं नमूद् न हो लालाज़ार् की ॥ २ ॥
भूके नहीं हैं सैरे गुलिस्तांके के हम् व ले
क्यौंकर् न खाइये के हवा है बहार् की ॥ ३ ॥

(१) बादशहाच्या स्वारांनीं उडविली म्हणून रस्त्यावरची धूळ गर्व करीत आहे.

(२) ज्या उपवनाला बादशहा भेट देतात त्या उपवनाची प्रसिद्धि जनतेंत झाल्याशिवाय कशी राहील.

(३) उपवनाची सहल करण्याची आम्हांला हौस नाहीं पण वायूची विलक्षण मादकता आम्हांला तिकडे ओढून नेत आहे.

२०४ . . . हज़ारों ख़ाहिशें ऐसी के हर ख़ाहिश्पे दम् निक्ले
बहोत् निकले मेरे अर्मान् लेकिन् फिरभी कम् निक्ले ॥ १ ॥
डरे क्यौं मेरा क़ातिल क्या रहेगा उसकी गर्दन् पर्
वो ख़ूं जो चश्मेतर्से उम्रभर् यौं दम्बदम् निक्ले ॥ २ ॥
निकलना खुल्द से आदम् का सुनूते आये हैं लेकिन्
बहोत् बेआबरू होकर् तेरे कूचेसे हम् निक्ले ॥ ३ ॥
भरम् खुल जाये ज़ालिम् तेरे क़ामत् की दराज़ी का
अगर् इस् तुर्रये पुरपेचोख़म्का पेचोख़म् निक्ले ॥ ४ ॥
मगर् लिखवाये कोयी उसको ख़त् तो हम् से लिखवाये
हुयी सुब्ह और् घर्से कान् पर् रखकर् क़लम् निक्ले ॥ ५ ॥
हुयी इस् दौर् मे मन्सूब् मुझ्से बादा आशामी
फिर आया वो ज़माना जो जहां मे जामे जम् निक्ले ॥ ६ ॥
हुयी जिन्से तवक़्क़ो ख़स्तगीके दाद् पानेकी
वो हमसे भी ज़ियादा ख़स्तये तेग़े सितम् निक्ले ॥ ७ ॥
मोहब्बत मे नहीं है फ़र्क़ जीने और् मर्ने का
उसीको देखकर् जीते हैं जिस् काफ़िर् पे दम् निक्ले ॥ ८ ॥
कहां मय्ख़ाने का दरवाज़ा ग़ालिब और कहां वाइज़्
पर् इत्ना जानूते हैं कल वो जाता था के हम् निक्ले ॥ ९ ॥

(१) मला हजारों इच्छा आहेत त्या इतक्या उत्कट आणि तीव्र आहेत कीं प्रत्येक इच्छेवर जणु जीव चालला आहे असें वाटतें. कांहीं इच्छा तृप्त झाल्या तरी त्या अत्यल्पच होत्या. अतृप्त इच्छा पुष्कळच राहिल्या.

(२) माझा वध करणाऱ्याला विनाकारण भीति वाटते कीं माझें रक्त त्याला चिकटून राहील. माझ्या डोळ्यांतून रक्ताच्या धारा सारख्या वाहात आहेत. त्या वधकाच्या अंगावर चिकटून कशा राहातील.

(३) आदि मानव स्वर्गांतून भ्रष्ट आणि अवमानित होऊन पतित झाल्याची दंतकथा आम्ही ऐकत आलों, पण प्रिये, तुझ्या बैठकींतून जेव्हां आम्ही अवमानित होऊन बाहेर फेकले गेलों तेव्हां आम्हांला त्या कथेची सत्यता जाणवली.

(४) हे प्रिये, तुझा बांधा उंच असल्याचा भास होतो पण तुझ्या डोक्यावरील शिरपेंच आणि तुऱ्याचा अंदाज लागला कीं तुझ्या उंचीचा भ्रम नाहींसा होईल.

(५) प्रियेशीं बरेच प्रेमिक पत्रव्यवहार करीत असतील ह्या शंकेनें कवि म्हणतो कीं मी लेखकाचा धंदा पत्करला आहे. म्हणजे लोक माझ्याकडून पत्रें लिहिवितील आणि ह्या निमित्तानें ते काय मजकूर सांगू इच्छितात मला कळून येईल. माझ्याकडून तुमचीं पत्रें लिहिवलीं जावीं म्हणून मी कानाला लेखणी लावून दिवसभर शहरांतून फिरत आहें असें कवि म्हणतो.

(६) जमशीदचें मदिरापान प्रसिद्ध होतें. आतां जमशीद किंवा त्याचें मदिरापात्रही राहिलें नाहीं. पण माझ्या मदिरापानामुळें जमशीद आणि त्याच्या मधुपात्राची लोकांना पुन्हां आठवण होऊं लागली आहे.

(७) आम्ही पीडित म्हणून ज्यांच्यापाशीं दाद मागण्यास गेलों ते आपल्यापेक्षांही अधिक पीडित निघाले.

(८) प्रेमांत जीवनमरणांतील भेद नाहींसा होतो. जिच्याकरितां आमचा जीव चालला आहे तिच्याकडे पाहून आम्ही जगत आहोंत.

(९) मदिरालय कोठें आणि कोठें कट्टर धर्मप्रचारक. पण कालची मौज पाहा. आम्ही मदिरालयांतून बाहेर पडत होतों तों आम्हांला जाहिद (मौलवी) आंत प्रवेश करतांना दिसला.

२०५ . . . कोहके हों बारे ख़ातिर् गर् सदा हो जाइये
बे तकल्लुफ़ अये शरारे जस्ता क्या हो जाइये ॥ १ ॥
बैज़ा आसा नंगे बालोपर है ये कुंजे क़फ़स्
अज़् सरे नौ ज़िंदगी हो गर् रिहा हो जाइये ॥ २ ॥

(१) हे ठिणग्यांनो, आमचीं आक्रंदनें पर्वतांवर आदळून परत येतात म्हणजे तीं पर्वतांना नकोशीं झालीं आहेत. मग आम्हीं काय करावें. कवीचा आशय असा कीं आपण ठिणगी बनावें म्हणजे क्षणभर कां होईना मुक्तपणानें जळून नष्ट होतां येईल.

(२) माझें कारागार म्हणजे अंड्यासारखें संकुचित आहे. अंड्यांतून बाहेर पडल्या-वर पक्षी जसे मोकळेपणानें हिंडूं लागतात तसे ह्या कारागारांतून बाहेर पडलों कीं मला नवजीवन लाभेल.

२०६ . . . मस्ती बजौके ग़फ़लते साक़ी हलाक है
मौजे शराब् यक् मिज़हे ख़ाब्नाक् है ॥ १ ॥
जुज़ ज़ख़्मे तेग़े नाज़ नहीं दिल मे आरज़ू
जेबे ख़ियाल भी तेरे हातोंसे चाक है ॥ २ ॥
जोशे जुनूंसे कुछ नज़र् आता नहीं असद्
सहरा हमारी आंख मे यक मुश्ते ख़ाक है ॥ ३ ॥

(१) साकी (प्रिया) ची उपेक्षा आणि दुर्लक्ष करण्याची आकर्षक ढब काय वर्णावी ? तिच्यापुढें मदिरेची खुमारी म्हणजे कांहीं नाहीं. उलट ही लाल मदिरा पाहिली तर असें वाटतें कीं मधुपात्राचे रक्ताळलेले डोळे म्हणजेच ही मदिरा होय.

(२) माझें हृदय तुझ्या नाजनखऱ्याच्या खंजिरीनें विद्ध आहे. आतां त्यांत कोणताही भाव शिल्लक राहाण्यास जागा नाहीं.

(३) वेडाच्या आत्यंतिकतेंत आम्हांला आतां कांहीं दिसेनासें झालें आहे. एवढें विशाल वाळवंट समोर पसरलें आहे पण आमच्या नजरेंत तें मूठभर धुळीहून अधिक वाटत नाहीं.

२०७ . . . लबे ईसा की जुंबिश् करती है गहवारा जुंबानी
क़ियामत्कुश्तये लाले बुतांका ख़ाब संगीं है ॥ १ ॥

(१) मृतांना आपल्या मंत्रोच्चारानें येशूख्रिस्त जिवंत करी असें म्हणतात. पण सुंदरीच्या ओठांनीं हत झालेल्यावर ह्या मंत्राचा प्रभाव चालत नाहीं. उलट त्यांची निद्रा अधिक दीर्घ होण्याची शक्यता मात्र आहे.

२०८ . . . आमदे सैलाब् तूफ़ाने सदाये आब है
नक़्शेपा जो कान मे रखता है उंगली जादा है ॥ १ ॥
बज़्मे मय् वहशत्कदा है किस्की चश्मे मस्त का
शीशे मे नब्ज़े परी पिनहां है मौजे बादा से ॥ २ ॥
हूं मै भी तमाशाईये नैरंगे तमन्ना
मत्लब् नहीं कुछ इस्से के मत्लब् ही बर् आये ॥ १ ॥

सियाही जैसे गिरजाये दमे तहरीर् काग़ज़ पर्
मेरी क़िस्मत् मे यौं तस्वीर् है शबूहाये हिज़ां की ॥ २ ॥

(१) पदचिन्हांना कान आणि वाटेला बोटाची उपमा देण्यांत आली आहे. कवि म्हणतो समुद्रावर तुफान वादळाचा ध्वनि ऐकूं येऊं लागला आहे. तो कानीं पडून भीति वाटूं नये म्हणून पदचिन्हांनीं वाटेचीं बोटें आपल्या कानांत घातलीं आहेत. भीति ह्या गोष्टीची कीं समुद्राच्या तुफानानें पदचिन्हें नाहींशी व्हावयाचीं.

(२) कोणाच्या मादक डोळ्यामुळें मदिरेच्या मैफिलींत खळबळ उडाली आहे वरें. मदिरेच्या पात्रांत ती लाल वारुणीरूपी अप्सरासुद्धा लपून बसली आहे.

(१) आकांक्षा बाळगण्यानें त्या पूर्ण व्हाव्या हा हेतु नाहीं तर त्या आकांक्षांचा काय शेवट होतो आणि कसा होतो ह्याचा तमाशा पाहाणें हा हेतु आहे.

(२) लिहितां लिहितां कागदावर काळी शाई सांडावी तसें माझ्या नशिबावर विरहाची काळी रात्र पसरली आहे.

२०९ . . . हुज्से नालये हैरत् आजिज़ अरज़् यक् अफ़ग़ां है
खुमूशी रेशये सद् नेस्तांसे खस् बदंदां है ॥ १ ॥
तकल्लुफ़् बरतरफ़ है जांसितांतर् लुत्फे बदखूयां
निगाहे बेहिजाबे नाज़ तेग़े तेज़् उरियां है ॥ २ ॥
हुयी ये कसरते ग़म्से तलफ़् कैफ़ियते शादी
के सुबहे ईद् मुझको बदतर् अज़् चाके गरेबां है ॥ ३ ॥
दिल् व दीन् नक़द ला साक़ीसे गर् सौदा किया चाहे
के इस् बाज़ार्मे साग़र् मताये दस्त्गर्दां है ॥ ४ ॥
ग़म् आग़ोशे बला मे परवरिश् देता है आशिक् को
चिराग़े रोशन् अपना क़ल्ज़ुमे सरसर् का मर्जां है ॥ ५ ॥

(१) माझीं आक्रंदनें बाहेर पडूं इच्छितात पण सुन्न आणि स्तिमित होऊन बाहेर पडत नाहींत.

(२) तिनें आपले नयनशर सहज फेकले तरी आमचा वध होतो आणि आतां ती हेतुपुरःसर आणि उघडउघड आमच्याकडे कटाक्ष फेंकते आहे मग आमची काय दशा होईल ह्याची कल्पनाच केलेली बरी.

(३) माझा शोक इतका अपार आहे कीं आनंदांच्या सणाची प्रभात मला वेडाच्या भरांत कपडे फाडण्यास लावील इतकी शोकमय वाटते.

(४) तुला दारू हवी असेल तर हृदय आणि धर्म आधीं गहाण टाक कारण ह्या मैफिलींत उधारी चालत नाहीं.

(५) प्रेमिकाचें सगळें आयुष्य दुःख आणि संकटांत जातें. प्रेमिकाची प्रेमज्योत संकटाच्या तुफान वादळांतच वाढीला लागते. मरजान हा प्राणी समुद्राच्या तुफानांतही तग धरून राहातो त्याप्रमाणें आहे.

२१० . . . खुशियों मे तमाशा अदा निकल्ती है
निगाहे दिल्से तेरी सुर्मा सा निकल्ती है ॥ १ ॥
फ़िशारे तंगीये ख़िल्वत् से बनती है शबनम्
सबा जो गुंचे के परदे मे जा निकल्ती है ॥ २ ॥
न पूछ सीनये आशिक़्से आबे तेग़ी निगाह्
के ज़ख़्म रौज़न्ने दर्से हवा निकल्ती है ॥ ३ ॥

(१) तुझी दृष्टि स्तब्ध आहे. ज्यामुळें आवाज बसतो असा सुर्मा हृदयांत भरला आहे म्हणून कीं काय तुझी दृष्टि बोलत नाहीं.

(२) प्रभातकालीन वायूची लहर गुलाबाच्या कळ्यांत प्रवेश करती झाली. गुलाबानें तिच्याशीं एकांत साधला, लहरीचें लाजेमुळें पाणी पाणी झालें आणि लोक त्यालाच दंवबिंदु म्हणतात.

(३) प्रियेच्या नयनशरानें प्रेमिकाच्या हृदयाला किती जखम होते हें काय विचारतोस? अरे, दरवाजांना मोठीं भोकें पडून त्यांतून वारा येतो आहे ना. तीं भोकें प्रिया दरवाजांतून पाहात होती तेव्हां तिच्या कटाक्षामुळें पडलेलीं आहेत.

२११ . . . जिस् जा नसीम् शानाकशे ज़ुल्फ़े यार् है
नाफ़ा दिमाग़े आहूये दश्ते तितार है ॥ १ ॥
किस्का सुराग़े जल्वा है हैरत् को अय् ख़ुदा
आयीना फ़र्शे शशजिहते इंतिज़ार् है ॥ २ ॥
है ज़र्रा ज़र्रा तंगीये जाये ग़ुबारे शौक़्
गर् दाम् ये है वसअते सहरा शिकार् है ॥ ३ ॥
दिल् मुद्दई व दीदा बना मुद्दआले
नज़्ज़ारे का मुक़द्दमा फिर् रूबकार् है ॥ ४ ॥
छिड़्के है शबनम् आयीनये बर्गे गुल पर् आब
अये अंदलीब् वक्ते विदाए बहार् है ॥ ५ ॥

पेच आपडी है वादये दिल्दार् की मुझे
वो आये या न आये पे यां इंतिज़ार् है ॥ ६ ॥
बे पर्दा सूए वादीये मज्नूं गुज़र् न कर्
हर् जर्रे के नक़ाब् मे दिले बेक़रार् है ॥ ७ ॥
अय् अंदलीब् यक् कफ़े ख़स् बहरे आशियां
तूफ़ाने आमद् आमदे फ़स्ले बहार् है ॥ ८ ॥
दिल मत् गंवा ख़बर् न सही सैर् ही सही
अय् बेदिमाग़ आयीनये तिमसाल्दार है ॥ ९ ॥
ग़फ़लत् कफ़ीले उम्र व असद् ज़ामिने निशात्
अय् मर्गे नागहां तुझे क्या इंतिज़ार् है ॥ १० ॥

(१) वारा सुंदरीच्या सुगंधित केशकलापाशीं खेळतो. केसाचा सुगंध लांववर पसरत जाऊन कस्तुरीमृगाच्या डोक्यांत शिरून मृगाच्या डोक्याला सुगंधी करतो. जणूं कुणाला वाटावें कीं नाभीप्रमाणें मृगाच्या डोक्यांतही कस्तुरी सांठविली आहे.

(२) कुणाचें सौंदर्य पाहावें आणि चहूंकडून पाहावें म्हणून मनानें विस्मयाचे आरसे चोहोंकडे लावून ठेवले आहेत बरे.

(३) माझ्या आसक्तींचा प्रतिकूल परिस्थितीमुळें चक्काचूर झाला. त्याची धूळ उडून मरु प्रदेश व्यापून आहे.

(४) हृदयानें डोळ्यावर खटला भरला आहे. डोळ्यानें प्रेयसीचें सौंदर्य पाहिलें आणि त्यामुळें हृदयांतील रक्त वाहूं लागलें म्हणून हा खटला आहे.

(५) ईराणमध्यें कुणाला निरोप द्यावयाचा असला तर त्याच्या पाठीवर आरसा धरून त्या आरशावर पाणी शिंपडतात. कवि म्हणतो दंवबिंदू फुलझाडावर पडतात. तें आरशावरील पाणी होय आणि वसंतऋतूला निरोप देण्याची वेळ आली असें ते दंवबिंदू कोकिळेला सुचवितात.

(६) प्रियेनें येण्याचें वचन दिलें आहे त्यामुळें पेंच पडला आहे; कारण ती येवो अथवा न येवो मला तर तिची प्रतीक्षा करणें भाग आहे.

(७) अगे लैला, बेपडदा होऊन तूं मजनूंच्या वनांत जाऊं नकोस कारण तेंथील कणाकणांतून मजनूंचें तळमळणारें हृदय दडलें आहे.

(८) हे कोकिळे, घरटें बांधण्यास वाळलेलें तृण झटकन गोळा करूं लाग कसें. तो बघ वसंतऋतु येऊं पाहात आहे. मग तुला वाळलेलें गवत मिळायचें नाहीं.

(९) हे हृदया, तुला परमेश्वराचा साक्षात्कार होत नसेल तर हरकत नाहीं. सुंदरीचा तरी साक्षात्कार होऊं दे.

(१०) ऐषआरामांत काळ कंठणाऱ्यांना अचानक मृत्यु येतो असा संकेत आहे. कवि म्हणतो कीं हे मृत्यो, आम्ही ऐषआरामांत आणि तुला विसरून जीवन कंठीत आहोंत. मग तूं अचानकपणें येत कां नाहींस.

२१२ . . . आयीना क्यौं न दूं के तमाशा कहें जिसे
ऐसा कहांसे लावूं के तुझसा कहें जिसे ॥ १ ॥
हस्रत्ने लारखा तेरी बज़्मे ख़ियाल्ह मे
गुल्दस्तये निगाहे सुवेदा कहें जिसे ॥ २ ॥
फूंका है किस्ने गोशे मोहोब्बत् मे अय् ख़ुदा
अफ़्सूने इंतिज़ार् तमन्ना कहें जिसे ॥ ३ ॥
सरपर् हुजूमे दर्दे ग़रीबीसे डालिये
वो एक् मुश्ते खाक् के सहरा कहें जिसे ॥ ४ ॥
है चश्मे तर् मे हस्रते दीदार्से निहां
शौक़े इनान् गुसेख़्ता दरिया कहें जिसे ॥ ५ ॥
दरकार् है शिगिफ़्तने गुल्हाये ऐश् को
सुब्हे बहार् पंबये मीना कहें जिसे ॥ ६ ॥
ग़ालिब बुरा न मान् जो वाइज़ बुरा कहे
ऐसा भी कोयी हैं के सब् अच्छा कहें जिसे ॥ ७ ॥

(१) तुझ्यासारखी सुंदर स्त्री कोठून आणूं. थांब, तुला आरसा आणून देतों म्हणजे तूं आपलें रूप न्याहाळशील आणि तुझा विस्मय पाहून माझी करमणूक होईल.

(२) माझ्या हुरहुरीनें हृदयांत तुझे कटाक्ष आणून ठेविले आहेत आणि ते हृदयाचे मर्मस्थळ बनले आहेत.

(३) हे परमेश्वरा, प्रेमाच्या कानांत कुणी बरें प्रियेसाठीं लागणाऱ्या तळमळीचा मंत्र फुंकला आहे ?

(४) परदेशांत संकटामुळें डोक्यांत माती घालावी असें वाटतें. ती थोडी थोडकी नसून लोकांना वाटावें कीं सगळें वाळवंट जणूं मी डोक्यावर घेत आहें.

(५) प्रियेला पाहाणाऱ्या तळमळीमुळें माझ्या डोळ्यांत इतके अश्रु येऊन थबकले आहेत कीं त्यांना समुद्राचीच उपमा साजेल.

(६) सकाळच्या कापसासारख्या पांढऱ्या प्रकाशांत फुलें उमलतात पण आमच्या हृदयाचीं फुलें दारूच्या पांढऱ्याशुभ्र पात्रांनींच खुलतात.

(७) गालिब, तो कट्टर धर्मप्रचारक तुला वाईट म्हणत असेल तर वाईट वाटून घेऊं नकोस. सगळेच ज्याला चांगला म्हणतात असा जगांत कोणी असेल काय ?

२१३ . . . शब्नम् ब गुलेलाला न खाली अज़् अदा है
दाग़े दिले बेदरद् नज़रगाहे हया है ॥ १ ॥
दिल खूंशुदये कश्मकशे हस्रते दीदार्
आयीना बदस्ते बुते बदमस्त् हिना है ॥ २ ॥
शोलेसे न होती हवसे शोलेने जो की
जी किस्क़दर् अफ़्सुर्दगीये दिल पे जिला है ॥ ३ ॥
तिम्सालमे तेरी है वो शोख़ी के बसद् ज़ौक़
आयीना बअंदाज़े गुल आग़ोश कुशा है ॥ ४ ॥
क़ुम्री कफ़े ख़ाकस्तर् व बुल्बुल क़फ़से रंग
अय् नाला निशाने जिगरे सोख़्ता क्या है ॥ ५ ॥
खूने तेरी अफ़्सुर्दा किया वहशते दिलको
माशूक़ी व बेहौसलगीये तर्ज़ बला है ॥ ६ ॥
मजबूरी व दावये गिरफ़्तारीये उल्फ़त्
दस्ते तहे संग् आमदा पैमाने वफ़ा है ॥ ७ ॥
मालूम हुवा हाले शहीदाने गुज़िश्ता
तेग़े सितम् आयीनये तस्वीर्नुमा है ॥ ८ ॥
अय् परतवे ख़ुर्शीदे जहांताब् इधर भी
साये की तरह हम्पे अजब् वक्त पडा है ॥ ९ ॥
नाकर्दा गुनाहोंकी भी हस्रत् की मिले दाद्
यारब् अगर इन् कर्दा गुनाहों की सज़ा है ॥ १० ॥
बेगानगीये खल्क़् से बेदिल न हो ग़ालिब्
कोयी न हो तेरा तो मेरी जान खुदा है ॥ ११ ॥

(१) फुलावरचे दंवबिंदु निरर्थक नाहींत. हृदयांत व्यथा आणि तळमळ नसेल तर व्यर्थ होय. फुलें निष्ठुर असतात. आपल्याला तळमळ नाहीं ह्याची त्यांना लाज वाटून त्यांना घाम आला. त्यालाच दंवबिंदु म्हणतात.

(२) तिला पाहाण्याच्या तळमळींत हृदयाचें रक्त वाहूं लागलें. हें रक्त प्रियेच्या हाताची मेहंदी होय. ह्या मेहंदीकडे प्रिया आरशांत पाहावें तशी सतत पाहात असते. जणू काय माझ्या रक्तानें बनलेली मेहंदी तिला आरशासारखी भासूं लागली.

(३) प्रेमाग्नीनें मी जितका जळत आहें तितका खऱ्या अग्नीनें जळलों नसेन. माझ्या मनःस्थितीमुळें मी अग्नीपेक्षांही जास्त दाहकपणें जळत आहें.

(४) तुझ्या प्रतिबिंबित सौंदर्याच्या मादकपणाला भुलून आरसा उमललेल्या फुलाप्रमाणें विकसला आहे. हेतु हा कीं तुझें सौंदर्य आपल्यांत पूर्णपणें सामावलें जावें.

(५) कुमरी पक्षी म्हणजे सुरूचा प्रियकर हा प्रेमशोकांत जळून राखेचा रंग धारण करीत आहे आणि फुलांचा प्रियकर बुलबुल प्रेमांत नष्ट होऊन फक्त रंगाच्या रूपानें शिल्लक आहे. त्याच्यांत जीव राहिला नाहीं. हा रंगही फुलामुळेंच शिल्लक राहिला आहे. म्हणजे राखेमुळें कुमरी पक्षी आणि रंगामुळें बुलबुल ह्यांचा पत्ता तरी मिळतो पण माझ्या दग्ध काळजाचा पत्ता कसा लागावा.

(६) हे प्रिये, तुझ्या प्रेमामुळें माझें हृदय तळमळत आहे. ती तळमळ वाढविणें तुझ्या हातांत आहे पण तूं उपेक्षा करूं लागल्यामुळें ती तळमळ नाहींशी होऊं लागली हें मोठें संकट माझ्या नशिबीं आलें आहे.

(७) लाचारीच्या अवस्थेंत, प्रेम करण्याचा दावा मांडणें म्हणजे जड दगडाखालीं हात सांपडल्यासारखें आहे. वर वर म्हणायला आमचें प्रेम यशस्वी आहे असें हे प्रेमिक म्हणतात पण आंतून त्यांची लाचारी जाणवल्याशिवाय राहात नाहीं.

(८) तुझ्या हातांतील छळाची तलवार पाहूनच तुझ्या हातून हत झालेल्यांची स्थिति काय झाली हें समजण्यासारखें आहे. कारण तुझी तलवार म्हणजे आरशासारखी आहे. त्यांत वरील छळाचें स्पष्ट प्रतिबिंब दिसून येतें.

(९) हे परमेश्वरा, आम्ही सावलीला सत्य समजण्याच्या भ्रमांत सांपडलों आहोंत. तुझी कृपादृष्टि यत्किंचित जरी आमच्याकडे वळली (तुझ्या कृपेचा एक किरण जरी आमच्या वाट्याला आला) तरी आमचे भ्रम नाहींसे होतील.

(१०) परमेश्वरा, केलेल्या पापाची शिक्षा आम्हांला मिळणार असेल तर जीं पापें मनांत आलीं पण आम्ही करूं शकलों नाहींत त्याबद्दल पण आम्हांला शिक्षा झाली पाहिजे ना ?

(११) लोक आपल्याला विचारीत नाहींत म्हणून उदास होऊं नकोस. कोणी नसला तरी विचारणारा परमेश्वर पाठीशीं आहे ना ?

२१४ . . . मंज़ूर थी ये शक्ल तजल्ली को नूर की
क़िस्मत् खुली तेरे क़दोरुख़् के ज़ुहूर् की ॥ १ ॥

इक ख़ूंचिकां कफ़न् मे करोडों बनाव हैं
पड़ती है आंख तेरे शहीदोंपे हूर की ॥ २ ॥
वाइज़् न तुम् पियो न किसीको पिला सको
क्या बात् है तुम्हारे शराबे तहूर की ॥ ३ ॥
आमद् बहार की है जो बुल्बुल है नग़मा संज
उडतीसी एक ख़बर है ज़बानी तुयूर की ॥ ४ ॥
लडता है मुझ्से हश्र मे क़ातिल के क्यौं उठा
गोया अभी सुनी नहीं आवाज़ सूर की ॥ ५ ॥
गो वां नहीं पे वांके निकाले हुये तो हैं
काबेसे इन् बुतोंको भी निस्बत् है दूर् की ॥ ६ ॥
क्या फ़र्ज़ है के सब् को मिले एकसाजवाब्
आवो न हम् भी सैर् करें कोहे तूर की ॥ ७ ॥
गरमी सही कलाम मे लेकिन् न इसक़दर्
की जिस्से बात् उस्ने शिकायत जरूर् की ॥ ८ ॥
ग़ालिब् गर् इस् सफ़र् मे मुझे साथ ले चलें
हज् का सवाब् नज़र करूंगा हुज़ूर् की ॥ ९ ॥

(१) सौंदर्याला सुंदर बांधा आणि रूप ह्यांची प्रतीक्षा होती. तूं लाभतांच सौंदर्याचें भाग्य उजळलें.

(२) तुझ्या हातानें वध झालेल्या प्रेमिकांचें वैभव काय वर्णावें? रक्तरंजित कफनांत लपेटलेलीं त्यांचीं शरीरें पाहून अप्सरा त्यांच्यावर मोहित होतील.

(३) अरे धर्मप्रवचनकारा, तूं स्वर्गीय सुधेची थोरवी वर्णन करीत आहेस. जी तूं पिऊं शकत नाहींस आणि दुसऱ्याला पाजूं शकत नाहींस असली कसली रे ती सुधा. ती कल्पनेची सुधा असेल.

(४) वसंतऋतूचें आगमन होणार अशी उडत उडत बातमी आली आहे. तो पाहा बुलबुल गीतें गाऊं लागला आहे.

(५) कल्पांताच्या दिवशीं परमेश्वराच्या दूतानें शिंग फुंकलें कीं मृत माणसें उठून बसतात अशी कल्पना आहे. प्रेमिक असाच उठून बसला तर प्रेयसीला राग आला कीं माझ्या आज्ञेशिवाय हा परत उठला कसा म्हणून.

(६) मूर्ती आतां काव्यांत नाहींत पण काव्यांतूनच काढून टाकलेल्या आहेत ना. म्हणजे दूरचा कां होईना मूर्तींचा आणि काव्याचा संबंध आहेच ना !

(७) चला आपणही टारस पर्वताची सहल करूं या. पैगंबर मोझेसला परमेश्वरानें दिलें तेंच उत्तर आपल्याला मिळेल कशावरून ? त्यापेक्षां अधिक आशादायक उत्तर आपल्याला कदाचित् मिळेल.

(८) वाणींत जोम पाहिजे पण इतकाही नको कीं लोकांना गाऱ्हाणें करावेंसें वाटेल. वाणींत संयम आणि समतोलपणा पाहिजे.

(९) बादशहांनीं मला मक्केच्या यात्रेंत बरोबर नेण्याचें ठरविलें, तर यात्रेचें सगळें पुण्य मी त्यांना नजर करण्यास तयार आहें.

२१५... ग़म् खाने मे बोदा दिल् नाकाम् बहोत् है
ये रंज के कम् है मये गुल्फ़ाम् बहोत है ॥ १ ॥
कहते हुये साक़ीसे हया आती है वर्ना
है यौं के मुझे दुर्दे तहे जाम् बहोत् है ॥ २ ॥
नै तीर् कमान् मे है न सय्याद् कमीन् मे
गोशे मे क़फ़स् के मुझे आराम् बहोत् है ॥ ३ ॥
क्या ज़हद को मानूं के न हो गर्चे रियायी
पादाशे अमल्की तमअे खाम बहोत् है ॥ ४ ॥
हैं अहले खिरद् किस रविशे खास् पे नाज़ां
पाबस्तगीये रस्मोरहे आम् बहोत् है ॥ ५ ॥
ज़म्ज़मूहीपे छोडो मुझे क्या तौफ़े हरम्से
आलूदा ब मय् जामये इहराम् बहोत् है ॥ ६ ॥
है क़हर् गर् अबभी न बने बात् के उन्को
इन्कार् नहीं और मुझे इब्राम् बहोत है ॥ ७ ॥
खूं होके जिगर आंखसे टप्का नही अय् मर्ग
रहने दे मुझे यां के अभी काम बहोत् है ॥ ८ ॥
होगा कोयी ऐसा भी के ग़ालिब् को न जाने
शाइर् तो वो अच्छा है पे बद्नाम् बहोत् है ॥ ९ ॥

(१) माझें हृदय भारीच दुबळें बनलें आहे. एवढेंसें दुःखसुद्धां त्याला सहन होत नाहीं. आज पिण्यास मदिरा थोडी आहे ह्याचेंच दुःख त्याला भारी वाटत आहे.

(२) साकीला सांगायला मला लाज वाटते पण खरी गोष्ट अशी कीं मदिरापात्राच्या तळाशीं उरलेली मदिरा मला फार आवडते. पण मी किती हलक्या रुचीचा आहें असें साकी समजेल म्हणून मी गप्प आहें.

(३) धनुष्याला बाण जोडला नाहीं कीं परिसरांत व्याध नाहीं. ह्या कारागारांत मला विलक्षण स्वस्थता अनुभवास येत आहे.

(४) ज्या उपासनेंत कामना आहे ती उपासना काय कामाची. असली उपासना सदोष होय. कारण परलोकीं सुखें मिळावीं हा त्या मागील हेतु असतो.

(५) चार लोकांसारखे आपण वागतों ह्या गोष्टीचा बुद्धिमान अभिमान बाळगतात. ह्यांत मला कांहीं वैशिष्ट्य वाटत नाहीं. कांहीं तरी असाधारण हे लोक करून दाखवितील तर ती खरी बुद्धिमत्ता म्हणावी.

(६) मला जम्‌जम्‌च्या पवित्र विहिरीवर बसून राहूं द्या कसें. मला हरम (पवित्र स्थळ) ची प्रदक्षिणा घेऊन काय करावयाचें आहे. माझे यात्रेकरूचे कपडे मद्यानें भरले आहेत.

(७) माझी विनवणी आहे आणि तिची संमति आहे. ह्या उपरही मीलन झालें नाहीं तर माझें दुर्दैव म्हणावें लागेल.

(८) हे मृत्यो, मला अजून प्रेमाचा आघात होऊन डोळ्यावाटे रक्त वाहात नाहीं. तूं येण्याची घाई करूं नकोस, मला जीवनाच्या सुखदुःखाचे अनुभव अजून घ्यावयाचे आहेत.

(९) गालिबला न ओळखणारा कोणी सांपडणार नाहीं कारण तो बदनाम आहे. पण खरें म्हटलें तर तो उत्तमपैकीं कवि पण आहे.

२१६ . . . मुद्दत हुयी है यार्‌को मेहमां किये हुये
जोशे क़दह्‌से वज़्मे चराग़ां किये हुये ॥ १ ॥
कर्‌ता हूं जमा फिर जिगरे लख़्तलख़्त को
अर्सा हुआ है दावते मिज़गां किये हुये ॥ २ ॥
फिर् वज़ए एहतियातसे रुकने लगा है दम्
बर्सों हुये हैं चाके गरेबां किये हुये ॥ ३ ॥
फिर् गर्मे नालाहाये शरर्‌बार है नफ़स्
मुद्दत् हुयी है सैरे चराग़ां किये हुये ॥ ४ ॥
फिर पुर्सिशे जराहते दिलको चला है इश्क़
सामाने सद्‌हज़ार नमक्‌दां किये हुये ॥ ५ ॥
फिर भररहाहूं ख़ामए मिज़गां बख़ूने दिल
साज़े चमन्‌तराज़ीये दामां किये हुये ॥ ६ ॥
बा हम्‌दिगर हुये हैं दिलोदीदा फिर रक़ीब
नज़्ज़ारा व ख़ियाल्‌ का सामां किये हुये ॥ ७ ॥

दिल् फिर् तवाफ़् कूये मलामत् को जाये है
पिंदारका सनमकदा वीरां कियेहुये ॥ ८ ॥
फिर् शौक़ कर्‌रहा है ख़रीदार् की तलब्
अर्ज़े मताए अक्लो दिलो जां किये हुये ॥ ९ ॥
दौडे है फिर् हर एक् गुलो लाला पर खियाल
सद् गुल्‌सितां निगाह् का सामां किये हुये ॥ १० ॥
फिर् चाहता हूं नामये दिल्दार् खोल्‌ना
जां नज़्रे दिल फ़रेबीए उन्वां किये हुये ॥ ११ ॥
मांगे हैं फिर् किसी को लबे बाम् पर हवस्
ज़ुल्फ़े सियाह रुख़्पे परीशां किये हुये ॥ १२ ॥
चाहे है फिर् किसी को मुक़ाबिल मे आरज़ू
सुर्मेसे तेज़् दश्नये मिज़गां किये हुये ॥ १३ ॥
इक् नौबहारे नाज़् को ताके है फिर निगाह
चेहरा फ़रोगे मय् से गुलिस्तां किये हुये ॥ १४ ॥
फिर जी मे है के दर पे किसी के पडे रहें
सर ज़ेर बारे मिन्नते दरबां किये हुये ॥ १५ ॥
जी ढूंडता है फिर वही फ़ुर्सत् के रातदिन्
बैठे रहें तसव्वुरे जानाँ किये हुयें ॥ १६ ॥
ग़ालिब् हमें न छेड् के फिर् जोशे अश्क से
बैठे हैं हम् तहीये तूफ़ां किये हुये ॥ १७ ॥

(१) प्रियेला पाहुणी करून आणि तिच्या स्वागतार्थ मैफिली सजवून आणि घरांत दिवाळीची आरास करून अनेक दिवस झाले.

(२) आतां ती पुन्हा येणार म्हणून हृदयाचे इतस्ततः विखुरलेले तुकडे पुन्हा एकत्र करीत आहें. कारण हृदय भग्न करण्याकरितां म्हणून तिच्या पापण्यांना आमंत्रण देऊन बरेच दिवस झाले.

(३) आतां पुन्हा जीव गुदमरूं लागला आहे. प्रेमवेडांत स्वतःचे कपडे फाडून टाकल्याला अनेक दिवस झाले. आतां प्रिया पुन्हा येणार म्हणून पहिल्यासारखी मनःस्थिति होऊं लागली आहे.

(४) फिरून निश्वासांची दाहकता दिसून येऊं लागली आहे. दाहक निश्वासांनीं दिव्यासारखी आरास झालेल्याला पुष्कळ दिवस झाले.

(५) हृदयाच्या भग्नावस्थेची विचारपूस करण्याकरितां प्रेम पुन्हा वाट चालूं लागलें आहे. आणि जखमांवर मीठ शिंपडण्याकरितां प्रेमानें आपल्याबरोबर मिठाच्या अगणित पेट्या घेतल्या आहेत.

(६) माझ्या पापण्यांची लेखणी मी पुन्हा हृदयाच्या रक्तांत बुडवीत आहें. त्या लेखणीनें मला आपल्या कपड्यावर रंग उमटवायचे आहेत.

(७) हृदयाला प्रियेच्या चिंतनांत म्हणून आणि डोळ्यांना प्रियेच्या दर्शनाकरितां म्हणून आपसांत चढाओढ लागली आहे.

(८) अहंकाराचें आसन उध्वस्त करून हृदय पुन्हा अवमान आणि अवहेलनेची वाट चालूं लागलें आहे.

(९) रसिकतेनें विक्रीकरितां म्हणून पुन्हा आपली बुद्धि, हृदय आणि प्राण बाजारांत मांडले आहेत.

(१०) दृष्टि पुन्हा पुन्हा आपली सारी शक्ति एकवटून फुलांनीं बहरलेल्या उपवनाकडे वळत आहे.

(११) प्रियेचें पत्र उघडून त्याच्या आकर्षक शीर्षकावर पुन्हा जीव ओवाळून टाकावा असें वाटूं लागलें आहे.

(१२) प्रिया आपले केश मुक्त सोडून पुन्हा गच्चीवर यावी असें मनाला पुन्हा पुन्हा वाटूं लागलें आहे.

(१३) कुणीतरी डोळ्यांना सुर्मा लावून आपले शर तीक्ष्ण करून समोर येऊन बसावें असें पुन्हा वाटूं लागलें आहे.

(१४) वारुणी पिऊन जिचा सुंदर चेहरा उजळून निघाला आहे अशा प्रमदेकडे पाहाण्याकरितां डोळे पुन्हा उत्कंठित झाले आहेत.

(१५) कुणाच्या तरी उंबरठ्यावर डोकें टेकून आणि रखवालदाराचे ऋणी होऊन पडावें असें पुन्हा वाटूं लागलें आहे.

(१६) दिवसरात्र प्रियेचें चिंतन करीत बसावें असें मनाला रात्रंदिवस वाटूं लागलें आहे.

(१७) गालिब, आम्हाला छेडूं नकोस बरें. आमचें ऊर भरून आलें आहे आणि आम्ही वादळाची तयारी करून बसलों आहोंत.

२१७ . . . नवीदे अमन है बेदादे दोस्त् जान् के लिये
रही न तर्ज़े सितम् कोयी आस्मां के लिये ॥ १ ॥

बलासे गर् मिज़हे यार् तश्नये खूं है
रखूं कुछ अपनी भी मिज़गाने खूंफ़िशां के लिये ॥ २ ॥
वो ज़िंदा हम हैं के हैं रूशिनासे खल्क़ अये खिज्र्
न तुम् के चोर् बने उम्रे जाविदां के लिये ॥ ३ ॥
रहा बलामे भी मै मुब्तिलाये आफ़ते रश्क
बलाये जान् है अदा तेरी इक् जहां के लिये ॥ ४ ॥
फ़लक् न दूर् रख् उससे मुझे के मै ही नहीं
दराज़दस्तीये क़ातिल् के इम्तिहां के लिये ॥ ५ ॥
मिसाल ये मेरी कोशिश् की है के मुर्गे असीर्
करे क़फ़स् मे फ़राहम् खस् आशियां के लिये ॥ ६ ॥
गदा समझके वो चुप् था मेरी जो शामत् आयी
उठा और् उठ्के क़दम् मैने पासबां के लिये ॥ ७ ॥
बक़द्रे शौक़ नहीं ज़र्फे तंगनाये गज़ल
कुछ और् चाहिये वसअत् मेरे बयां के लिये ॥ ८ ॥
दिया है खल्क़ को भी ता उसे नज़र् न लगे
बना है ऐश् तजमल हुसेन् खां के लिये ॥ ९ ॥
ज़बां पे बारे खुदाया ये किस् का नाम् आया
के मेरे नुत्क़ ने बोसे मेरी ज़बां के लिये ॥ १० ॥
नसीरे दौलत् व दीन् और मुईने मिल्लत् व मुल्क्
बना है चर्ख बरीं जिस्की आस्तां के लिये ॥ ११ ॥
जमाना अहद मे उसके है महवे आराइश्
बनेंगे और् सितारे अब् आसमां के लिये ॥ १२ ॥
वरक़ तमाम् हुवा और मदह्न बाक़ी है
सफ़ीना चाहिये इस बहरे बेकरां के लिये ॥ १३ ॥
अदाये खास से ग़ालिब् हुवा है नुक्ता सरा
सलाये आम् है याराने नुक्तादां केलिये ॥ १४ ॥

(१) माझ्याकडे दुर्लक्ष करणारी तरुणी बरी कारण माझ्या प्रियेनें छळ करण्याची कोणतीही तऱ्हा शिल्लक ठेविली नाहीं.

(२) प्रियेच्या पापण्यांना माझें रक्त हवें आहे पण मी तें सर्व देणार नाहीं. कारण मला डोळ्यांवाटे वाहण्याकरितां रक्त नको का ?

(३) हे खिजर्, (हा चिरंजीव समजतात) तुझें दीर्घायुष्य काय कामाचें ? तूं कुणाला दिसत नाहींस कीं कुणाला भेटत नाहींस. चोरासारखें तुझें जीवन आहे. आमचें पाहा. ह्या अल्पजीवनांत आमचें नांव सर्वतोमुखीं झालें आहे.

(४) तूं माझा छळ करतेस पण मला त्यांतही हेवा वाटतो. तो ह्याकरितां कीं तूं सगळ्या जगाला छळतेस तें कां ? तुझा छळ फक्त माझ्या वांट्याला यायला हवा. त्यांत दुसऱ्यांना वांटा काय म्हणून मिळावा ?

(५) शिकार दूर असली तरच तिला धरण्यांत शिकाऱ्याचें कौशल्य आहे म्हणून कां हे काला, मला तूं प्रियेपासून दूर ठेवलेंस ? हा प्रयोग करून पाहाण्याकरितां मीच कां तुला सांपडलों ?

(६) माझे सारे प्रयत्न निरर्थक आहेत. कारागारांत सांपडलेल्या पक्ष्यानें घरटें बांधण्याच्या हेतूनें गवताच्या काड्या गोळा करण्याचा प्रयत्न करावा तसें माझें झालें आहे.

(७) मला भिकारी समजून तिच्या घरचा रखवालदार गप्प होता. पण माझें दुर्दैव. त्याचे पाय धरण्याची बुद्धि मला आठवली आणि म्हणून माझें स्वरूप त्याला उमगलें.

(८) माझ्या वाणीला गज़लाचा पद्यप्रकार अपुरा पडतो. माझे विचार व्यक्त करण्यास गज़लाहून विशाल असें वृत्त हवें.

(९) परमेश्वरानें बहुतेक वैभव तजमल हुसेन खां (फर्रुखाबादचा नवाब) ला दिलें आहे. उरलेलें थोडें वैभव इतरांच्या वांट्याला दिलें आहे. हेतु हा कीं नवाबाला कुणाची दृष्ट लागूं नये.

(१०) नवाबांचें नांव जिभेवर येतांच माझ्या यशानें प्रेमानें माझ्या जिभेचें चुंबन घेतलें.

(११) नवाबसाहेब हे धर्मरक्षक आणि देशरक्षक आहेत. नियति स्वतः त्यांचा उंबरठा बनली आहे.

(१२) नवाबाच्या राजवटींत प्रत्येक वस्तु सुंदर रूप धारण करीत आहे आणि नवनवे शृंगार करीत आहे. कदाचित् आकाशालाही आपल्या शृंगाराकरितां नवीन तारे निर्माण करावे लागतील.

(१३) नवाबाची स्तुति करतांना कागद पुरत नाहींत. त्या अथांग गुणसमुद्राकरितां असंख्य कागद लागतील.

(१४) आज मी पूर्वसंकेत सोडून गज़लांतून स्तुति-गीतें रचलीं आहेत. इतरांनींही अनुकरण करावें.

REFBK-0010566

REFBK-0010566